
# सातारचे प्रतिसरकार :
## स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती



लेखक
**ल.ग. कुलकर्णी उर्फ**
**धन्वंतरी कासेगांवकर वैद्य**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# सातारचे प्रतिसरकार : स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती

– लेखक –
ल.ग. कुलकर्णी
ऊर्फ धन्वंतरी कासेगावकर वैद्य

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

वाय ५९-१

➢ **पुस्तकाचे नाव** : 'सातारचे प्रतिसरकार : स्वातंत्र्यलढ्याच्या स्मृती'

➢ **संपादक** : ल. ग. कुलकर्णी उर्फ धन्वंतरी कासेगांवकर (वैद्य)

➢ **प्रथमावृत्ती** : १९८८

➢ **पुनर्मुद्रण :** २०२२

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

➢ © **प्रकाशकाधीन :**

➢ **मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.

➢ **किंमत : रुपये ६५/-**

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने स्थापनेपासून उत्तमोत्तम ग्रंथांची निर्मिती केली आहे. मंडळाने प्रकाशित केलेल्या बऱ्याच महत्त्वपूर्ण ग्रंथांच्या प्रती आजमितीस संपुष्टात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मंडळाची ही मौलिक प्रकाशने वाचकांना उपलब्ध करून द्यावीत या हेतूने या ग्रंथाचे पुनर्मुद्रण करतांना मंडळास मनापासून आनंद होत आहे.

**डॉ. सदानंद मोरे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

# निवेदन

आपल्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाची उपलब्ध साधने प्रसिद्ध करण्याचे साहित्य संस्कृती मंडळाचे धोरण आहे. कारण त्यातून भारतीय स्वातंत्र्याचा आणि त्या लढ्यातील महाराष्ट्राच्या सहभागाचा इतिहास साकार होऊन जनतेसमोर येणार आहे.

आपल्या स्वातंत्र्याच्या चळवळीत साताऱ्याच्या पत्री सरकारचे अनन्य साधारण महत्त्व आहे. श्री. अच्युतराव पटवर्धन, श्री. अप्पासाहेब पंत यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतिसिंह नाना पाटील यांनी वाळवा, कुंडल भागात प्रति सरकारची स्थापना करुन ब्रिटिश सत्तेविरुद्ध रणशिंग फुंकले. कै. धन्वंतरी कासेगांवकर वैद्य हे या लढ्यातील एक अग्रगण्य असे व्यक्तिमत्व होते. या लढ्यात कासेगांवकर वैद्य यांनी मोलाची कामगिरी तर बजावली होती. पण ते एवढ्यावरच थांबले नाहीत. त्या काळात नियमितपणे त्यांनी आपली डायरी पण लिहून ठेवली. या डायरीचा पुढील इतिहासकारांना निश्चितच उपयोग होईल. ही डायरी ''सातारचे प्रति सरकार:स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती'' या नावाने आता प्रसिद्ध होत आहे.

या ग्रंथाचे प्रकाशन साहित्य संस्कृती मंडळाकडे सोपविल्याबद्दल कै. कासेगांवकर यांचे चिरंजीव श्री. मो.ल. कुलकर्णी आणि या ग्रंथाचे सर्व संपादक डॉ. वा.ना. कुबेर, श्री. डी.जी. देशपांडे आणि श्री. शेखकाका यांचे मंडळ ऋणी आहे. कविवर्य नारायण सुर्वे यांनीही या ग्रंथावरून शेवटचा हात फिरवला आहे. मंडळ त्यांचेही ऋणी आहे.

श्री. अप्पासाहेब पंत यांनी या ग्रंथाला प्रस्तावना लिहून दिल्यामुळे या ग्रंथाचे मोल आणखीच वाढले आहे. हा ग्रंथ लवकरात लवकर प्रकाशित करण्यास ज्यांनी ज्यांनी सहाय्य केले त्या सर्वांचे उतराई होणे कठिण. त्यांच्या ऋणातच राहणे योग्य व्हावे.

४२, यशोधन,
मुंबई-४०० ०२०.
दि. ३१ मे, १९८८

सुरेन्द्र बारलिंगे
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

# प्रस्तावना

जातीचा क्रांतिवीर कसा असतो? कसा बोलतो? काय खातो? कसा वागतो? इतरांशी व्यवहार कसा व कसला करतो? मैत्री, लोकसंग्रह करताना कोणते नियम—शिस्त पाळतो? आमच्या "धन्वंतरी" कासेगांवकर वैद्य यांचे हे सुंदर, साधे, सहज स्फुरणारे सोज्वळ सत्य आत्मनिवेदन वाचल्याने हे सर्व समजेल.

"धन्वंतरी" यांचा पिंडच बंडाचा, अन्यायाविरुद्ध लढण्याचा. निःस्पृह, निगर्वी, धाडसी पण सूज्ञही; शरीर व मन कसलेले, स्वतःच्या ताब्यात असलेले. भावना व आत्मसमर्पण मात्र प्रचंड. पेटलेला ज्वालामुखी जसा.

१९४२ च्या आधीच्या काळात त्यांचा माझा संबंध आलेला आठवत नाही. १९४२ ते पुढे ४० वर्षे तरी खूपच वेळा गाठीभेटी, विचारविनिमय झाला. पण वितंडवाद नाही. केव्हा रानांत तर कधी राजवाड्यांत, कधी कैदखान्याच्या भिंतीआड तर कधी रानावनांत, अनेक वेळा रात्री अपरात्री किंवा भल्या पहाटे भेटी झाल्या.

इंग्रजी साम्राज्यशाहीविरुद्धच्या या अखेरच्या लढ्यांत अनेक हेतूने प्रवृत्त होऊन अनेक प्रवृत्तींचे, ध्येयाचे, ध्येय नसलेले, काहीतर चोर, दरोडेखोर, काळाबाजारवालेही कधी कधी दृष्टोत्पत्तीस येत. त्या सर्वात आमचे "धन्वंतरी" खऱ्या त्यागाने, सुबुद्धतेने, ध्येयनिष्ठेने, कर्तव्यतत्परतेने व विशेषतः अनहंकाराने उठून दिसत.

सातारा जिल्ह्यांत सर्व वेगवेगळ्या प्रवृत्तीच्या लोकांचा त्यांनी मोठ्या चातुर्याने, धीराने, समंजसपणाने लोकसंग्रह केला होता. कार्यक्रम आखण्यापासून ते हिशोब

व्यवस्थित ठेवण्यापर्यन्त सर्व शिस्त व संयम ते स्वतः अंमलात आणीत, व दुसऱ्यांना काटेकोरपणाने अंमलात आणण्यास स्वतःच्या स्पष्टवक्तेपणामुळे व अत्यंत ध्येयनिष्ठेमुळे भाग पाडीत.

तसे ''धन्वंतरींच्या'' हातून प्रतिसरकार, ग्रामराज्ये निर्माण करतांना व **'कामेरी कोर्ट'** चालवितांना कधीहि अन्याय, अत्याचार झाला नसेल असे म्हणता येणार नाही. त्यांच्या प्रांजळ लिखाणांत हे त्यांनी मान्यही केलेले आहे, दुःखही प्रदर्शित केले आहे.

१९४६-४७ साली १९४२ चा लढा संपला. काँग्रेस-राज्ये पुन्हा हिन्दुस्थानभर सुरु झाली. ''बंडखोर, बेजबाबदार, दरोडेखोर, राष्ट्रविरोधी'' हीच भाषा अनेक पुढारी-इंग्रजी तुरुंगातील शांततासुव्यवस्थेतून बाहेर आल्यावर बोलू लागले!! इतकेच नाहीतर ज्या दंडुकेशाहीविरुद्ध **'चलेजाव'**चा लढा ४ वर्षे सतत सातारा जिल्हयात तेवत ठेवला त्याच दंडुकेशाहीला आता हे काँग्रेस राज्यकर्ते, स्वातंत्र्यसंग्रामात स्वतःला झोकून देणाऱ्यांना, पकडण्याचा आदेश देऊ लागले. धन्वंतरींच्या पायाची आग मस्तकाला जाणे साहजिकच होते. सरतेशेवटी भूमिगत अच्युतराव पटवर्धनांच्या मार्फत सातारा, सोलापूर, बेळगांव जिल्हयांतील सुमारे २५० स्वातंत्र्यसंग्रामात झोकून देणारे हे जवान श्री. जवाहरलाल नेहरुंना ''गुप्त'' रीतीने मुंबईच्या एका फिल्म स्टूडिओमध्ये रात्री १२ वाजता भेटले. त्यांनी त्यांच्या पाठीवरुन हात फिरवला, त्यांना शांत केले.

हे झाले १९४७ मध्ये. नंतर स्वराज्यस्थापनेनंतरचे दिवस तर धन्वंतरींना जास्तच **अस्वस्थ** करु लागले. परदेशातून ज्या ज्या वेळी मी परत येई त्या त्या वेळी अनेकदा भेटून त्यांच्या मनाची व्यथा ते साश्रू बोलून दाखवीत. म्हणत, ''आप्पासाहेब, हयाकरताच आम्ही आमच्या जिवाचे रान केले का? ज्या स्वराज्यात सहकार, सेवा, सर्वोदय, न्याय, नीती, नवनिर्मिती आम्ही स्वप्नी पहात होतो, त्याच या स्वराज्यांत आता अहंकार, अधिकारलालसा, उपभोगलोलुपता, भ्रष्टाचार, गुन्हे, पिळवणूक बेशिस्त वर्तन बोकाळले आहे. आता सर्वच पुढारी, सर्वच अधिकारी व सर्वच स्वार्थी झालेले आहेत.

याला उपाय काय?

धन्वंतरींची ही मनोव्यथा आता सर्वांनाच ग्रासू लागली आहे. पण धन्वंतरींनी लिहिलेल्या या सुवाच्य पुस्तकात या व्यथेवर **उपाय**हि दडला आहे. शोधून काढणे जरुर आहे.

जय जगदंबे.

**—आप्पा पंत**

**''पंत निवास'' भांडारकर रोड,**
**पुणे-४११ ००४.**
**१९-४-८८ (अक्षय्य तृतीया)**

# ऋणनिर्देश

माझे वडील कै. **लक्ष्मण गणेश कुलकर्णी** माझे गावकर वैद्य यांना १९४२ च्या 'छोडो भारत' लढ्यात ते भूमिगत असतांना '**धन्वंतरी**' हे नाव त्यांच्या सहकाऱ्यांनी दिले. अखेरपर्यंत तीच उपाधि त्यांच्यामागे लागली. भूमिगत अवस्थेतील नाव ती अवस्था संपल्यावरही राहिले असे आमचे दादा हे एकमेव होते.

कै. धन्वंतरी दादांनी ज्या काळात भूमिगत राहून स्वातंत्र्यसंग्रामात स्वतःस झोकून दिले त्या वेळी मी वयाने लहान होतो, तरी जाणता होतो. काय घडतंय, कशासाठी घडतंय, आणि कसं घडतंय याची मला त्यावेळी थोडी जाणीव होत होती. कै. दादांच्या भूमिगत होण्याने आमच्या कुटुंबास होणाऱ्या हालअपेष्टांचे चटके आम्ही सहन करीत होतो. आमच्या मातोश्रींनाही सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ तुरुंगात स्थानबद्ध करण्यात आले होते.

स्वातंत्र्य मिळाले त्या दिवसाचा आनंद सर्वांनी उपभोगला, पण आमची फरपट काही थांबली नाही. स्वातंत्र्यानंतर कै. दादांचे सामाजिक शैक्षणिक कार्य चालूच. घराकडे पूर्वीप्रमाणेच दुर्लक्षच असे; कारण त्यांचे घर फार मोठे होते, सर्व समाज त्यांच्या घराचा घटक होता. स्वतःविषयी, स्वतःच्या प्रकृतीविषयी काळजी करण्यास त्यांना वेळ नव्हता; वेळ होता फक्त दुःखी कष्टी व संकटग्रस्त लोकांचे दुःखनिवारण व संकटनिवारण करण्यासाठी! त्यांची प्रकृती ठणठणीत असे. कृष्णा-कोयनेच्या वा वारणेच्या महापुरात सहकाऱ्यांना घेऊन ते लीलेने पैलतीर गाठीत. ते रात्रंदिवस अथक कष्ट करीत व हसतमुखही असत.

१९५६ साल त्यांना काय वाटले, कुणास ठाऊक, पण स्वातंत्र्यलढ्यात केलेल्या कामाचा तपशीलवार वृत्तान्त लिहावा असे त्यांना वाटले आणि वेळ मिळेल तशा घटना त्यांनी लिहून काढल्या. कै. दादा हे एवढे काय लिहीत आहेत याचे आम्हाला कमालीचे

औत्सुक्य. ते जसजसे लिहीत गेले तसतसा ते वाचण्याचा छंदच मला लागला. त्यांनी लिहिलेल्या आठवणी स्फूर्तिदायक असल्याने त्या प्रसिद्ध व्हाव्यात असे मला अनेकदा वाटले. पुढील काळात मी त्यांना तसे बोललोही. त्याला त्यांनी जे उत्तर दिले ते मोठे मार्मिक होते. ते म्हणाले, ''आपण जे काय केले ते आपण प्रसिद्ध करू नये. ते इतरांनी प्रसिद्ध करण्यातच मोठेपण आहे''. मी निरुत्तर झालो.

ता. १० जानेवारी १९८७ ला दादांचे निधन झाले. दुःखाचा आवेग काहीसा ओसरल्यावर त्या आठवणी प्रसिद्ध व्हाव्यात ही माझी सुप्त इच्छा जागृत झाली. कै. दादांच्या अनेक मित्र व सहकाऱ्यांना ही कल्पना सांगितली व त्यांनीही ती उचलून धरली. माझे ज्येष्ठ बंधु ती.नानांनी हे हस्तलिखित माझ्या स्वाधीन केले.

कै. दादांच्या आठवणींचे हस्तलिखित मी प्रथम **डॉ. वा.ना.कुबेर** यांना दाखवले. श्री. **कुबेर** हे स्वातंत्र्यसैनिक, सातारचेच. स्वातंत्र्य लढ्याचे अभ्यासक, व कै. दादांचे एक निकटचे स्नेही. त्यांनी ते हस्तलिखित वाचले व या कार्याचा पाठपुरावा केला. कै. दादांनी जसे आठवले तसे लिहून काढले, त्याला कालक्रम नव्हता, लिहितांना घटना मागेपुढे झालेल्या. तरीपण त्याला श्री. कुबेर यांनी शीर्षके देऊन व्यवस्थित रूप दिले व अनेक घटनांचे साक्षीदार कै. दादांचे सहकारी कॉ. **डी.जी. देशपांडे** (त्यांना भूमिगत अवस्थेत 'बहिर्जी नाईक' म्हणत) व कॉ. **शेखकाका**. त्यांनी हस्तलिखित वाचून उपयुक्त सूचना केल्या. अनेक घटनांची सत्यता पडताळून पाहिली, आणि संपादनकार्यास बहुमोल साहाय्य केले.

कै. दादांचे एक सहकारी कॉ. **नागनाथ अण्णा नायकवडी** (हल्ली वाळव्याचे आमदार) तसेच दुसरे एक सहकारी कै. **बाबूजी पाटणकर** यांच्या पत्नी कॉ. **इंदुताई पाटणकर** यांनी आपुलकीने सहकार्याचा हात पुढे केला, आणि उपयुक्त सूचना केल्या. सातारा प्रतिसरकार चळवळीचे पाठीराखे बॅ. **आप्पासाहेब पंत** यांनी तत्परतेने प्रस्तावना लिहून दिली. कै. दादांचे एक सहकारी कै. **माधवराव जाधव** (दुर्दैवाने यांचे मोटारच्या अपघातात निधन झाले) यांचे चिरंजीव श्री. **धनंजय ऊर्फ बापूसाहेब जाधव** यांनी पुस्तकासाठी छायाचित्रे मिळवून दिली. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. **सुरेंद्र बारलिंगे** हेही 'छोडो भारत' लढ्यातील सहभागी. सा. सं. मंडळाने अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या आठवणींना प्रकाशात आणले आहे. कै. दादांच्या आठवणीही प्रकाशात आणण्याचे श्रेयही त्यांचेच.

वरील सर्व श्रेष्ठांना कृतज्ञतापूर्वक धन्यवाद देणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

**— मोहन ल. कुलकर्णी**


२११६, सदाशिव पेठ,
विजयानगर कॉलनी,
पुणे ४११ ०३०.



स्वातंत्र्यसैनिकांच्या मेळाव्यात—
खुर्चीवर दादासाहेब आळतेकर, समोर बाबूराव गोखले, शेखकाका व इतर पुढील रांगेत उजवीकडून दुसरे धन्वंतरी दादा.



कासेगाव येथील जाहीर सभेत बोलताना धन्वंतरी दादा छायाचित्रात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मारुतराव कन्नमवार व यशवंतराव चव्हाण.



कराड येथील एका जाहीर सभेच्या प्रसंगी डावीकडून धन्वंतरी दादा, किसन वीर, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, गौरिहर सिंहासने व माधवराव जाधव.



माधवराव यांच्या घराच्या पायाभरणी समारंभ प्रसंगी. बसलेले माधवराव जाधव उभे धन्वंतरी दादा.




कराड येथील पहिल्या १९४७ स्वातंत्र्य सोहळयात अग्रभागी धन्वंतरी दादा.




सांगली येथील आयुर्वेद महासंमेलनात धन्वंतरी दादा व पाठमोरे वसंतदादा पाटिल.



धन्वंतरी दादा.



धन्वंतरी दादा





सांगली येथील महाराष्ट्र आयुर्वेद महासंमेलन प्रसंगी– डावीकडून– धन्वंतरी दादा, वैद्यराज त्रिगुणाजी दिल्ली व सांगली येथील आयुर्वेद विद्यालयाचे प्राचार्य श्री. जोशी.

१९४२ च्या स्वातंत्र्यसमरांतील क्रांतीकारकांचे नेते



भाई अच्युतराव पटवर्धन

श्री. क्रांतीवीर लक्ष्मणराव कासेगांवकर वैद्य (धन्वंतरी)



१९४२ च्या आंदोलनांतील प्रतिसरकारचे उद्गाते नि

: कुशल संघटक :

ज्या माणसास खूप लिहिण्याची सवय असते व निरनिराळ्या प्रकारानी संधी मिळते, त्यावेळी काही वाटत नाही; पण ज्यावेळी मुख्य मार्ग बंद होतो, त्यावेळी मन बेचैन होऊ लागते. जीव कासावीस होतो, चित्त कुठे लागत नाही व काय होतंय हे स्पष्ट समजूनही येत नाही. त्याचा परिणाम म्हणून मन चिडखोर बनतं, कारण ज्यावेळी तो लिहीत असतो, भावनांचा निरनिराळा आविष्कार करीत असतो, त्यावेळी मन निरनिराळे साठवलेले भाव आपल्या आवडत्या व्यक्तीपाशी व्यक्त करीत असते. प्रत्येक मनात-विचारात-भिन्नता असल्यामुळे ती व्यक्ती निरनिराळ्या भावना-विलासांत रुपांतरित करुन पुन्हा मांडल्यामुळे सर्वांना मानसिक आनंद मिळाल्याशिवाय राहात नाही. त्यामुळेच लेखनाची गोडी व वाढ झाल्याशिवाय राहात नाही. मैत्री म्हणजे समान स्वभाव, गुण यांची वृद्धी. या जगात ज्यावेळी मनुष्यप्राणी प्रवेश करतो त्यावेळी जग हे काय आहे हे समजून घ्यावं, यासाठी सारखा धडपडत असतो. इतर प्राणी हे सर्व या सृष्टीत भोग भोगून नाश पावतात. त्यात मैत्री वगैरे फारसे भाव नसतात. असतात तेही तात्पुरते. माणसास काही विचार बरा, वाईट म्हणून असतो व पल्लेदार विचारशक्ती असते, त्यामुळे हे विश्व म्हणजे काय आहे? मनुष्यप्राणी येतो कुठून? निर्माण कसा होतो? तो शेवटी जातो कुठे? त्याचे काय होते? या विश्वाचा उपभोगाच्या दृष्टीने कसा उपयोग करुन घेता येईल? याबाबत आपापल्या परीने विचार मांडले आहेत. त्यांच्या परंपरा निर्माण केल्या आहेत व ते धर्मपंथ म्हणून व्यवहारात अमलात आणले आहेत. मग हे करत असता कित्येकवेळा मूळ हेतू बाजूस राहून स्वार्थाच्या,

अभिमानाच्या, असूयेच्या आहारी जाऊन पापसात रक्ताच्या नद्या वाहतात असे इतिहास सांगतो. सर्व आदी भौतिक जगाची—शोधाची जननी ही मैत्री आहे. त्याच्या उलट सर्व जगाच्या नाशाचे कारण वैर आहे. ज्यावेळी मैत्री होते—जमते—त्यावेळी समान शरीरापेक्षा समान मनोधर्माची अत्यंत आवश्यकता असते. आपल्याला कित्येकवेळा असे दिसून येते की, माणसाचा लळा, प्रेम इतर प्राण्यांबाबतसुद्धा दिसून येते. किंवा पुरुषाची मैत्री पुरुषाशीच होईल असे नाही. कित्येकवेळा स्त्रीशीसुद्धा असू शकेल. अगर याच्या उलट असेल. म्हणजे ज्या ठिकाणी अंतःकरणाची एकरुपता प्राप्त होईल तेथेच खरी मैत्री निर्माण होईल.

आता कित्येकवेळा विचाराऐवजी विकारांचा प्रादुर्भाव होऊन मैत्रीचा आभास निर्माण होऊ शकतो. स्वार्थी हेतू मनात धरून मैत्रीचे सोंग, ढोंग आणता येते पण तो स्वार्थ संपल्यावर अगर साध्य होण्याची आशा नष्ट झाली तर ती मैत्री नष्ट होते व ती जागा वैराने सुड, द्वेषबुद्धी वगैरे घेतात, म्हणून मैत्री ज्यावेळी जमत जाईल त्यावेळी अत्यंत दक्षतापूर्वक आपला स्वभाव व मित्राचे स्वभाव हे एक आहेत ना? हे अत्यंत सुक्ष्मतऱ्हेने तपासून पाहिले पाहिजे. स्वभाव अगर गुण निरनिराळ्या प्रसंगानीच तपासावयाचे असतात. आणि विशेषतः आपत्तीमध्ये, संकटामध्ये मित्राची परीक्षा फार चांगली होते. वैभवाच्यावेळी काही समजू शकत नाही, किंवा ज्यांच्या अंगात स्वभाव पारखण्याची शक्ती उत्पन्न झाली आहे तेच चटकन स्वभावधर्म ओळखू शकतात.

मैत्री करता काही पथ्यही पाळावे लागते. जर आपल्यास चिरकालीन मैत्री पाहिजे असेल तर आपसात सावकारी अगर तो गैरहजर असता त्याचे स्त्रीशी एकांतात बोलत बसणे, हे मैत्रीस विघातक ठरणारे आहे. मैत्री टिकण्यास आणखी दोन गुणांची प्रामुख्याने आवश्यकता असते. एक प्रेमळपणा व दुसरा समंजसपणा. मग त्याच्या पाठोपाठ आदर, विश्वास, श्रद्धा यांचीही आवश्यकता असते. जर प्रेमळपणा नसेल तर आपल्या मित्राच्या दुःखाबरोबर दुःखी अगर आनंदाबरोबर आनंदी होता येणार नाही. संवेदनाशील होता येणार नाही. एक संवेदना निर्माण होणार नाही. त्याचप्रमाणे समंजसपणा नसेल तर ती मैत्री चिरकाल टिकत नाही. क्षुल्लक गोष्टीवरुन मतभेद वाढतात. आपला मित्र काय हेतूने असे वागतो हे कळत नाही. व कित्येकाना कोणाची मैत्री सहन होत नाही. त्यांचे अंतःकरण बुद्धीभेद निर्माण करतो आणि त्यामुळे त्याचा उलगडा न झाल्यामुळे विचारांचा पल्ला जवळ नसल्यामुळे त्यांची मैत्री राहात नाही व विपरित अर्थ काढतो. हे दोन गुण सोडून शिवाय त्याबाबत आदरही पाहिजे. नाहीतर तो एक समाजातील टाकाऊ प्राणी आहे अशी भावना झाली तर फार वेळ मैत्री राहणार नाही. त्याचप्रमाणे एकदा त्याच्या गुणांचा प्रत्यय आल्यानंतर, त्याचे गुण तपासून पाहिल्यानंतर, त्याचा स्वभाव कळून आल्यानंतर, जर आपण विश्वास ठेवला नाही; त्यावर अविश्वास दाखवू लागलो, तर मैत्री टिकणार नाही. संपूर्ण विश्वास यालाच श्रद्धा म्हणतात. आणि जर ही श्रद्धा आपल्या मित्रांसंबंधी आपल्या अंतःकरणात बसत

नसेल तर कोणीही तिऱ्हाईत मनुष्य केव्हाही सहज स्वार्थाकरीता अगर असुयेने मैत्रीत बिघाड आणू शकेल. या जगात मनुष्य प्राण्याने प्रवेश केल्यानंतर व सर्व अवयवांची वाढ पूर्ण होऊ लागल्यानंतर त्याला या जगात शारीरिकदृष्ट्या व मानसिकदृष्ट्या यशस्वी जीवन जगावे असे वाटते आणि त्या करिता त्याची धडपड असते. शरीराकरिता सामान्य नियम शरीरशास्त्राने बांधले आहेत. पण मानसिक यशाकरिता अत्यंत महत्त्वाची कोणती गोष्ट असेल तर मैत्रीची—माणूस हा संघ-द्विप असल्यामुळे तो सारखा मैत्रीसाठी धडपडत असतो व स्वत:भोवती व्यक्ती गोळा करत असतो. म्हणून अत्यंत प्रेमळपणे व समंजसपणे मित्र गोळा केले पाहिजेत. त्याचप्रमाणे मित्राशिवाय इतरांपासून दूर राहिले पाहिजे. जो आपल्या जीवनात जितके अधिक मित्र मिळविल तितक्या प्रमाणात यशस्वी होतो. चांगल्या मित्राशी मैत्री होणे हे महत् पुण्याईने घडते असे कित्येक विद्वान म्हणतात. तर सुखदु:खाशी एकरुप झालेला, दिवसेंदिवस प्रेम वाढवत जाणारा व ज्याच्या मैत्रीतील गोडी कमी होत नाही; उलट जसजसे दिवस जातील तसतसे परिपूर्णावस्थेला पोचला आहे व ज्याचे स्वरुप प्रेममय झाले आहे असा मित्र सुदैवानं क्वचितच मिळतो. असेही काही पुरुषश्रेष्ठ म्हणतात— जगातील सर्व नाती मैत्रीच्या पुढे फिकी पडतात. आई, वडिल, गुरु, जेष्ठ, श्रेष्ठ, इष्ट सर्व थोर असतील, त्यांची नाती श्रेष्ठ पवित्र असतील पण मित्राच्या नात्याची त्यात गोडी नाही. आई, वडिल, भाऊ, बहिण, गुरु, नातेवाईक, पत्नी, मुलगा, मुलगी इ. सर्वांशी वागताना प्रत्येकाने प्रत्येकाशी कसे वागावे याचे सामान्य नियम आहेत व ते जर मोडले तर त्याला सदाचार मानीत नाहीत व त्या व्यक्तिकडे सज्जन तिरस्काराने पाहातात. पण मित्राच्या नात्यात कसलाच निर्बंध असत नाही व आपसात कसेही वागले तरी त्या एकमेकाना काही वाटत नाही. उलट ते सावरुन दोघेही गोड करुन घेतात. त्यांच्या मनावर त्याचा काही परिणाम होत नाही. त्या उलट इतर नात्यात त्या विषयाचा विपर्यास होऊन कित्येकवेळा भयंकर अनर्थ ओढवल्याची उदाहरणे पुष्कळ आहेत. मित्राच्या नात्यात वंश अगर पुरुष-स्त्री असा ही भेद राहात नाही. ध्येय एक असल्यामुळे त्या ध्येयाप्रत जाणारे ते एकमेकांचे साथीदार बनतात. ही आपण मैत्रीची शुद्धस्वरुपे सात्विक प्रवृत्तींची पाहिली. पण तिची राजस व तामस स्वरूपे दिसतात व ती कमी अधिक प्रमाणात त्याज्यही असतात. मैत्रीचे राजस स्वरुप स्वार्थमय व तात्पुरते असते व ते नित्य व्यवहारात अमलात येते. तर काही या स्वरूपात कित्येकवेळा आपण त्याला ''शालू'' मैत्री म्हणतो. मैत्री करतानाच अमुक कारणाकरिता आपण जवळ आलो आहोत असे दोघेही समजतात. त्यात भावना व विचार यांची मिसळ असते. दोघेही सावध असतात ते काम संपले की आपोआप दूर होतात. त्याचा चित्तावर विषाद अथवा आनंद निर्माण होत नाही. पण तामस मैत्री मात्र निव्वळ भावनामय असते. त्यात विचारांचा भाग जवळ जवळ नाहीच. त्यामुळे ती दोघाना तापदायक होते. पुष्कळवेळा ते एकमेकांचा विश्वासघात, फसवणूक करण्या करताच एकत्र येतात व

परिणाम वाईट होतात. कित्येकवेळा जीवावर प्रसंग येऊन ते नाश पावतात किंवा दु:ख करीत एकमेकाना शिव्या देत त्याचे वाईट परिणाम भोगत दूर होतात. म्हणून जीवनात तामस मैत्री त्याज्यच. राजस, मध्यम व सात्विक मैत्री उत्तम यात शंका नाही, आणि हे सामान्य नियम जो पाहात नाही, लक्ष देत नाही, पाळीत नाही तो वैयक्तीक व सामाजिक जीवनात यशस्वी होत नाही. मनुष्याच्या इच्छेप्रमाणे, स्वभावाप्रमाणे सर्व गोष्टी घडत नाहीत. जीवनात सर्व व्यक्ती एकत्र येतात त्यात परिस्थितीप्रमाणे सर्वच अनुकूल होईल असे कधी घडत नाही, आणि त्यामुळेच तो सारखा अस्वस्थ असतो. दु:खी, असमाधानी असतो व सुखासाठी, आनंदासाठी धडपडत असतो. आणि ती अपूर्णता, मनाची इच्छा, परिस्थितीमुळे स्वभावाविरुद्ध, परिस्थिती कमी करण्याची इच्छा मैत्रीमुळे साधू-मिळवू शकतो. जग हे भिन्नतेवर आधारल्यामुळे प्रत्येक जीवात अत्यंत सुक्ष्म प्रमाणात विविधता असणारच. ज्याप्रमाणे विविधता हा भाग सृष्टीत आहे त्याचप्रमाणे सर्वत्र एकत्वाचाही भाग आहे. मन, सुखदु:खाच्या संवेदना, ग्रहण, सृजन इत्यादी. पण ही विविधता सर्वस्वी भिन्न असत नाही. सामान्य आणि विशेष या स्वरुपात असते. त्यामुळेच जरी भिन्न स्वभावाच्या व्यक्ती एकत्र आल्या तरी मग प्रत्येकातील जे समानत्व असेल व किंचीत भिन्नता असेल त्याला मुरड घालून त्या व्यक्ती जवळ येतात व एकरूप बनतात. अर्थात आपण त्यालाच मैत्री म्हणतो व मग त्या व्यक्ती एकत्र आल्यामुळे त्यांची दुप्पट तिप्पट शक्ती होते. त्यांची वेळ व ताकद वाढली की, तितक्या झपाटयात सामुदायिक शक्ती कार्यप्रत पोचून लवकर यशाच्या मार्गावरुन ध्येयसिद्धी पर्यन्त जाता येते. आता व्यवहारी यशाकरीता सामुदायिक शक्तीचा उपयोग होतो. परंतु व्यक्तीगत यशाकरिता स्वत:चा स्वत:च मार्ग आक्रमून ध्येय हे सिद्धीप्रत पोचावे लागते.

## वैद्यकीय

माझे जीवन काही एकमार्गी नाही. त्याला निरनिराळे पैलू आहेत. माझे शैक्षणिक जीवन, प्रापंचिक, व्यक्तिगत जीवन, राजकीय जीवन, आणि व्यावसायिक जीवन असे ठोकळ मानाने प्रकार पडतील. माझे शैक्षणिक जीवन काही फारसे चांगले नाही. बुद्धी काही मोठी कुशाग्र नव्हे, अगदी सामान्य, पण मठ्ठही खास नव्हे, किंवा मुर्खही नव्हे. घरची संपन्नावस्था व जुन्या विचारांची सर्वांवर छाप आहे. घरचे भरपूर, शिक्षणाची काय आवश्यकता? जर मलाच शिक्षणाची आवड, तळमळ असती तर शिक्षण खूप झाले असते व घरच्यानी पूर्णही केले असते. शिक्षणाकरिता खटपट काही कमी केली नाही. कोल्हापूरला ठेवले, कऱ्हाडला ठेवले, वाई प्राज्ञपाठशाळेत ठेवले; पण इंग्रजी दुसऱ्या इयत्तेत काही गेलो नाही. इंग्रजीची भीती फार वाटत असे, त्यामुळे सर्व विषयात चांगले पण इंग्रजीत १० चे वर मार्क मिळवल्याचे मला आठवत नाही. शिवाय प्रकृती निरोगी असल्यामुळे उनाडपणाकडे लक्ष अधिक, पण सुदैव असे की कधी कसलेही व्यसन जडले नाही. पुस्तकी ज्ञान जरी कमी असले तरी व्यवहारी ज्ञानात माझी प्रगती

दिवसेदिवस फार मोठी होत गेली. चौकस बुद्धीमुळे समजण्याच्या शक्तीची वाढ होत गेली व या जगात यशस्वी जीवन जगायचे असेल तर पैसा कमविला पाहिजे ह्याची जाणीव होऊ लागली. नंतर संस्कृतचा अभ्यास करुन वैद्यकीय अभ्यास चांगला केला व कष्ट करण्याची प्रवृत्ती असल्यामुळे प्रत्यक्ष रोग्याची शुश्रूषा करणे इ. गोष्टीमुळे प्रत्यक्ष ज्ञान वाढले व दुसऱ्याचे मन ओळखून वागणे, त्याची मर्जी संपादून पैसा काढणे वगैरे गुणही प्राप्त होऊन धंदयाचा आत्मविश्वास आला. वाचनाचाही नाद ठेवला. त्यामुळे सामान्य वाटणारा मी, पण हा माणूस हुषार आहे असे सर्वजण समजू लागले. तोपर्यंत कार्य करण्याची शक्तीही खूप वाढली. येथपर्यंत सामान्य शिक्षणाचे जीवन ठोकळपणे संपले.

वयाच्या १६ वर्षांपासून वैद्यक धंदयास सुरुवात झाली. ती. काका (वडील) हे महत्त्वाचे काम पहात असत; कारण हा धंदाच श्रद्धेचा आहे. बाकीचे सर्व काम आम्ही उरकत असू—औषधे देणे, रोग्यांची शुश्रूषा, औषधे तयार करणे इ. अशा तऱ्हेने दोन वर्षे गेल्यावर आम्ही सर्वजण असे एकत्र बसलो असता—वाळवेकर, गोपाळराव, रेमणे, गोटखिंडीकर यांनी प्रश्न केला: स्वतंत्र धंदा करण्याची हिम्मत कोणात आली आहे? सर्वजण चुळबुळू लागले, पण मी ठासून सांगितले—'मी स्वतंत्र धंदा करीन'. माझी हिम्मत आणि आत्मविश्वास पाहून त्याना आनंद झाला. मला म्हणाले, 'आजच्या जगात शहरात धंदा करावयाचा, पैसा मिळवावयाचा तर आधुनिक शास्त्रांचे, ॲलोपॅथिचे ज्ञान पाहिजे. त्याशिवाय आपले म्हणणे एखाद्या डॉक्टरला समजावून सांगता येणार नाही, अगर काही कळणार नाही, म्हणून मग इस्लामपूरचे डॉ. भाऊराव श्री.म. वैद्य एल्.एम्.एस्. यांच्याकडे अभ्यासास ठेवले.

## कराडला वैद्यकीचा व्यवसाय

रोज सायकल वरुन संध्याकाळी इस्लामपूरला जावयाचे व रात्री डॉ. वैद्य यांच्याजवळ अभ्यास करायचा, त्यांनी शिकवले त्याचा पुन्हा पहाटे अभ्यास करायचा—दुपारी १२ वाजेपर्यंत. रोगी पाहाणे, कंपाऊंडींग व मग सायकलवरुन घरी जेवणास यायचे. शिवाय त्यांच्या बरोबर रोगी पहावयासही परगावी जावयाचे. डॉक्टरांची व वैद्यकीची दोन्ही शास्त्रे वाचल्यामुळे त्यांनी सर्व विषय फार चांगल्या तऱ्हेने समजावून दिला व दोन्ही शास्त्रांचा चांगला तौलनिक अभ्यास करुन घेतला. याप्रमाणे संपूर्ण १ वर्ष अभ्यास केल्यानंतर त्यांनी सांगितले की, आता अभ्यास संपला. मग कऱ्हाडला धंदा सुरु करावा असे ठरवले व त्याप्रमाणे २४–१–१९३२ रोजी कऱ्हाडला जाऊन धंदा सुरु केला. खेडेगावचा, अडाणी समजला जाणारा, आयुर्वेदिक वैद्य, धंदा म्हणून आजपर्यंत कधी केला नाही. त्यामुळे मनातून सारखी भीती वाटत होती. पहिल्या आठवड्यात २५ रुपये मिळाले. खूप आनंद झाला व धंद्याचा आत्मविश्वास वाढत गेला. सर्वांपेक्षा पैसे कमी घ्यावयाचे, कष्ट खूप करावयाचे व

गरीबांशी अत्यंत प्रेमळपणे वागायचे यामुळे धंदा सपाटून वाढला. रोज ३०-४० रोगी येऊ लागले व दरमहा १५० - १७५ रुपये मिळू लागले. एकदा श्रीमंत दादासाहेब शिराळकर अत्यवस्थ होते. गावातील सर्व नामांकित डॉक्टरांनी व आसपासच्या डॉक्टरांनीही आशा सोडली होती. सर्व जणू त्यांच्या मृत्यूची वाट पहात होते. आम्ही नवीन गेलेलो, म्हणून त्यानी बोलावून घेतले व विचारले, 'काय वाटते?' वडील म्हणाले, '८ दिवस खटपट करुन सांगतो.' माझ्या तोंडून पटकन गेले, 'बरे ल.' सुदैवाने माझे वाटशब्द खरे ठरले. अतिशय खटपट केली. त्यांना बरे वाटले. आपल्या पायाने ते हिंडूफिरु लागले. पुढे १० वर्षांनी पुन्हा दुखणे वाढून ते गेले, पण यापूर्वी आमच्या उपचाराने बरे वाटल्यामुळे सर्व श्रीमंत वर्गाचे लक्ष आमच्याकडे खेचले गेले. सर्व डॉक्टरांनी तोंडात आश्चर्याने बोटे घातली व गावात सर्वांच्या तोंडी माझे नाव झाले. दरमहा ५०० - ७०० पर्यन्त पैसे मिळू लागले व वैद्यकीय धंदद्याचे वैभव वाढू लागले. सावकारांचे सर्व देणे फिटत चालले. घरास सुस्थिती प्राप्त झाली. एक हजार रुपयांची जमीन खरेदी केली. इतर डॉक्टरांना मत्सर वाटू लागला. दिवसातून तीनवेळा रोग्याचे घरी जात असे. रोग्याच्या घरी जाण्याबद्दल पैसे नाहीत. औषधाचे रोज ८ आणे. महत्त्वाचे असेल तर ४-८ आणे जास्त (जाण्याबद्दल) त्यामुळे सर्वांचा धंदा कमी झाला. त्यानी मला बोलावून घेतले व धंदयाचे काही नियम माहीत आहेत का? म्हणून विचारले. मी म्हणालो, 'मी कोणाबद्दल अपप्रचार करीत नाही. बोलून चालून मी खेडेगावचा वैदू. मजजवळ तुमच्यासारखे ज्ञानाचे का भांडवल आहे? तेव्हा रोग्यांची शुश्रूषा प्रामाणिकपणे करुन ती उणीव मी भरुन काढतो. तुमच्याबद्दल मला अनादर नाही किंवा तुमचा धंदा बसावा म्हणून मी पैसे कमी केले नाहीत.' त्या वेळी सर्वांना समाधान वाटले व माझ्या विनयाबद्दल व त्यांचे ठिकाणच्या आदरामुळे त्याना समाधान झाले, माझी सुटका झाली. जवळजवळ धंदयात १९४२ पर्यन्त दहा वर्षात सर्व खर्च वजा जाता ३०,००० रुपये मिळविले असतील पण कर्जे भागविणे, शेतकीसाठी खर्च, खटले, यात सर्व पैसा खर्च गेला. १९३८ सालापासून धंदयास उतरती कळा लागली. दरम्यान दत्तप्रकरण, कोर्टातील खटले प्रकरण सुरु झाले. त्यामुळे धंदयावरील लक्ष कमी होऊन शेतीकडे व इतर भानगडींकडे लक्ष घालावे लागले. त्यामुळे धंदा बसू लागला व पुन्हा रोगी कमी होऊन दरमहा १५० ते २०० रु. वर उत्पन्न येऊन बसले.

## क्रांतिवादाचा प्रभाव

माझे सामुदायिक जीवन हे अगदी लहानपणापासून फार चांगले असे. मित्राचा कधीच तोटा नाही; कारण दुसऱ्यांकरिता कष्ट करण्याचा स्वभाव. त्यामुळे अंत:करणापासून जोडलेला मित्रवर्ग, आणि त्यामुळे कीर्ती ही दिवसेंदिवस वाढत गेली व समाजात पहिल्या वर्गात सर्वात पुढे चालण्याची संधी मिळत गेली व लोकांची सहानुभूति वाढत गेली. आता माझ्या स्वभावात दोष असा की, रक्ताच्या नात्याला फारशी किंमत मी कधीच देत नाही. जे माझ्या कार्यात मला मदतरूप होतील, ज्यांचे माझे स्वभाव

जमतील, ज्याना माझ्या मतांच्याबद्दल आदर आहे व ज्यांच्या मताबद्दल मला आदर आहे, अशीच माणसे मी गोळा केली. त्यामुळे घरच्या म्हणवणाऱ्या माणसांनाही माझ्याबद्दल फारसे प्रेम, आदर राहिला नाही व मलाही त्यांच्याबद्दल प्रेम, आदर राहिला नाही. फार काय सख्या मामाचे व माझे न पटल्यामुळे १८ वर्षात कधी बोललो नाही. यावरुन बाकीच्या नातेवाईकांची कल्पना येईल. मी पुरोगामी विचारांचा असल्याने सनातनी विचारांशी माझे जमत नाही. त्याचप्रमाणे पांढरपेशा, बुद्धीजीवी, पुढारलेल्या वर्गाशी त्यांच्या वागण्याच्या पद्धतीमुळ माझे त्यांचे कधी जमत नाही. स्वतःच्या स्वार्थाकरिता, वशीला लावण्याकरता ते मजजवळ येतात. काम चांगले असले तर करतो पण एरवी त्याना मजजवळ थारा मिळत नाही. त्यांच्या धर्माच्या कल्पना, उच्चनीचते.वर आधारलेली ती वृत्ती व तुसडेपणाची, स्वार्थीपणाची व अज्ञानी लोकांना पिळून कष्ट न करता जगण्याची वृत्ती, तोंडाने उच्च तत्त्वज्ञान, स्त्रीसंबंधी समाजाची वागणूक इ. माझ्या वृत्तीस न पटणाऱ्या गोष्टी आहेत. मी स्पष्टपणे बोलतो व याचा धिक्कार करतो व त्याप्रमाणे आचरण करतो.

आता माझे राजकीय जीवन. अगदी लहानपणापासून माझ्या जीवनावर राजकारणाचा प्रभाव होता. वडिलांच्या पासूनच तो संस्कार माझ्यावर झाला होता. लोकमान्य टिळकांशी त्यांचा वैयक्तिक परिचय होता व त्यांच्या राजकारणात ते स्वतः भाग घेत असत, ते काँग्रेसचे मेंबर होते, निरनिराळ्या चळवळीत ते प्रामुख्याने भाग घेत. 'केसरी' वर्तमानपत्र अगदी पहिल्यापासून आजतागायत ते घेतात. निरनिराळे कार्यकर्ते येऊन घरी उतरत. त्यांची व्यवस्था ठेवताना त्यांचा सहवास होई व त्यांची व्याख्याने ऐकावयास मिळत. त्याचप्रमाणे राष्ट्रीय व धार्मिक माणसांचा—ह.भ.प. चौंडे महाराज, पटवर्धन बुवा आदी माणसांचा सहवास मिळे. वडिलांचा धार्मिक गोष्टींचा व हठयोगाचा दांडगा व्यासंग होता. त्याही माणसांचा सहवास होई. त्यामुळे त्यांच्या चारित्र्याचाही परिणाम झाल्याशिवाय राहिला नाही. बुद्धीची प्रगल्भता वाढली. त्यामुळे त्यांना आपल्या मुलानेही तेजस्वी व्हावे, देशाकरिता काही करावे असे नेहमी वाटे. त्यामुळे माझ्या वृत्तीस चालना मिळे. लहानपणापासून चहा सोडून दिला. हातसुताची खादी वापरु लागलो. काँग्रेस मेंबर करणे, गणेशोत्सव करणे, निरनिराळे सार्वजनिक कार्यक्रम करुन मोठमोठे वक्ते आणून त्यांची व्याख्याने ऐकवणे, सार्वजनिक वाचनालय काढणे, खादी भांडार काढणे, प्रभात फेऱ्या काढणे, स्वातंत्र्यदिन साजरा करणे, शिवजयंती साजरी करुन गावभर मिरवणूक काढणे वगैरे कामे नेहमी सुरु होती. अगदी प्रथम महात्मा गांधींनी मुलांची शाळा सोडून राजकारणात भाग घ्यावा असे सांगताच शाळा सोडून घरी बसलो व रोज प्रभातफेरी काढून परदेशी कापडाची होळी केली. नंतर राष्ट्रीय शिक्षण घ्यावयाचे म्हणून प्राज्ञपाठशाळेत वाईस गेलो. तेथे वे.शा.सं. नारायणशास्त्री मराठे यांचे तेजस्वी चारित्र्य व मोठमोठ्या सहाध्यायांचा सहवास, स्वतः सर्व कामे करावी लागल्याने इतर कामे करणे हलकेपणाचे असले क्षुद्र विचार

मनातून पार नष्ट झाले. संडास घासणे, बागेस पाणी घालणे, सारवणे, भांडी घासणे, वाढणे, जेवणाचे निमंत्रण आले तर भिक्षुक म्हणून भोजनास जाणे इ. गोष्टींमुळे आपण मोठे, इतरांची हलकी कामे, हलकटांचे काम असा विचार राहिला नाही. रोज व्यायाम, सात्विक अन्न, पवित्र विचार, आचार, साधी राहाणी व उच्च विचारसरणी यांचे आदर्श यामुळे वर्ष दीड वर्षात जीवनावर फारच चांगला परिणाम झाला. सेनापती बापटांसारखे पुरुष मोठमोठ्या संस्थेस भेटी देऊन जात. त्यांची व्याख्याने ऐकणे व त्यांचा सहवास यामुळे देशासंबंधीच्या कल्पना व आपण देशाकरिता काही केले पाहिजे यांची जाणीव निर्माण झाली. पण पहिल्यापासूनच कल क्रांतिवादाकडे. त्यामुळे बंगालमधील क्रांतिकारकांसंबंधी अतिशय आदर वाटे. पुस्तके मिळणे तर दुर्मिळच परंतु ती मिळवून वाचणे, बॉम्बसंबंधी तसेच रेल्वेगाड्या पाडण्यासंबंधी माहिती गुप्तपणाने मिळविणे, क्रांतिकारकांचे शक्यतितके फोटो मिळवून त्यांचा संग्रह करणे असे उद्योग सुरु झाले. श्रीपाद शंकर नवरे हे पूर्वी प्राज्ञपाठ शाळेत होते. तेथून ते मुंबईस 'प्रताप' वर्तमानपत्र काढीत. त्यात निरनिराळ्या देशातील क्रांत्यांची माहिती देत. क्रांतिकारकांची माहिती देत. म्हणजे वरील सर्व गोष्टी कशा करावयाच्या याचे जवळजवळ ते धडेच होते. त्यामुळे मी त्या वर्तमानपत्राचा ग्राहक व वाचक अखेर पर्यन्त होतो. सरकारने ते वर्तमानपत्र पुढे बंद केले. नंतर कानपूरचे गणेश शंकर विद्यार्थी, भगतसिंग वगैरे लोकांनी लाहोरला ''नवजवान भारत सभा'' नावाची उघड उघड क्रांतिकारकांची संस्था काढली. त्या संस्थेचा सभासद झालो व त्यांच्याशी संबंध जोडण्याचे प्रयत्न करु लागलो; पण मला इंग्रजी चांगले न येण्याने थेट संबंध ताबडतोब जोडणे अशक्य होते. इतक्यात जतीन्द्रनाथ दासांचे उपोषण, भगतसिंगांचा खटला, सॉंडर्सचा खून इत्यादी गडबडीत ती संस्था बेकायदा ठरुन सर्व जप्त झाले व तेथे पूर्णविराम झाला. तथापि सुभाषबाबू हे या मार्गाचे उघड पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांच्याबद्दल सहानुभूति वाढली. पण दैनंदिन व्यवहार कॉंग्रेस आदेशाप्रमाणे चालत असे.

कॉंग्रेसमध्ये गांधीजींचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत होता व ते या दहशतवादाच्या-विरुद्ध होते. त्यामुळे त्यांनी शस्त्रावर ज्यांचा विश्वास आहे, अशा सर्व विचारांना कॉंग्रेसमधून पद्धतशीरपणे घालवून लावले म्हटल्यास अयोग्य होणार नाही. भगतसिंगाच्या नंतर पुन्हा अशी जबरदस्त संघटना भारतात होऊ शकली नाही व सुभाषबाबूंचे संबंधही परदेशात वाढत गेले व १९३९ साली महायुद्ध सुरु होताच त्यानी एकवेळ कॉंग्रेसश्रेष्ठींच्या विचारांचा कौल पाहिला, पण त्यानी स्वच्छ सांगितले : कॉंग्रेसमध्ये राहून काही करता येणार नाही. भारताच्या स्वातंत्र्याकरता कॉंग्रेस बाहेर होऊन कोणाला काहीही करता येते. त्याप्रमाणे सुभाषबाबू कॉंग्रेसबाहेर पडले व लौकरच ते भारताच्या बाहेर जाऊन त्यांच्या स्वतःच्या मताप्रमाणे जर्मनीशी, जपानशी संबंध जोडून स्वतंत्र सैन्य उभे करुन भारताच्या सरहद्दीवर येऊन त्यानी ब्रम्हदेशातून स्वारी केली, युद्ध पुकारले, रोज अशा बातम्या येत होत्या. मन सारखे खळबळून जात

होते. सुभाषबाबूंचे रेडिओवरून भाषण होत असे. ते ऐकण्यास मन सारखे धडपडे. त्यांचे रिपोर्ट ऐकावयाचे काम चालूच होते. मग असा निश्चय केला की, सरकारच्या सैन्यात भरती होऊन युद्धआघाडीवर जावयाचे व सुभाषबाबूंना जाऊन मिळायचे. त्यावेळी एकदम कमिशन देऊन ऑफिसर्स नेमीत असत. पण कमीत कमी मॅट्रीक तरी पाहिजे. (किंग्ज कमिशन, व्हाईसराय कमिशन) तेव्हा एका स्नेहयांनी बोलता बोलता सहज सांगितले, सिव्हिल गार्डमध्ये चांगले काम केले तर ४-५ महिन्यात कमिशन मिळू शकते. मग ताबडतोब सिव्हिल गार्डमध्ये दाखल झालो. परेड वगैरे सुरू झाल्या. फौजदार रा. वालावलकर यांची माझ्यावर खूप मर्जी बसली. त्यामुळे मला कमिशन मिळण्याची स्वप्ने पडू लागली व कुणीकडे कसे जावे असे विचार घोळू लागले.

## क्रांतिकारक लढ्यात उडी

एवढ्यात १९४२ चा लढा काँग्रेसने सुरु केला. त्याचे स्वरुप उघड सत्याग्रह, कचेरीवर मोर्चे काढणे असे होते. त्यामुळे मला ते आवडत व पटत नव्हते. पुढे वडूजच्या मामलेदार कचेरीवरील मोर्चावर गोळीबार झाला व त्यात ८ जण मारले गेले. इस्लामपूरच्या मोर्चात दोन लोक ठार झाले. तासगाव व कराड येथील मोर्चे यशस्वी झाले. काँग्रेसच्या वरिष्ठ पुढाऱ्यांची धरपकड ८ ऑगस्टलाच झाली होती. नंतरच्या पुढाऱ्यांनी (जयप्रकाशजी, अच्युतराव पटवर्धन, राममनोहर लोहिया, अरुणा असफल्ली, आण्णासाहेब सहस्रबुद्धे वगैरे पुढाऱ्यानी) उघड चळवळीपेक्षा गुप्त चळवळ चालवून व्यक्तिगत हिंसा करावयाची नाही व खाजगी प्रॉपर्टीचा नाश करावयाचा नाही, अशा मर्यादा घालून विध्वंसनाची चळवळ सुरु केली. सर्व भारतात आंदोलन सुरु होते. रेल्वे स्टेशन्स जाळली, बंदूका पळवल्या, पोस्टाच्या थैल्या लुटल्या. सरकार दडपशाही जोरात करू लागले. हजारो लोकाना तुरुंगात टाकणे, गोळीबार करणे, मिलिटरी आणून स्त्रियांवर अत्याचार करणे यामुळे सर्व देशात डोंब उसळला व आता युद्धआघाडीवर जाऊन सुभाषबाबूंना मिळण्यापेक्षा या देशातील चळवळीत उडी घेऊन लढत लढत देहत्याग करावा असा मनाचा निश्चय झाला.

त्यावेळी कुठं कसं जाणार? हा विचार पडला. शिवाय सिव्हिल गार्डमध्ये असल्याने कित्येक जण मला हिंदू महासभेचा असेही समजत असत. त्यामुळे सकाळी कृष्णा नदीवर स्नानास जाताना आमच्या क्लबमध्ये मी सहज म्हटलं आपल्याला चळवळीत सामील व्हावयाचे आहे. तेव्हा ताबडतोब कळलं की श्री. सदुभाऊ पेंढारकर हे सातारा जिल्ह्याच्या या विभागाचे प्रमुख आहेत. ते तर आमच्या क्लबचे मेंबर. मग काय गुप्तपणाने त्यांची गाठ घेतली व त्याना मनोदय कळवला. त्यांचा माझ्यावर जबरदस्त विश्वास असल्यामुळे खूप मोकळेपणाने बोलले व पुष्कळशी माहिती दिली. यशवंतराव चव्हाण यांची गाठ घालून देण्याचेही ठरले व प्रत्यक्ष ॲक्शन करण्यास सुरुवात केली. यावेळी डी.जी. देशपांडे (बी.कॉम्.) हे या चळवळीचे प्रमुख आहेत

म्हणून कळताच त्यांची गाठ घेतली व त्यांच्याकडून सर्व प्रांतातील माहिती कळून त्या प्रांगणात प्रवेश झाला. शांताराम इनामदार हा यशवंतरावांचा प्रायव्हेट सेक्रेटरी, त्याच्या कानावर गोष्ट जाताच त्याने माझी गाठ घेऊन माझ्याशी चर्चा केली. त्यावेळी कामाचे स्वरुप बुलेटिन्स वाटणे, सत्याग्रह करणे असे झालेच होते. त्यांनी माझी परीक्षा पहाण्याकरिता कदाचित असेल, रेल्वेवर जाण्याचा कार्यक्रम ठरवला. रात्री दहा वाजता निघण्याचे ठरले पण रात्री ९ वाजेपर्यन्त कोणी आलेच नाही. मी बरोबर एक पहार घेऊन सायकलवरुन रेल्वेवर गेलो. कुठेच कुणी भेटले नाही, मग भला मोठा दगड रेल्वेलाईनवर ठेवला, मेल आली व त्यावर आदळली. मी दुरुन सर्व पाहात होतो. ताबडतोब गाडी थांबली. सर्वत्र गोंधळ उडाला. सर्व पॅसेंजर खाली उतरले. स्टेशनवरुन पोलिस पार्टी आली. धोंडा जप्त होऊन सर्वत्र खळबळ माजली. गाडी सकाळी पुढे गेली. सर्वांना अचंबा वाटला. हे कोणी केले? मग सर्वांना कळले. समाधान वाटले व मी आतल्या गोटात प्रवेश केला. नंतर माझ्या हाताखाली मुलांची एक तुकडी देण्यात आली. त्यात माधवराव जाधव, बाबूराव नलावडे, शास्त्रीबुवा, बाजीराव उमराणी, नेवाळकर, बाळ भुरके इ. १५-२० जण होते व माझे सांकेतिक नाव "धन्वंतरी" होते. त्यावेळी वॉरंट आपल्या पाठीमागे आहे अशा समजुतीने भूमिगत होण्याची प्रथा अतिशय वाढली होती. त्याला तडाखा देण्याचे मी व सदूभाऊंनी ठरविले व प्रत्यक्ष वॉरंट निघाले याची खात्री झाल्याशिवाय भूमिगत व्हावयाचे नाही असे ठरवून टाकले. १९३२ पासून १९४२ पर्यन्त कराडला फक्त आम्ही वैद्यकीय व्यवसाय करुन पैसे मिळवावयाचे असे धोरण ठेवल्याने राजकारणाचे माझे अंग कराडच्या कोणासही ठाऊक नव्हते. त्यामुळे चार महिने काम करीत असतानासुद्धा उघड राहाता आले. रोज तारा तोडणे, पोस्टाच्या थैल्या लुटणे, बॉम्बचे साहित्य जमा करुन पुल उडविण्याचे प्रयत्न करणे, रेल्वे पाडण्याचे प्रयत्न, रिव्हॉल्व्हर जमवणे, हत्यारे जमवणे असे कार्यक्रम सुरु होते.

## शिरवडे स्टेशन जाळले

यशवंतराव कराडला आले त्यावेळी माझी त्यांची गाठ सदुभाऊंनी पालून दिली व कामाची सर्व माहिती दिली. त्यावेळी ते प्रेमाने भेटले व माझ्याशी चर्चा केली. मी माझी जिल्ह्यात चळवळ करण्याची योजना सांगितली व नंतर त्यांनी लिहून द्या म्हटल्यावर लिहून दिली. त्याचा फारसा उपयोग नव्हता, पण अगदी आतल्या गोटात माझा प्रवेश झाला. त्यांनी सांगितले शिरवडे स्टेशन जाळण्याकरिता २-३ प्रयत्न झाले. ते फसले पण यश आले नाही. तेथे ५ हत्यारी पोलिस आहेत. मी त्यांना सांगितले ही अॅक्शन व्हावी अशी आपली इच्छा असेल, तर आम्ही पार पाडू, एक स्टेशन तरी जाळू, नाहीतर स्वतः मरुन तरी जाऊ, पण त्याची संपूर्ण जबाबदारी आमच्यावर पाहिजे. त्यांनी ठीक आहे म्हणून सांगितले. नंतर आम्ही उठलो. सदुभाऊंनी आणि मी विचार केला व मी

स्वत: वॉच करुन येतो म्हणून सांगितले व शिरवड्यास रोगी तपासण्याचे निमित्त करुन गेलो. शिरवड्याच्या कुलकर्ण्याची बायको आजारी होती. मला माहीत होते. तेथे गेलो. तब्येत पाहिली. नंतर स्टेशनवरील बाकावर अशा अंदाजाने येऊन झोपलो की, तेथून बरोबर घड्याळ दिसावे. सातच्या सुमारास स्टेशन मास्तर आले. त्यानी सांगितले स्टेशनात रात्री थांबण्यास कोणास परवानगी नाही. मी डॉक्टर आहे. रोगी पहावयास गेलो होतो. तेव्हा रात्रीच्या पॅसेंजरने मला जावयाचे आहे. त्याना विश्वास वाटून झोपू दिले. बरोबर साडेसातला पोलीस आले व स्टेशन मास्तरांना विचारले की कोण झोपले आहेत? त्यानी सांगितले कराडचे डॉक्टर आताच्या गाडीने जाणार आहेत. आता जरी त्यानी मला बाहेर हाकलले असते तर माझी तक्रार नव्हती. माझे काम संपले होते. पोलीसांनी येऊन मला विचारले, "केव्हा आला होता, कुणाच्या घरी गेला होता?" इतकेच. पोलीसांनी फारशी चौकशी केली नाही. नंतर रात्रीच्या गाडीने कराडला आलो. सदुभाऊना सर्व हकीकत सांगितली व कार्यक्रम कायम केला. शांताराम इनामदाराने रामभाऊ पवार यानाही बोलावले होते. तांबव्याच्या लोकांनाही सांगितले होते. आम्ही सर्व पांगून सातच्या सुमारास डोंगराआड जमलो. इतक्यात रामभाऊ पवार आले व रात्री ९ वाजता ॲक्शन करु म्हणाले. मी साफ नकार दिला व बरोबर साडेसातच्या आत काम पूर्ण करणार म्हणून सांगितले. सदुभाऊ मोटार सायकलवरुन मागाहून येणार होते. लागलीच आम्ही सर्व वेषांतर करुन चाल करुन गेलो तर स्टेशन मास्तरने फोन वरुन कराडास कळवले. स्टेशन खलास झाले. ते आमच्या लक्षात येताच ताबडतोब स्टेशन मास्तरला बाजूस घेऊन स्टेशनातील पोस्टर्सवर एक हत्यारी माणूस उभा करुन ताबडतोब कार्यभाग उरकण्याच्या नादी लागलो. स्टेशनमध्ये शिल्लक नव्हतीच. मोडतोड करुन स्टेशन पेटविले. इतक्यात स्टेशन मास्तराना कोणीतरी मारले. तो ओरडत माझ्याकडे आला. मी विचारले : कोणी मारले? त्याने एका मुलाकडे बोट केले. मी एक जोरात त्याच्या मुस्काटात मारली. त्यांची क्षमा मागितली, तुम्ही फोन केल्याचा त्याला राग येऊन त्या रागाच्या भरात झाले, तेव्हा क्षमा करा. याचा परिणाम त्याच्या मनावर फार मोठा होऊन मास्तरने एका बाजूस नेऊन सांगितले की आंत बंदुका आहेत. त्यावेळी सर्व स्टेशन पेटले होते. मी त्यांना म्हटले तुम्ही नुसत्या दाखवा. त्या मी बाहेर आणीन. मी एकटा जाणार नाही. तुम्ही माझा घात होण्याच्या दृष्टीने म्हणत असाल तर? मग त्याना बरोबर घेऊन बरोबर आतल्या खोलीत जाऊन हाताने चाचपून पहिल्यांदा खात्री केली. मास्तराना सोडून दिले व सर्व बंदुकांचा कवळा भरुन सदुभाऊपुढे आणून ठेवल्या. सदुभाऊ मोटारसायकलवरुन आले होते व मोटारसायकल पुढे सोडून दिली होती. सर्वांना अतिशय आनंद झाला. एक पिशवीही तिथे होती. तीही बाहेर काढून आणली. सदुभाऊनी एक बंदूक रामभाऊ पवार, दोन बंदुका तांबवे ग्रुपकडे व दोन कराड ग्रुपकडे दिल्या व पिशवीत काही असणार नाही म्हणून फेकण्याचे ठरले. मी ती उचलून खाकोटीस मारुन आमचे निरनिराळे ग्रुप करुन परत निघालो. तो

सशस्त्र पोलीस पार्टी येथे दाखल झाली. डोंगरात आम्ही आहोत या भावनेने ते टॉर्चचे लाईट पाडू लागले. आम्हास दुरुन गंमत दिसत होती. आम्ही वाटचाल करीत आडरस्त्याने ओगलेवाडीच्या माझ्या दवाखान्यात रात्री ९ चे सुमारास पोचलो. मी, सदुभाऊ आणखी १-२ होतो. यशवंतराव आमची सारखी काळजी करत तेथे बसले होते. कारण त्याना शिरवडयाहून ताबडतोब येऊन फोन आल्यापासून अवघ्या २० मिनिटात पोलीस पार्टी रवाना झाल्याचे कळले होते. तेव्हा सर्व सुखरुप कसे भेटतील? आम्हास पाहताच कडकडून भेटले. पिशवी पाहिली तर त्यात पानाची चंची, दगड व १५० काडतूसे. काडतुसे पाहून सर्वांना आनंद वाटला व माझी पाठ थोपटली. नंतर कपडे बदलून ताबडतोब सायकलवरुन झोपावयास दवाखान्यात. सकाळी पुन्हा सिव्हील गार्ड परेडसाठी फौजदार जवळ ॲक्शन करीत असता किती दक्षता घेतली तरी काही किरकोळ चुका झाल्या. स्पिरीटची मोकळी बाटली तेथे पडली होती. त्यावर दातारांचे नाव होते. त्यानी ताबडतोब घरचे चमचा चमचा स्पिरीट गोळा करुन बाटली भरुन ठेवली व कुणा गिऱ्हाईकांची पडली असेल माहीत नाही म्हणून सांगितले. अर्थात हा गुन्हा येथील स्थानिक लोकानी केला असे म्हणू नये म्हणून मी त्या बंदुकीच्या बॉनेटवरची कातडयाची मॅन घेऊन बेळगावास गेलो.

## मी भूमिगत झालो

सन १९४० साली ज्या वेळी मी हिंदी शिकत होतो, त्या वेळी प्रमिला देशपांडे, भय्याशास्त्री वाटवे यांच्याकडे शिकण्यास येत होत्या. त्यांचा माझा परिचय वाढत गेला व पुढे आम्ही चांगले मित्र बनलो. त्याही अत्यंत हुषार, चलाख, राष्ट्रीय वृत्तीच्या, प्रेमळ अशा होत्या. चळवळ सुरु झाल्यावर बेळगावला जोरात लाठीहल्ला झाला. त्यात त्यांच्या धाकटया भावास मार बसला व तो पकडला गेला. हयाही अगदी संतापून चळवळीत पडण्याच्या विचारात होत्या. अंत:करणाने आम्ही इतके जवळ आलो होतो की, मला वाटेल ते मी त्यांना कळवत असे व त्याना वाटेल, मनात येईल ते त्या मला कळवत असत. आता या चळवळीत पडावे असे मला वाटतं. मी त्याना पत्र पाठवलं. योगायोगानं त्यांचंही पत्र असा लाठीहल्ला झाला, धाकटा भाऊ पकडला गेला, मला चळवळीत भाग घ्यावासा वाटतो, असं आलं. दोघांची पत्रं एकाच दिवशी पोस्टात, एकाच दिवशी, एकाच वेळी, एकमेकांच्या हातात. चळवळीचे स्वरुप पाहून त्या तेथील गटाशी संबंध वाढवून काम करीत होत्या. मी इकडे काम करीत होतो. त्यामुळे स्वाभाविकच बेळगावला गेल्यावर त्याना माझी कल्पना सांगितली. सर्वांना एकदम पसंत पडली, व त्याप्रमाणे साताराच्या डी.एस्.पी. च्या नावे पत्र तयार केले. "आम्हास आनंद वाटतो की, त्याना त्या काळात आपल्याला ही सुंदर भेट पाठवता आली. त्या परमेश्वराचे आम्ही आभारी आहोत." अशी एक चिठी व त्या म्यानाचे तुकडे (नंबर शाबूत राखून) एका खोक्यांत घालून साताऱ्याच्या पत्त्यावर धारवाडहून रवाना केले. ते

दोन दिवसात त्याना पोचले. त्याप्रमाणे उपयोग झाला व पोलीस दप्तरी हा कर्नाटककडच्या लोकानी येऊन गुन्हा केला असा रिपोर्ट होऊन शिरोड्याचा तपास स्थगित झाला.

आमच्या कामाचा सपाटा सारखा सुरु होता. त्यामुळे सर्व अधिकारी अगदी भांबावून गेले. परंतु दुर्दैव आमचे. आमच्यातीलच एका पोराने झुल्लक कारणावरुन वालावलकर फौजदार यांच्याकडे चहाडी केली. फौजदाराना खरे वाटेना. त्यानी त्याला हाकलून दिले व उगाच तपास म्हणून बाबूराव कोतवाल याना पकडून बेदम मार दिला. ते यशवंतरावांचे जवळचे आप्त असल्याने त्याना तपशीलवार माहिती होती. त्यामुळे प्रथमपासून शेवटपर्यन्त तारीखवार सर्व ॲक्शन्सची माहिती, नावे त्याना समजली. आम्ही ठरवले होते की निश्चित वॉरंट निघाल्याशिवाय फरारी व्हावयाचे नाही. त्यामुळे दुसऱ्या दिवशी परेडला ग्राऊंडवर गेलो. पण सायकल अशी लावली होती की वेळ पडल्यास पलायन करता यावे व फौजदाराच्या हालचालीवरही सारे लक्ष ठेवता येईल. त्याना अपुरी माहिती होती. म्हणून दुपारी डॉ. देशपांडे याना रोगी तपासण्याच्या निमित्ताने बोलावून कासेगांवकर वैद्य कोण? आमच्याकडे का येतात? त्यानी मोघम सांगितले. सर्व पिता, पुत्र कासेगांवकर वैद्य म्हणून संबोधले जातात. 'बरं', फौजदार म्हणाले. गावातील सर्व डॉक्टराना माहीत होते मी असल्या काही उद्योगात आहे. बॉम्ब करता पोटॅश क्लोराईड लागते. बाजारात विक्री बंद असल्याने डॉक्टरकडे ते कोणास किती दिले याची यादी असे. तरी त्यांच्या मार्फत मागवून सर्वत्र भरपूर पुरवठा करीत असू. त्यामुळें डॉक्टरांनी घरी आल्याबरोबर बोलवून घेऊन मला सांगितले. फौजदार आज तुमची चौकशी करीत होते. मी ताबडतोब ओळखले, व सदूभाऊना सांगितले 'टाईम आला बरं. आता जर दुर्लक्ष झालं तर पकडले जाऊ.' ते म्हणाले, 'थांबा काय काय होतं ते पाहू. सावध रहा.' मात्र दुपारी १२ च्या सुमारास शिपाई डॉ. देशपांडे यांच्या दवाखान्यातून माझ्यावर नजर ठेवू लागला. मी त्यास पाहिले. ताबडतोब विचारले का उभा राहिलास? तो म्हणाला, 'एनिमा पॉट पाहिजे.' 'चल मी देतो'; म्हणून त्याला घेऊन माझ्या दवाखान्यात आलो. तर शेजारी दिले होते, म्हटलं 'थांब आणतों.' 'बरं', म्हणाला आणि परत येतो म्हणून निघून गेला. मी ओळखले तो शिपाई घेऊन येणार, म्हणून कंपाऊंडरपाशी पॉट देऊन बाहेर काम आहे म्हणून निघून गेलो. तो परत आला तर पॉट मिळाले, पण मी नाही. मग त्याने सांगितले 'भाऊसाहेब यांनी बोलावले आहे'. मी परत येऊन जेवून बाहेर निघून गेलो. दुपारी ४ च्या सुमारास पोलीस पार्टी घरी येऊन बसली. मी सदुभाऊंच्या वाड्यात. तेथे बातमी आली घरी पोलिस आहेत. घरी जाऊ नका. तरी सदुभाऊ म्हणाले, 'नाही. इतक्यात हालावयाचे नाही.' मग संध्याकाळी बाहेर बाजारपेठेत काय हालहवाल म्हणून चौकशी करीत निघालो. गप्पा मारीत मुळचंद राजाराम यांच्या दुकानी बसलो होतो. इतक्यात सर्व गावात पोलीस शोधार्थ सुटले, मुलंही मी असेन तेथे बातमी सांगण्यासाठी फिरु लागली. नंतर मुलाना

मी दुकानात दिसलो. त्यानी ताबडतोब सांगितले. दहा पोलिस सर्व गाव तुमच्याकरता धुंडाळत आहेत. मग डॉ. व्ही.जी. देशपांडे यांच्या दारी गेलो. तेथे जाईन अशी कल्पनाही नव्हती कोणास. त्यामुळे तेथे सुरक्षित होतो. पोलिसानी सर्व थिएटर, पाहुणे, स्नेही यांची घरे तपासली व रात्री १२ वाजता येऊन बंधूना, बायकोस पकडून घेऊन गेले. डी.जी. देशपांडे डॉक्टरांच्या घरी होतेच. ते व मी पहाटे कृष्णानदीतून पार होऊन मधल्या रस्त्याने किवळला गेलो. सर्व पत्रातून बोल्ड टाईपमधून फरारीपणाची बातमी कळली. पोलिसांचा ससेमिरा पाठीमागे लागला. किवळला पोलिसांचे दडपण वाढले, म्हणून कोरेगावी पांडुरंग बोराटे यांच्या शेतात राहिलो. तेथे पोलिसाना सुगावा लागला म्हणून मालगाव, नंतर शिवधर. पण फार दिवस कुठे काढणे शक्य होईना. बातम्या भयंकर उठू लागल्या. त्यामुळे पुन्हा किवळला आलो. सदुभाऊ पकडल्याची वार्ता कानी पडली.

## बेळगांवात रेल्वे चौकी जाळली

इतक्यात बेळगांवहून पत्र आले, तेथे पोलिस दडपण फार वाढले असेल तेव्हा विश्रांतीकरता इकडे या. अगदी योग्य वेळी माझ्या हाती पत्र पडले. त्यामुळे डी.जी. व मी बेळगांवी निघून गेलो. डी.जी. परत आले मी राहिलो. तेथील जीवन अतिशय आनंदात गेले. ते आयुष्य अविस्मरणीय आहे. काही संबंध नसता तळहाताच्या फोडाप्रमाणे माझी काळजी घेतली जात असे. आम्ही मनानं एकरुप झालो. सर्व घरची मंडळी प्रेमाने वागत असत. मला माझे ते आई, वडील, भाऊ वाटू लागले. मी त्यांच्या घरचा बनलो. पहिले चार आठ दिवस विश्रांतीत गेल्यानंतर कर्नाटकातील गजाननराव याळगी, मुत्केकर, मनोळी वगैरेंच्या ओळखी करून देण्यात आल्या. परिचय उरकल्यानंतर मी त्यांच्या घरी जाऊ लागलो. २६ जानेवारी (१९४३) उजाडला. मी म्हटलं, 'आज स्वातंत्र्यदिन, पण काय इलाज?' गजाननराव याळगी म्हणाले, 'आज ॲक्शन करु या'. मी म्हटलं, ठीक. कोणती? रेल्वे चौकी जाळून टाकू? शहापूर रस्त्यावरील। ठीक आहे. त्यांची जाळण्याची पद्धत रॉकेल डबा कढईत ओतून त्यात बोळे बुचकळून ते तारेने बांधून इमारतीच्या आढघास अडकवीत असत. त्यामुळे बोळघापुरताच भाग जळे. संपूर्ण इमारत जळून खाक होत नसे व खर्चाचाही प्रश्न नव्हता. मी म्हटलं: 'तुम्ही शहरी लोक व पैसेवाले, तुम्हास ते शक्य आहे. आम्ही साताऱचे लोक, दरिद्री व अर्धवट काम आम्हास कधी पसंत पडतच नाही.' मग शेजारी कडबा किंवा गवत यांची गंज आहे का विचारले. त्यानी भाताण्याची आहे म्हणून सांगितले. मग मी चालेल म्हणून रात्री साडे दहाला पंचवीस मुले घेऊन निघालो. तेथे जाऊन चौकीवाल्यास उठवून जर गडबड करशील तर गोळी घालीन म्हणून त्यास रिव्हॉल्व्हर दाखवले. त्याबरोबर तो घाबरुन स्वस्थ बसलाा. शेजारच्या फाटकातून मोटारची रहदारी चालू होती. पण तेवढ्यापुरते लपत असे, पण काम सुरु. त्याचे सर्व सामान बाहेर काढले व त्यात ते भाताणे भरुन

पेटवून दिले. अर्ध्या पाऊण तासात सर्व जळून खाक. नुसत्या दगडी भिंती जळून खाक होऊन उभ्या राहिल्या. सकाळी सर्व मित्र याळगींच्या बंगल्यावर जमले व माझे अभिनंदन केले व मला सांगू लागले सर्व जळून खाक झाले. तेथे काही राहिले नाही. मी म्हटले, बाबांनो ही सातारी पद्धत पैसा खर्च नाही व काम पूर्ण फत्ते. मग सर्वांची गट्टी जमली.

## दारु गुत्ते बंद केले

दुसरा कार्यक्रम दारु गुत्ता फोडण्याचा. १-२ दिवस गेले व कार्यक्रम ठरला. पंचवीस जण गेलो. परत सर्व तेथील रहिवासी असल्याने त्याना ओळखण्याची भीती असल्याने पुढे होण्याची मजवर कामगिरी होती. रात्री ११ चे सुमारास गेलो. गिऱ्हाईक कमी होत आले होते. गल्ला मोजणे चालू होते. प्रथम मी आत गेलो. 'काय साहेब?' म्हणालो. ताबडतोब रिव्हॉल्व्हर दाखवून खाली ओढला. चोपून काढला व सर्व पिंपे फोडून टाकली. या भागात जर दारुगुत्ता पुन्हा चालला तर जिवास मुकशील म्हणून सांगून दम भरला. त्या भागातील सर्व दारु दुकाने पुन्हा बंद. मग आमच्या टोळीस चांगला जोर आला. पुन्हा १-२ दिवस जाऊ दिले. पोलीस खळबळ थांबू दिली. नवा कार्यक्रम घेतला. रेल्वेवरील हत्यारांचे स्टोअर लुटले, हत्यारे लुटून विहीरीत आणून फेकून दिली. ऑस्ट्रेलियाहून गुन्हे शोधणारे कुत्रे सरकारने आणले होते. त्याला त्या गुन्ह्याच्या जागी नेऊन सोडले. ते माग काढीत काढीत शेजारच्या गावी परटाच्या घरी गेले. त्या बिचाऱ्यास मरेपर्यन्त मार बसला व रेल्वेची हत्यारे कुठं आहेत म्हणून विचारले तो बिचारा काय सांगणार?

## पोस्टाच्या थैल्या लुटल्या

नंतर ठळकवाडीतील पोस्टाच्या थैल्या लुटण्याचा कार्यक्रम ठरविण्यात आला. आसपास ऑफिसर्सचे बंगले, एक मैलावर मिलिटरी, नजीक पोलीस चौकी व हमरहदारीच्या रस्त्यावर ॲक्शन करावयाची. सकाळी आठची वेळ असेल तेव्हा मी ॲक्शन करेन, पण इथला माहितगार मी नसल्याने सुरक्षितपणे मला घेऊन जाण्याची सर्व जबाबदारी तुमच्यावर. तेव्हा सर्वांनी ठीक म्हटल्यावर ॲक्शनची तयारी सुरु केली. प्रत्येक ठिकाणी सायकलस्वार. मी फक्त ॲक्शन करुन माझ्या बरोबरच्या सायकल-बरोबर जावयाचे. मुसलमानी पोषाख केला, व तोंडात सिगरेट धरुन महत्त्वाच्या चौकात उभे राहिलो. त्या दिवशी गाडी लेट त्यामुळे उशीर झाला. ९ वाजले, १० वाजले, ११ वाजले आता सर्वांना संशय येऊ लागला व हा कोण उभा आहे म्हणून कुतुहल सुरु झाले. मजजवळ रिव्हॉल्व्हर असल्यामुळे मला पकडण्यास कशाचीच जरुर नव्हती. तेव्हा आज रहित करावे असा विचार करत होतो. इतक्यात मेल आली. पोस्टमन सायकलवरुन थैल्या घेऊन आला. वाटेत अडवून दोन मुस्काटात देऊन त्या

हिसकावून घेऊन पोत्यात घालून सायकलवर बसून पसार होऊ लागलो. तो बोंबलू, ओरडू लागला. शेजारचे इमारतीवर २५ गडी-गवंडी काम करीत होते. तो ओरडा ऐकून पाठलाग करण्यासाठी माझ्या मागे लागले. ताबडतोब सायकलवरुन उतरुन त्याच्यावर रिव्हॉल्व्हर रोखून 'जर ओरडाल अगर पाठलाग कराल तर गोळ्या घालीन' म्हटल्याबरोबर सर्व गुपचुप आपल्या कामावर पळाले व मी सुरक्षितपणे शेजारच्या सायकलवाल्याबरोबर निघालो. ठिकठिकाणी सायकलस्वार होते. त्यानी बरोबर जिकडे आम्हास जावयाचे होते त्याच्या विरुद्ध दिशेस तेथे मोकळ्या आंबराईत नेऊन पोस्टाच्या थैल्या फेकून दिल्या. मी माझा मुसलमानी वेष बदलून नेहमीचा पोशाख केला व गजानन याळगी व मी सरळ एका हॉटेलमध्ये येऊन फराळ केला. एका वेश्येच्या घरी मुक्काम ठोकला. तेथे सर्व पाहिले. रोख ५०० रु. व इतर पार्सले निघाली. त्यानी मला खर्चास काही पाहिजे का म्हणून विचारले मी काही नको म्हणून सांगितले, म्हणून माझ्याविषयी अतिशय आदर वाटला व त्यांचा म्होरक्या बनलो. साऱ्या शहरास अतिशय मोठा हादरा बसला. पोलीस दल गडबडले. या कार्यक्रमाकरिता कर्नाटकातील निरनिराळ्या ग्रुपनी प्रयत्न केले होते; पण सर्वांना अपयश येऊन सर्व हताश झाले होते. त्या सर्वांना हे कळताच अतिशय आनंद झाला व कर्नाटकातील हायकमांड सर्कल श्रीरंग कामत, वडवी मास्तर वगैरे त्यांच्यापर्यन्त हे सर्व जाऊन पोचले. बेळगावात फिरणे अशक्य झाले. रस्त्याने पोलीस त्या रनरला घेऊन हा का तो मनुष्य? असे करत फिरू लागले. गावात असा लठ्ठ माणूस होता, दाढी हातभर होती, त्याच्या हातात रिव्हॉल्व्हर होते अशी चर्चा सुरु झाली.

मग याळगीने बेळगाव सोडावे म्हणून ठरवले. त्याबरोबर पुढील स्टेशनवर बसून धारवाडला गेलो, पण ते शहर लहान असल्यामुळे तेथे लपून राहणे कठीण होते म्हणून एक दिवस राहून रात्री हुबळीस गेलो. ते शहर मोठे आहे. तेथील रसशाळेच्या शाखेच्या दुकानात राहिलो. तेथे श्रीरंग कामतांची गाठ घालून देण्यात आली व तेथील बँकेची ॲक्शन घ्यावी असे याळगींचे म्हणणे होते. पण काही दिवसानी करु असे ठरले. कर्नाटकच्या कामाची शिस्त, हिशोबी पद्धत वगैरे सर्व पाहून हे आपण अंमलात आणू शकू असे वाटून जरा स्थिरस्थावर झाल्यावर पुन्हा बेळगावी आलो. कराडहून पत्रे येऊन पडली होती की जरुर इकडे निघून या. आम्ही सर्व पोरके झालो आहोत. सर्वांची वाताहत झाली आहे. मग माझ्या कर्नाटकच्या या प्रेमळ मित्रांचा निरोप घेण्याचे मी ठरवले. इतक्यात श्रीरंग कामत बेळगावी येत आहेत असा निरोप आला. नंतर मी बेळगावीच थांबलो. श्रीरंग कामत आले आणि त्यांच्याशी करार झाला. कर्नाटकने पैसे पुरवावे व आम्ही दिमाखाने कर्नाटकातून जी रेल्वे जात आहे, ती बंद पाडावी. आमच्याकडे आम्ही तिला दासी बनवली होती. गाडीने जाऊ का विचारावे व आम्ही जा म्हटलं की जायचे. तिच्यातून दहा मैल वेगाने जावयाचे. शिवाय प्रत्येक डांबास राखण्या होताच. इतक्या लवाजम्यात मिरज गाठल्यावर पुढे मग वेगाने धावायचे. हे माझ्या

डोळ्यास काही सहन होईना. अर्थात आमचा करार पूर्ण होऊन दोन दिवसानी मी निघणार. इतक्यात दुसऱ्या दिवशी कोल्हापूरला श्रीरंग कामत पकडले गेल्याची दुःखद वार्ता आली. परंतु पुन्हा पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळाल्याचेही समजले. मग थांबलो. श्रीरंग दुसऱ्या दिवशी लगेच बेळगावला आले. पुन्हा कडकडून भेटलो. एक दिवस त्यांच्याजवळ राहिलो. एका दिवसात ५० हजारांच्या देणग्या माझ्यासमोर मिळवल्याचे व त्यांच्यावरील जनतेचा विश्वास पाहून थक्क झालो.

## भूमिगतांची संघटना

नंतर सर्वांचा गोड निरोप घेऊन रात्रीच्या गाडीने किर्लोस्करवाडीत आलो. पी.के. कुलकर्णी यांच्या घरी होतो. तेथे शांताराम इनामदार भेटले. शिरवडा केस सुरु झाली होती. त्याची सर्व माहिती घेतली. तसेच भागातील इतर माहिती घेतली व नंतर दुसऱ्या दिवशी रात्रीच्या गाडीने मसूर स्टेशनवर उतरुन किवळला सूर्योदयापूर्वी जाऊन पोचलो. तेथील सहकारी भिकू पाटील, बापुसाहेब कोणगावकर, व्यंकटराव घरेगांवकर, दत्तोबा काटकर सर्व भेटले व पुढील संघटनेविषयी मी त्यांच्याशी चर्चा केली. सर्व जिल्ह्यात त्यावेळी वाताहात झाली होती. कोणा भूमिगताचा कोणास पत्ता नव्हता. कोणी मुंबईस गेले होते. कोणी डोंगरात दडून बसले होते. कोणी गवंड्याच्या हाताखाली लपून छपून कामे करत होते. तेव्हा सर्व ग्रुपमधील माणसे एकत्र केली व असे ठरले की, कामे बंद ठेवली हे बरोबर नाही. तेव्हा कामे सुरुच ठेवावयाची पण जर आपण जिल्ह्यात एकटेच काम करत राहिलो तर सरकार सर्व शक्ती एकवटून आपला नाश करुन टाकील. तेव्हा सर्व जिल्ह्यातील ग्रुप्स् कार्यक्षम केले म्हणजे सर्वांवर सारखा ताण पडेल. मग तारा तोडण्याचा एक कार्यक्रम घेतला. काशीळच्या रानात कसाबाच्या हातून गाई सोडवल्या. कसाबाना मार दिला, त्यामुळे जिल्ह्यातील गाईंची विक्री साफ थांबली. डी.जी. देशपांडे हे काम उघड करीत असत. सरकारला त्यांचा कधीच संशय आला नाही. ते सुशिक्षित पदवीधर त्यामुळे त्याना सर्व सुशिक्षित समाज आदराने पाही. शिवाय त्यांचा मित्रपरिवार सर्वत्र अतिशय मोठा, कष्ट करण्याची तयारी अतिशय मोठी, धाडसी, हुषार, समयसूचक, त्यागी, प्रसिद्धीविन्मुख, सुदृढ. साताऱ्याच्या चळवळीच्या यशापैकी निम्या यशाचे ते भागीदार आहेत म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. जिल्ह्यात सावधपणे सर्वत्र उघड फिरत असल्यामुळे सर्व केसेसना मदत करणे, वकील पाहून त्याना सर्व मदत देणे, राजबंद्यांच्या घरी जाऊन त्याना धीर देणे, त्याना शक्य ती आर्थिक मदत पोचविणे, निरनिराळ्या व्यक्तींशी संबंध जोडणे, जिल्ह्यातील सर्व ग्रुपशी संबंध ठेवणे या सर्व गोष्टी ते पाहात असत. शिवाय कित्येक अॅक्शनचा वॉच करणे, प्रत्यक्ष अॅक्शनमध्ये भाग घेणे, औषधोपचारांची व्यवस्था, फार काय असे कोणतेही काम नाही की ज्यात डी.जी. नी काम केले नाही. भूमिगतांची शुश्रूषा, अच्युतरावांशी संबंध नेहमी ठेवणे, ही कामे त्याना पाहावी लागत आणि

आश्चर्याची गोष्ट म्हणजे इतकी सर्व कामे करीत असून पाताळयंत्री सरकारला त्यांचा संशयसुद्धा येत नसे. एक दोन वेळी पोलिसांच्या छाप्यात सापडले. पण बुद्धिचातुर्याने तेव्हाच निसटले. त्यामुळेच सरकारला कित्येक वेळा आम्ही, आंधळे अगर गाढव म्हणत असू. तेव्हा आमच्या मिटिंगनंतर डी.जीं. ना ही कल्पना मी बोललो. त्याना ती पसंत पडली. माझी जिल्हयात कुठल्याही भूमिगताशी ओळख नव्हती, पण कामामुळे सर्व भूमिगतांच्या कानापर्यंत माझे नाव गेले होते. त्यामुळे मी सरळ त्याना माझे नाव सांगे, त्यामुळे काम सोपे होई. आमच्या ग्रुपचे संघटन केल्यानंतर पाटण तालुक्यात शिरलो. बुवा म्हावशीकर म्हणून त्या भागात प्रसिद्ध भूमिगत होते. ते म्हावशीच्या डोंगरात लपून बसले होते. त्या भागातील डेखणचे खाशाबा रोमण गवंड्याचे हाताखाली काम करीत होते. राऊ पाटील असेच चोरुन शेतात राहात होते. बुवा म्हावशीकर म्हटल्यावर वाटले वृद्ध, गोपीचंदनाच्या मुद्रा लावलेले गृहस्थ असतील. जाऊन बघतो तर एक काळाभोर तगडा तरुण. बुवांना कडकडून भेटलो व म्हटले मला वाटले तुम्ही एखादे म्हातारे वारकरी असाल. नंतर त्यानी नाचण्याची कांजी आणली व मला म्हणाले, प्या, फार छान लागते. मी म्हटले की, कांजी म्हटलं की मला कससंच होते. तेव्हा कृपाकरुन मला आग्रह करु नका. अगदी थोडी घेतली. त्यानी सर्व तांब्या फस्त केला व म्हणाले, मी हल्ली कांजीवर असतो. कारण आपल्या देशात कंट्रोल बसले आहे व गरीबाना पोटभर अन्न हल्ली मिळत नाही. त्यामुळे या आहारावर राहिलो आहे. मी त्याना म्हटले, 'मला हा विचार पसंत नाही. यापेक्षा चला सरकारची गोडाऊन्स फोडू या व सर्व गरीबाना पोटभर अन्न खावयास घालूया आणि आपण पोटभर खाऊ या. आपल्या महाराष्ट्राची अशी ऐतिहासिक उज्ज्वल परंपरा आहे. माझ्या दृष्टीने हे विचार बेंधळे आहेत.' तेव्हा त्याना ते पटले व आम्ही दोघानी जेवण घेतले व मिटिंगकरता निमंत्रण देऊन कोठे कशा पद्धतीने जावे याची माहिती देऊन त्या भागातील सर्व भूमिगत हुडकून काढून त्यांच्याशी संबंध जोडून सर्वांना खाली घेऊन या म्हणून सांगितले. या वेळी भूमिगतांचा उघड तपास करता येत नव्हता. ठराविक ठिकाणीच जाऊन पोचावे लागे, त्यामुळे कित्येक वेळ २५ - ३० मैलसुद्धा एक एका सपाट्यात चालावे लागे. संध्याकाळी इंदोलीस येऊन पोचलो. इतक्यात निरोप आला की, किवळला बोलावले आहे. मग तसाच निघून गेलो.

इंदोली हे आमचे महत्वाचे ठाणे. कॉ. दिनकरराव निकम ही व्यक्ति अगदी डी.जीं. च्या (डी.जी. देशपांडे) सारख्या स्वभावाची. शिक्षण फारसे न झाल्याने स्थानिक व आसपास त्यांची फक्त माहिती. प्रखर राष्ट्रीयवृत्ती, कितीही आर्थिक अगर अन्य तोषीस लागली तरी सहन करण्याची शक्ती! आम्ही केव्हाही जात असू पण जेवण व राहण्याची व्यवस्था असे. आपल्या सद्वर्तनाने व लोकसेवेने सर्व गाव आपलासा करुन टाकलेला. त्यामुळे आमची बातमीसुद्धा कोणी देत नसे व सर्व गाव घरच्यासारखे वागे. दिनकररावांची लहानपणापासून राष्ट्रीय वृत्ती असल्यामुळे सर्व गावभर राष्ट्रबाण्याचे

संस्कार झाले होते. नेहमी निरनिराळ्या परिषदा घेत असत. सर्व भारतीय पुढारी जवळ जवळ इंदोलीहून येऊन गेले होते. प्रत्येक चळवळीत सर्व तुरुंगात जात. सत्याग्रह करीत, शिबिरे घेत. त्यामुळे स्वतःचे घर व गाव त्यानी राष्ट्रीय वृत्तीचा करुन टाकला होता. बेचाळीसच्या आंदोलनातही भाग घेऊन वामनराव कोडगुले यानी देह ठेवला. बाकीचे तुरुंगातून या वेळी सुटून आले होते. ते खरे गांधीवादी होते. त्याना आमचे पसंत नसे. विरोध कधीही न करता सर्वतोपरी मदत करीत असत. तेथील तुकाराम कोडगुले म्हणून एक तरुण आमच्या ग्रुपमध्ये सामील झाला. किवळला ताबडतोब गेलो. तेथे डी.जी. आले व उत्तर भागात किसन वीरांना कळविले आहे. मी त्याना वाईहून शिवथरला घेऊन येतो. तुम्ही एकसळला दादासाहेब साखवळकर यांच्या घरी या, मग तेथे मिटिंग घेऊ असे ठरले. त्याप्रमाणे ते निघून गेले. नंतर दुसऱ्या दिवशी मी, तानाजी पेंढारकर, आम्ही दोघे मिळून चौघे निघालो. रस्ता विचारीत विचारीत डोंगरातून जावयाचे. दुपार, आर्वीच्या अलीकडच्या ओढ्यात झाली. भूक सर्वांना लागली. ऊसाचा फड शेजारी होता. बरोबरची मुले शहरी. त्याना भूक लागली, ऊस तोडण्याचे धाडस होईना. मग मी ऊस मोडून आणून दिल्यावर त्याना समाधान वाटले. त्या दिवशी अक्षरशः भीक मागून थोडी भाकरी मिळाली ती खाऊन पाणी पिऊन पुढे प्रवास सुरु. नेहमी सर्व आनंदात असू. एकसळ किती लांब आहे? याची कल्पना येईना. रहिमतपूरच्या माळावरील द्राक्षाच्या मळ्यात आलो. एक मोडकी तोडकी झोपडी तेथे होती. तेथे थांबलो व गावात तानाजीस पाठवला. पण डी.जी. नी ज्या गृहस्थाचा पत्ता दिला होता ते टंकसाळे गृहस्थ केव्हाच पसार झाले होते. बरे जवळ पैसा नाही, त्यामुळे त्या गृहस्थाच्या द्राक्षाच्या मळ्यातील कच्च्या आंबट द्राक्षांवर रात्र काढावी लागली। पण आम्हास मात्र ती फार गोड लागली। चालून थकल्यामुळे जरी पोटात काही नव्हते तरी गाढ झोप लागली. अंथरा-पांघरावयास कुठलं? पहाटे उठून पुढे चालू लागलो. पण तेथून ४-५ मैलच असल्याने केव्हा एकसळ आले समजले नाही. मग एका आंब्याच्या झाडाखाली थांबून घरी "धन्वंतरी" आलेत म्हणून दादाना निरोप दिला. त्यानी ताबडतोब मागील दाराने आत घेऊन माडीवर जागा दिली. आंघोळी केल्याच होत्या. सर्वांनी ताजे पोटभर जेवण केले आणि ताणून दिली. दादासाहेब साखवळकर हे अतिशय जुने देशभक्त. त्यांचे चारित्र्यही उज्ज्वल. राष्ट्रीय पाठशाळा म्हणून साताऱ्यास पाठशाळा चालवलेली. राष्ट्रसेवादल हर्डीकर यांचे पूर्वीचे. त्यात खूप काम केलेले व राष्ट्रीय पाठशाळेच्या मदतीकरिता सर्व प्रांतभर प्रवास केल्यामुळे सर्व मोठमोठ्या व्यक्तींशी परिचय. प्रखर राष्ट्रीयवृत्ती व भगतसिंग वगैरे देशभक्तांच्या-बद्दल अतिशय मोठा आदर. अत्यंत मोठा प्रचारक. गोड व पहाडी आवाजामुळे पोवाड्यांचे कार्यक्रमात हजारो श्रोत्यांना मंत्रमुग्ध करुन टाकण्याची मोठी कला त्यामुळे ते माझ्या दृष्टीने तरी साताऱ्यातील महत्‌ऋषि आहेत यात शंका नाही. पण प्रसिद्धीविन्मुख असल्याने व आयुष्याच्या अखेरपर्यंत त्यागी वृत्ती असल्यामुळे, आर्थिक

परिस्थिती बेताची, घरचे वाढते व्याप, वय झालेले. त्यामुळे हल्ली सर्व व्याप कमी करुन आपल्या गावात सर्व खेडुतांवर चांगला संस्कार करण्याचे काम करतात. घरची सर्व मुले माणसे त्यांच्या संस्कारात वाढल्याने सुसंस्कृत व आदरातिथ्यशील आहेत. गावातील सगळ्या शेतकऱ्यांचे त्यांच्यावर अतिशय प्रेम आहे. त्यामुळे आम्हा सर्व भूमिगताना तेथे निर्धास्तपणे राहाता येत असे. येथील भागाचा त्यांच्याबद्दल आदर असल्यामुळे व सरकारी अधिकाऱ्यांचाही त्यांच्याबद्दल आदर असल्यामुळे पुष्कळशा बातम्या आगाऊही समजत. आम्ही उठल्यानंतर पुन्हा कॉफी पान घेऊन त्यांच्याशी खूप चर्चा केली. आम्ही दोन्ही एकमताचे असल्यामुळे स्वाभाविक एकमेकाबद्दल जिव्हाळा व आदर निर्माण झाला. त्यानी एकूण चळवळीची माहिती घेतली. माझे विचार समजून घेतले व मीही त्यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. नंतर पांडुरंग बोराटे भेटण्यास आले. त्याना माझी पूर्वीची माहिती असल्यामुळे सर्व हकिकती समजून घेतल्या. या वेळी त्यांच्यावरही वॉरंट निघाल्यामुळे ते भूमिगत होते. मग आम्ही सर्व शिवथरला गेलो. रात्री ९ च्या सुमारास लिंबाच्या बागेत मिटिंग झाली. त्यात सोबत बोराटे, दादा, किसन वीर, आम्ही चौघे व पुण्याहून आलेले बाळ, पंत, दिवाण हे कॉलेज विद्यार्थी व आबांचा इतर परिवार मिळून पन्नास लोक होतो. किसन वीर येरवडा जेल फोडून मुक्तेच आले होते. त्यांच्या विनंतीवरुन मी माझे विचार मांडले व सर्व जिल्ह्याची अभेद्य संघटना होणे जरुर आहे हे प्रतिपादन केले. सर्वांना ते अतिशय आवडले व जिल्ह्याचा मध्यभाग कराडभाग, पश्चिमभाग, पाटण व उत्तरभाग, वाई, सातारा, कोरेगांव वगैरे यांची मिटिंग व संबंध जोडले गेले. आता दक्षिणभाग फक्त राहिला म्हणून कामेरी येथे सर्वांनी जमायचे असे ठरुन जिल्ह्यासंबंधी अनेक गोष्टींवर चर्चा करुन व सर्वत्र कार्यक्रम करण्याचे ठरवून मिटिंग संपवली व आम्ही परत एकसळला आलो. नंतर पुन्हा किवळला आलो. ज्याप्रमाणे उत्तर भागात एकसळ, उंब्रज भागात इंदोली तसे मसूर भागात किवळ हे आमचे ठिकाण होते. किवळचे भिकू पाटील हे गृहस्थ थेट दिनकरराव निकमांच्याप्रमाणे लहानपणापासूनच राष्ट्रीय वृत्तीचे व निरनिराळ्या आंदोलनात धडाडीने भाग घेत, सूत काढीत. वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेणे व गावातील गावगुंडी मोडून काढणे अशी कामे त्यानी केली, त्यामुळे गावच्या गरिबांचे ते वाली बनले व सर्व त्यांच्यावर जीवापलीकडे प्रेम करू लागले. गावगुंडानी त्यांचा मोड करण्याचा खूप प्रयत्न केला; परंतु जबरदस्त ध्येयनिष्ठा असल्याने उलट त्यांचाच बिमोड झाला. त्यांची कृष्णकृत्ये उजेडात आली व त्यांच्या कर्मांची त्याना फळे भोगावी लागली. त्यानी गावात सुधारणा केली. रस्त्यातील उकिरडे काढणे, अतिक्रमणे काढणे इत्यादी. नवीन तरुण वर्गावर चांगला संस्कार करुन तो सर्व आपलासा करुन टाकला. त्यामुळे जुनी खोडे आपोआप मनातल्या मनात शिव्या देत व तोंडाने त्यांची स्तुतिसुमने गात गप्प पडली. या भागात त्यांच्यावर सर्वांचे प्रेम असल्यामुळे सरकारी अधिकाऱ्याना बातमी मिळत नसे व आम्हा भूमिगताना निर्धास्तपणे राहता येत असे.

शिवाय केव्हाही या, कितीही जण या, त्यांना जेवण पुरविणे व आनंदाने आदरसत्कार करणे हे त्यांचे अतिशय मोठे वैशिष्ट्य होते. त्यामुळे पाहिजे तितके दिवस भूमिगत येथे येऊन राहात.

उत्तर भागातील मिटिंग घेऊन किवळला एकदोन दिवस काढून पुन्हा कामेरीकडे निघालो. ते कारभारी कामेरीचे चंद्रोजी पाटील यांच्याकडे येऊन पोचलो. त्या वेळी चळवळीस उग्र स्वरुप येऊ लागले होते. पेट्रेनची अॅक्शन झाली होती, शेणोली स्टेशनाजवळ रेल्वे कामगारांचा पगार घेऊन जाणारी गाडी भूमिगतांनी लुटली होती व नांद्रयाजवळ मालगाडी उलथून पडली होती. त्यामुळे तात्पुरत्या प्रमाणात चळवळ व्हावी म्हणणारे चळवळीतून सटकले होते. आता या चळवळीत फाशी होईल अगर गोळी खावी लागेल अशी समजूत होऊ लागली. त्यामुळे कुणी कुणी आतून संधान बांधून हजर होण्याच्या नादास लागले. कामेरीस कारभाऱ्यांच्या बरोबर वाटाघाटी करुन नंतर के.डी. (पाटील) यांची गाठ घेऊन कामेरीस मिटिंग होण्याचे ठरले. नंतर मरळोबाच्या वाडीस जाऊन तेथून वसंतराव पाटील यांच्याकडे पभाळघास जावयाचे तो निवृत्तिकाका आले व त्यानी वसंतराव पकडले गेल्याचे दुःखद वर्तमान सांगितले, त्यामुळे तिकडे न जाता शिराळे पेट्यात निघालो. बरोबर व्यंकटराव माने घरेगावकर व भिकोबा नाना होते.

## कामेरीची वादळी बैठक

पोलीसांच्या बंदुका हिसकून घेण्याची अॅक्शन नुकतीच झाल्यामुळे सर्वत्र मिलिटरी आली होती. यामुळे पेट्यास लष्करी कँपचे रुप आले होते. आडरस्त्याने जात आत बिळाशीत पोचलो. गणपतराव पाटलांच्या मामानी जाऊन चौकशी करता ते (गणपतराव पाटील) मलकापूर स्टेटच्या हद्दीत गेल्याचे समजले. मग घरच्या मंडळींना कामेरीच्या मिटिंगचा निरोप देण्यास सांगून परत निघालो. भूक फार लागलेली. भाकरी तर बरोबर अर्धी, खाणारे दोघे. नंतर एका धनगराच्या घरात शिरलो व पाण्याचा तांब्या मागितला. भाकरी सोडून खाऊ लागलो. त्या घरच्या मालकिणीने पाहिलं व एवढ्याश्या भाकरीने तुमचे काय होणार? म्हणून बुट्टी उघडली. तर त्यात एकच भाकरी. दोन लहान मुले जवळ होती. पण तिने काही विचार न करता सर्व भाकरी आम्हास घातली व 'बाबांनो फार भुकेले दिसताय?' असं अगदी केविलवाणे म्हणाली. ते तिथे प्रेमळपणाचे स्वागत व त्याग पाहून—स्वतःच्या मुलांचीही काळजी न करता आम्हास सर्व भाकरी घालून टाकली। माझ्या डोळ्यात पाणी आले व पांढरपेशयांचा दिखाऊ आदर, सत्कार व श्रीमंतांची बेफिकीरी याबद्दल अतिशय तिरस्कार वाटला. जेवण करुन निघालो तो परत चिखलीवरुन, मांगल्यावरुन परत कामेरीस आलो. नंतर वाळव्यास जाऊन नागनाथ यांची गाठ घेतली व नंतर खाली दुधोंडीस गेलो. तेथे वस्ताद (शामू चौकीवाले) एस.बी. शिंदे, जाधव मास्तर, आनंदा यांच्या गाठी घेतल्या व

कामेरीच्या मिटिंगकरता नाना पाटील यांची गाठ घ्यावयाची आहे, म्हणून सांगितले व त्याना ''धन्वंतरी'' आलेत म्हणून निरोप दिला. रात्री एकच्या सुमारास नाथाजी त्याना घेऊन आले. गाठ पडली. जिल्हयातील सर्व हकीकतीवर बराच वेळ चर्चा होऊन कामेरीस येण्याचे निमंत्रण दिले. अगदी अंधारात बसून राहाण्याने नानांचे सर्व शरीर पिवळे पडले होते व हातातून मुंग्या निघणे वगैरे सुरु होते. मग औषध लिहून दिले व निरोप घेतला. तेथून परत कामेरीस येऊन सर्व मिटिंगची तयारी करुन परत किवळला आलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी शांताराम गरुड व भिकू गुजर घाबऱ्या घाबऱ्या सांगत आले की तो रनर मेला. सर्व घाबरले व पुढे काय म्हणून सचिंत झाले. सर्वांची मनःस्थिती चमत्कारिक झाली. मग सर्वांना सांगितले घाबरु नका. सुरक्षित ठिकाणी निघून जा. या गुन्हयाची सर्व जबाबदारी मी माझ्यावर घेईन व त्या दोघाना सांगितले, माझ्या नावाचा पुकारा करा. अमक्यानी केल्याचे लोक बोलतात म्हणजे गुन्हा माझ्यावर धरतील. पण दुसऱ्या दिवशी तो जिवंत असल्याची बातमी आली. त्यामुळे सर्व आनंदी झाले. भिकू पाटील, मी, व्यंकटराव चरेगावकर, माधवराव जाधव कामेरीस आलो. डी.जी. देशपांडे, किसन वीर, कारभारी (कामेरीचे चंद्रोजी पाटील), के.डी. (कामेरीचे के.डी. पाटील), नाथाजी लाड, नागनाथ वस्ताद, बापूसाहेब देशमुख, निवृत्तिकाका कुरळपेकर, बर्डे मास्तर, जोशीकाका, बुवा म्हावशीकर इ. ४० लोक जमलो होतो. शांतराम इनामदार, यशवंतराव चव्हाण यांचा निरोप व अच्युतरावांची चिट्ठी घेऊन मिटिंगला हजर होता. काम थांबवून सर्वांनी हजर व्हावे असा यशवंतरावांचा निरोप होता. अच्युतरावांच्या चिट्ठीत 'जर जनतेपासून तुम्ही दूर जात असाल तर काम बंद करुन हजर व्हावे', असा मजकूर होता. त्यामुळे सर्वांना चिट्ठीचा संशय आला व कोणीतरी चुकीचे रिपोर्ट त्यांच्या कानावर घातले असावेत असा आमचा समज झाला. त्याकरता बर्डे मास्तर व जोशीकाका यांनी समक्ष अच्युतरावांना भेटून पुढचे धोरण आखावे असे ठरले. पंधरा दिवसात जाऊन यावे व नंतर पणुंब्र्यास मिटिंग घ्यावी असे त्याच सभेत ठरून जिल्हयातील झालेल्या कामासंबंधी चर्चा झाली. तिथून पुन्हा मी किवळला परत आलो, व कामास सुरुवात झाली.

कोणेगावच्या हद्दीत आम्ही तारा तोडल्या. नंतर मसूरचा रनर लुटण्याचे ठरले. त्या भागातील रस्त्याचे माहीतगार व्यंकटराव. मग मी, महादेव जाधव व व्यंकटराव तिघे पहाटे मसूरच्या रस्त्यावर रनरची वाट पाहात बसलो. इतक्यात पहाटे ५ च्या सुमारास रनर आला. त्याला पिस्तुलच्या हातासह एक तडाखा डोक्यावर दिल्याने तो बेशुद्ध झाला. आम्ही थैली घेऊन निघालो. व्यंकटराव म्हणाले : थैली मजकडे द्या. माधवने (महादेव जाधव) ते नाकारले. मी रस्ता दाखवीत नाही म्हणाला. 'ठीक आहे' म्हणून डोंगराच्या बाजूस आम्ही निघालो. तो आमच्यापासून दूर गेला. आम्ही सुमारे एक मैल गेल्यावर स्वारी आडवाटेने पुनः आमच्याजवळ हजर! त्यात पैसे सापडणार ते किती? ते

बघावयास नको काय? हा! जरूर पाहा चल! डोंगराआड जाऊन थैली फोडली. आतून सर्व बाहेर काढले, पण एक छिडकी मिळाली नाही. पुन्हा १-२ दिवस तारा तोडण्याचा कार्यक्रम ठेवून मी व व्यंकटराव कामेरीस आलो. तो कारभाऱ्यानी सांगितले की, ताबडतोब कुंडलला जाऊन रामभाऊ पवार यांची बंदूक ताब्यात घ्या. ती शिरोडा केसमधील रायफल होती. सखाराम बारवट्टे (सातारा जिल्ह्यातील प्रख्यात क्रिमिनल फरारी गुंड) यांनी ती पाहिली होती व दोन हजार रुपयास तिची मागणी केली होती. पण रामभाऊ पवार यांना एक बंदूक दिल्याचे खटल्याच्या पुराव्यात आले होते. त्यामुळे जरी बारवटयास विकली तरी ती सापडल्यावर आपल्याबरच शेकणार अशी त्यांची समजूत होती व या केसमध्ये गुष्कळाना काळे पाणी व फाशी होणार ही समजूत होती. त्यामुळे ती विकली तरी जाईल नाहीतर तिचा नाश होईल. म्हणून कारभाऱ्यानी सांगताच तसेच दुधोंडीस गेलो. मसूच्या वाडीत सखारामचा मुक्काम होता. दुधोंडीस आम्ही आल्याचे समजताच सखारामने आम्हास बोलावून घेतले. मीही त्यांचे नाव ऐकत होतोच. त्यानेही माझे नाव ऐकले होते. समक्ष गप्पा व जेवणखाण झाल्यावर मी दुधोंडीस आलो व तो कामेरीस निघून गेला. मी कशाकरिता आलो होतो याचा पत्ता त्याला लागू दिला नाही. नंतर रामभाऊ पवार याना बोलावून घेतले. ते फार घाबरले होते व गडबडून गेले होते. त्याना धीर दिला व मी बंदूक घेऊन गेलो म्हणून तुमच्या जबाबात सांगा. मी माझ्या जबाबात तुमच्याकडून बंदूक आणल्याचे सांगेन. मग त्याना जरा धीर आला व किर्लोस्करवाडी स्टेशनच्या पुढे तारेच्या डांबाखाली ती पुरुन सातारा डी.एस्.पी. स तसे खांबाचा नंबर देऊन कळविले आहे, म्हणून सांगितले. म्हटलं आमचे नशीब असेल तर आम्हास सापडेल, नाहीतर जाईल. म्हणून ताबडतोब रात्री साडे बाराला तसेच दोनतीन मैल गेलो व त्या डांबाखाली उकरले. तो व्यवस्थित स्थितीत रायफल मिळाली. ताबडतोब ताब्यात घेऊन दुधोंडीस आलो व सरळ पोत्यात बांधून खांद्यावर टाकून आम्ही दोघे आडवाटेने कामेरीस निघालो. रस्ता चुकून कामेरीच्या रानात एका झोपडीत आलो तर तेथे सखाराम बसलेला. तोही आश्चर्यचकित झालेला. आम्हीही विस्मीत होऊन त्याच्याकडे पाहू लागलो. तो म्हणाला : इकडे कसे? आम्ही म्हणलो वाट चुकून! तो म्हणाला : इतक्या कडक पहाऱ्यातून? आम्ही म्हटलं : पहारा आम्हाला कुठंच दिसला नाही. नंतर त्यानं रायफल बघितली. तिची अतिशय स्तुती केली, पण चेहरा खरकन् पार उतरला. त्याचे कारण मी तेव्हाच जाणले. पण कशाची ओळख न देता गावात कारभाऱ्यांचे घरी—मळ्यात आलो. कारभाऱ्यांची रायफल पाहिली. सोबत दहा काडतुसे होती. नंतर त्यानी सांगितले : सखाराम याचे व माझे बिनसू लागले आहे. तेव्हा हत्यार तेथे ठेवता का? आम्ही म्हटले की ठीक आहे. मग त्याच्याकडे हत्यार ठेवून परत आलो. पुढे आठदहा दिवसात त्यानी व के.डी. (पाटील) यानी भोसले मामलेदारामार्फत हजर होण्याचा निश्चय केला व मला निरोप दिला हत्यार घेऊन जा. मग मी व पांडुरंग बोराटे किवळहून निघून कामेरीस आलो व हत्यार घेऊन निघालो. हत्यार जवळ

असल्यामुळे दिवसा जाणे धोक्याचे होते. ते दिवस वळवाच्या पावसाचे होते. कामेरीबाहेर आलो तो ढग जमू लागले. डोंगराचे चढणीस लागलो व पाऊस जोरात सुरू झाला. काळोख किट्ट, डोळ्यात बोट घातले तरी दिसेना. वरुन मुसळधार पाऊस. वीज चमकेल तेवढ्यात जेवढे पुढे सरकता येईल तेवढे पुढे सरकावयाचे. असे कसेतरी झाडा झुडपातून डोंगराच्या माथ्यावर आलो. पुढे कडा दिसू लागला. पांडुरंग अगदी रडकुंडीस आला. आग लागो या राजकारणाला; आता पुढे चालणे अशक्य आहे, असे वैतागाने म्हणाला. मग त्या धुवांधार पावसातच तिथे एका झाडकोंडालगत दोघेही झोपलो. अतिशय श्रम झाल्याने झोप लागली. पहाटे उठून थोडेसे दिसू लागल्यावर पुढे चालू लागून मरळोबाच्या वाडीत सरकार यांच्याकडे जेवण केले. नंतर पुढे चालू लागून कासेगावच्या भैरेवाडीच्या मळ्यात दुपारी येऊन पोचलो. दुपारी विश्रांती घेऊन घरुन खावयाचे आले ते खाऊन संध्याकाळी अंधार पडल्यावर पुढे निघालो. पण कालच्या सारखाच वळवाचा पाऊस इतका भयंकर सुरु झाला की, बेलवड्याला जाईपर्यन्त जीव अगदी मेटाकुटीस आला. पाऊस मुसळधार, अंधार काळाकुट्ट, वाट दिसेना. नेहमीची पायाखालील वाट, पण तीही सापडेना. बेलवड्यातील लोक राहा म्हणाले. पण ते कसे शक्य होते? तसेच पुढे निघालो व पुना-बेंगलोर रोडला मिळावे म्हणून मधल्या रस्त्याने निघालो. पाऊस वरुन सारखा ओतत होताच. अंधार कुट्ट, विजा कडाडत होत्या. सुमारे अर्धा मैल चालून गेल्यावर बोराटे म्हणाले: तुम्ही वाट काढा. म्हणून मी पुढे झालो. माझ्या खांद्यावर बंदूक होती. थोडे पुढे जातो न जातो तोच एकदम मी धाडदिशी कोसळलो. मोठा आवाज झाला. पांडुरंग बोराटे व दुधोंडीचे जाधव मास्तर हे मागे दचकून उभे राहिले, व मी खलास झालो अशा समजुतीने खिन्न झाले. सुमारे तीस फूट खोल अशी पडीक विहीर होती. पावसामुळे माती वरुन खाली किंचित घसरुन खालच्या दगडावर पसरली होती. बाभळीच्या काट्या आत पडलेल्या. कुजलेल्या होत्या. वरुन खाली पडल्याबरोबर छातीवर मार बसला. एका मिनिटात भानावर आलो व वरती पांडुरंगास हाक मारुन सांगितले, ''काळजी करु नका मी सुखरुप आहे.'' मग त्यांच्या जिवात जीव आला व मला आधार म्हणून त्यानी पटका सोडला, पण तो खालपर्यन्त पोचेना. नंतर पटक्यास पटका बांधून खाली सोडला. काट्याकचऱ्यात हत्यार, पायताण पडले ते शोधून घेतले व पटक्याच्या आधाराने हळूहळू वर तिरका तिरका होत आलो, त्याना मला वर ओढून घेणे शक्य नव्हते; कारण माझे वजन फार. वर आल्यावर एकमेकाना कडकडून भेटलो. कुठं लागलं म्हणून त्यानी अंधारात चाचपून पाहिले. काटे बरेच लागले होते. छातीस मार बसला होता. सर्व अंगास मुका मार बसला होता. पण बेभानपणामुळे तसेच पुढं चालू लागलो. हत्यार व्यवस्थित राहिले होते. त्याचाही आम्हा दोघाना आनंद झाला. नंतर पुढे चालू लागलो. नऊ म्होत्याचे पुलानजीक रोडला येऊन मिळालो व किवळकडे जाण्यासाठी कराडच्या बाजूस निघालो. त्यावेळी सरकारने तारा तोडल्या जाऊ नयेत म्हणून प्रत्येक गावच्या पाटील, तलाठी व इतर पन्नास माणसे

यानी रोडच्या तारा राखल्या पाहिजेत म्हणून आपापल्या हद्दीत कंदील घेऊन पहारा करावयाचा हुकूम दिल्यामुळे वाठारचे पन्नास लोक हातात कंदील घेऊन पहारा करीत असल्याचे पाहून यातून पलीकडे जाणे कठिणच वाटले. रात्रीचे दोन वाजलेले व मध्ये नदी आडवी! तिला पाणी आलेले! या सर्व गोष्टीनी आम्ही खिन्न व थकलेलो. म्हणून रस्ता सोडून आंब्याच्या झाडाखाली आडोसा घेऊन झोपलो. वरुन पाऊस पडत होताच. अंगाखालून पाणी वाहात होते. मात्र झोप लागली. पहाटे उठून चालू लागलो. सूर्योदयास कृष्णा पुलावर आलो. पण तेथे पहारा. कल्पना होतीच. त्यामुळे वाटेत कडब्याची पेंडी घेऊन व त्याला हत्यार बांधून डोक्यावर घेतले व पांडुरंग, जाधव, मी यात अंतर ठेवले. नदीस पाणी आलेले होते. त्यामुळे जर मला पकडत आहेत असे वाटले तर मी पाण्यात उडी टाकावी व बाकीच्यानी पसार व्हावे यापैकी कुणास पकडले तर बाकीच्यानी त्याकरिता न थांबून सरळ पार व्हावयाचे असे ठरवले. सुदैवाने पोलीस चहापाण्यासाठी नळावरील हॉटेलात गेले होते. त्यामुळे आम्ही पूल पार होऊन नळावर आलो. तो ते चहा पिऊन तोंड साफ करुन बाहेर पडत होते. त्यामुळे जरी त्याना शंका आली असती तरी त्याचा काही उपयोग झाला नसता. नंतर सुखरुप किवळला पोचलो. हे भिकू पाटील वगैरेना कळल्यावर सर्वांना वाईट वाटले व छाती शेकणे वगैरे सुरु केले; कारण छाती दुखणे आता जास्त जाणवू लागले. एक महिना छाती दुखतच होती. पण निजून मात्र रहावे लागले नाही. बंदूक भिकू पाटील यांच्याकडे ठेवून नंतर उत्तर भागात पांडुरंग बोराटे व मी निघून गेलो.

## साताऱ्यातील गट

माझ्याकडे सारखी फिरती असे. कारण हे जे निरनिराळे, जिल्ह्याच्या निरनिराळ्या विभागात काम करणारे ग्रुप्स असत त्यांच्याशी टपालाने संबंध ठेवता येत नसे. त्यामुळे पायी प्रवासच करावे लागत. कोरेगाव भागात पांडुरंग बोराटे यानी काम धडाक्याने सुरु ठेवले होते. बुध-खटाव भागात बापूराव कचरे यांचे काम चालू होते. उत्तर भागात किसन वीर, आण्णासाहेब पंत दिवाण, डी.जी. देशपांडे काम करीत होते. पाटण भागात बुवा म्हावशीकर, तांबवे भागात अण्णा, चंदर, डी.जी. पाटील, तातु सुपेनकर, बाबा; शिराळपेटा, पश्चिम भाग गणपती पाटील, मारुती पाटील, बाबूराव चरणकर, बर्डे, वगैरे. पूर्व भागात नाना पाटील, जी.डी. लाड, नाथाजी लाड, नागनाथ वस्ताद, तासगांव सांगली भागात वसंतराव पाटील, बॅ. जी.डी. पाटील, दत्तु पाटील, निवृत्ती काका इ. कामेरी भागात कारभारी, के.डी. पाटील, पांडू मास्तर, छगन, गणा, एस.बी. पाटील, कराड भागात मी, भिकू पाटील, व्यंकटराव चरेगांवकर, बापूसाहेब कोणेगांवकर, दत्तोबा काटकर, माधवराव जाधव, डॉ. काळे, बी.बी. काळे, बाबूराव नलवडे, बाळ भुरके, तुकाराम, रंगा (इंदोली) वगैरे. पोस्ट ऑफिसमधील पत्रे सरकार सेन्सॉर करीत असे. त्यामुळे आम्हास पोस्टाचा महत्त्वाच्या कामी फारसा उपयोग होत नसे. शिवाय

प्रत्येक ग्रुपचे संबंध त्यावेळी येत नसल्याने निरनिराळी कामे चालत. त्याची माहिती एकमेकास नसे. प्रत्येक ग्रुप आपापल्या बुद्धीप्रमाणे निरनिराळ्या कल्पना लढवून परकीय सत्तेस टोला देत असे. नवीन नवीन कल्पना निघत. त्याची माहिती कोणाची कोणास नसे. त्यामुळे सर्व ठिकाणी समक्ष जाऊन कामात एकसूत्रीपणा आणावा लागे. कित्येक कामे (ॲक्शन्स) अतिशय महत्त्वाची असत. शिवाय जर एकमेकाना भेटलो नाही तर त्याची मानसिक अवस्था एकेलकोंडेपणाची होऊन भीती वाटणे स्वाभाविक होते. म्हणून एका फराऱ्यास अगर ग्रुपला दुसऱ्या ठिकाणी नेऊन आणणे म्हणजे त्याला काम करण्याची दिशा, उत्साह व आपल्या पाठीशी खूप मोठी शक्ती आहे, व सर्वसामान्य जनताही आपल्या पाठीशी आहे, याची खात्री होत असे. आपण एकटेच फरारी नसून जिल्ह्यात प्रचंड शक्ती आपली आहे याची खात्री पटली म्हणजे त्याचे मन खूप धाडसी बनून मोठमोठी कामे करण्यास तो तयार होत असे व सर्व जिल्ह्यात ते वातावरण पसरत असे.

## समाजविरोधी फरारी गुंड

सातारा जिल्ह्यात ज्याप्रमाणे राजकीय भूमिगत होते, त्याचप्रमाणे फरारी दरोडेखोरही होते. सातारा जिल्ह्यातील वाळवे तालुक्यातील कामेरीपासून पश्चिम भाग व शिराळ्यापेट्यापैकी वारणाकाठचा भाग—चिखली, कांदे, मांगले, ऐतवडे वगैरे भाग. हा भाग क्रिमिनल फराऱ्यांचा पहिल्यापासूनच होता. कारण अलीकडे ब्रिटिश हद्द व नदीपलीकडे कोल्हापूर संस्थानची हद्द. त्यामुळे इकडे गुन्हे करावयाचे व संस्थानात राहावयाचे. तसेच संस्थानच्या हद्दीत गुन्हे करुन इकडे राहायचे. निरनिराळी पोलीस खाती असल्यामुळे छापे घालून पकडणे कठीण जाई. डोंगराळ भाग. शिवाय प्रतिष्ठित माणसांच्या करवी दोन्ही भागातील पोलीस खात्याशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असत. संस्थानचे पोलीस अधिकारी ब्रिटिश हद्दीत जाऊन गुन्हे करण्यास प्रोत्साहन देत असत व ब्रिटिश पोलीस अधिकारी संस्थानच्या हद्दीत जाऊन गुन्हे करण्यास प्रोत्साहन देत असत. शिपायांपासून ते डी.एस्.पी.पर्यन्त, निरनिराळ्या पोलीसापासून ते बरच्या अधिकाऱ्यापर्यन्त, त्यांच्या त्यांच्या कुवतीप्रमाणे दर महिन्याचे पैशाचे हप्ते बांधलेले असत. फौजदाराला तीनशे रुपये पर्यन्त हप्ता म्हणून मिळत असत. शिवाय मोठा गुन्हा घडला वा दरोडा घातला आणि त्यात फार मोठी प्राप्ती झाली तर त्यात काही हिस्साही त्यांचा असे. त्यामुळे या भागात चोर, दरोडे, मारामाऱ्या वगैरे गुन्हे सारखे असावयाचे. या भागात राहून शंभर शंभर मैलापर्यन्तही जाऊन दरोडा घालण्याचे दरोडेखोर कित्येक वेळा धाडस करीत. या भागातील काही लोकांचा हा धंदा म्हणून असे। दरोडे घालावयाचे, चैनीत राहावयाचे. लांब मिशा, कतई रंगाचा पटका लांब सडक सोडायचा, पानाचा बटवा, तोंडात पानाचा व तंबाखूचा तोबरा, हातात वीतभर लांब फरशी, कुऱ्हाड, भाला नाहीतर खांद्यावर बंदूक, तांबडे लाल धोतर,

पायात नालाचे पायताण व अगदी टेचात चाल! रोज खाण्यास बकरे, पिण्यास दारु, तलम रेशमी कपडे! एक-दोन सुंदर देखण्या बाया ठेवलेल्या व नाच रंग विलासात राहावयाचे! रोज रोजगार केला तरी "आठ नाण्यांची प्राप्ती होणार नाही", व वर्षभर जगता येणार नाही ते कुटुंब चैनीत कसे राहणार? त्यामुळे तरुण वर्गाने हे जीवन पाहिले की आकर्षक वाटून तो त्या मार्गाकडे स्वाभाविक ओढला जाई व आसपासचे त्याचे नातेवाईकही स्वतःच्या स्वार्थासाठी त्याला प्रोत्साहन देत; कारण फराऱ्याच्या आप्त इष्ट कुटुंबातील मंडळी, पै पाहुणे यानीसुद्धा त्याच्या जोरावर गुंडगिरी करीत सुटावयाचे. शिवाय आसपासच्या आवती-भोवतीच्या लोकानाही त्यांचा उपसर्ग पोचे. त्यामुळे त्यातीलही काही तरुण सूडबुद्धीने या मार्गास लागत. प्रथम रानातील वस्तूंच्या—गवत, मका वगैरे चोऱ्या करणे—त्या उघडकीस आल्या व मालकाने गवगवा केला, प्रतिकार केला तर त्याची गंज, कडबा, घर वगैरे पेटवून देणे, पोलिसात गुन्हा येथपर्यन्त दाखल होतो; कारण पोलिस पाटलास त्यातून काही पैसे पाहिजे असतात! तेथून पहिली पायरी सुरु झाली. मग काही पुरावेदार उभे राहतात. वाटले तर त्यांची घरेदारे पेटविणे, पाडणे, त्यामुळे पुरावे देण्यास कोणीच तयार होत नाहीत व पोलिसांच्या काही तांत्रिक चुकांमुळे व पुरावे न होण्याने केस कोर्टातून सुटते व यास आपण जिंकली म्हणून, अधिक मोठे गंभीर गुन्हे करण्यास तो प्रवृत्त होतो. नंतर काही तरुणही त्याच्या भोवती गोळा होतात. नंतर ती एक छोटीशी टोळी तयार होते. मग जी जुनी थोरली टोळी असेल त्याशी ती संबंध जोडते व त्यांनाही तोपर्यन्त त्यातील सर्व गोष्टी कळून त्यांचे तंत्र ध्यानी येऊन ते वर अधिकाऱ्यांशी संबंध जोडतात आणि प्रसिद्ध टोळीत त्यांचे रुपांतर होते. अर्थात् ही स्वार्थी लोकांची पापमय संघटना होती. अशा संघटना फार दिवस टिकू शकत नाहीत. वर्तमानपत्रांतून गवगवा झाला, वरच्या अधिकाऱ्यांचे दडपण आले की मग खालच्या अधिकाऱ्याना गुन्हे काढणे भाग पडे. नाहीतर नोकरीवर बेतेल म्हणून दहा गुन्हांपैकी एक गुन्हा शोधून काढावयाचा. मग एकातील मुद्देमाल काढावयाचा. नऊ गुन्हे माफ. हा सौदा फराऱ्याच्या दृष्टीनेही तोटयाचा नसायचा. अधिकाऱ्यासही ग्रेड मिळते. दरोडयातील माल वाटून घेताना वांधे येतातच की. मग त्याना हुषारीने पकडून द्यावयाचे म्हणजे दरोडेखोरांच्याही मागची काळजी कमी! त्यामुळे सर्वांचाच फायदा व्हायचा व गुन्हा निघाला किंवा शिक्षा झाली म्हणून गुन्हेगारी कमी व्हायची नाहीच उलट ती वाढतच जायची. आता जर त्यांचा महत्त्वाचा माणूस पकडला गेला तर टोळीपैकी काहीनी ताबडतोब पोलिस अधिकाऱ्यामार्फत हजर व्हावयाचे, त्यामुळे त्या अधिकाऱ्यांस फरारी पकडले म्हणून प्रमोशन मिळायचे व या गुन्हेगारांचे बद्दल सहानुभूति निर्माण व्हायची व मग केसमध्ये सौम्य धोरण व टोळीतील राहिलेले लोकही बाहेरचा पुरावा जोडायचे व केस निर्दोष म्हणून सुटली तर सर्वत्र राजरोसपणे उघड वावरु लागायचे व उघड वावरत्या सर्व भागात दहशतीचे वातावरण निर्माण व्हावयाचे. सामान्य गरीब माणसे यांचे कोणाचे नावच काढायची नाहीत आणि जरी काही नुकसान

झाले तरी दैवाने झाले किंवा मनातून शिव्याशाप देत गप्प बसायची. मग टोळीतील हे लोक लोकांच्याकडून पैसे घेऊन जमिनी काढणे, खरेदीपत्रे उलटून देणे, तिन्हाईत्या पंचायती करुन निकाल देणे, त्यांची अंमलवारी करणे असे प्रकार सुरु करीत. त्यामुळे मग एका व्यक्तीपेक्षा भाऊपणा प्रतिकारास पुढे उठे, पण त्यांच्याजवळ हत्यारे असल्याने जाळपोळ, खून, मारामाऱ्या करीत व त्यामुळे गावातील लोकांचेसुद्धा काही चालेनासे होई व अतिशय दंगा झालाच तर अधिकाऱ्यांचा आधीच बंदोबस्त करुन ठेवलेला असे! मग ही माणसे गप्प बसत नसत. दुसऱ्या आळीतील माणसाना या टोळीवर घालीत.

टोळी-टोळीत विश्वास नसे. टोळीवाले एकमेकांचा विश्वासघात करुन नाश पावत किंवा काही पोलिसांच्या स्वाधीन होत. पहिल्या प्रथम तांदुळवाडीचा सावळा धनगर म्हणून होता. त्याने अशी टोळी बळकावली—मोठी केली. नंतर रामू सपाटे म्हणून त्याचाच पठ्ठया, पण त्याचे व सावळया धनगराचे वितुष्ट येऊन रामूने धनगराच्या टोळीचा नायनाट केला. नंतर कामेरी भागात सखाराम बारबट्टे, ज्ञानू कुंभार, महादू रामोशी अशी टोळी निर्माण झाली व त्यांच्या व रामू सपाटे यांच्या टोळीचा सामना होऊन त्यात तुका कांदेकर, भिवा कांदेकर यांचा नाश झाला. कोरे याना पाच हजाराची मागणी केली होती म्हणून सखारामच्या टोळीत दोन भाग झाले. एक सखाराम याची टोळी. त्यानी कामेरीपासून पूर्व भागास कृष्णाकाठापर्यन्त कामे करावयाची व ज्ञानू कुंभार व महादू रामोशी यानी पश्चिम भाग व उत्तर भाग वाघेगावपर्यन्त गुन्हे करावयाचे. महादू पेठकर रामोशी याने कासेगांव ते काले-कराड तालुक्यातील कामे करावयाची. मारुती शेणेकर याने वाटेगाव ते शेणे ते पाचुंब्री वगैरे शिराळे पेटधात गुन्हेगारी करावयाची. म्हणजे जवळजवळ वारणेपासून ते कऱ्हाड तालुक्याच्या निम्म्या हद्दीपर्यन्त या गुंडांनी राज्य स्थापन केले होते.

अर्थात् आम्हा कॉंग्रेस फराऱ्यांना फरारी म्हणून राहणे हे शास्त्र नवीन होते. बरे, याची काही पुस्तके नाहीत. अनुभवांनी व दुसऱ्यांचे पाहूनच आमचे लोक हळूहळू तयार होऊ लागले. क्रिमिनल्स हे निर्बुद्ध, त्यामुळे त्यांचा नाश पोलिसाना सहज शक्य, पण कॉंग्रेस फराऱ्यांच्या पुढे त्यांचे काही चालत नसे, कारण पोलिसांपेक्षा हे आमचे लोक सरस ठरत. सर्व जिल्ह्यांत क्रिमिनल फराऱ्यांशी प्रथम कोणाचा संबंध आला असेल तर कामेरीचे चंद्रू कारभारी यांचा! ते नेहमी म्हणत असत ही आमची मिलिटरी, त्या बंदुका, ते भाले, त्या कुऱ्हाडी, ते २५-३० जवान लोक, खांद्यावर घोंगडया! त्या गालमिशा, कल्ले, हातात हत्यारे, ते दृश्य मोठे मजेशीर दिसावयाचे! प्रथम कारभारी व के.डी. (पाटील)यांनी ही शक्ति जर आपल्या राष्ट्रीय कार्याच्या उपयोगी पडली तर पहावे म्हणून यांची मिटिंग घेऊन त्यात त्यांचा गौरव करुन तुम्ही जो स्वार्थासाठी एवढया मोठया शक्तिचा वापर करता त्याऐवजी देशाकरिता जर काही कराल तर तुमची मोठी

कीर्ती होईल व देशसेवेचे पुण्यही पदरी पडेल व लोक पुढे तुमच्या गुन्ह्यांची माफी करतील व तुम्हास नागरी जीवन उपभोगता येईल. त्या गुंडांनी हे कबूल केले, पण त्यांच्या वळणात व सवयीत फरक पडला नाही व ते पूर्ववत पूर्वीचेच समाजविरोधी काम करीत राहिले. त्याना तारा तोडण्यास नेले, त्यानी तारा तोडल्याही. ते म्हणत, आम्हास असंच राष्ट्रीय फरारी म्हणा, पण आम्ही कोणी ते कबूल केले नाही.

प्रथम काही दिवस काँग्रेसच्या फराऱ्याकडे ते निरुपद्रवी मित्र म्हणून पाहात असत. गावोगावी त्यांचे हस्तक व फरारी असत. दोघानाही रात्रीचा प्रवास करावा लागे. त्याचप्रमाणे आडरस्त्याने डोंगरातून जावे-रहावे लागे. त्यांचा मुक्काम आम्हास कळे, आमचा मुक्काम त्याना कळे, पण कोणी कोणाचे नाव काढीत नसत. पुढे वाटेगावचे दिगंबरपंत कुलकर्णी यानी बर्डे मास्तर यांच्यावर गावातील काही लोकांच्या मदतीने छापा आणला. तो (कुलकर्णी) महादू रामोशी, ज्ञानू कुंभार, मारुती रामोशी यांचा हस्तकही होता. त्या छाप्यातून सुदैवाने मास्तर निसटले. पुढे ही गोष्ट सखाराम, महादू रामोशी व मारुती शेणेकर रामोशी यांच्या कानावर घातली व तुमच्या माणसाने आमच्यावर छापा आणला तेव्हा त्याचा बंदोबस्त तुमचा तुम्ही करा म्हणून सांगितले. त्यावेळी त्यांचा निरोप आला की त्याने केलेल्या गोष्टीस आमची काही अनुमती नव्हती, तेव्हा तुमचा तुम्ही बंदोबस्त करा, आमची काही हरकत नाही. यावर बर्डे मास्तर शिराळ्याकडून आले. दिगंबर कुलकर्णी चावडीत काम करीत होता. त्याला उचलून नेऊन ठोकले व पाच हजार रुपये दंड केला. दंड एक दिवसात देतो म्हणून सांगून तो गाव सोडून गेला तो परत आलाच नाही. मग त्याचे वाटेकरी बोलावून घेऊन त्याना ताकीद देण्यात आली. पिके वाळवा, पाणी पाजू नका असे पुकारून त्याचे पाणी तोडले, पण जे वाटेकरी होते ते सखारामचे आधीन. त्यामुळे त्यांचेही नुकसान होणार, त्यामुळे सर्व जमून बर्डे मास्तरांना विचारायचे असे ठरले. सखाराम काही नव्हता; पण महादू रामोशी, ज्ञानू कुंभार, मारुती रामोशी, शेणेकर, पेठकर, पिलू कुंभार असे त्यांचे प्रमुख अडीचशे अनुयायी सर्व आटेगांवी आले. या दरोडेखोरांची पद्धत अशी असे की, कोणत्याही गोष्टीचा जाब विचारावयाचा असेल तर त्यावर आरोप ठेवायचा व गोळी घालावयाची व घरदार पेटवून विहिरीचे वरवंटे वगैरे पाडावयाचे. दरोडेखोराकडून निरोप येऊ लागले; मास्तराना आम्हाला भेटायचे आहे. मास्तर नुकतेच मुंबईहून आल्याचे त्यांना कळले होते. कारण जोशी काका व मास्तर मुंबईहून आले ते वाटेगावी वाटेत एका घरी मारुती शेणेकर व अनुयायांसह बसले होते. पानसुपारी चालली होती. अशा वेळीच मास्तर आले व त्याना खूप बोलले व शिव्या दिल्या. तुम्ही गोरगरिबांची घरे लुटता, त्रास देता हे यापुढे चालणार नाही, तुम्ही नीच आहात असे खूप बोलले, फराऱ्यांना त्या वेळी साधे कुणी बोलत नसे. कुणी डोळा वर करुन त्यांच्याकडे पाहात नसे. त्या ठिकाणी असा सर्वांदेखत अपमान म्हटल्यावर मारुती शेणेकर अतिशय चिडला आणि त्याच्या टोळीचे कामेरीचे महादू रामोशी, ज्ञानू कुंभार होते त्यांच्याकडे

येऊन त्याने सर्व हकीकत सांगितली. त्याबरोबर ते खवळले व सर्वांनी घरावर चाल करुन जाण्याचे ठरवले असल्याचे निरोप येऊ लागले व त्या गोटातून बातम्या येऊ लागल्या, त्याबरोबर घरी सर्व रडारडी सुरु झाली. गावातील बर्डे मास्तर यांच्या बाजूची माणसे पांडूमामा शिंदे, विनायक, तातोबा दुकाने वगैरे सुमारे २५ माणसे असतील ती हत्यारे हातात घेऊन त्यांच्या घरी जमली, व प्रतिकार करत मरावयाचे असे ठरले.

## वाटेगावचा पेचप्रसंग

हत्यार घेऊन जा असा भिकू पाटलांचा निरोप आल्याने मी ताबडतोब किवळला गेलो. मी व माधवराव जाधव मिळून दोघे ते हत्यार घेऊन वाटेगावी ठेवावे म्हणून घेऊन निघालो. पहिला मुक्काम कासेगावी करुन संध्याकाळच्या सुमारास वाटेगावजवळ आलो. तो समोरुन बाबू रामा नेर्लेकर यांची टोळी आली ते पंचवीस जण हत्यारबंद. आम्ही दोघेच. शिवाय निशाणबाजी अगर बंदूक उडविण्यात आम्ही तरबेज नव्हतो. मजजवळ रिव्हॉल्व्हर होते. तेव्हा माधवरावांना म्हटले : "महादेव, तुझ्यात व माझ्यात २००-३०० हाताचे अंतर ठेव. तू पुढे चाल. मी मागोमाग येतो." बंदूक घोंगडयात गुंडाळली होती. 'जर माझ्याशी लगट करीत आहेत असे वाटले तर तू पळत जाऊन बर्डे मास्तरांचे घर गाठावयाचे'. या लोकाना हत्याराची हाव दांडगी. ते एका बंदुकीस २ ते ३ हजारापर्यन्त पैसे देण्यास तयार होते. पैशाची फिकीर कोणासच नव्हती. पिलू कुंभाराची व माझी पूर्वीची ओळख होती. तो म्हणे : 'दादा, मला कितीही पैसे मागा, पण एक बंदूक द्या'. त्या सर्व दरोडेखोरांची समजूत अशी होती की, काँग्रेस फराऱ्याना हत्यारांचा व गोळयांचा तोटा नाही, तेव्हा त्याच्याकडून आपण हत्यारे मिळवू. हत्यारे जरी आमच्याकडे खूप असली तरी त्याना द्यावयाची नाहीत, हे आम्हा सर्वांचे पक्के धोरण होते. गाठ पडली तेव्हा महादेव पुढेच होता. 'काय राव? फार दिवसांत गाठ नाही.' असे म्हणाला. नंतर क्षेम समाचार झाल्यावर 'त्या माणसाजवळ काय आहे?' म्हणून त्यानी विचारले. कोष्टयाची विणावयाची फणी आहे असे मी सांगितले. तेव्हा ते हसू लागले व आम्हाला एवढे कळत नाही होय, एवढे म्हणाले. मग मी त्याना स्वच्छ सांगितले, 'बंदूक आहे!' मी एवढया दमात बोललो की त्यानी चौकशीचे स्वरुप बदलून एकमेकास भेटून निरोप घेतला. ते पुढे गेले. आम्ही दोघे वाटेगावी निघालो व बर्डे मास्तर यांच्या घरी जाऊन बंदूक व काडतुसे ठेवली व लगेच दुसऱ्या दिवशी पणुंब्र्यास मिटिंग असल्यामुळे दोघे रानात आलो व बडयाच्या मळयात राहिलो. दुसऱ्या दिवशी दुपारी मिटिंगला निघणार तो एक माणूस पळत आला व बडर्यांचे घर दरोडेखोर वेढणार आहेत व त्याना ठार मारणार आहेत, म्हणून सांगू लागला. काहीच अर्थबोध होईना म्हणून आम्ही दोघे गावातील घरी आलो. सर्व बायका माणसे ओक्साबोक्शी रडत आहेत, खिन्न होऊन बसले आहेत असे दिसले. चौकशी करता मागील सर्व हकीकत समजली. जोशीकाका व मास्तर याना भेटून मुंबईची हकिकत समजून घेतली व त्याना

येथे रायफल व काडतुसे मी आणून ठेवली आहेत ती घ्या व तुम्ही पणुंब्र्यास मिटिंगला निघून जा. मी व जोशीकाका त्यांच्याकडे जातो आणि हकिकत काय आहे ती समजून घेऊन त्यातून मार्ग काढतो. ते कितीही रागात असले तरी आमच्यावर एकदम हल्ला करतील असे मला वाटत नाही. तुम्ही असला की काहीतरी बाचाबाची होऊन गोळीबार सुरु होणार. शिवाय आपण २५ व ते ३००-४००. त्यांच्याजवळ १०-१२ बंदुका, आमच्याजवळ एक. त्यांच्याजवळ रिव्हॉल्व्हर ४-५ व आमच्याकडे १-२. त्यामुळे उघड सामना देऊ नये. आमच्यावर हल्ला करुन घरावर आले तर आडून सर्वांनी हल्ला करावा असे ठरले. आम्ही दोघानी जेवण करुन घेतले व त्यांच्याकडे जाण्यास रानात निघालो. त्यानाही तिकडे कळले की यानी हल्ल्याची तयारी केली आहे. प्रथम त्याना कळले की मास्तर एकटेच आहेत. त्यांच्याजवळ हत्यार नाही. त्यामुळे ते घरावरच चाल करुन निघाले. पण तेवढयात त्याना कोणी जाऊन सांगितले त्यांच्याजवळ एक रायफल व रिव्हॉल्व्हर्स आहेत. तेव्हा ही भेट न होता उघडया वाळवंटात व्हावी म्हणून निरोप सांगण्यास माणूस आला. त्याची आमची वाटेत गाठ पडली. माणूस सांगू लागला: वस्ताद ज्ञानू कुंभार, पैलवान महादू रामोशी कामेरीकर यानी सांगितले आहे. ''ओटयावर वाळवंटीत या.'' मी 'होय' म्हणून 'चल' म्हणून सांगितले. तो पुढे व आम्ही मागे असे निघालो. त्यांच्या टोळीतील बरेच लोक माझ्या ओळखीचे होते. ते म्हणू लागले, ''धन्वंतरी'' आले. मग जवळ जाताच माझ्या ओळखीचा पिलू कुंभार याने आमची व त्यांची ओळख करुन दिली. एकमेकानी रामराम घालताच सर्व मोकळया रानात बसलो. ते म्हणाले, 'घरी जाऊ.' मी म्हटले, 'ठीक आहे.' त्याबरोबर त्यांच्यातील काही माणसे म्हणाली, 'घरी जावयाचे नाही.' मी म्हटले, 'ठीक आहे.' मग सर्व तेथेच बसलो व चर्चा सुरु झाली. 'आम्ही काही तुमच्यावर आक्रमण केलेले नाही. तुम्ही डाक्याचा बंदोबस्त करा म्हणून सांगितल्यावरुन दिगंबर यास ठोकले आहे व दंड केला आहे.' तेव्हा ते म्हणाले, 'तुम्ही राने पाडली, पाणी बंद केले, त्यामुळे गरीब शेतकऱ्यांचे नुकसान होते.' तेव्हा आम्ही म्हटले, 'चालू सालचे जिराईतील सर्व पीक नेऊ देत व त्याना दंडाची रक्कम भरावयाची असेल तर बागाईत पिकास पाणी पाजू देत.' तेव्हा शेवटी यंदाच्या सालची जिराईत पिके न्यावीत व पुढच्या वर्षापासून व त्यानी दंड देईपर्यन्त सर्व राने, मळे पाडावेत असे ठरले व मग इकडच्या तिकडच्या गप्पा होऊन व मास्तर फार कडकपणे वागतात असे म्हणून निरोप घेतला. पुन्हा कामेरीस येईन तेव्हा भेट घेईन या अटीवर प्रेमाने निरोप दिला. इतक्यात त्यांच्यापैकी एका माणसाने त्याना बर्डे मास्तर रायफल हातात घेऊन बाहेर पडलेत असे सांगितले. मी म्हटले पणुंब्र्यास आमची मिटिंग आहे, त्यास गेले असतील असे सांगितले. आम्ही घरी आलो. सर्वत्र आनंदी आनंद झाला. यश घेऊन परत आलो म्हणून सर्वांनी धन्यवाद दिले. त्या दिवशी त्या कुटुंबावर येणारे अरिष्ट टळले. आम्ही सर्व पणुंब्र्यास निघून गेलो.

# अच्युतरावांचा अभिप्राय

जिल्हयाच्या सर्व भागातून खूप माणसे या मिटिंगकरता आली. सुमारे १५० तरी मंडळी आली होती. किसन वीर, डी.जी. देशपांडे, पांडुरंग बोराटे, बापूराव कचरे, दादासाहेब साखवळकर, नागनाथ, नाथाजी, डी.जी. लाड, आप्पा पाटील, वस्ताद रामुतात्या पैलवान, रामभाऊ पवार, मी, माधवराव जाधव, निवृत्तिकाका कुरळपकर, बाबूजी पाटणकर, शेख काका, बाबूराव चरणकर, बर्डे मास्तर, दत्तू लोहार, दत्तू सोनार, जोशीकाका, बुवा म्हावशीकर, तांबवे, सुपने इ. जिल्हयाच्या सर्व भागातील लोक आले होते. ते सर्व एकमेकाना भेटले. परिचय करुन दिला व नंतर कामास सुरुवात केली. प्रथम जोशीकाका यानी मुंबईची हकिकत सांगितली. त्यानी अच्युतराव पटवर्धन यांची गाठ घेतली. त्यानी जिल्हयातील सर्व परिस्थिती त्याना निवेदन केली. अच्युतरावानी सर्व शांतपणे ऐकून घेतले. त्याना अतिशय आनंद झाला. ते म्हणाले, "तुमच्या जिल्हयातून मजकडे रिपोर्ट आले व त्यातून सर्व जनता तुमचा द्वेष करु लागली आहे; व्यक्तिगत संपत्तीचा नाश व व्यक्तिगत हिंसा सुरु असल्याचेही समजले. म्हणून मी सर्व काम बंद करुन तुम्हास हजर होण्यास सांगितले. आता तुम्ही जबाबदार माणसे आला आहात व प्रातिनिधिक स्वरुपात रिपोर्ट देत आहात तर तुमच्यावर विश्वास ठेवून सांगतो की, व्यक्तिगत हिंसा व खाजगी संपत्तीची लूट वा नाश करावयाचा नाही. फक्त सरकारी मालमत्तेवर हल्ले करावयाचे व शेवटी आपणापासून जनतेत भीती निर्माण होऊन जनता दूर जात नाही ना यावर लक्ष ठेवावयाचे. खर्चाच्या अडचणी मी जाणतो, पण वरही काही पैसा नसल्याने तशी नियमित मदत आम्ही करु शकत नाही. मिळेल तशी जरुर देईन. आता प्रत्यक्ष माझ्याशी संबंध ठेवणे कठीण आहे. तेव्हा तुम्ही आप्पासाहेब पंत यांच्याशी संबंध ठेवा, ते तुम्हास जेव्हा लागेल तेव्हा सल्ला देतील. कामे सुरु ठेवा व अत्यंत सावधपणे सर्व चालू द्या." हे ऐकून सर्वांना अतिशय आनंद झाला.

सर्व जिल्हयाचे आपले संघटन पूर्ण झाले की नाही याची परिक्षा म्हणून अत्यंत सौम्य व सर्वांना करतायेण्याजोगा म्हणून सर्व जिल्हयात एकाच दिवशी एकाचवेळी बरोबर रात्री बारा वाजता 'तारा तोडणे व तारेचे डांब मोडणे' हा कार्यक्रम करावा असे ठरले. या विषयात आमची बरीच प्रगती झाली होती. पूर्वी करवतीने तारा कापीत असू पण आता अलीकडची पद्धत म्हणजे तारेवर कासरा टाकावयाच्या व सर्वांनी मिळून तार खाली ओढावयाची व लाकूड खाली घेऊन कुऱ्हाडीने तोडावयाच्या. एका वेळेत चार पाच सुद्धा तुटतात व एके ठिकाणी तार तुटली की मग चोहीकडील ताण कमी होऊन त्या जमिनीपर्यन्त लोंबू लागतात. मग भरभर एक मनुष्य प्रत्येक दोन डांबांच्या मध्ये तोडत जातो, बाकीच्यानी त्या सर्व तारा धरुन ओढल्या की डांब पोकळ असल्याने ऊस मोडतो तसा काडकन् मोडतो व दोन तुकडे होतात. म्हणजे सुमारे एक तासात २-३ मैलातील

डांब व तारा सहज नष्ट होतात. पुष्कळाना हे माहीत होते. ज्याना माहीत नव्हते, त्यानी समजून घेऊन व आपापल्या कामाची माहिती सर्वांना देऊन पुढील कामाविषयी खूप चर्चा होऊन, हा कार्यक्रम ठरुन मिटिंग स्थगित केली. तिथे दुधाचा खवा तयार करण्याच्या भट्ट्या असल्यामुळे खूप खवा व साखर आणून सर्वांना पोटभर खाण्यास दिला. चहा, कॉफी झाली व पुन्हा काम सुरु झाले. दर महिन्यास सायक्लोस्टाईल मशीनवर बुलेटिन काढून त्यात वरचे येणारे आदेश व जिल्ह्यातील ठोकळ माहिती देऊन ती वाटण्याचे ठरले. तेव्हापासून सर्व जिल्हाभर बुलेटिन्स जाऊ लागली. त्याचप्रमाणे त्याच्या पुढच्या महिन्याचाही कार्यक्रम ठरला. जिल्ह्यात जेवढे डाक बंगले शिल्लक असतील (कारण पुष्कळ ठिकाणचे आधीच जाळले गेले होते.) ते सर्व जाळून टाकण्याचे ठरुन मंडळी आपापल्या निवासस्थानी निघून गेली.

ठरल्या तारखेस वारणेपासून म्हणजे जवळजवळ कोल्हापूरपासून ते नीरेपर्यन्त फलटणसह सुमारे दोन हजार तारेचे खांब मोडले व जिल्ह्यातील सर्व भागातील तारा तोडल्या. तारा दुरुस्तीस जवळ जवळ एक महिना लागला. किती नुकसान झाले याचा पत्ताच नाही. सर्व सरकारी अधिकारी समजू लागले की शत्रुपक्षाने काहीतरी हत्यारे मिळवून मोटारीतून सर्व जिल्हाभर तारा तोडल्या असल्या पाहिजेत. पण रात्री बरोबर १२ वाजता कशा तुटतील? त्यामुळे त्याना कशाचा उलगडा होईना. ते आश्चर्याने दिङ्मूढ झाले. सरकारला फार मोठा हादरा बसला. आम्हासही जिल्हाभर आमची कार्यक्षम संघटना निर्माण झाल्याचे पाहून समाधान वाटले व पुढील महिन्याच्या कार्यक्रमात दंग होऊन गेलो. जिल्ह्याच्या दक्षिण भागातील सर्व बंगले जळून खाक झाले होते. काही ठिकाणी दुरुस्त केले, पण काही ठिकाणचे तसेच होते. तेव्हा त्या भागातील लोक दुरुस्त केलेले बंगले सुद्धा जाळण्याच्या मार्गास लागले. मोठा प्रश्न उत्तर भागाचा. तेथे बंगले तसेच होते. म्हणून मी व माधव दोघे उत्तर भागात निघालो.

## उत्तर भागातील काम

प्रथम सुर्लीस येऊन तेथे विठ्ठलराव (भोसले) यांची गाठ घेऊन त्यांच्या गळ्यात आम्ही ठरविलेला कार्यक्रम घातला. तो पार पाडतो असे ते म्हणाले. तुम्ही निश्चित जा म्हणून त्यानी सांगितले. मी तेथून पुढे जाऊन पांडुरंग बोराटे यांच्या गळ्यात नेरचा बंगला जाळण्याचा कार्यक्रम घातला. कोरेगावला काम करणारी काही मुले होती. त्यानी कोरेगावचा बंगला जाळून त्याच दिवशी रेल्वे पाडतो म्हणून सांगितले. नंतर पुढे जाऊन बुधला गेलो व मी, जाधव, बापूराव कचरे यानी खातगूणचा बंगला जाळण्याचे ठरवले. वाई भागातील काम करण्यास निरोप दिला व जे बंगले राहतील ते पुन्हा वर शिरुन जाळण्याचे ठरवले. आम्ही बुधला खूप तयारी केली. सुमारे पंधरा इतर माणसे व आम्ही असे निघालो. जावे न जावे असे टंगळमंगळ करू लागलो. इतक्यात नेरच्या बंगल्याच्या ऊंच ऊंच ज्वाळा दिसू लागल्या. मग तडक खातगूणला रवाना झालो. तिथे पुढे कोणी

होईना. गावाजवळ पहारेकरी होता. पुढे होऊन पहारेकऱ्यांच्या खोलीना बाहेरुन कडया घातल्या व बंगल्याची दारे मोडून आत शिरलो. सर्व सामान एकत्र करुन पेटवून दिले. सर्व बंगल्याने धडाडून पेट घेतला. गावातील लोक जमा होऊ लागले. गडबड सुरु झाली. मी व माधव दोघेच सर्व एकत्र करुन पेटविणे या उद्योगास लागलो. माधव बेभान झाला होता. त्याला म्हटले सर्व लोक निघून गेलेत जाऊया. नंतर तेथील एक टेबलाचा आरसा स्मृति म्हणून बरोबर घेऊन निघालो. आता कुठे जाणार? रस्ता माहीत नाही. भाग माहितीचा नाही. बंगला पेटल्यामुळे आसपास काही दिसेना. कोंडलेल्या लोकांची गडबड, गावातील लोकांची गडबड ऐकू येऊ लागली. मग तसेच दोघेही साधारण दिशा धरुन चालू लागलो. सुमारे एक दीड मैल चालून गेल्यावर एक एक भेटू लागला व आम्ही सर्व जमलो. मग त्याना म्हटले: तुमच्या विश्वासावर आम्ही आलो, आणि आम्हास सोडून पळालात. जर गावच्या लोकानी आम्हांस मारले असते व रागाच्या भरात तोडले असते आणि पोलीसाकडे हजर केले असते तर. पण आमचा दोघांचा राग शांत झाला होता. नाहीतर त्याना खूपच बडवले असते. नंतर बुधला आलो. रानात आडाला जाऊन झोपलो. संध्याकाळी उठलो.

पुन्हा कोरेगावी पांडुरंगकडे (बोराटे) आलो. तिथे रानात राहात असू. मामी म्हणून एक पाहुणी होती. अत्यंत गरीब पण प्रेमळ. आम्ही केव्हाही जात असू. प्रत्येक वेळी काय असेल ते प्रेमाने खाऊ घाली. ती म्हातारी होती. त्यामुळे डोळयात पाणी आणून सारखी म्हणे: ''बाबांनो, तुमच्या घरी माणसं सारखी वाट पाहात असतील. सणावाराची वाट पाहून दुःखी होत असतील. कुठनं हे तुम्हास सुचलंय?' असे म्हणून कित्येक वेळ डोळयातून पाणी गाळी. तिचा प्रेमळपणा पाहून आम्हाला आमच्या आईची आठवण कधीच येत नसे. शेवटपर्यन्त ती माऊली कधी कंटाळली नाही की तिने कशाचीही आशा धरली नाही. बेचाळीसचे आंदोलन यशस्वी होण्यात या माणसांचा मोठाच सहभाग आहे. यामुळेच यशोमंदीर उभारले गेले. कोरेगावचा रिपोर्ट विचारला, तेव्हा मुले म्हणू लागली: आमच्यात आम्ही दोन गट केले. एका गटाने बंगला जाळावा व दुसऱ्या गटाने गाडी पाडावी. याप्रमाणे ते गेले.

दक्षिण भागातील ढेबेवाडी, बंगला डेपो, ताकारी बंगला वगैरे सर्व जाळले गेले. मी, पांडुरंग बोराटे, माधव खाली आलो. वाटेगावी येऊन पोचलो. माधव आजारी झाला म्हणून त्यास पाचुंब्रीस ठेवला व आम्ही वर शिराळ पेटयात निघून गेलो. तपास काढीत जाता जाता बरोबर तातोबा दुकाने व विनायक याना बरोबर घेतले. आरळयास जाऊन पोचलो व तेथून बातमी काढता समजले की, डोंगरात मलकापूरच्या हद्दीत शित्तुरला लोक आहेत. मग ते वरून खाली गावात आले व मी नदीतून सांगडीवरुन वारणेपार गेलो. पावसाळा होता त्यामुळे नदीस पूर आला होता. पलीकडे गेलो तर यांचा मुक्काम एका प्रशस्त घरी. ८-१० बंदुका जमवल्या आहेत. ग्रुपमध्ये ३५-४० माणसे आहेत. सर्वांनी मिळून आनंदाने जेवण केले. या ग्रुपमध्ये सर्व कलाकार लोक होते. जोशीकाका

गाणे म्हणत, दत्तू सोनार पेटी वाजवी, बापूभाई मुलाणी तबला वाजवी. तुकाराम शित्तुरकर भजन चांगले म्हणे. यामुळे जेवण झाल्यावर करमणूक ही नेहमी असावयाची. सर्व जिल्हयात दिवसा कुठेतरी हत्यारे लपवून ठेवून कामापुरती बाहेर काढायची पद्धत असे, पण इथे चोवीस तास काडतुसे भरुन खांद्यावरुन घेऊन उघड फिरत असत. प्रत्येक गावात चावडीत मुक्काम ठोकावयाचा. पाटलाने धान्य आणून द्यावयाचे. महाराने जळण. स्वयंपाक करुन जेवण करुन मगच मुक्काम पुढे जावयाचा. गावातील तंटे काही असले तर सोडवायचे असा त्यांचा सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणे कार्यक्रम चाले. सरकारी अधिकारी त्या भागातून जवळजवळ फिरत नसत. फिरतीस आले तर येऊन भेटून जात. पण रिपोर्ट कधीही करीत नसत.

## धन्वंतरी डिक्टेटर

मी शित्तूरहून निघण्याचे ठरवले तेव्हा सर्व मंडळी जमली होती व मिटिंग भरली. त्यात पहिले यशवंतराव चव्हाण पकडले गेले. नंतर के.डी. (पाटील) ना केले. ते हजर झालेले होते. मी, बाबूराव, बर्डे, गणपती पाटील याना म्हटले तुम्ही व्हा. तेव्हा त्यानी सांगितले: 'आमची जिल्हयात कोठे फारशी माहिती नाही व सर्व जिल्हाभर हिंडले पाहिजे, काम केले पाहिजे. तेव्हा तुम्हीच व्हा. हा काही मान नाही. तेव्हा दुसऱ्या कोणावर आम्ही विश्वास ठेवण्यास तयार नाही. तेव्हा आम्ही सांगतो म्हणून तुम्ही व्हा.' ते मी पत्करले व तेव्हापासून डिक्टेटर म्हणून काम पाहू लागलो. नंतर खाली आलो. शिराळा पेटयातील ते सर्व पाहून माझ्या मनावर फार चांगला ठसा उमटला. 'आपल्या स्वराज्यात चला' म्हणून मी सर्वांना सांगत सुटलो. कित्येकाना ते खरे वाटत नसे. मग प्रत्येक भागातील एक ग्रुप बरोबर घेऊन यावयाचा व त्याला शिराळा पेटयातील स्वराज्यात घेऊन यावयाचे. त्याला ती कामाची पद्धत दाखवायची. खांद्यावर बंदूक घेऊन उघड राहाण्याची ती पद्धत पाहून प्रत्येकास वाटे आपल्याकडेही हे शक्य आहे. प्रथम पूर्व भागातील सोळा लोक घेऊन आलो. नाथाजी लाड, नागनाथ, जी.डी. लाड, रामभाऊ पवार, रामुतात्या, वस्ताद, आप्पा पाटील वगैरे होते. पणुंब्र्याहून डोंगरातून शिराळा पेटयातील आरळयाकडे निघालो. गुडे पांचगणीजवळ आलो. पाचगणी गावात शिरणार तो पोलीस पार्टी व फौजदार आल्याचे कळले. सुदैवाने आमची बातमी त्याना मिळाली नाही व आम्ही सुटलो, आमच्याजवळ हत्यारे नव्हती, ते सशस्त्र होते. वाटेत भूक लागली. पाऊस पडत होता. शेतकरी रोपभात गारा करुन लावत होते. ते कष्ट पाहून आमच्याकडील शेतकरी याच्या शतांश कष्ट करीत नाही याची जाणीव झाली. बायका-पोरांचे कष्ट पाहून अतिशय आश्चर्य वाटले व इतके श्रम करुन वर्षभर परिश्रम करुन मिळवतात केवढे, तर फक्त तीन महिन्यापुरते! हे कष्ट पाहून व ही आठवण येताच वेदना होत. नंतर त्या शेतकऱ्याना म्हटले: आम्हास भूक लागली आहे. त्यानी लागलीच घरी नेऊन भात, नाचण्याच्या भाकऱ्या करुन सर्वांना जेवावयास

वाढले. नंतर आरळघावरुन शित्तूरवरुन ओखूळला गेलो. सर्वांनी पायास तेल लावून पायावर कढत पाणी घेतले व गप्पा मारीत शेकत बसलो. रात्री भात चपात्या केल्या. पूर्व भागाच्या मंडळींना भाताचे विशेष वाटे. प्रथम खूप भात खात, पण चारसहा दिवसात कंटाळून जात. पुढे त्याना भाताचे काही विशेष वाटेनासे झाले. आठ दिवस तिकडे काढले. तिथली राहणी, कामाची पद्धत वगैरे सर्व पाहून सर्व मंडळींच्या मनावर चांगला परिणाम झाला व परत आल्यावर त्यानीही त्याप्रमाणे कामास सुरुवात केली व तो सर्व भाग सुरक्षित करुन टाकला.

नंतर कोरेगाव व खटाव तालुक्यातील पांडुरंग बोराटे, बापूराव कचरे वगैरेना त्या भागात नेऊन आणले. त्यानीही उत्तर भागात ही कामाची पद्धत सुरू केली. पाटण तालुक्यातील बुवा म्हावशीकर, तातू गायकवाड, अण्णा पाटील, चंदर पंडीत येरवळेकर, खाशाबा डेखणकर अशांना त्या भागातून फिरवून आणले. त्यानीही आपापल्या भागात त्याप्रमाणे कामे सुरु केली. वसंतराव पाटील यांच्या ग्रुपमधील आदगोंडा नांद्रेकर, शाम, धोंडीराम माळी, खोत वगैरे तिकडील माणसे या भागात पाठवून दिली. त्यामुळे सर्व जिल्हयातील कार्यकर्त्यांत आत्मीयता वाढू लागली व आत्मविश्वास येऊ लागला. आपण सर्व एक आहोत अशी भावना निर्माण होऊन सर्व जिल्हयातील जिव्हाळा व आपुलकी वाढली.

## क्रिमिनल गुंडांचा बंदोबस्त

याप्रमाणे सर्व जिल्हयात भूमिगतांची चळवळ फोफावू लागल्यावर सरकार पिसाळले. त्याना कशाचाही विधिनिषेध राहिला नाही व ते आडमार्गाचा, बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करु लागले. सरकारचा तोल सुटला. हजारो लोक तुरुंगात घातले. अत्याचार सुरु केले. हाताशी गुंड धरले. हजारो रुपयांची बक्षिसे लावली. पण त्याना कोणी पत्ते सांगेनात. आम्ही त्यांच्याजवळच असू, पण लोक मार खात, तुरुंगात जात, दंड भरीत. भूमिगतांची कसलीही माहिती अगर बातमी देत नसत. शेवटी कामेरीजवळील डोंगरात क्रिमिनल लोकांची, फराऱ्यांची मिटिंग स्पेशल डी.एस.पी. येरवडेकर यानी घेतली व काँग्रेस फराऱ्याना जिवंत पकडून द्या अगर त्यांचे मुडदे स्वाधीन करा, तुमची वॉरंटे रद्द करतो, बक्षिसे देतो म्हणून त्यानी सांगितले. क्रिमिनल फराऱ्याना विश्वास वाटला व झानू कुंभार, महादू रामोशी यानी कामेरीच्या एस.बी. पाटील याना पकडून दिले. सरकारी अधिकाऱ्यानाही त्यांचा विश्वास आला व त्यानाही जोर चढला व ते उघड सायकलवर बसून काडतुसांचे पट्टे गळयात अडकवून खांद्यावर बंदूक ठेवून सर्वत्र फिरु लागले व त्यामुळे भीतीचे वातावरण चहूकडे निर्माण झाले. सामान्य जनतेचा सरकारवरचा विश्वास साफ उडाला व सरकार गुंडांना हाताशी धरत आहे म्हणून त्यांचा तिटकारा आला. दरोडेखोर काँग्रेसवाल्यांवर आता चढाई करू लागले. त्यानी वाटेगाव येथे शांतिनाथ शास्त्री यास ताणले व विष्णु तांबवेकर यास

थोबाडीत मारले व तू काँग्रेसवाल्यांचा हस्तक आहेस असे म्हणू लागले. कासेगाव येथील राहाणारे नागेशराव पाटील यांच्या घरची बंदूक मारुती शेणेकर याने काढून नेली. ती त्याना फार सोपेपणाने मिळाली. त्यानी रात्री दारावर धक्के दिले. नागेशराव घरी नव्हते. बायकानी कोण आहे म्हणून विचारले, त्यानी सांगितले फक्त आम्हास बंदूक पाहिजे. बायकानी ताबडतोब दरवाजा उघडून दिला. कपाट उघडून दिले. ते सरळ आत आले व बंदूक घेऊन गेले. त्यामुळे त्यांची हत्यारांची लालसा वाढली. वाटेगावचे शंकर पाटील यांच्या घरी हे दरोडेखोर जेवीत असत. त्याना आश्रय मिळत असे. हत्याराच्या लोभामुळे ते विसरले व एक दिवस रात्री घरावर चालून आले व बंदुका कोठे आहेत हे विचारुन पाटलाना मारू लागले. तेव्हा बायको त्यांच्या अंगावर पालथी पडली व 'मारू नका बंदुका देते' म्हणाली. जेथे बंदुका होत्या त्या माडीवर ती त्यांना घेऊन गेली, पण त्या आधीच तेथून कोणीतरी बंदुका दूर नेल्या होत्या. त्यामुळे नाइलाज झाला. ते चिडले व खाली येऊन त्याना मारू लागले. त्यांच्या अंगावर ती माउली पडली. तिला भाल्याने भोसकून ठार मारले. रानात बाबूजी पाटणकर होते. त्याना ही बातमी कळताच बंदूक घेऊन बाबूजी त्यांच्या घरानजीक आले व तेथे असलेल्या तुळशी वृंदावनाआड बसून गोळीबार करु लागले. अनपेक्षित सुरु झालेला गोळीबार बघून ते घाबरले व त्यानी उलट गोळीबार केला. काही बार बाबूजींच्या दंडात घुसले पण ते धैर्याने बार करीतच होते. इतक्यात त्यांच्याकडील एका माणसास गोळी लागून तो 'मेलो मेलो' म्हणून ओरडला. त्याबरोबर त्या माणसास बरोबर घेऊन ते सर्व पळून गेले. नाहीतर आणखी दोनतीन खून करुन व घरदार पेटवून ते गेले असते. हे सर्व नुकसान वाचले. पण त्या साध्वीचा शाप त्याना लागला!

येथून पुढे क्रिमिनलच्या ऱ्हासास सुरुवात झाली. आतापर्यन्त क्रिमिनल्सकडे दुर्लक्ष केले, त्याचे कारण आम्हास दोन आघाड्या उघडावयाच्या नव्हत्या. एक या शास्त्रात आम्ही अनभिज्ञ व दुसरी गोष्ट ते श्रीमंताना लुटतात. होईना का काही काळ दुर्लक्ष? अशी आमची वृत्ती होती. पण आता फरारीपणाचे शास्त्र आम्ही चांगले अभ्यासले होते व आम्ही चांगलेच तरबेज झालो होतो. आमची शक्तिही फारच वाढली होती. जवळ जवळ सर्व जिल्हयात आम्ही दोनशे लोक तरी होतो व आमच्या जवळ पंचवीस तीस बंदुका व कामाच्यावेळी आणू अशा पन्नास बंदुका झाल्या होत्या. रिव्हॉल्व्हर्स, हॅन्डग्रेनेडस्, बॉम्ब व काडतुसे यांची तर उणिवच नव्हती. क्रिमिनल्सचे अत्याचारही असह्य होऊ लागले. म्हणून शिराळा पेट्यात गेलो व आम्ही सर्व एकत्र जमून विचार करू लागलो. हे स्वातंत्र्य कुणासाठी मिळवावयाचे? या दरोडेखोरांचे वागणे हे असे. स्वार्थी माणसामार्फत गावात प्रवेश करावयाचा व मग प्रथम म्हणावयाचे गुजर, बामण आम्हास ठोकावयाचे आहेत व त्यांच्याकडून पैसे घ्यावयाचे आहेत. म्हणून त्याना खंडणी मागावयाची. जमिनी पाडावयाच्या, त्याना ठोकावयाचे, घरे पेटवून द्यावयाची व ते झाले की म्हणावयाचे धनगरे फुकट गावास त्रास देतात, त्यांच्याकडे आम्हास बघावयाचे

आहे, म्हणून त्याना ठोकून त्यांच्याकडून पैसे उकळावयाचे व सर्वांना नागवायचे. नंतर गोरगरीबसुद्धा सोडावयाचे नाहीत. रानात काही राहावयाचे नाही. प्रत्येक गावात त्यांचे सर्व जातीचे अनुयायी तयार व्हावयाचे व त्यानी मग रानात कुणाचे मक्याचे कणीससुद्धा ठेवावयाचे नाही. रानात शेतकऱ्यांची मळणी चालली तर ठार मारून सर्व लुटून न्यावयाचे. अशी गावेच्या गावे लुटली होती. सर्व चांगली माणसे घरेदारे, शेते सोडून शहरात जाऊन राहिली. सर्वत्र हा:हा:कार उडाला. वारणेपासून ते कालेगावापर्यंत त्यानी राज्यच स्थापन केल्यासारखे झाले. सरकारकडे दाद लागेना, सरकार त्यानाच सहाय्य करू लागले. सामान्य माणसांची दादफिर्याद चालेना. फिर्याद द्यावी, पोलिसास सांगावे तर घरदार खलास व जिवाचा केव्हा नाश होईल याचा पत्ता नाही. म्हणून जो तो हळहळत, रडत, मनातून शिव्या देऊ लागला. त्यामुळे यावेळी जनतेस कोणी त्राता राहिला नाही. ती परिस्थिती पाहून आम्ही सर्व सचिंत झालो, व निर्णय घेतला की हे स्वातंत्र्य ज्या गोरगरिबांसाठी मिळवावयाचे त्यांची परिस्थिती आज काय झाली आहे? त्यांचे ते टाहो सारखे कानावर पडत आहेत. ती परिस्थिती पाहून अंत:करण विषण्ण होई. तेव्हा याचा बंदोबस्त झाला पाहिजे, हे आम्ही मनाशी निश्चित केले व चोहोबाजूंनी प्रतिकार करावयाचा म्हणून आम्ही सर्व उठलो. मी सर्व जिल्हयातील लोकाना सांगितले व सर्व भागात हे ठोकण्याचे धोरण सुरू झाले. शिराळा पेट्यातून बर्डे एक टोळी बरोबर घेऊन बाबूराव चरणकर, गणपती पाटील वगैरेंसह खाली आले व पाचुंब्री येथील सर्व गुंड ठोकले. त्यांचीच पद्धत उचलली. कित्येकांची घरे पेटवली, पत्र्या लावल्या, दंड घेतले. त्याबरोबर सर्व जिल्हयात एकदम प्रकाश पडला व सर्व गरिबाना वाटले की परमेश्वराने आपला धावा ऐकला व देवदूत पाठवले आहेत. म्हणून ते आम्हास डोंगरात हुडकत येऊ लागले व गावोगावच्या गुंडांचा बंदोबस्त होऊ लागला. आश्चर्याची गोष्ट म्हणजे चार महिन्यातच जिल्हयातील सर्व गुंड खलास झाले व काँग्रेसवाल्याना सर्वसामान्य जनता देव मानू लागली. सर्वत्र रेशनिंग होते. लोकाना पोटभर अन्न मिळत नसे, पण भूमिगतापैकी मटन खाणारांचे मटन व न खाणाऱ्यांच्या पोळ्या तेव्हापासून कधी तुटल्या नाहीत. भूमिगत डोंगरात कुठे असेल तेथे शोधत लोक येत असत. पूर्वी जेव्हा मी जिल्हयातून प्रवास करीत असे तेव्हा २५-३०-३५ मैलाच्या आत सुरक्षित गाव मिळत नसे. कोणी बातमी देईल काय ही भीती. शिवाय आश्रय कोणी देत नसे. कोणी सापडला तर त्याला पकडून देण्याची मन:स्थिती; पण त्यात संपूर्ण बदल पडून आता असे गाव, खेडे, वाडी राहिली नाही की, आमची माणसे कुठे नाहीत. प्रत्येक ठिकाणी हात जोडून सेवेस हजर असत. सर्व भागात गुंडांचा त्रास नष्ट होऊन आनंदी आनंद झाला. गुंडांचे अनुयायी नष्ट होऊन त्यांचे प्रमुख तेवढेच राहिले व त्याना ही अवस्था बरी वाटेना. काँग्रेसवाला पुढारी म्हटले की त्याना धडकी भरू लागली व ते अतिशय गुप्त राहू लागले व काँग्रेस फराऱ्यांच्या मुख्यांचे खून कसे करावेत या साठी पोलिसांचे सहाय्य मागू लागले. मारुती शेणेकर, रामोशी यानी माळी पोलीस

इन्स्पेक्टरशी संधान बांधून बर्डे मास्तर यांचा नाश करावयाचा असे ठरवले. मारुती शेणेकर व पोलिस एका आंब्याच्या झाडाखाली आले व एका विश्वासू माणसाबरोबर निरोप पाठवून दिला की तुम्हास भेटावयाचे आहे, झाले गेले विसरुन जाऊया व आपली दोस्ती करुया. मी त्या दिवशी तेथे होतो. मला त्यांनी विचारले काय करावयाचे? मी म्हटले, 'यात मला घात दिसतो. तेव्हा तयारी करुन जावयाचे. आपल्याजवळ आता दोनतीन बंदुका आहेत पण दोन नादुरुस्त आहेत. तेव्हा आता त्यांच्यावर चढाई करुन जाण्यापेक्षा ते कदाचित् आपल्यावर चालून येतील तेव्हा संरक्षणात्मक भूमिका घेऊया.' त्यांना ते पटले व बंदुकी भरुन ती रात्र काढली व त्यांना पुन्हा निरोप पाठवून दिला—आपण उद्या भेटूया. मग मी तावडतोब दुधोंडीस गेलो व वस्ताद वगैरे २५-३० माणसांचा ग्रुप घेऊन हत्यारासहित आलो. पण त्यांनी भेट टाळली. मग एकदोन दिवस राहून ते लोक परत गेले. पारीस काका अत्यंत मुत्सद्दी गृहस्थ. त्यांनी युक्ती काढली. वाटेगाव त्यावेळी कुरुंदवाड संस्थानातील एक गाव होते. त्याप्रमाणे त्यावेळचे वाटेगावचे सब इन्स्पेक्टर वाईकर यांच्याशी संगनमत करुन मारुती रामोशी येणार आहे, तेव्हा त्यावर छापा घालण्याचा व्यूह रचला. ही गोष्ट वाईकरांनाही पटली. त्यांनी त्यास मान्यता दिली. आठ दिवसांनी पुन्हा त्यांचा निरोप आला तेव्हा बर्डे व त्यांच्या गावातील चार-पाचशे लोक व वाटेगावचे फौजदार व त्यांचे पोलीस लढायला उभे राहिले. मारुती शेणेकर याना पोलीसांनी घालण्यास कोट दिला होता. आमचे लोक व ब्रिटिश पोलीस व अधिकारी यांच्या दरम्यान गोळीबार सुरु झाला. सुमारे २०० काडतुसे उडाली असतील. वाटेगावच्या फौजदारांची काडतुसे संपली. पुन्हा गावात जाऊन काडतुसे आणली. लोकांनी ब्रिटिश पोलीस व मारुती शेणेकर यांना वेढा दिला. त्यांचा नाईलाज झाला. ते पळत सुटले ते नांदगाव गेटात येऊन थांबले. लोकांनी २-३ मैल त्यांचा पाठलाग केला. तेथे या गडबडीत त्यांच्या चपला, कोट, काडतुसांची मोकळी टोपणे पडली. ती सर्व जप्त करुन वर पाठवली. पोलिसांच्या पायताणावर नंबर होते. काडतुसे थ्री नॉट थ्रीच्या रायफलची होती. आम्ही खूप गवगवा केला, पण सरकारने सर्व प्रकरण दाबून टाकले. संस्थानचे काही चालले नाही.

नंतर दुसरे दिवशी बर्ड्यांना बातमी आली की त्या गडबडीत मारुती शेणेकर जखमी झाला आहे. तेव्हा तो आसपास खास असेलच. त्याच्या पायास लागले होते. मग तावडतोब लोक बरोबर घेऊन त्याच्या कासारशिरब्याच्या आश्रयदात्याला ठोकला व 'मारुती शेणेकर कुठे आहे?' असे विचारले. त्याने सांगितले कासेगांव येथे मारुती बाबू माळी याच्याकडे आहे. मग त्याला बरोबर घेऊन मारुती माळी याच्याकडे येऊन त्यास पकडले. त्याने सांगितले : मारु नका, मी शेणेकरला दाखवतो. त्याने कडब्याची गंज दाखवली. तो या गंजीत बसला आहे. आम्ही तेव्हा ती गंज वेढली व त्यास हाक दिली. तो काही केल्या बाहेर येईना म्हणून गंज पेटवायचे ठरवले व त्याच्या दोस्तास काडी लावण्यास सांगितले. बाकीचे सर्व भोवती सावरुन बसले. गंज धडाडून पेटली. मग

त्याचा जावई व तो हात जोडून 'क्षमा करा' म्हणून बाहेर आले, पण त्या पूर्वीच शेख काकांच्या बंदुकीतून सुटलेल्या गोळीने त्यास आडवाही केला होता. त्याच्या जावयास ठोकून सोडून दिले.

दरोडेखोरांचा नायनाट काँग्रेसच्या फराऱ्यानी केला त्यामुळे त्यांची लोकप्रियता अतिशय वाढली व आपल्याबद्दल तिरस्कार निर्माण झाला आहे ही गोष्ट सरकारच्या मागाहून ध्यानात आली व त्यानी धोरण बदलले. म्हासोलीच्या पोलीस पाटलास गिल्बर्टने (सातारचा डी.एस.पी.) बोलावून विचारले : तुम्ही काँग्रेसच्या फराऱ्याना मदत करता? त्यानी 'होय' म्हणून सांगितले. त्याने विचारले : का? 'ते आमच्या जीविताचे रक्षण करीत आहेत. आम्हाला सर्वांना त्यानी गुंडांच्या त्रासातून सोडवले आहे. त्यामुळे त्याना आम्ही मदत करणार.' असा रोखठोक जबाब पाटलाने दिला. 'तुमची पाटीलकी जप्त होईल'. यावर त्यानी सांगितले, 'खुशाल होऊ देत.' 'लेखी देता?' त्यानी कागद पुढे केला. ते लिहू लागले. पण रेकॉर्ड नको म्हणून त्याने लिहिणे बंद केले व तेथून तो चालता झाला. त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. त्याने धोरण बदलले व काँग्रेसच्या फराऱ्यांच्या मागे न लागता तो भराभर क्रिमिनलसच्या मागे लागला व महादू रामोशी कामेरीकर यास त्याने गोळी घालून ठार केले. भीतीने ज्ञानू कुंभार हजर झाला. काल्यास काही सापडले. बाबू रामा, धोंड्या, चौगुले वगैरेंना पकडले. महादू रामोशी पेठकर यास वालावलकर यानी पकडले, पण तो पळून जाऊ नये म्हणून पायावर कुऱ्हाड घातली. जिल्हयात (कराडचे फौजदार) वालावलकर यांचे वजन फार वाढले होते. हुषार, धाडसी व काम पार पाडण्याची शक्ती यामुळे सर्व जिल्हयात वरचे अधिकारी त्यांच्या सल्ल्याने चालत व त्यांच्याकडे अवघड काम देत व ते सहज पार पाडीत. यामुळे त्यांच्या खात्यातच त्यांचा मत्सर सुरु झाला होता. फौजदार माळध्यांच्या आणि त्यांच्या दरम्यान मतभेद वाढले होते. मग त्यानी या गोष्टीचा फायदा घेऊन व पकडलेल्या आरोपीच्या पायावर कुऱ्हाडीने जखम केली म्हणून त्यांच्या मार्फत फिर्याद दाखल केली. त्यात वालावलकर यांची नोकरी गेली. जिल्हयातील देशभक्ताना त्याने अतिशय छळल्याने एकपरी आम्हास अतिशय आनंद झाला. सरकारने जरी दरोडेखोरांच्यावर हात उचलला व पुष्कळांचा नाश केला तरी ते सामान्य जनतेला पटले नाही व जनतेचे खरे हितचिंतक आम्हीच (भूमिगतच) ठरलो. यामुळे जनता पाठीशी येईल हा सरकारचा अंदाज फसला व वरातीमागून घोडे असा प्रकार झाला.

## सामुदायिक दंड

पहिल्या महिन्याचा तारा तोडण्याचा कार्यक्रम झाला. नंतर बंगल्याचा कार्यक्रम झाला. तेव्हा सरकारने आमची शक्ती ओळखून खूप जिल्हयात मिलिटरी आणली. दर पाच मैलास ठाणे टाकल्यासारखे केले. काही ठिकाणी पोलीस ठाणी तर काही ठिकाणी मिलिटरी ठाणी. म्हणजे जवळजवळ सर्व जिल्हयाला कँपचे स्वरुप आले व काँग्रेस

फराऱ्यांना पकडून द्या नाहीतर सामुदायिक दंड व तो भयंकर बसवला जाईल असे जाहीर केले. एक तार तुटली तर रु. ६०००, पोस्ट लुटले तर १०,००० रु. असे दंड बसू लागले. गावावर ३०,०००, ४०,००० असे दंड बसवू लागले. सुपन्या-तांबव्यावर ४०,०००, काऱ्र्यावर ३०,००० सामुदायिक दंड बसला. दंड वसुल करण्याची पद्धतही और असे. लोकाना काही कळू द्यावयाचे नाही व २००० पोलीस बरोबर घेऊन जाऊन गाव वेढावयाचे! सर्व घरापुढे पोलीस पहाटे पाचला उभे करावयाचे. लोक उठून दार उघडतात, तो पोलीस. त्यातून सरकारी नोकर व हरिजन सुटावयाचे. मग फार थोड्या लोकांवर दंड बसे. 'पैसे नाहीत' असे म्हटले की, त्याला बदडत असत. मग बायकांनी भीतीने दागिने, शेरडे, कोकरे विकावयाची व कशीतरी भरती करावयाची. रडारडी, आरडाओरड, गोंधळ चाले. कोणाही सहृदय माणसाचे ते दृश्य पाहून अंत:करणास पीळ पडून डोळ्यात प्राणी आल्याशिवाय राहात नसे. गावातील लोकांकडून दंड वसूल झाल्यावर सर्वांना बोलावून घेऊन अधिकाऱ्यांनी सांगितले, 'काँग्रेस फराऱ्याना पकडून द्या.' तेव्हा लोकांनी सांगितले, "जोपर्यंत दंड भरण्यास त्राण आहे, तोपर्यन्त दंड भरु, नाही त्या दिवशी घरदार सोडून जाऊ; पण काँग्रेस भूमिगताना केव्हाही पकडून देणार नाही." ही गोष्ट आम्हास कळल्यावर त्यांचे आमच्यावरील प्रेम पाहून आमच्या सर्वांची अंत:करणे भरून आली व मिटिंग घेऊन लागलीच धोरणात बदल केला.

## न्यायदान

या वेळी ब्रिटिश सरकारलाही युद्धात जय मिळू लागला होता. जर्मनीची पिछेहाट सुरू झाली होती. जपानचा पाडावही जवळ दिसत होता. त्यामुळे आपण आता लोकांचे निष्कारण हाल होऊ देण्यात अर्थ नाही, आपणास प्रतिसरकार स्थापन करावयाचे आहे; नुसते संरक्षण करुन भागणार नाही, तर विधायक कार्य करुन त्यांची स्थिती सुधारली पाहिजे असे ठरविले. शेतकऱ्यांचे सर्वात जास्त पैसे कशात जात असतील तर तंट्यात, खटल्यात. शिवाय कोर्टात काय पुरावा येईल त्यावरुन न्याय मिळायचा. म्हणजे सत्य परिस्थितीचा निवाडा असा अर्थ नाहीच. बरे, पैसा, चिकाटी व कोर्टातून काम करुन घेण्याच्या खाचाखोचा ज्याला माहीत त्याच्यासारखा न्याय. बाकीच्याना नुसता खर्च. न्यायाचा तर पत्ताच नाही. शिवाय निकाल झाला तरी पुन्हा दरखास्ती, कब्जे, मारामाऱ्या व वकिलांच्या भरत्या. यामुळे सामान्य माणूस नको ते कोर्ट म्हणून जेरीस येई. आम्ही न्यायदान सुरु केल्यावर काही खर्च नाही, एका तारखेत निकाल व ताबडतोब कब्जा. गुंडांवर आमची दहशत असल्यामुळे ते आमच्यात ढवळाढवळ करीत नसत. त्यामुळे आमच्याकडे सर्वांची नुसती रीघ लागत असे. सर्व खूष होत. सर्वत्र भूमिगतांचे नैतिक वजन वाढू लागले व जो तो काँग्रेस फराऱ्यांशी संबंध असावा म्हणून धडपडू लागला. आश्चर्य वाटेल; ज्या कराड कोर्टात वर्षाचा दोन हजारापर्यन्त दाव्याचा नंबर जावयाचा तेथे तो १००-२०० वर आला. अशी सर्व जिल्हाभर परिस्थिती झाली.

वकील बेकार झाले. मग कोणी शाळामास्तर तर कोणी रेशन आफिसमधून नोकरीस लागले. त्यांच्या जीवनावर परिणाम झाल्याने ते भूमिगतांचा द्वेष करू लागले व त्यानी खोटानाटा प्रचार करण्यास सुरुवात केली.

लोकाना मारतात, ठोकतात, सर्वत्र दहशत बसवली आहे. पत्र्या लावतात, म्हणजे पायात मोळे ठोकतात असा प्रचार सुरू झाला. खरे म्हणजे पत्र्या हे त्याचे नुसते नाव आहे. कायद्याच्या भाषेतून सुटण्याचा तो एक प्रकार आहे. पत्र्या म्हणजे प्रथम त्या माणसास उताणा निजवून त्याचे दोन्ही पाय एका ठिकाणी बांधावयाचे व त्यात मध्ये काठी घालून ते दोघानी वर उचलून धरावयाचे व दुसऱ्याने काठीने त्याच्या तळपायावर तडाखे मारावयाचे. पायाच्या तळव्यावर मारल्याने कळ फार येते. जखम होत नाही. शिवाय सर्वांची समजूत आहे की अशी पत्री लावली की पुरुषत्व जाते! त्यामुळे मनातून खरे भिऊन कसलाही कठोर मनुष्य असला तरी तो ताबडतोब गुन्हा कबूल करी व खरी हकीकत सांगे किंवा नुसती पत्री लाव म्हटले तरी दहशतीने तो हातापाया पडून खरं बोलू लागे. शिवाय कायद्याच्या दृष्टीने त्यास शिक्षा कमी. जखम नाही, तीक्ष्ण हत्यार नाही. म्हणून या शिक्षेचा प्रचार सर्वत्र झाला. ही शिक्षा मूळ कोल्हापूरच्या पोलिसानी शोधून काढली व ती त्या हद्दीतील दरोडेखोरांनी उचलली. त्यांच्यापासून आमच्याकडील दरोडेखोर शिकले व त्यांच्यापासून ती आम्ही शिकलो. अशी या विद्येची परंपरा आहे. यात गांडपत्री म्हणून आहे. त्यात पाय वर उंच उचलून कुल्ल्यावर तडाखे देत; पण पायावरच मारण्याचा प्रघात जास्त.

## विधायक कामांची मालिका

न्यायदान सुरु केल्यानंतर काँग्रेस भूमिगतांत बरेच स्वार्थी घुसले व त्यानी धुमाकूळ मांडला. लोकानी पैशाच्या मागण्या सुरु केल्या. आपल्या आप्तेष्टांना अनुकूल असा न्याय देऊ लागले. कोणी खोटेच नाव धारण करुन बाकीच्यानी हे अमूक अमूक आहेत म्हणून न्यायदान करीत, असे अनेक प्रकार झाले. त्यामुळे बुलेटिनद्वारा आम्हांला त्यांचे स्वरुप जाहीर करावे लागत असे. ज्या वेळी आम्हाला पैशाची जरुर लागेल त्या वेळी आम्ही सही करुन विश्वासू माणसाबरोबर चिठ्ठी पाठवीत असू. 'तुम्ही तसे पैसे देऊ नका अगर भिऊ नका. ताबडतोब आम्हास कळवा आम्ही बंदोबस्त करु.' असे निरोप आम्ही पाठवीत असू.

त्यानंतर खेडोपाडी सेवादले काढली, शिबिरे घेतली. असे गाव राहिले नाही की जेथे सेवादल शाखा काढली नाही. स्त्रियांची सेवादले काढली, शिबिरे घेतली. येळगाव, कासेगाव, पाली येथे शिबिरे झाली. नंतर कापुसखेड, कराडला झाली. तरुण हा बुद्धीची वाढ झालेला पाहिजे. म्हणून वाचनालये काढली. साने गुरुजी, पां.वा. गाडगीळ यांची पुस्तके (वाद विवेचनमाला) आणून गावोगाव दिली. खेड्यातून बागेतूनसुद्धा त्यांचे वाचन सुरू झाले. नंतर तरुणांस सेवादलात मेहनत केल्यावर खाण्यास पौष्टिक

खुराक पाहिजे म्हणून शहरात हॉटेलमध्ये दूध घालू नका असा प्रचार सुरु केला. त्याबरोबर शहरात दूध जाण्याचे बंद झाले. त्यात एक गंमत अशी झाली, हॉटेलमध्ये दूध घालू नका म्हणताच त्यानी शहरात दूध नेण्याचेच बंद केले. त्यामुळे गोरगरिबांच्या मुलांचे हाल होऊ लागले. तेव्हा सहज एक दिवस कराडचे माझे स्नेही एस.पी. राव, पेंढारकर, बाजीराव उमराणी, एकांडे वगैरे स्नेही सुपने येथे भेटावयास आले व त्यानी नवीन परिस्थितीची कल्पना दिली व लोकानी कलेक्टरकडे अर्ज केल्याचे सांगितले. मी दूध बंद करण्यामागील उद्देश त्याना सांगितला व कलेक्टरकडे जाऊन काही उपयोग होणार नाही. आमच्याकडे आलात तर काही उपयोग होईल असे सांगितले. ८ दिवस गेले. कलेक्टर काही करु शकले नाहीत. शेवटी आम्हास विनंती केल्यावर सर्व लोकाना आम्ही समजावून सांगितले. मग पूर्ववत् सर्वत्र दूध सुरु झाले. तमाशे बंद केले गेले व त्याना राष्ट्रीय तमाशे बसविण्यास सांगण्यात आले. त्याचप्रमाणे लग्नकार्यात व्यर्थ खर्च होतो म्हणून वाजंत्री बंद करण्यात आली. एक वेळ कोणेगावचा एक धाडसी तरुण मला भेटण्यास आला व म्हणू लागला : तुम्ही वाजंत्री बंद केले. पैसा व्यर्थ खर्च होतो हे मलाही मान्य आहे; पण यामुळे ही कला मरेल. ती मरावी अशी तुमची इच्छा आहे का? मी सांगितले : तशी इच्छा नाही. पुढे आम्ही यातून मार्ग काढणार आहोत. मलाही हे संपूर्ण वाजंत्री बंद करणे पसंत नाही. नंतर दारुबंदीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला व तो संपूर्ण जिल्हाभर यशस्वी करण्यात आला. आर्वी येथे अक्षरशः लाखो रुपयांची दारु ओतण्यात आली. पाटण तालुक्यातील दारूची सर्व ठिकाणे नष्ट करण्यात आली. याप्रमाणे धूमधडाक्याने विधायक कार्यास सुरुवात झाली. त्यावेळी रस्ते करणे आम्हास इष्ट नव्हते. सारखे छापे येत. उलट असे वाटे की, मोटार जाणारे रस्ते नसते तर बरे झाले असते.

याप्रमाणे मी इकडे आल्यानंतर श्रीरंग कामत येथे बेळगावीच राहिले. नंतर दुसऱ्या दिवशी पोलिसांना त्यांचा सुगावा लागताच त्याना वेढले व दुर्दैवाने ते पकडले गेले. ही बातमी मला उंब्रज शेजारच्या कोर्टी गावात कळली. मला अतिशय वाईट वाटले. नंतर त्यांच्या अल्पशा सहवासात माझ्या प्रत्ययास आलेल्या गुणांचे वर्णनपर पत्र मी प्रमिलाबाईना पाठविले व नुसत्या कर्नाटकाचे नव्हे, तर महाराष्ट्राचेही नुकसान झाल्याचे त्याना लिहिले. वर मथळा "शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे" असा देऊन फारच सुंदर पत्र लिहिले होते. ते पाकीट जाड झाले होते. कोर्टीस पोस्ट नसल्यामुळे उंब्रजला पोस्टात टाकण्यास दिले. तेथे ते पोलिसानी काढून घेतले असावे! आमच्या पत्रव्यवहाराकरिता कव्हर अँड्रेस वापरत असू. कराडला सुशीला कुबेर व बेळगावला सुशीला साठे (साठे वकिलांची मुलगी) यांच्या पत्त्यांचा वापर करीत असू. हे पत्र

पोलिसांच्या हाती पडताच प्रथम त्यानी सुशीला साठे हिला पकडले व नंतर तिच्या बापास पकडले. बाप वकील, त्याला काहीच माहीत नव्हते. तो घाबरुन गेला. त्याला हकिकत समजताच तो मुलीवर खूप रागावला व तिने प्रमिलाबाईंची ती पत्रे असतात म्हणून सांगितले. सुशीला साठेला पकडल्यावर आपल्यास पकडणार हे जाणून प्रमिलाबाईंनी मला पत्र पाठवले व सर्व हकिकत कळवली व आता पत्रे पाठवू नका म्हणून मला लिहिले. ते पत्र मला मिळाले. त्याच वेळी पुन्हा एक अत्यंत महत्त्वाचे पत्र त्याना लिहून पोस्टात टाकलेही होते. ताबडतोब मी डॉ. कुलकर्णी यांच्या घरी उंब्रजला गेलो. त्याना परिस्थिती सांगितली व माझे पत्र मास्तरांच्याकडून मागून घ्या. नाहीतर मला त्या रनरला गाठून वाटेत ठोकून ते पत्र मिळवावे लागेल; कारण बेळगावला असा घोटाळा झाला आहे असे सांगितले. टपाल जाण्याची वेळ होती. नशीब तुमचे काय घडेल ते खरे असे ते म्हणाले. पण सुदैवाने डाक बंद झाली तरी मास्तराने ती फोडून मला पत्र परत दिले. जिवात जीव आला. नंतर तेथून किवळला निघून गेलो. नंतर कळले सुशीला साठे व तिचे वडील याना सोडून दिले व प्रमिलाबाईंना पकडले व त्याना विचारले: तुम्ही साठेंच्या नावावर पत्रे का मागवत होता? तर त्यानी सांगितले "माझी प्रेमपत्रे येत व ते माझ्या आईवडिलाना खपत नसे, म्हणून मी यांच्या नावावर मागवत असे!" त्यानी ते पत्र दाखविले व 'हे प्रेमपत्र आहे का?' म्हणून विचारले. त्यानी काही उत्तर दिले नाही व त्याना पकडून अंडरट्रायल म्हणून ठेवून दिले व सुमारे वर्ष सव्वा वर्षे तुरुंगात डांबले. सुशीलाबाई कुबेर यानाही माझ्याकरिता एक वर्ष तुरुंगात डांबले. माझे धाकटे बंधु आप्पासाहेब यानाही १ वर्ष तुरुंगात टाकले. बायकोस तुरुंगात टाकले. तिलाही ७-८ महिने ठेवले. उमराणी मास्तराना पकडून तुरुंगात डांबले. त्याना कळले उमराणी म्हणून कोणी माझे स्नेही आहेत. पण त्याना बाजीराव उमराणी माझा मित्र आहे हे माहीत असताही ते त्यानी न सांगता स्वत: जवळजवळ १ वर्ष तुरुंगवास पत्करला. नानासाहेब देशपांडे यानाही एक दिवस बसवून ठेवले; पण सर्वांनी सांगितले तुम्ही तुमचे कार्य खुशाल करा. आम्हास पकडले म्हणून हजर होऊ नका. एका वर्षानंतर सर्वांना सोडून देण्यात आले. सुटल्यावर ते सर्व येऊन मला भेटले.

## औंधचे ऋण

पुन्हा परत उत्तर भागात गेलो. तिथून किल्हईस गेलो. तेथे आण्णासाहेब दास्ताने आले होते त्यांच्याशी बोलणे झाले. त्यानी कामाचे स्वरुप समजून घेतले व आपले विचारही आम्हास समजावून सांगितले. तेथेच रत्नाप्पा कुंभार यांची गाठ पडली व त्यांचीही काम करण्याची पद्धत समजून घेतली. नंतर ते औंधास आले. आण्णासाहेब तेथून निघाले व ते कराडास आले. मी त्याना हा सातारा आहे, जपून वागा म्हणून सांगितले. पण कराडला आल्यावर त्याना अटक झाली व काही निकामी कागदपत्रे जाळत असता पोलिसानी त्याना धरले व केस भरुन येरवड्यास रवाना केले. औंधास

आप्पासाहेब पंत, पंडित सातवळेकर यानी तुम्ही रत्नाप्पांकडून मार्गदर्शन घ्यावे असे सुचविले. अच्युतरावांच्यापाशी रत्नाप्पांचे वजन चांगले होते. त्यांचे सहकाऱ्यांशी होणारे वर्तन आम्हास पसंत नव्हते. ते बेफिकीरीने वागत. तथापि मी म्हटले, आमच्या सहकाऱ्यांच्या सल्ल्याने काय ते ठरवू. नंतर मी, बर्डे मास्तर वगैरेंना हे सांगितले. ते म्हणाले, 'पाठीवर शेपट्या रुळणाऱ्या पोरी घेऊन त्याने हिंडावे. तो आम्हास कशाचे मार्गदर्शन करणार आहे? आम्ही आमच्या विचाराने चालू. त्याची बरी वाईट फळे आम्ही भोगण्यास तयार आहोत.' पुढे फक्त साताऱ्यात काम सुरु राहिले. महाराष्ट्रातील बाकीच्या जिल्हयातील सर्व काम थंडावले. तेव्हा अच्युतरावांच्या विचारे सर्व जिल्हयांत काम सुरु करावे असे ठरुन जिल्हयावरील प्रेशर कमी व्हावे, म्हणून आम्ही सर्व मुंबईस निघून गेलो.

आमचा औंधचा मुक्काम जेलमध्ये असे! आप्पा मास्तर, बाबुराव लाड वगैरे त्या जेलमध्ये स्थानबद्ध म्हणून होते. आम्ही जेलमध्ये केव्हाही जात असू. तेथे मज्जाव नव्हता व सुरक्षितता फार चांगली. त्यामुळे जेवणखाणे, गप्पागोष्टी व आराम घरच्यासारखा असे. आमच्या बेचाळीसच्या चळवळीत जर कोणत्या संस्थानचा उपयोग झाला असेल तर तो औंधचा. किर्लोस्करवाडी, ओगलेवाडी येथे आमची ठाणी असत. वाटेल त्या वस्तू पुरवणे, वेळ पडल्यास पैसे पुरविणे, औषधांची मदतही तेथून होत असे. आप्पासाहेब पंत अगदी घरच्यासारखे आमच्याशी वागत. बेचाळीसच्या आंदोलनात यशाचे वाटेकरी कोण असतील तर प्रामुख्याने आप्पासाहेब पंत यांची गणना करावी लागेल. जिल्हा त्यांचा खास ऋणी आहे.

## कार्यकर्त्यांची निरनिराळ्या जिल्हयात रवानगी

मी, बर्डे व बुवा म्हावशीकर औंधावरून सोलापूर जिल्हयातील बाकोद स्टेशनवर बसण्याकरिता निघालो. तेथून सकाळी वाटाड्या बरोबर घेऊन आटपाडीच्या रस्त्यास लागलो. बर्ड्यांना चालण्याची सवय कमी, त्यामुळे संध्याकाळपर्यन्त माचणीपर्यन्त गेलो. वाटेत एक बैलगाडी चार मैलापुरती मिळाली. त्यात बसून पुढे निघालो. गाडीवान अचानक म्हणाला: माचणीस पोलिस पार्टी आहे व तेथे तपासतात. मग युक्ती करुन आम्ही उतरलो. गाडीवानास सांगितले, इथल्या मळ्यात आम्हास जावयाचे आहे. तू आपला निघून जा. तो निघून गेल्यावर आडवाटेने अंधारातून निघालो. तो काही लोक भेटले. त्याना वाटले हे आडवाटेने चाललेले दरोडेखोर आहेत. ते गावात गेले की दंगा उठला व गावातील लोकानी पाठलाग सुरु केला. आडवाटेने पळताना पळत पळत कसे तरी माचणी ओलांडून पुढे एक मैलभर गेलो. बर्डे म्हणाले, 'मी अगदी थकलो आहे. आपल्याने एक पाऊलसुद्धा उचलणार नाही.' म्हणून मांडी ठोकून रस्त्यावर स्वस्थ बसले! कोणाचे ऐकेनात. शेवटी म्हणाले. आडरानात तरी चला. वाटाड्या म्हणाला, 'येथून माझ्या बहिणीचे गाव एक मैल आहे. तेथपर्यन्त चला,' पण ते काही केल्या

ऐकेनात. शेजारच्या वावरांत आंबा होता. मग कसे तरी त्याखाली सर्व झोपलो व पहाटे पुढे चालू लागलो. सूर्योदयापूर्वी त्या गावाबाहेर आलो व त्या वाटाड्यास गाडी बघण्यास गावात पाठवून दिले व आम्ही गावानजीकच्या शेतात आंब्याच्या झाडाखाली बसलो. तो अर्ध्या तासात येतो म्हणाला, पण दोन तास झाले तरी तो आला नाही. बरे, सकाळी शौचास माणसे येऊ लागली व आमच्याकडे टवकारुन पाहू लागली; कारण मी, बर्डे, म्हावशीकर सर्वच गडी तयार, जाडे. बुवांनी मिशांचे कल्ले ठेवल्यामुळे दिसावयास भयंकर दिसावयाचे. त्यामुळे सर्वांना आमचा संशय येऊ लागला. जे ते येऊन जात व आपसात कुजबुजत. माचणी एकदीड मैलावर. तेथे पोलिस ठाणे. त्यामुळे बर्ड्यांना म्हटले, आता येथे थांबणे धोक्याचे आहे. तेव्हा गावात जाऊन चौकशी करुन घराचा पत्ता काढून तेथे थांबू. सर्वांना ते पसंत पडले व गावात निघालो. तर पोलिस पाटील व इतर १०-१५ माणसे आमच्या मागून येऊ लागली. आम्ही म्हटले : न्हाव्यांची घरे कुठे आहेत? तेथे सुदैवाने एकच घर होते व तेथील बाईला विचारले : मुलगा कुठे गेला? तिने सांगितले : त्याला इथे गाडी मिळाली नाही म्हणून तो शेजारच्या वाडीत गेला आहे. पावणं आत याकी. केव्हांपासून तुमची वाट पाहाते आहे. माझ्या भावानं तुम्ही आल्याचे व बाहेर बसल्याचे सांगितले. म्हणून तिने आग्रह करुन, जवळजवळ हातास धरुन म्हटले तरी हरकत नाही, आत नेले व ती चहा करू लागली. त्यावेळी सर्व गावाचा संशय गेला व लोक आपापल्या घरी गेले. इतक्यात गाडी आली व त्यात बसून संध्याकाळी आटपाडी गाठली व त्या प्रसंगातून सुदैवाने सुटलो. नंतर वालोद स्टेशनवरुन मुंबईस जाऊन पोचलो. बाकीचे सर्व आले होते. मग किसन वीर, जोशीकाका, नाथाजी, मी, रत्नाप्पा कुंभार, बर्डे, बाबूराव चरणकर, आणखी एक दोघे व अच्युतराव असे होतो. म्हात्रे यांच्या पुतळे करण्याच्या कारखान्यात जमलो व जिल्हयातील सर्व परिस्थितीची चर्चा झाली. अच्युतरावांनी ही गोष्ट मान्य केली व प्रत्येकास जिल्हे वाटून दिले व तेथील कार्यकर्त्यांचे पत्ते व चिठ्ठ्या दिल्या. माझ्या वाटणीस पुणे जिल्हा आला. नाथाजींच्या वाटणीस खानदेश, बाबूराव चरणकर रत्नागिरी, बर्डे सोलापूर, जोशीकाका नगर याप्रमाणे जिल्हे वाटून देण्यात आले. नंतर रत्नाप्पांचे नेतृत्व स्वीकारण्याची गोष्ट अच्युतरावानी काढली. सर्व म्हणाले, त्यांच्या पाठीमागे कामाचा व्याप मोठा व कोल्हापूर आमच्यापासून दूर. तेव्हा त्याना मार्गदर्शनाला वेळ कुठे आहे? दूरपणामुळे सर्वांना गैरसोयीमुळे अच्युतरावांनी याचा भावार्थ तेव्हाच ओळखला व म्हणाले, 'मुंबई तुम्हांस जवळ वाटते व कोल्हापूर लांब वाटते. तेव्हा मी सर्व जाणतो.' तुमची इच्छा नसेल तर माझा आग्रह नाही. अर्थात् राजकारणाच्या इतर प्रश्नावर चर्चा होऊन ती मिटिंग संपली व आपापल्या सुरक्षित ठिकाणी आम्ही निघून गेलो.

## पुणे जिल्हयातील अनुभव

मी पुण्यास येऊन कामास सुरुवात केली. शेजारच्या खेड्यात जाऊन गाठीभेटी

घेऊन आलो. शहरी मुलांच्यात दम कमी. लगेच दमत व किती काम केले म्हणून हाशहुश करीत. त्यामुळे काम करणे जड जाऊ लागले. त्याना वाटे मी काही सोशालिस्ट नव्हे. त्यामुळे ते मनापासून सहकार्य करीत नसत. मध्ये एकदा भाऊराव तेंडूलकर आले. त्यांच्याशी चर्चा झाली. तेथील केळकरांच्या हाती मला सोपवले होते. तेही अगदी तुटक वागत. जेवणाची हेळसांड व जवळजवळ नजरकैदेत ठेवल्यासारखे मला वाटू लागले! त्यांचे लोक जमतील तेव्हा चर्चा चाले. अच्युतराव हे सोशॅलिस्टांचे पुढारी आहेत व ही चळवळ सोशॅलिस्टांनी चालवली आहे असे ते बोलत. मी एक दिवस मुंबईस गेलो व अच्युतरावांना भेटून सांगितले की तुमचे अनुयायी याप्रमाणे प्रचार करतात व आम्ही तर तुम्हास कॉंग्रेसचे व यावेळी सर्व पक्षांचे भारतीय पुढारी समजतो. तेव्हा असा प्रचार होऊ नये. त्यामुळे लोकात — कार्यकर्त्यात फूट पडेल. त्याना ते पटले व मग आपल्या अनुयायाना त्यांनी कानपिचक्या दिल्या व माझ्या व्यवस्थेबद्दल सांगितले. नंतर मी पुण्यास आलो. दुर्दैवाने माझ्या पायात नारु झाला व तो तुटला व सेप्टीक झाले. सर्व पाय सुजला. ठणका सुरु झाला. ताप १०४-१०५ अंशांपर्यन्त राहू लागला. दिवसातून एकदाही उतरेना. आण्णासाहेब हरिहर L.M.S. चा अभ्यास करीत होते. यावेळी मी त्यांच्या खोलीवर होतो ते माझ्या खोलीवर आले. नुकताच तानाजी पेंढारकर दोषी तापाने असाच भूमिगत अवस्थेत वारला होता. त्याला उपचार व्यवस्थित करू शकलो नव्हतो. त्याची आठवण झाली. डी.जी. नी शुश्रूषा केली. माझे मलमूत्र सुद्धा ते काढीत. मजवर त्यांचे अनंत उपकार आहेत. त्याचप्रमाणे हरिहर यांनीही सेवा केली. नंतर डी.जी. नी व मी विचार केला. डॉक्टरची मदत घेण्याचे ठरले. डॉ. दातारांनी सांगितले : माझ्या घरी नको. ताराचंद रामनाथ हॉस्पीटलमध्ये ठेवा. तसेच मामा गोखले यांनीही सांगितले. मग टांग्यात घालून मला हॉस्पिटलमध्ये नेऊन पोचवले. डॉक्टरनी तपासून सांगितले की पायात पू झाला आहे, तेव्हा ऑपरेशन केले पाहिजे. लगेच दुसऱ्या दिवशी भूल देऊन ऑपरेशन केले. सर्व पू काढून टाकला. दोन तास ऑपरेशन चालले होते. नंतर कॉटवर टाकले. फारसा त्रास झाला नाही. इतक्यात पोलिस अधिकारी डी.एस्.पी. हॉस्पीटल तपासण्यास आले. त्याना ह्या हॉस्पिटलचा संशय होता; कारण येथे फराऱ्यांना आश्रय मिळतो, असा त्यांच्या खात्याचा समज असल्यामुळे तो दर ८-१० दिवसांनी तपासत असे. तो तपासत माझ्यापर्यन्त आला. मी नाकापर्यन्त पांघरुण घेऊन झोपेचे सोंग घेतले. तो सरळ निघून गेला. मी सुदैवाने सुटलो. नंतर एकदोन दिवसानी शांताराम इनामदार या हॉस्पिटलमध्ये आला. त्याला भेटण्यास माणसे येऊ लागली. त्यामुळे मामा गोखले याना सांगून दुसऱ्या खोलीत कॉट बदलली. नंतर चारआठ दिवसात आणखी ओळखीची माणसे येऊ लागली म्हणून घरी ड्रेसिंग करतो असे सांगून हॉस्पिटलची रजा घेतली. खोलीवर येऊन पडलो. डॉ. करमळकर यांना बोलावून ड्रेसींग करून घेत होतो. इतक्यात एक दिवस वाटेगावचा विनायक तेथे आला व सांगू लागला: 'बर्डे मास्तर बेळगावला गेले. तेथे ते उघड एक दिवस वावरले.

संध्याकाळी सिनेमा थिएटरात त्याना पकडले व त्यांच्यावर ३०२ कलमाखाली मारुती शेणेकराचा खून केल्याबद्दलची केस भरली आहे व पुरावे कासेगांवचे आहेत. तेव्हा चला.' मी सांगितले, 'हलण्यासारखी माझी परिस्थिती नाही. थोड्याच दिवसानी बरे वाटले म्हणजे तिकडे येतो. आता मुंबईस जाऊन बाबूजीना घेऊन या म्हणजे तुमची तिकडची सर्व व्यवस्था करुन देतो. मग ते मुंबईस गेले व बाबूजीस घेऊन आले. त्याला कासेगांवच्या सर्व लोकाना जाऊन सांगण्यास सांगितले. मीही प्रत्येकाच्या नावे टपाल पाठवून पुरावे देऊ नका, व कासेगांवला कलंक लावू नका. जर पुरावे द्याल तर तुमच्या जिवासह काही शिल्लक राहणार नाही असे निरोप दिले. बाबूजी कासेगांवकडे आला व त्याने सर्वांना तसे सांगितले. कुणाचे पुरावे झाले नाहीत. केस सुटली. बर्डे मास्तरांना डेटेन्यू म्हणून ठेवून दिले. नंतर वाटेगावी बाबूजीनी एक टोळी निर्माण केली. त्यात बाबूजी, अहमदभाई, श्रीपतीबुवा, किसन पणुंब्रेकर काका वगैरे लोक होते. मी १५ दिवसानंतर पुण्याहून कासेगावी आलो तोपर्यंत सर्व व्यवस्थित होते.

## गांधीवाद्यांचा खोटा प्रचार

या भागात काम सुरू केलें होते. देवकीनंदन नारायण, डॉ. दातार व आचार्य लिमये मुद्दाम पुण्याहून भेटण्यासाठी सातारला आले व पुढे काय म्हणून विचारु लागले. आम्ही सांगितले आमच्यापुढे तीनच गोष्टी वा पर्याय आहेत. एक आमच्या वर्किंग कमिटीने बाहेर येऊन लढा थांबवा म्हणणे, अगर स्वातंत्र्य मिळणे, अगर काम करीत करीत मरून जाणे. याशिवाय हे आम्हास बंद करता येणार नाही. हे काँग्रेसच्या मर्यादेत बसत नाही. अच्युतराव मार्गदर्शन करीत आहेत. त्यांचे ते बघून घेतील. आम्हास त्याची काळजी करण्याचे कारण नाही. ते म्हणाले, 'पत्र्या मारता, क्रूरपणे वागून दहशत निर्माण करता.' मी म्हटले, 'ही गोष्ट साफ खोटी आहे. आपण मजबरोबर चला. आपल्यास सर्व दाखवितो. उलट लोक अगदी तळ हातावरील फोडाप्रमाणे आम्हाला सांभाळतात. नाहीतर आम्ही अवघे दीडशे लोक काय करणार? १०,००० मिलिटरी आहे. त्यांच्यापुढे आमचे काय चालते? पण लोकांचा आश्रय आहे म्हणूनच आम्ही त्याना भारी पडलो आहोत. दिवसेंदिवस जनतेचा आमच्यावरील विश्वास वाढतच आहे.' आम्ही एक तास चर्चा करीत होतो. त्यानंतर ते निघून गेले. त्यानी महाराष्ट्रात एक संघ स्थापन केला व साताराचे काम काँग्रेसमध्ये बसत नाही असा प्रचार सुरु केला. मी पुण्यास गेलो होतो. तेव्हा देवकीनंदन, डॉ. दातार, आचार्य लिमये एकत्र जमून चर्चा चालू होती की, काँग्रेसच्या नकाशातून सातारा काढून टाकावा काय? पुन्हा एक महिन्यांनी प्रेमाबाई कंटक कराडपर्यन्त येऊन परत गेल्या व काहीतरी बडबडू लागल्या. 'बैलाच्या पायास बांधून फरफटत नेतात, पायात लोखंडी पत्र्या ठोकतात. व हे सर्व साताऱ्यात जाऊन मी पाहून आले.' मला कोणी सांगितले असा या बाईचा प्रचार सुरु आहे. रात्री मी त्याना गाठले व त्याना विचारले, 'तुम्हास कोणी ही माहिती दिली? कराडला कुठे उतरता?

आळतेकरांच्या इथे?' मग त्यानी सांगितले, 'नाही.' 'सातारा जिल्ह्यात आमच्यासारखी क्रिमिनलची संघटना आहे. ह्यांची ही सर्व क्रूर कामे आहेत. आमची नाहीत.' मग त्याना पाहिजे त्या सर्व घटना सांगितल्या आणि असा खोटा प्रचार करु नका असे बजावले. नंतर त्यांचा प्रचार थांबला. पुन्हा तिने आवाज काढला नाही.

## गांधीजींनी आधार दिला

एवढ्यात गांधीजींची सुटका झाली व ते बाहेर आले. त्याना भेटण्यास अच्युतराव गेले. त्यांच्याशी सर्व चर्चा झाली व सर्व गोष्टींचा निकाल लागला. आम्ही उत्तर भागात करंजखेड जवळ मोरबन नावाच्या खेड्यात मिटिंग घेण्याचे ठरविले व त्याप्रमाणे खालून सर्वांना घेऊन वर निघालो. शेखकाका, बाबूजी, बुवा म्हावशीकर, मी, माधवराव, कोरेगावजवळील कुमठ्यात आलो. तेथे बापूराव कचरे वगैरे लोक येऊन मिळाले. बापूराव कचरे व त्यांचे लोक जास्त उघड फिरणे व हा पांडुरंगाचा भाग जास्त सेफ म्हणून त्यानी कसलाच निर्बंध पाळला नाही. संध्याकाळी तडवळ्यास पांडुरंग पैलवान यांच्याकडे जेवणास गेलो. त्यानी पोळ्याच्या जेवणाचा बेत केला. उदबत्त्या, रांगोळ्या सर्व होते. नंतर स्वस्थपणे जेवण करुन पानसुपारी झाल्यावर रात्री ८ च्या सुमारास त्यांची सुंदर बैलांची जोडी असलेली गाडी होती तीमधून निघालो. दिवसभर उघड फिरण्यामुळे कोरेगांव पोलिस स्टेशनला बातमी लागून मोठी पोलिस पार्टी आमच्यावर छापा घालण्यासाठी म्हणून निघाली व जिथे आम्ही दुपारी राहिलो ते छप्पर तपासून तडवळ्याचे पांडू पाटील यांच्या घरावर छापा घालून 'कुठे गेले?' म्हणून मारहाण करु लागले. त्यातील एक माणूस आम्हास सांगण्यासाठी पोलिसांची नजर चुकवून धावत पळत आला. आमची गाडी गावाबाहेर निघून एका वळणावर आली. तेथे धोंड्यावर अंधारात चाक गेले. त्यामुळे गाडी पालथी झाली. हत्यारे इकडे तिकडे अस्ताव्यस्त झाली. लोक फेकले गेले. मी गाडीखाली सापडलो. गाडी सरळ केली. आम्ही सर्व सामान हुडकून घेऊन पुन्हा व्यवस्थित गाडीत बसतो न बसतो तोच तो माणूस येऊन सांगू लागला. आता पळा पाठोपाठ पोलीस येत आहेत. असे ऐकताच आम्ही गाडी सोडून दिली व आमचा पाठलाग करीत ते खास किन्हईकडे जाणार, तेव्हा पांडुरंग व आम्ही दोघांनी विचार करुन एकदम दिशा बदलली व उत्तरेकडे न जाता एकदम पश्चिमेकडे वळलो. जवळच कुत्रे होते ते भुंकू लागले. शेतकरी म्हणाला, 'कोण आहे?' मी सांगितले, 'ओळखत नाही का? पाठीमागून पोलीस येत आहेत. त्यानी विचारले तर किन्हईकडे लोक गेले म्हणून सांग व कुत्र्याचे भुंकणे बंद कर. पोलिसांना चाहूल लागेल.' तो म्हणाला, ''कॉंग्रेस हाय व्हय? मी बी तुमच्यातलाच हाय, बराय जावा.'' आम्ही पुढे व पोलीस मागे याप्रमाणे रेल्वे, रस्ता ओलांडला, पोलिसांच्या बॅटऱ्या चमकत असताना दिसत होते. ते त्या झोपडीवरून पुढे किन्हईकडे गेल्याचे दिसत होते. मग आम्ही निश्चित झालो व जरंड्याच्या डोंगराच्या पायथ्याशी एका आंब्याच्या

झाडाखाली झोपलो व सकाळी उठून याच बाजूने मोरबनपर्यन्त गेलो. तेथे सर्व भागातील लोक जमले होते. नाथाजी लाड, आम्ही सर्व, डी.जी. देशपांडे, वगैरे५० लोक होते. तेथे कामासंबंधी चर्चा झाली.

महात्माजी पाचगणीस जाणार होते. म्हणून त्याना भेटण्यासाठी किसन वीर वगैरे लोक खिंडीत रस्त्यावर गेले. त्यांची गाठ पडू शकली नाही. नंतर मिटिंगमध्ये झालेल्या कामाचा आढावा व पुढील कामाची दिशा यावर चर्चा झाली व पुढील वर्षाकरीता म्हणून नाथाजी लाड यांची डिक्टेटर म्हणून नेमणूक केली व सर्व मुंबईस निघून गेलो. मुंबईस सुतार गल्लीतील एका खोलीत आम्ही राहात असू. अच्युतराव गांधीजींना भेटूनच आले होते. शिवाय आम्ही गांधीजींना एक पत्र पाठवले होते. त्यात त्याना 'आम्ही काँग्रेसमध्ये राहू शकत नाही, नियमात बसू शकत नाही. असे काही महाराष्ट्रातील काँग्रेसवाले म्हणतात. त्यासंबंधी आपले मत काय आहे? व आम्ही हजर व्हावे काय?' यासंबंधी विचारले होते. त्याच्यावर त्यानी स्वतःच्या हातानी लिहून उत्तर पाठवले आहे. ''तुम्हारा हृदय मंजूर करे तो सवाल है, हाजिर होने का। काँग्रेस नियमनका कोई सवाल नही उठता है इसमें। वर्किंग कमिटी जेलमें है। बाहर आ जाय तो निकाल देगी।'' 'तुमच्या अंतःकरणास पटत असेल व चुकीच्या मार्गानी गेलो असे वाटत असेल तर हजर व्हा. तुम्ही काँग्रेसमध्ये राहू शकता की नाही हा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही; कारण हे ठरविणारी काँग्रेस वर्किंग कमिटी जेलमध्ये आहे. ती बाहेर येऊन काय तो निर्णय घेईल.' त्यामुळे आम्ही सर्व निश्चित झालो व महाराष्ट्रातील गांधीवादी म्हणवणारांचे ते मंडळही लयास गेले.

मुंबईच्या फोर्टमध्ये वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनीच्या ऑफिसच्या तळघरात आम्ही मिटिंग घेतली. सातान्यातील सुमारे ५०-६० लोक आले होते. अच्युतरावही आले होते. मग कामाचा आढावा घेण्यात आला आणि पुढील कार्यक्रमाबाबत मार्गदर्शनही झाले. गांधीजींच्या भेटीची सर्व हकिकत अच्युतरावांनी सांगितली. गांधीजींनी अच्युतरावांचा गौरव केला व 'तुम्ही तुमच्या अंतःकरणावर श्रद्धा ठेवून चालत आहात ना? मग तसे मानावयाचे काहीच कारण नाही.' अशा अर्थाचे गांधीजींशी बोलणे झाल्याचे त्यांनी सांगितल्याचे आठवते.

## नागनाथचे सातारा तुरुंगातून पलायन

नंतर शिराळ पेट्याचा ग्रुप हजर होतो असे म्हणाला. अच्युतरावांनी त्यांना परवानगी दिली; कारण त्या ग्रुपमध्ये काही दोष निर्माण होऊ लागले. बाबूराव चरणकर मागे राहू इच्छित होते; पण ते मागे राहिले तर सर्वच जण म्हणणार आम्ही मागे राहतो. म्हणून कोणी मागे राहावे व कोणी हजर व्हावे हा वादच नको म्हणून सर्वच्या सर्व १५-२० लोकांचा ग्रुपच हत्यारासहित बार काढीत शिराळ्यास हजर झाला. आम्ही मुंबईहून पांडू मास्तर, मी, शेख काका आणखी १-२ असे लोणंद स्टेशनवर उतरुन आदर्कीवरुन किन्हईला आलो व नंतर कुमठ्यास आलो व दुपारी

जेवण करीत बसलो. इतक्यात कोणी येऊन सांगितले, आज सकाळी सातारा जेलच्या तटावरुन उडी टाकून नागनाथ पळाला, व त्याच्या हातास काच लागली आहे. मी पांडू मास्तराना म्हटले, 'मला ताबडतोब सातारला गेले पाहिजे. त्याला वरच्या भागाची काही माहिती नाही. पुन्हा पोलिसांच्या हाती पडेल. तुम्ही येथून माहितगार माणूस घ्या व इंदोलीस जा. आम्ही तेथे येऊन तुम्हास गाठतो.' याप्रमाणे सांगून मी तडक साताऱ्यास गेलो. सातारला चार साडेचारच्या सुमारास पोचलो. रानातील एक गवताची पेंडी डोक्यावर घेऊन शहरात शिरलो. सर्व रस्त्यावर पोलीस! त्यांची सारखी धडपड सुरू होती. न्यू इंग्लीश स्कूल नजिक दादासाहेब साखवळकर यांच्या पाहुण्यांच्या घरी जाऊन उतरलो व तेथून चौकशीस सुरुवात केली. प्रथम बापुराव सोमण यांच्याकडे निरोप दिला. आमचा बातमीदार एका मारवाड्याच्या घरातून भाऊराव आण्णा कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या घरी गेला. मग भाऊराव आण्णांच्या शाळेत चौकशी केली. तेथे गनीसाहेब म्हणून मुख्याध्यापक होते. त्यांनी सांगितले, 'सकाळी आला होता, पण पुढे माहीत नाही.' मध्यरात्री ९ वाजता समक्षच त्यांना भेटावयास गेलो व त्यांना सांगितले, "माझे काही काम नाही. तो नागनाथ या भागात अपरिचित आहे. तेव्हा त्याला धोका होऊ नये म्हणून मी नेण्यास आलो आहे. शिवाय त्याच्या हातास काच लागली आहे म्हणे. तेव्हा त्याला चांगले उपचार व्हावयास पाहिजेत. नाहीतर धनुर्वातासारखा विकार निर्माण होईल. तेव्हा त्याला फक्त एवढेच सांगा "धन्वंतरी" आले आहेत. तुमची इच्छा असली तर ते भेटू इच्छितात आणि जर माझा निरोप त्याना तुम्ही सांगितला नाही आणि तो पकडला गेला अगर त्याचे जिवास काही धोका झाला तर त्याची जबाबदारी तुमच्यावर राहील." मग मात्र ते चपापले व म्हणाले, 'तो काल सकाळी आला होता. पण आता जावळी तालुक्यात आहे.' मी म्हटले, 'ठीक आहे. आता माणूस द्या. मी जातो.' लगेच त्यानी एक विद्यार्थी माझ्याबरोबर दिला व आम्ही दोघे निघालो. रात्रीचे १० वाजलेले. आभाळ भरुन आलेले. काळोख, रस्त्याने काही दिसेना. तसेच पुढे विजेच्या प्रकाशात आम्ही चालू लागलो. ४-५ मैल गेल्यावर एक गाव लागले. नागनाथ पळून गेल्यामुळे रस्त्यावर पहारे बसवले होते. मला शंका आलीच होती. मग मी बरोबरच्या मुलास सांगितले, "आपण कोर्टाविषयी बडबडत जाऊ या. त्या वकिलाने सकाळी हजर होण्यास सांगितले आहे. आत्तापर्यन्त बसवून घेतले. आता पोचणार केव्हा? इ.' त्याप्रमाणे मोठ मोठ्याने बडबडत निघालो. जणू काही एकमेकावर खेकसतो आहे असे भासवले. ती माणसे जवळ आली. ते राखणे होते. आमच्याकडे त्यांनी लक्षपूर्वक पाहिले. आम्ही त्यांच्याकडे लक्ष देत नाही अशा थाटात व जोरजोराने बोलत निघून गेलो. त्यांनी अडवले नाही. जवळजवळ पहाटेपर्यन्त चालत होतो. नंतर डोंगराच्या पायथ्याशी एक वाडी लागली. तेव्हा 'नागनाथचे ठिकाण येथून किती आहे' म्हणून विचारले. त्याने सांगितले, 'येथे वर डोंगराच्या वाडीत.' मग मी त्याला सांगितले, 'मी येथे कोणाच्या तरी घरी झोपतो. आज फार मी चाललो आहे. सातारा ते

कुमठे १४ मैल व हे १६ मिळून ३० मैल चाल झाली होती. तेव्हा शेतकऱ्याच्या माचावर झोपलो व नागनाथला जाऊन सांगा. ''धन्वंतरी आलेत, इच्छा असेल तर ते भेटू इच्छितात.'' नागनाथला निरोप कळताच तो तडक खाली आला व सातच्या सुमारास मला उठवले. आम्ही कडकडून भेटलो. सर्व हकिकत विचारली. जेलच्या दक्षिण अंगाची भिंत कमी उंच आहे. दोघांच्या खांद्यावर उभा राहून वर चढलो व उडी मारुन पलीकडून पसार झालो. हातास विशेषसे लागले नाही. बरे झाले. तेथे माझी काही माहिती नसल्याने एका मारवाड्याच्या घरी गेलो व भाऊराव आण्णांच्या घरी नेऊन पोचव म्हणून त्याला सांगितले. त्याने आण्णांच्या घरी पोचवले. नंतर त्यांच्या शिक्षकांनी मला येथे सुरक्षित ठिकाणी आणून ठेवले. जावळी तालुका गरीब. त्यामुळे चळवळीच्या दृष्टीने सरकारचे लक्ष इकडे फारसे नसे. मी सांगितले, 'मला कुमठ्यास हकिकत कळली व तुम्हास वरचा भाग अपरिचित म्हणून न्यावयास आलो आहे. इच्छा असल्यास येथेच राहा.' तो म्हणाला, 'आला बरे झाले. खाली आपल्या भागात कसे जावयाचे या मोठ्या विचारात मीही पडलो होतो. तेव्हा आपण बरोबरच जाऊ. तुम्ही एक दिवस आराम करा.' त्याप्रमाणे एक दिवस विश्रांती घेऊन दुसऱ्या दिवशी खाली दक्षिण भागात येण्यास निघालो. प्रत्येक ठिकाणी एक शाळा मास्तर घ्यावयाचा व पुढच्या शाळेत जावयाचे. या प्रमाणे या सर्व भागात भाऊराव आण्णांच्या शाळा होत्या. त्यामुळे अगदी सोपे जाई. शिवाय त्या सर्व शाळांतून बहुतेक मास्तर वाळवे तालुक्यातील होते. त्यामुळे त्यांना व आम्हाला संकोच वाटत नसे. आम्ही त्या शिक्षकावर विश्वास ठेवीत असू व तेही दक्षतापूर्वक काळजी घेत असत. पुढे जाताना मागचे मास्तर सोडून द्यावयाचे व पुढे जाण्यास मास्तर घ्यावयाचे व त्यांनी आडवाटेने पुढच्या गावी आम्हास घेऊन जावयाचे. असा क्रम करीत जावळी तालुक्यातून परळी खोऱ्यातून सातारा डाव्या हातास टाकून आम्ही दक्षिणेकडे निघालो. मधल्या रस्त्यावर पाले कसली म्हणून नागनाथने विचारले. मी म्हटले : डोंबाऱ्यांची पाले असतील. जरा न्याहाळून पाहिले तर त्या पोलिसांच्या राहूट्या! साताऱ्याभोवतीचे सर्व आडरस्ते अडवले होते. वाटेतल्या भरतगावी तर फौजदार गावात नवीन कोणी आले वगैरेबद्दल नुकतेच चौकशी करुन गेले होते. आम्ही गावात शिरलो. तो एकाने विचारले, 'कोण गाव पावणं?' आम्ही सांगितले, 'परळी.' आताच फौजदार येऊन गेले. त्यावरुन आम्हास हे कळले. तेथील सर्कल सर्वांना फार त्रास देत होता म्हणून चावडीत गेलो. आम्हाला पाहून ते सर्व घाबरले व सर्कल आताच गेले असे त्यांनी सांगितले. 'मग त्यांना निरोप सांगा. लेव्हीच्या बाबतीत शेतकऱ्यांना फार त्रास देऊ नका. पैसे खाऊ नका,' असा दम दिला. गावातील लोक जमले. पाटील तलाठी पाया पडले व गयावया करू लागले. त्यांना सांगितले, 'घाबरु नका. अंगास हात लावीत नाही. फक्त आज सर्वांना ताकीद देत आहे.' असे सांगून आम्ही सर्व तेथून निघून शिरगाववरुन इंदोलीस आलो आणि बरोबर वाटाड्या म्हणून आलेल्या मास्तरांना परत पाठवून दिले. कारण हा भाग माझ्या उत्तम परिचयाचा होता. नंतर कोरिवळ्यास

सर्वांचा मुक्काम होता. पांडू मास्तर वगैरे तेथे होतेच. त्यांत आम्ही मिसळलो. तेथून सर्व चरेगाव खिंडीने तांबव्यास आलो. तेथे विश्रांती खाऊन पुढे पाचुंब्रीस आलो व तेथून पुढे पांडू मास्तर कुरळपकडे गेले व नागनाथ वाळव्याकडे निघून गेला. बुवा म्हावशीकरांना तिकडे राहणे कठीण झाले होते म्हणून ते प्रथम इकडेच राहात असत. बाबूजींचा ग्रुप तयार झाल्यावर त्यात ते राहू लागले. पांडू मास्तर कुरळपला निवृत्तिकाकांच्याकडे राहात असत. मी कुरळपला गेल्यावर प्रथम माझी व त्यांची ओळख काकांनी (निवृत्तिकाका) करुन दिली. मी म्हटले, 'चला तर पाचुंब्रीस.' ते बाबूजींचे गुरुजी-मास्तर. तेव्हा पांडू मास्तर मग माझ्याबरोबर तिकडे निघाले व आम्ही सर्व पाचुंब्रीस आलो. तेथून बुवा व यशवंता गायकवाड असा बाबूजींचा ग्रुप पाटण तालुक्यात म्हावशीच्या वर लुगडेवाडीस गेला व त्या भागात ते तेथे काम करू लागले. मी परत नडशीस आलो. भिकू पाटील हजर झाल्यानंतर आमचे ठाणे नडशीस राहू लागले व माधवराव जाधवांनी आपला ग्रुप तयार केला. त्यात माधवराव, डॉ. काळे, बी.बी. काळे, बाबू नलवडे, बाळ भुरके, खाशाबा टुरिंग, रंगा कुंभार, तुकाराम कोडगुले वगैरे लोक होते. माझा मुक्काम तिथे होता.

इतक्यात कोणी निरोप सांगितला की, तुम्हास भेटण्यास अच्युतरावांच्याकडून मुंबईहून कोणी गृहस्थ आले आहेत. मी म्हटले, 'त्यांना नडशीस घेऊन या.' मग ते नडशीस आले. त्यांना भेटलो. कोण काय याची चौकशी झाली. माझे नाव मी त्यांना सांगितले. भाऊसाहेब नेवाळकर म्हणाले, 'माझे पूर्वीचे गाव चाफळ, पण आम्ही मुंबईसच असतो. अच्युतरावांच्या कानावर काही लोकांनी विरुद्ध बातम्या घातल्या. म्हणून जिल्ह्याची परिस्थिती समक्ष पाहून रिपोर्ट देण्यास त्यानी सांगितले आहे.' मी म्हटले, 'फार चांगली गोष्ट झाली. आम्हालाही आपले मार्गदर्शन होईल. आपण शिराळा पेट्याच्या भागात जाऊ या. तेथे सर्व परिस्थिती पाहता येईल. बाबूराव चरणकर वगैरे लोक भेटतील व नंतर तसेच सर्वत्र फिरुया. पण तुम्ही मुंबईचे लोक, तेव्हा कोल्हापूरहून मोटारने मलकापूरला या. मी मधल्या रस्त्याने जाऊन आमच्या निवासस्थानी येतो.' ते म्हणाले, 'छे, मी तुमच्याबरोबर चालतच येणार.' 'बरं', म्हटलं, 'माझी काही तक्रार नाही. पण तुम्हास त्रास व्हावयास नको म्हणून मी म्हटलं. मला तुमची काहीच अडचण होणार नाही.' नंतर आम्ही दोघे सुपन्या-तांबव्यास गेलो. तो टप्पा लहान असल्यामुळे त्यांना वाटले, विशेष त्रास नाही. रात्री तेथून निघालो ते कुंभारगाव रस्ता जरा ओढ्यातून वगैरे असल्यामुळे व रात्रीची वेळ यामुळे थोडा त्रास झाला. तेव्हा ते म्हणाले, 'रात्रीचा प्रवास नको.' मी म्हटले, 'आता आपण डोंगरात आलो आहोत. रात्रीचा प्रवास करावा लागणार नाही.' बाबूराव चव्हाण यांच्या घरी मुक्काम केला. त्यांनी फारच सुंदर व्यवस्था ठेवली. मोठी मेजवानीच दिली. पाट, केळीची पाने, रांगोळ्या, उदबत्त्या असा थाट केला. हे सर्व पाहून भाऊसाहेब चाटच पडले आणि दिवसा ढवळ्या शेकडो माणसे जमलेली व इथून अवघ्या चारच मैलावर पोलीस ठाणे,

पण काही गडबड नाही, गुप्त नाही. अगदी निर्धास्तपणे जेवणखाण करुन आम्ही पुढे निघालो. प्रवासाची इतकी सवय नाही, आता डोंगराची चढण लागली त्यामुळे ते पार थकून गेले व शेवटी म्हणाले, 'थकलो आता.' मग आम्ही सावकाश प्रवास सुरु केला. आणि गुडयाच्या दरम्यान आल्यावर एक माणूस पळत आला व सांगू लागला, 'पोलीस व फौजदार वर या गावात आलेत, ते याच रस्त्याने येत आहेत. पळा.' काँग्रेसचे फरारी या गावात सहज ओळखले जात. तिकडील शेतकऱ्याना एकंदर राहणीमानावरुन कल्पना येत असे. सुशिक्षित, पांढरपेशा, चळवळीची भाषा, हातात हत्यार दिसले की बहुधा काँग्रेसचाच तो फरारी असावयाचा! मग पोलिस वगैरे दिसले की न सांगता लोक बातम्या देत. पार खालच्या थरापर्यन्त चळवळीची कल्पना पोचली होती. हे फरारी म्हणजे आपले हितचिंतक मग त्यांचे रक्षण करणे आपले काम अशी बुद्धी यांच्यात असल्यामुळे लहान मुलांचाही फराऱ्यांना फार उपयोग होई. पोलीस आल्याची बातमी समजताच बरोबरच्या वाटाड्याने फक्त या दिशेने जा व डोंगरातून लपून छपून जा म्हणून सांगून तो पसार झाला. मग मी भाऊसाहेबांना घेऊन डोंगरातून निघालो. घसार असल्यामुळे पायताण घालता येईना. पायास खडे बोचू लागले. डोंगरातून सोनवड्यात पोलीस असलेलेही दिसत होते. त्यामुळे आरळे किंवा सोनवड्यात न शिरता सरळ वारणा नदी पोहून पलीकडे जाण्याशिवाय मला गत्यंतर नव्हते. म्हणून त्याना मधून मधून धीर देत देत डोंगराच्या पायथ्याशी आलो. ते अगदी थकले व मांडी घालून बसले. 'मला पकडू द्या. तुम्ही जा. मला एक पाऊलसुद्धा चालणे शक्य नाही.' असे म्हणाले. मग त्यांच्याजवळ जरा बसलो. थोडी विश्रांती घेऊ दिली. नंतर अगदी हळूहळू वारणाकाठी येऊन पोचलो. वारणेस पूर आलेला. त्याना नदीतून पोहावयास कसे येणार या विचाराने मी पलीकडे पोहत जाऊन एक मातीची घागर घेऊन आलो व माझ्या खांद्यावर एक हात ठेवून घेऊन पोटाखाली घागर देऊन ती एका हाताने त्यांना धरावयास लावून अलिकडच्या काठास घेऊन आलो. मग माझ्या जीवात जीव आला. नाहीतर मुंबईचे लोक म्हणावयाचे, आमचा माणूस तुम्ही जिल्हयात पकडून दिला! मग म्हटले, 'आता खुशाल बसा, लोळा, काहीही करा. आता मला तुमची काळजी नाही.' पोलीस वारणा ओलांडून सहसा येत नसत. कारण ती हद्द मलकापूर संस्थानची होती. नंतर कुरळुपात देवळात आलो व जाळ करण्यास सांगितले. तसेच खोबरेल तेल व ऊन पाणी करण्यास सांगितले. दुसरा माणूस पाठवून भाऊसाहेब यांना देवळात आणले. चालून त्यांचे पाय सुजले होते. त्याला खोबरेल तेल चोळून त्यावर गरम पाणी घातले. त्यामुळे जरा बरे वाटले. नंतर एक दिवस विश्रांती घेऊन ग्रुप कोठे आहे याची बातमी काढली. तो वर डोंगरात पळसवडे येथे होता, असे समजले. चांगली हुषारी आल्यावर मग पुढे पळसवड्यास गेलो. तेथे सर्व लोक होते. सर्वांना भाऊसाहेब यांची ओळख करुन दिली. हत्यारबंद २५ - ३० लोक, त्या बंदुका, तेथील मोकळे वातावरण असा सर्व देखावा त्यानी पाहिला. त्या दिवशी त्यांना-बाबूरावांना भेटण्यास कोल्हापूरहून वसंतराव

देशपांडे आले होते. त्यांनी करंडचा भरुन मिठाई व फळे आणली होती. अनायासे पाहुण्यांना त्याचीही मेजवानी झाली. लोकांचे प्रेम, सर्वांची सहानुभूति वगैरे सर्व त्यांनी डोळयांनी पाहिले. त्यांचे समाधान झाले. ते अत्यंत खूष झाले व म्हणाले, 'मला रिपोर्ट द्यावयाचा तो देतो. तुम्ही सर्वच जण या विषयातील एकापेक्षा एक सरस असे प्रोफेसर्स आहात. मी काय तुम्हास मार्गदर्शन करणार?' मी म्हटले, 'खाली पूर्व भागाकडे येणार काय?' ते म्हणाले, 'आता जिल्हयात काही विशेष फिरण्याची आवश्यकता वाटत नाही.' 'परत चालत येणार काय?' या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, 'आता नाव काढू नका. मला आता मोटार कुठे जवळ असेल तेथून जाऊ द्या.' मग वसंतराव यांच्याबरोबर त्यांना दिले. ते कोल्हापूरहून मुंबईस रवाना झाले. त्यामुळे अच्युतरावांचा आमच्याबद्दल फार चांगला ग्रह झाला, व आमच्याबद्दलचा आदरही वाढला.

## चाफळ भागातील काम

नंतर तेथून मी परत पाटण तालुक्याकडे गेलो. तेथून वाटाडचा बरोबर घेऊन कालगाव ढेबेवाडीवरुन म्हावशीवरुन लुगडेवाडीस पोचलो. तेथे सर्व व्यवस्थित चालू होते. बोलता बोलता म्हणाले, 'चाफळची ॲक्शन करण्याकरिता जाणार आहोत.' प्रत्येक ग्रुपमध्ये गेल्यावर केलेल्या कामाचा तपशील सांगत व पुढे कोणती कामे करणार व का करावयाची व का केली हे सांगत. तेव्हा चाफळची ॲक्शन का? 'तर विष्णुपंत देशपांडे यांच्या मुलाने पोलीस पार्टी आणली होती; व त्या पार्टीतून तो फिरत असतो. पेंढारकरांनी, शहाण्यांनी खोटचा साक्षी दिल्या आहेत,' असे मला सांगण्यात आले. मी म्हटलं, 'ठीक आहे. शिक्षा दोन प्रकारची असते. एक शारीरिक दंड व एक आर्थिक दंड. आर्थिक दंड हा शारीरिक दंडापेक्षा बरा व खरे खोटे काय ते बघून त्याची पुरती चौकशी करुन मग निकाल द्यावा, कारण चाफळचे वातावरण बरे नाही. तेव्हा विचारपूर्वक काम व्हावे.' तेव्हा ते म्हणाले, 'तुम्ही चला', 'ठीक आहे'. म्हणून त्या दिवशी राहिलो व रात्री सर्वांना बरोबर घेऊन चाफळला आलो.

रात्री ९ चा सुमार असेल. गावात दंगा करू नये असे माझे मत होते; पण ते काहींना पटले नाही. मी म्हटले, 'विष्णुपंत देशपांडयाच्या घरात जातो. तुम्ही बाकीच्या लोकांना घेऊन तेथे या.' मी माझ्या हातातील बंदूक दुसऱ्याजवळ दिली व नुसता सडा गेलो. दरवाजा उघडाच होता. आत शिरलो व आण्णांना नमस्कार केला. दादासाहेब भागवत तेथेच बसले होते. नंतर मी तिथे बसलो. 'घाबरु नका' म्हणून सर्वांना सांगितले. तसेच माझ्या येण्याचे कारणही त्यांना सांगितले. 'या भागातील कार्यकर्त्यांचे मत आपण पोलीसांना मदत करता, खोटे खटले भरता असे आहे, बुवा म्हावशीकर मजजवळच होते. तेव्हा तुमचे म्हणणे काय असेल ते स्वच्छ मांडा, घाबरु नका, पेंढारकर शहाण्यांचीही जरुर आहे असे सांगितले. इतक्यात गावात गेलेले लोक परत आले, व त्यांनी दारावर खूप हाका मारल्या, धक्के दिले, पण कोणीही उठत नाहीत, तेव्हा ते

नाईलाज होऊन परत आले. तेव्हा आण्णा म्हणाले, 'मी मुलगा बरोबर देतो. तुम्ही समक्ष सांगितले तर ते येतील.' मग त्यांच्या मुलास बरोबर घेऊन जाऊन त्यांना उठवले, पण वरुनच बोलत होते. त्यांना सांगितले, 'धोका नाही. मी तुमच्या केसास धक्का लागू देणार नाही.' मग ते माझ्याबरोबर आले. आम्ही सर्वजण बसलो व चर्चेस सुरुवात झाली. विष्णुपंतांचे चिरंजीव पोलीसांबरोबर फिरल्याचे काही शाबित झाले नाही व बाकीच्यानी सांगितले की त्यांनी आमच्यावर खोटया केसेस केल्या म्हणून आम्हीही खोटया साक्षी दिल्या. आमच्या येथे दोन पाटर्या पहिल्यापासून आहेत. त्यांनी लबाडीच्या काही गोष्टी केल्यामुळे आम्हासही काही गोष्टी कराव्या लागल्या. त्यात त्यांना शिक्षा झाल्या. शेवटी बुवांची खात्री पटली की हे सर्व पाटर्यामुळे झाले आहे. तथापि ज्या काही थोडयाबहुत गोष्टी शाबित झाल्या त्यावरुन आण्णा देशपांडे यांना १०००, शहाणे ५००, व जोशी ३०० असे दंड वसूल करुन दोघांची दिलजमाई करुन आनंदाने तो कार्यक्रम संपवला. ते 'आता तुम्ही जेवून जा' म्हणाले, पण मीच नको म्हणालो. गाव चमत्कारिक, तुमच्या वाईटावर आहे. तेव्हा तेच पोलीस ठाण्यावर वर्दी देऊन छापा आणतील व तुमच्यावर घालतील. पोलीस ठाणे अगदी नजीक आहे, तेव्हा त्यांना ते पटले. ३०-४० माणसांचे अन्न बरोबर दिले व आम्ही सर्व जण आनंदाने परत निघालो.

## सातारा जिल्हा राष्ट्रीय संघ

या वेळी जिल्हयात पोलीस फोर्स फारच वाढला म्हणून आम्ही मुंबईस गेलो. हल्ली कित्येक वेळा सर्व लोकांना बाहेर जावे लागत असल्यामुळे प्रवास म्हटला की खर्च आलाच. म्हणून लोक पैसे मागू लागले. वरुन पैसेही येईनात व जिल्हयातील खर्च वाढले म्हणून डोक्यात कल्पना आली की मुंबईस ऑफिस उघडावे. मुंबईत सातारा जिल्हयातील बरेच लोक आहेत. शिवाय धनिक व दानशूर लोक आहेत. यांच्यामार्फत पैसा जमा करुन जिल्हयात पाठवावा. अच्युतरावांना १-२ वेळा पैसे मागितले. त्यांनी सांगितले, जे लोक पूर्वी मला लाखो रुपये न्या म्हणत होते ते आता देत नाहीत व ज्यांनी पैसे देण्याची अभिवचने दिली होती तेही आता देत नाहीत. त्यामुळे जर चळवळ चालावयाची तर ती स्वतःच्या पायावर उभे राहून चालवली पाहिजे. त्यांची गोष्ट खरी होती. नंतर आम्हाला ही कल्पना आली व साताऱ्याच्या माणसाकडून महिन्यात एक रुपया घ्यावयाचा व मुंबईतील संघटना उभी करावयाची. याप्रमाणे मुंबईस मिटिंग घेऊन त्यात ठरले. किसन वीर व जोशी काका मुंबईचे माहीतगार होते. म्हणून त्या दोघांना तेथे ठेवले व बापूराव जगताप, भाऊसाहेब नेवाळकर वगैरे माणसे तेथे काम करु लागली. खूप पैसा निर्माण होऊ लागला. या संघटनेचे जवळजवळ एक लाख मेंबर झाले. निरनिराळया विभागात त्यांची ऑफिसे खोलली व मुंबईत नवचैतन्य निर्माण झाले. त्यामुळे साताऱ्यात प्रेशर आले की, मुंबईस पळता येई. मुंबई ही अशी आहे की

खरोखरीच समुद्र! तिच्या पोटात काहीही खपते. त्याप्रमाणे इतके फरारी मुंबईत आले तरी सर्व गडप होत. हे ऑफिस पुढे मुंबईच्या राजकारणात भाग घेऊ लागले व स.का. पाटील यास विरोध करु लागले. तो किती वस्ताद माणूस. त्याने या संघटनेच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवून दिल्या व नेवाळकर व जगताप यांच्यात मतभेद होऊन शेवटी ती संघटना खलास झाली. त्याचे रुपांतर मजूर संघटनेत होऊन ती कम्युनिस्टांच्या ताब्यात गेली! पण चळवळीत हिचा फार मोठा उपयोग झाला एवढे मात्र खास.

## गव्हर्नरला बॉम्बने उडविण्याचा प्रयत्न

मुंबईहून मी परत कोरेगावला आलो. तेव्हा आम्ही रेल्वेगाडी पाडण्यासाठी १-२ वेळा प्रयत्न केले. कोरेगावशेजारीही आदर्कीच्या घाटात एकवेळ प्रयत्न केला, पण ते जमले नाही. पण त्या दिवशी आमची चाहूल लागल्यामुळे सर्व गाड्या रात्रभर थांबून राहिल्या. त्यामुळे आम्हास निराश होऊन परत यावे लागले. डी.जी. देशपांडे आले व म्हणू लागले की, साताऱ्यास गव्हर्नर येणार आहे व तो बहादूर कारखान्यास (सातारा रोडच्या) भेट देणार आहे. तेव्हा त्याच्या गाडीखाली बॉम्ब ठेवून ती उडविण्याची कल्पना निघाली व ते काम करायचे ठरले. त्याप्रमाणे कऱ्हाडहून बॉम्ब व मोटारचे टायर फुटण्याच्या टिकल्या डी.जी. नी ताबडतोब आणल्या आणि मी, डी.जी. व पांडुरंग बोराटे असे तिघे जरंड्याच्या बाजूने डोंगराकडेने रात्री दोन अडीच वाजण्याच्या सुमारास रस्त्यावर आलो व रस्ता उकरुन तो बॉम्ब पुरुन त्याची पिन वर काढून ती ओळखू नये व उकरले असे दिसू नये असे करुन परत निघालो; कारण जर गव्हर्नरची गाडी उडाली तर आसपासच्या भागातून दुसरीकडे जाणे अशक्य होते. म्हणून आम्ही तिघे परत कोरेगांवच्या बाजूला परत निघालो. रात्रभर जागरण व श्रम यांमुळे अतिशय भूक लागली होती. वाटेत ओढा लागला. शौच, मुखमार्जन, स्नान आटोपले. पांडुरंगजवळ चतकोर भाकरी होती. त्याची नेहमी खोड भाकर खिशात ठेवायची. ती तिघानी आवडीने खाल्ली, पाणी प्यालो व काय रिपोर्ट येतो याची वाट बघत बसलो. ठराविक वेळी गव्हर्नरच्या गाडीआधी डी.आय.जी. ची व इतर पोलीस गाड्या आल्या. सुदैवाने डी.आय.जी. च्या गाडीचा टायर उडाला. मग सर्व गाड्या उभ्या राहिल्या व सर्व रस्ता उकरुन तपासला. बॉम्ब सापडला. तो जिवंत बॉम्ब पाण्यात ठेवून तपासणीसाठी पाठवून दिल्याचे नंतर समजले. तो भयंकर असल्याचा रिपोर्ट आला. गव्हर्नरची कारखान्याची भेट रद्द झाली. बाकीच्या ठिकाणी जेथे जेथे गव्हर्नर जाणार होता ते सर्व रस्ते पोलीस अधिकारी व इंजिनिअर्स यानी तपासले व मग सर्व कार्यक्रम झाले. बॉम्बची बातमी गुप्त ठेवण्यात आली. कोरेगावच्या बोकील बंधूना डी.जी. बोलले होते. त्यामुळे त्यानी 'काळ' वर्तमानपत्रात ती बातमी दिली. बातमी प्रसिद्ध झाल्याबरोबर पोलीस अधिकाऱ्यांनी 'काळ'च्या संपादकाना ही बातमी कोठून आली म्हणून जामले. तेव्हा त्यांनी कोरेगांवच्या बोकिलांकडून ती बातमी आल्याचे सांगितले. ताबडतोब त्या

दोघाना अटक करुन सातारला आणून ठोकले व 'हे कोणी केले? तुम्हास कसे कळले?' म्हणून विचारता 'हे धन्वंतरीनी केले व त्यांनीच आम्हास सांगितले' असे त्यांनी सांगितले. मग त्यांना डेटेन्यू म्हणून येरवडयास रवाना केले. ते सहा महिने तुरुंगात होते. आम्हास फक्त सातारा जिल्हयातून गव्हर्नरला दिमाखाने जाऊ द्यावयाचे नव्हते. तेवढे आमचे काम संपूर्ण यशस्वी झाल्याने आम्हास समाधान वाटले.

## गारवडे व चाफळची प्रकरणे

पांडू मास्तरांना पाचुंब्रीस आणून ठेवल्यानंतर बाबूजी वगैरे सर्व ग्रुप तेथे होता. तांबव्याची माणसे आली, मग बुवा म्हावशीकर बाबुजींचा ग्रुप व मी तांबव्यास गेलो. तांबव्याच्या वरच्या वाडीत राहात होतो. तेव्हा डी.जी. पाटील, तांबवेकर म्हणाले, 'गारवडयाच्या मांगांनी अत्याचाराचा अगदी कहर केला आहे. सर्व भागातील उत्तम उत्तम बैल नेतात. त्याचे पाय उलटे करुन तोंड बंद करुन डोंगरात उपाशी ठेवतात. मालकाने पैसे दिले तर बरे, नाहीतर कापून खातात. नुकतीच त्यांनी सुमारे २०००/- रुपयांची बैलजोडी नेऊन कापून खाल्ली! त्या गरीब शेतकऱ्याचे घर पार उठले. शिवाय चोऱ्या, रानातील पिके कापून आणणे वगैरे अत्याचार सारखे सुरु असतात.' मग गारवडयाची ॲक्शन करावयाचे ठरले. त्याप्रमाणे आम्ही ५० जण रात्री १२ च्या सुमारास तेथे पोचलो व सर्व मांगांना धरले. त्यापैकी काहीना शिक्षा केल्या. पण माणसे फार, कामात एकसूत्रीपणा नाही. योजकता नाही. त्यामुळे दिसेल त्यानी त्याला बडवले. सर्व घरे पेटवून दिली. त्यात चार जण ठार झाले. गुन्हयापेक्षा शिक्षा फार झाली यात शंका नाही.

आम्ही परत पुन्हा तांबव्यास आलो. तो चाफळचे चंद्रहार सरेकरची चिठ्ठी घेऊन एक मनुष्य पांडू मास्तरांकडे आला. त्यात लिहिले होते: चाफळला धन्वंतरीनी येऊन पक्षपात केला. ते ब्राह्मण म्हणून इथल्या मंडळीना सोडून दिले. हे काही बरोबर झाले नाही. सर्व गावात त्यांनी पुन्हा धुमाकूळ घातला आहे. पांडुरंगानी मला चिठ्ठी दाखवली. मी सांगितले, 'ही गोष्ट साफ खोटी आहे. बुवा म्हावशीकर माझ्याबरोबरच होते. त्यांना विचारा. हे लोक लबाड आहेत. यांच्यावर विश्वास ठेवून माझ्याकडे अविश्वासाने पाहू नका.' पण पांडू मास्तर यांचा स्वभाव अत्यंत लहरी, भावनाप्रधान, विचारांचा पोच नाही, चंचल. त्यामुळे त्यांचे माझे कधीच जमत नसे. मी स्पष्ट सांगितले, 'तुम्ही पुन्हा पाहिजे असेल तर जा व खरे खोटे पहा. मी तुमच्याबरोबर मुळीच येणार नाही. माझा निकाल योग्य आहे.' ते चाफळला गेले. गावातील सर्व लोक जमले. पांडू मास्तरांनी आश्वासन दिले म्हणून लोक जमले व चौकशी करता मी दिलेला निकाल योग्य ठरला. पण तेवढयात चंद्रहार सरेकरच्या माणसाने शहाण्यांच्या थोबाडीत मारली! लोक ताबडतोब घरी निघून गेले. पांडू मास्तर यांनी न्याय मान्य केला. सर्वांनी 'चुकले' असे म्हटले. पण ते लोक शेफारले. पांडू मास्तर परत आले. नंतर

आठ दिवसानी मनुष्य आला. 'आम्हा सर्व ब्राह्मणांवर त्यांनी बहिष्कार पुकारला आहे.' असा निरोप आला. पांडू मास्तरांनी चिठ्ठ्या दिल्या, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. जनावरे उपाशी मरत आहेत. गावात सामान मिळत नाही. बायकाना घराबाहेर पडणे मुष्किल झाले आहे, असे निरोप सारखे येऊ लागले. पांडू मास्तर बेचैन झाले व त्यांनी उपास सुरु केला. 'बहिष्कार उठवा, व ताबडतोब भेटावयास या' असे कळवून उपास सुरु केल्याचे त्यांनी सांगितले होते. तरी त्यांनी बहिष्कार उठवला नाही व भेटावयासही आले नाहीत. मी तेथेच होतो. पण पांडू मास्तरांना भेटावयास जात नव्हतो. मग त्यांनी मला बोलावून घेतले व सर्व केविलवाणी परिस्थिती सांगितली. 'पुढे काय करावे' म्हणून विचारले. मी त्यांना खूप बोललो व 'चुकीच्या मार्गांनी भावनाप्रधान बनून जाता व काहीही करता. आता तुम्ही उपास सोडा. या मूर्खांचे लाड नकोत. तुम्ही स्वस्थ असा. मी जाऊन त्यांना गोळ्या घालतो व कसे भेटावयास येत नाहीत ते पाहातो.' मग त्यांनी चिठी दिली. 'जर ताबडतोब बहिष्कार उठवला गेला नाही व भेटावयास कोणी आले नाही तर माझी माणसे येऊन गोळ्या घालतील व मुसक्या बांधून इथे आणतील. त्याची जबाबदारी माझ्यावर नाही.' असे कळल्यावर त्यांनी बहिष्कार उठवला व झाल्या प्रकाराबद्दल माफी मागितली. ते प्रकरण संपले. नंतर आम्ही सर्व पाचुंब्रीस आलो. पुन्हा मी पूर्व भागाकडे गेलो. तिथे नागनाथकडे वाळव्यास मळ्यात गेलो. त्यांचा बेत येड्याच्या पाटलास शिक्षा करायचा होता. आप्पा पाटील, नागनाथ, मी, जी.डी. आणखी १५ -२० माणसे घेऊन येड्यास जाऊन त्याला ताकीद देऊन त्यास ३०० रु. दंड केला व तो लागलीच वसूल करुन आम्ही सर्व परत आलो.

## बॉंबचे प्रयोग

किर्लोस्करवाडीशी संबंध पहिल्या प्रथम आला. सदुभाऊंनी (पेंढारकर) मराठे यांना बोलावून घेतले व सदुभाऊ, मी, मराठे व भोरे चौघेजण रेल्वे पाडण्याकरिता गेलो. कराड-मसूरच्या दरम्यान डोंगरात बसलो. किर्लोस्करवाडीतून क्लँप्स् करुन आणले होते. ते रुळावर बसवले व गाडी येण्याची वाट पाहात बसलो. गाडी आली. गाडीच्या दणक्याने क्लँप्स् उडून गेले व गाडी निघून गेली. प्रयत्न फसला. मग मोठे क्लँपस् करण्यासाठी गाडीचे कणे पाहिजेत म्हणून कराडच्या शुक्रवार पेठेतील भांड्याच्या कारखान्यातील चांगला कणा तो माधवरावांनी व मी रात्री उचलून आणला. पण त्यांना दुसऱ्या दिवशी कणे मिळाल्यामुळे नको म्हणून आम्हास सांगितले. मग तो पोलिसांचा पहारा चुकवीत, पुन्हा पहिल्या जागी नेऊन टाकला. दुसऱ्यांदा मराठे, माधव, मी व भोरे कोपर्ड्याच्या हद्दीत गेलो. तेथे गाडी थांबली, पण पडू शकली नाही. गोंधळ झाला, पण मोठेसे नुकसानही झाले नाही. खडकीच्या दारुगोळ्याच्या कारखान्यातून बरेचसे बॉम्ब व स्फोटक सामान आणले होते. त्यापैकी ती स्फोटक वस्तू घेऊन डी.जी. देशपांडे व मी कासेगावचा पूल उडविण्यासाठी म्हणून आलो. ते पुरले व त्याला बत्तीही लावली.

आवाज झाला. पुलास डबरा पडला, पण फार मोठे नुकसान झाले नाही. पुन्हा प्रयोग करण्यासाठी म्हणून सुर्लीच्या घाटात पुलावर बाँब उडवले. तेथे सुद्धा फार मोठे नुकसान होऊ शकले नाही. तिथेही नुसताच डबरा पडला. बॉम्ब तयार करण्यासाठी म्हणून पोटॅश क्लोराईड, ग्लिसरीन व गन पावडर असे पदार्थ जमा करुन बॉम्ब तयार केले, पण मोठ्या आवाजापेक्षा आम्हास त्यात कधीच यश आले नाही. आण्णासाहेब पंत, डी.जी. व मी पुष्कळ प्रयोग केले. बाळ दिवाण यांचे हातही भाजले. पण बॉम्बने खूप लोक मरण्याची किंवा त्याच्या दणक्याने काही उडवून द्यावयाच्या कल्पनेत आम्ही यशस्वी होऊ शकलो नाही. पोलीसांची धावपळ व लोकात कुतूहल या बाबतीत तेवढे यश येई. एकदा सदुभाऊ पेंढारकर, शांताराम इनामदार, मी व यशवंतराव चव्हाण असे रेल्वे पाडण्यास कराड स्टेशनपलीकडे गेलो. बरोबर रॉकेल नेले नव्हते. त्यामुळे बोल्टसुद्धा निघाले नाहीत. सर्वच गरगर फिरू लागले. त्यामुळे सर्व घरी परतलो.

## शिरवडे व सदूभाऊ

शिरवडा केसमधील ज्या दोन बंदुका कराडच्या मुलाना दिल्या होत्या, त्या त्यांनी दुसऱ्या दिवशी आणून सदूभाऊंच्याकडे दिल्या. सदूभाऊंनी मला संध्याकाळी बोलावून घेतले व आम्ही त्या पॅकिंग करुन दोघांनी घराच्या भिंतीच्या बाहेरल्या बाजूस खुणेने पुरल्या व जर कोणी दोघांपैकी एक पकडले गेले, तर तेथून त्या हलवून दुसरीकडे ठेवावयाच्या असे ठरले. पुढे ८-१५ दिवसात दोघांनाही फरारी व्हावे लागले. मी बेळगावहून परत आलो तेव्हा सदुभाऊ पकडल्याचे समजले. मग लगेच मी किवळहून करवाडीस आलो. डी.जी. नी व मी त्या बंदुका न्यावयाचे ठरवले. सदूभाऊच्या घराभोवती कडक पहारा होता. तेव्हा शांताराम इनामदार यांचा निरोप आला की त्या हालवू नका. मग डी.जीं. चे म्हणणे पडले; दोन सापडल्या काय किंवा चार सापडल्या काय सारखेच. तेव्हा व्यर्थ संकटात सापडणे बरे नव्हे. सदूभाऊंची बहीण त्यांना भेटावयास गेली की ते विचारीत, 'काम झाले का?' त्याचा उद्देश मी ती हत्यारे काढून न्यावीत व मग अधिकाऱ्यांना फसवावे. इंदूने (सदूभाऊची बहीण) माझ्याकडे काही निरोप कळवला नाही. निरोप आहे एवढे कळते तर केवढेही धाडस करुन काम केले असते. शेवटी शांतारामने काम झाले म्हणून सांग असे तिला सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी आपल्या बहिणीस विचारता 'काम झाले' म्हणून सांगितले व टाळी वाजवून अधिकाऱ्यांना सांगितले. "चला, बंदुकीची जागा दाखवतो". आणि त्यांना बरोबर घेऊन आले. खणले तर दोन बंदुकी निघाल्या. सदुभाऊंना अतिशय वाईट वाटले. नंतर आम्हास सर्व कळले. आम्हासही अतिशय वाईट वाटले व त्या बंदुकी त्यांच्याजवळ सापडल्याने त्याना सहासहा वर्षे शिक्षा झाली. पुढे जेलमध्येच त्यांना जलोदराचा विकार झाल्यामुळे आम्ही एका मोठ्या क्रांतिकारकास मुकलो. शेवटपर्यंत ते माझी आठवण काढीत होते म्हणतात! आमच्या मूर्खपणामुळे आम्ही एक फार मोठा माणूस घालवला

असे वाटले. त्यांच्यासारखा धाडसी माणूस क्वचितच सापडेल. एकदा ते व मी रेल्वे पाडण्याच्या हेतूने पाहणी करण्यासाठी म्हणून सायकल वरुन मसूरच्या पुढे हेळगाव माळावर आलो व सायकली एका ओघळीत ठेवून खाली रुळावरुन फिरू लागलो, व तेथील मोठ्या पुलावर आलो. खालीवर न्याहाळले. आसपास कोणी नाही याची खात्री केली होती. पण पार दूरवर कराडचे मुख्य सर्कल बरोबर पाटील, तलाठी, महार व रामोशी सोबत जमिनीच्या हद्दी पहात होते. त्यांना आमचा संशय आला. लागलीच त्यांनी चार महार, दोन रामोशी पाठवून दिले. आम्हास बोलावून घेतले. आम्ही जवळ गेलो. 'काय चालले आहे?' असे त्यांनी विचारले. 'नाही काही नाही' म्हणून सांगितले. ते म्हणाले, 'मी तुम्हाला लांबून पाहिले आहे. खरे सांगा. तुम्ही ओघळीत सायकली ठेवून पुलावरुन फिरत आहात. पुलाजवळ गेलात तेव्हा मला तुमचा संशय येतो. तेव्हा नावे सांगा.' सदुभाऊ म्हणाले, 'नावे सांगत नाही.' तो अगदी अधिकार वाणीने बोलू लागला. मी सारखे दोघांना समजावत होतो. तो म्हणाला, 'अटक करीन.' सदुभाऊ लाल झाले. त्यांनी खिशात हात घातला. मी ताबडतोब त्यांच्या हातावर हात ठेवला व नावे, पत्ते सांगितले व आम्ही परत निघालो. वाटेत त्यांना विचारले, 'इतके रागावला होता व खिशात हात घातला, काय विचार होता?' ते म्हणाले, 'गोळी घालणार होतो.' मी म्हटले, 'ते खरं. तुम्हाला काही नाही. एक खून काय आणि शंभर खून काय सारखेच. पुण्याचे पहिले वॉरंट आहेच. पण माझा विचार केला नाहीत. मला आताच फरारी व्हावे लागले असते.' 'मग त्यात काय बिघडले असते.' 'पण काही काम करुन फरारी होऊ द्या. उगाचच फरारी होणे म्हणजे वेडेपणा नाही का?' अर्थात शांत झाल्यावर त्यांना ते पटले. मी घरी आल्याबरोबर मघाचे लोक कोणाचे पाहुणे होते हे हुडकून काढले. ताबडतोब चिठ्ठी लिहून 'हे लोक सभ्य आहेत. माझ्या माहितीचे आहेत. तेव्हा केस भरु नये किंवा वर कळवू नये.' असा निरोप दिला. दिवस उगवताच वर वोडोलीत गाठलेसुद्धा! अगदी गोड बोलून सदूभाऊना 'मूर्ख' म्हणून प्रकरण कसे तरी संपवले व नावे लिहून घेतलेला कागद समक्ष फाडून जाळून टाकला. मन शांत झाले व आमचा उद्योग यथापूर्व चालू झाला. ते गंडांतर टळले.

शिरोडा केस सुरु झाली. पोलिसानी सदुभाऊंच्या स्नेहयांच्याच (शंकरराव बेलापुरे इ.) साक्षी काढावयाचे ठरवले. मग त्यांना निरोप लावून दिले की जर साक्षी द्याल तर कसलाही विचार न करता देहान्त प्रायश्चित्त देऊ. कारण त्या खटल्यात बहुतेकांना फाशी अगर काळे पाणी होईल अशी आमची समजूत होती. ही केस चालविण्याकरता जे जज्ज होते ते आमच्या वडिलांच्या ओळखीचे होते व ते कासेगावी रामनवमीच्या उत्सवात आले होते. त्यांनीहून विषय काढला की तुमच्या मुलाला हजर होण्यास सांगा मी त्याला केसमधून निर्दोष सोडतो. वडिलांच्याकडून डी.जी. मार्फत निरोप आला. मी सांगितले, 'माझी मनःप्रवृत्ती आधी तशी नाही. मला तसे करावेसे वाटत नाही. एक मरण्याशिवाय आमच्यापुढे आता दुसरे ध्येय नाही व त्या जज्जाना माहीत नाही की

मजवर शंभर केसीस आहेत. एका केसमधून ते बिचारे मला मोकळे करतील, पण शेकडो केसेस मध्ये ते काय करणार? त्यांच्या सदिच्छेबद्दल त्यांचे आभार मानले. त्यांचासुद्धा नाईलाज झाला. त्या दृष्टीने त्यांनी केस सर्वस्वी सोडली म्हणावयास हरकत नाही. मुद्देमाल सापडला म्हणूनच दोघाना शिक्षा झाली.

## भटकंतीतील अनुभव

नेहमी सर्व जिल्हाभर पायी प्रवास करावा लागल्यामुळे संकटे फार ओढवत. पण ईशकृपेने त्यांच्यातून पार पडत असे. एकदा कामेरीहून किवळला जात होतो. वाटेत नांदलापूरच्या पुढे वालावलकर (पोलीस ऑफिसर) यांचा टांगा आला. पुढे पोलीस सायकलवरुन चालला होता. माझा वेष नेहमीचा; म्हणजे पंजीवर दोन खिशांची पैरण व वर तांबडा पटका. वर दुसरे धोतर टाकलेले. पोलीस पाहिल्यावर मी चपापलो. मागे वळून पाहिले तर वालावलकर. काही इलाज नव्हता. दिवसा किती वेषांतर केले तरी डोळ्याना डोळा भिडवला की माणूस तेव्हाच ओळखला जातो. रात्री वेषांतराचा चांगला उपयोग होतो. मग ताबडतोब लक्षात आले हा अतिशय उंडगा आहे. शेजारुन एक तरुण देखणी मुलगी चालली होती. तिच्या मागोमाग तिच्या लक्षात न येता चालू लागलो. तो सारखा त्या मुलीकडे पाहात दूरवर गेला. माझे लक्ष होते तो कोणीकडे पाहातो आहे याकडे. मी अगदी त्याच्या दाढेतून सुटलो. मन शांत झाले. एकदा पाटण तालुक्यांतील पापर्डे गावाहून बाबूरावांच्या ग्रुपकडे आरळे-शित्तूरला येण्यास निघालो. बरोबर धावडयाचा महादा होता. त्या ग्रुपला देण्यासाठी खिशात तीनशे रुपये होते. बोलत बोलत डोंगरामागून डोंगर पालथे घालीत होतो. नाईकबाच्या जानुगडयाच्या वाडीनजीक रस्त्याने चाललो होतो. इतक्यात एक मांग पळत आला व निघाला ढेबेवाडीकडे. का पळतोस म्हणून मी विचारले. तो म्हणाला, 'छापा टाकलाय व ढेबेवाडीत २-३ मोटारी व थोरले भाऊसाहेब साहेब आहेत त्यांना बोलवावयास निघालो आहे. भोवती पाहिले तर पोलिसांनी सर्व वेढलेले व आपण वेढ्यात सापडलो याची खात्री झाली. लगेच एकमेकानी विचार ठरवला. बैल घेण्यासाठी काळगावात जातो म्हणावयाचे; कारण खिशात रक्कम होती. फारशी घाई न दाखवता झपाटयाने चाललो. ढेबेवाडीच्या पटांगणात दोनतीन मोटारी उभ्या होत्या. व दोनचार फौजदार व २५ -३० पोलीस होते. त्या माणसाने निरोप सांगताच सर्व गडबडीने मोटार स्टार्ट करून निघण्याच्या गडबडीस लागले. तेवढयात आम्ही पुढे चाललो होतो. तेथील पार्टीस ते सांगत होते: कोणाला सोडू नको. रस्ते रोखून धरा. एखादा पळून जाण्याचा प्रयत्न करील. आम्ही हे सर्व ऐकत होतो. महादास सांगितले, 'मागे बघू नको. नाहीतर घात करशील.' कारण मागे पुढे बघत चालले की तेव्हाच त्यांना संशय येऊन तेथल्या तेथे बसवतील. त्यांच्या नजरेआड होईपर्यन्त सावकाश चालत होतो. नंतर गडबडीने चालून दुसरा आडरस्ता धरला. कारण एखाद्या वेळी या रस्त्याने सुद्धा ते येतील. बरेच

दूर गेल्यावर मन शांत झाले व या अरिष्टातून वाचलो!

जिल्हयाची गटवार विभागणी : या वेळपर्यन्त जिल्हयातून निरनिराळ्या ग्रुपची खूपच कामे झाली होती. धुळ्याचा खजिना, नांद्रयाची गाडी पाडणे अशी मोठी कामे झाली होती व सर्व जिल्हाभर प्रतिसरकार निर्माण झाले होते. निरनिराळे ग्रुप्स अलिखित हद्दी ठरल्याप्रमाणे कामे करीत होते; पण सरहद्दीच्या गावात एखाद्यावेळी घोटाळा निर्माण होण्याचा संभव असे. एकदा वाठारच्या एका डाक्यात शिक्षा करण्यासाठी वाटेगावचे लोक गेले व तिकडून किसन मास्तर गोंदीकर वगैरे लोक आले. त्यांना वाटले हे पोलीस आहेत, व एकमेकांत गोळीबार सुरु झाला. सुदैवाने कोणी दगावले नाही व मग दोन दिवसानी दोघांनाही कळले! त्यासाठी व इतर कामासाठी म्हणून आरळ्याच्या वरच्या वाडीवर मिटिंग घेतली. तेथे किसन वीर, पांडुरंग बोराटे, बापूराव कचरे, माधवराव जाधव, बाबूजी पाटणकर, नाथाजी लाड, जी.डी. लाड, नागनाथ, वस्ताद, बाबू पाचुंब्रीकर वगैरे पन्नास-साठ माणसे हजर होती. डी.जी. देशपांडे, बाबूराव घोरपडेही हजर होते. नंतर सर्व प्रश्नांवर चर्चा झाली. शेवटी मी सांगितले कोणी कोणत्याही भागात काम करावयाचे यामुळे कामाच्या जबाबदारीचा प्रश्न निर्माण होत आहे, तेव्हा कोणी कुठे काम करावयाचे याच्या हद्दी ठरवाव्या. नंतर सर्वानुमते मग ग्रुप्स व त्यांच्या हद्दी पुढीलप्रमाणे ठरवल्या : उत्तर भाग किसन वीर; कोरेगांव पांडुरंग बोराटे; बुध्रभाग बापूराव कचरे, कराड ते साताऱ्यापर्यन्त उत्तर भाग माधवराव जाधव, शिराळा पेटा व वाटेगांव भाग बाबूजी पाटणकर ग्रुप; कुरळूप भाग निवृत्ति काका; पूर्व भाग नाथाजी लाड याप्रमाणे विभाग वाटण्यात आले व एकमेकांच्या कोणाच्या हद्दीत काम अगर न्यायदान करावयाचे नाही असे ठरले. एखाद्या कार्यकर्त्याला जरुरीप्रमाणे तो ज्या भागाचा नाही त्या भागात जाण्याच प्रसंग आला तर त्या विभागाच्या मुख्यास घेऊन जावयाचे. पुढील वर्षीसाठी डिक्टेटर कोण? हा प्रश्न चर्चेस आला. डी.जी. लाड यानी नाना पाटील हे कायमचे डिक्टेटर समजून त्यांचे सेक्रेटरी म्हणून इतरानी काम पहावे अशी सूचना आणली. ती सर्वांनी हाणून पाडली. त्यावर खूप चर्चा झाली. किसन वीर यांनी डिक्टेटर म्हणून काम पहावे अशी सूचना बाबूजी पाटणकर यांनी आणली व ती सर्वांनी मंजूर केली. त्या दिवसापासून किसन वीर डिक्टेटर झाले व प्रत्येक ग्रुपने त्यांना दरमहा मासिक रिपोर्ट पाठवावा असेही ठरले. त्यात कोणी कोणती कामे केली, का केली वगैरे सर्व खुलासा असावा. डी.जी. देशपांडे व मी यांची हिशेब तपासणीसाठी कमेटी नेमण्यात आली. पुढील कामांची दिशा ठरून मिटिंग संपली व सर्व मंडळी आपापल्या भागात परत गेली.

## अनंता मुतालिकाला पत्री!

इतक्यात मला कोणी येऊन सांगितले की अनंता मुतालिक चरणकर आले आहेत व ते आरळ्यात आहेत. मी ताबडतोब निरोप दिला. 'त्यांना अडकवून ठेवा. कुठल्याही

परिस्थितीत सोडू नका. आम्ही संध्याकाळी खाली येतो.' नंतर सर्व माणसे घालवली व बाबूजी वगैरे आम्ही सर्व शितूरला आलो व त्यांना सकाळी शितूरला पाठवून देण्यास सांगितले. सुमारे सहा महिन्यांपूर्वी साळशिरब्यांस बाबूजीचा ग्रुप गेला होता. बरोबर पारिस काका, बर्डे वगैरेही लोक होते. साळशिरब्याहून टाकगावला लोक गेले. तेथे एका गरीब शेतकऱ्याविषयी पंचायत चालली होती. इतक्यात गिजरे नावाचा माणूस तेथे आला व म्हणू लागला, 'माझी तिराईती तोडा'. ते म्हणाले 'तुम्ही शहाणे शिक्षित; आम्ही कशी पंचायत तोडणार? तुम्ही कोर्टात जाऊनच आपला निकाल करुन घ्या.' तो म्हणाला, 'तसे कसे? इतके निकाल तोडता आहात आणि माझा काय अवघड आहे?' तेव्हा अतिशय आग्रह केल्यावर सर्व माणसे तयार झाली. मग म्हणाला, 'चला आमच्या घरी.' म्हणून सर्वांना घेऊन घरी गेला. चहा करतो बसा, दूध सामान आणतो म्हणून बाहेर गेला. बराच वेळ झाला तरी त्याचा पत्ता नाही तेव्हा त्याना शंका येऊ लागली व तेथे बसणे धोक्याचे वाटून त्यांनी ती जागा सोडली व दुसरीकडे नजीक रानात जाऊन झाडाखाली बसले. सुमारे अर्ध्या तासाने मोटारीचा हॉर्न वाजला व पार्टी आल्याची खात्री झाली. सावधपणाने सर्व पाहू लागले, तेव्हा तो पार्टीस सांगत होता, 'आताच इथे होते कुठे गेले कुणास ठाऊक?' फौजदार म्हणत होता, 'मर लेका आता.' असे म्हणून पार्टी चावडीत निघून गेली. त्यांनी ताबडतोब घरी शिरून गिजऱ्यास पकडले व त्याला बाहेर रानात काढून विचारले, 'काय काय ते सर्व खरे सांग,' तो नेहमी चोऱ्या करीत असे. त्याला वाटले, आपल्या चोऱ्या आम्हाला सर्व कळल्यात म्हणून म्हणाला देवळातील सर्व घाट्या मी नेल्या नाहीत. 'बाबूराव चरणकरांच्या दागिन्यांच्या चोरीत माझ्या वाटणीस फार आले नाही.' 'ते नको, पार्टीची हकिकत सांग', म्हणून सांगितले. मग त्याने 'सविस्तर सांगतो मारु नका'. त्याला पत्र्या लावीत होते म्हणून सांगितले. मग एकाने कोरा ताव घेतला व लिहिण्यास सुरुवात केली. तुझा जबाब घेतो आहोत म्हणून सांगितले. नंतर त्याने सांगण्यास सुरुवात केली. 'मी कराडच्या गिजरे नावाच्या ब्राह्मणाचा मुलगा. माझे येथे शेत आहे. म्हणून मी येथे येत असतो. तुम्हास पकडून द्यावे या हेतूने मी तुम्हास घरी बसवून व माझी तिऱ्हाईती तोडावयाची आहे असे ढोंग करुन मी कराडला पोलीस ठाण्यावर सायकलने गेलो व फौजदारास सांगितले की काँग्रेसच्या २५ फराऱ्यांची टोळी आली आहे व तिला पकडून देतो. तसेच त्या फराऱ्यांना मी घरी बसवून इकडे आलो आहे म्हणून ताबडतोब चला असे त्यांना सांगितले. तो फौजदार म्हणाला, 'का मरायला आला आहेस, मुकाट्याने घरी जा.' 'ते इतका वेळ तिथे बसणार आहेत का?' म्हणून तो मला हाकलून देऊ लागला. मी सांगितले, 'जर तुम्ही येणार नसाल तर मी साताऱ्यास तार देईन.' मग तो ताबडतोब उठला व पार्टीसहित येथे आला. तुम्ही घरात नाही असे पाहिल्यावर माझ्यावर खूप रागावला व त्याने मला शिव्या दिल्या. मी अतिशय गयावया करु लागलो तेव्हा त्याने माझ्या संरक्षणासाठी चार पोलीस चावडीत ठेवले व बाकीचे सर्व परत कराडला गेले.' 'घाट्यांच्या चोरीची खरी हकिकत

सांग' असे म्हणताच तो ती हकिकत सांगायला लागला. 'कोकणात देवाची भक्ती मोठी असते व प्रत्येक गावी डोंगरातही देऊळ असते व प्रत्येक देवळात ५-२५ घाट्या असतात, व त्या सर्व घाट्या पोत्यात भरुन आणून कराडला कासारांच्या दुकानात नेऊन नेहमी घालतो. याला एक कराडचाही साथीदार आहे. अनंता मुतालिकही त्यात असतो व हा धंदा करतो. 'बाबूरावांच्या चोरीची हकिकत काय?' विचारता तो म्हणाला, 'अनंता मुतालिक हा त्यांच्या घरात नेहमी येणारा जाणारा व माहीतगार माणूस आहे. बाबूराव (चरणकर) फरारी म्हणून जाहीर झाल्यावर घरची सर्व माणसे कराडला पोचवण्यात आली व घर मोकळेच होते. नंतर मी व अनंता मुतालिक दोघे बाबूरावांच्या घरात शिरलो. तो तळघरात जाऊन दागिन्यांचा डबा घेऊन वर आला. माझ्या वाटणीस चांदीची संध्येची पळी व मोत्यांचे काही बारीक जिन्नस, किडूक मिडूक आले आहे.' 'ते कुठे आहे?' विचारता तो म्हणाला, 'त्यातील काही जिन्नस विकले व चांदीची संध्येची पळी व काही किडूक मिडूक आहे.' 'ते आम्हास केव्हा देणार?' 'सहा दिवसांच्या आत आणून पोचवितो.' 'पुन्हा काही आढेवेढे घेशील?' 'नाही. मला सोडा. मी सर्व आणून पोचवतो,' नंतर त्याचे पाय सोडवले व त्यास जबानी वाचावयास दिली व वर सही कर म्हणून सांगितले. त्यावर त्याने सही केली व त्यास आम्ही सोडून दिले. चावडीपुढे येताच तेथील पोलीस घाबरले व कोणी खुर्च्याआड तर कोणी टेबलाआड दडले. नंतर गिजऱ्याला घरी पोचवले व जिन्नस ताबडतोब आणून देण्यास सांगून सर्वजण निघून गेले. या वेळी बाबूराव जेलमध्ये होते. नंतर या अनंत मुतालिकास कळले की आपली चोरी बाहेर पडली. त्याने कराड इस्पितळात जाऊन गिजऱ्यास सांगितले की, तू ते जिन्नस तिकडे पोचवू नको. तो म्हणाला, 'माझी छाती होत नाही.' तेव्हा त्याने धीर दिला व 'कराड सोडून जाऊ नको' म्हणून त्याला पुनः सांगितले व मी ग्रुपमधून साळशिरंब्यास आलो तेव्हा मुतालिकने माझी गाठ घेतली व मला सांगितले. 'गिजऱ्याने निष्कारण माझे नाव घेतले. माझा काही संबंध नाही. उगाच तो माझ्यावर तोहमत घेतो आहे.' मी म्हटले, 'तुम्ही घाबरु नका; कारण हे पहिले काँग्रेसवाले व काँग्रेसचे फरारी. तेव्हा आपल्यापैकी एक समजून मी त्याच्याशी सहानुभूतीने वागत होतो. तेव्हा उगाच काळजी करु नका. ते जिन्नस तेवढे देतो म्हणाला आहे. ते इकडे पाठवण्यास त्याला सांगा.' तो माझ्यापासून निघाला तो उमरकांचनला काही क्रिमिनल गुंड होते त्यांच्या आश्रयाला जाऊन राहिला. त्याचे पाप त्याला सारखे भीती दाखवत होते. तेथे काही दिवस राहिल्यानंतर माधवराव जाधव, बी.बी. काळे यांनी मालदण भागात जाऊन दारु ओतली व टग्यांना ठोकले. त्याबरोबर उमरकांचनचे टगे हादरले व त्यांनी याला सांगितले, 'तू जा बाबा, नाहीतर तुझ्याकरता आम्हास सटके बसतील.' मग तो अधिकच भ्याला व त्याने पुण्यास देशमुख म्हणून सी.आय.डी. खात्यातील प्रमुख होते त्यांना जाऊन सर्व सांगितले. 'काँग्रेसचे फरारी पकडून देतो. जिल्ह्यातील काँग्रेसच्या भूमिगतांच्या टोळ्या धरुन देतो. मला त्यांच्यात वावरावे लागते. तेव्हा संशयाने मला

कोणी सी.आय.डी. खात्यातील कोणी अगर पोलिस खात्यातील कोणी पकडू नये असे सर्टिफिकेट द्या.' म्हणून सांगितले व त्याप्रमाणे ते त्यानी दिले. मुंबई प्रांताचे ते सर्टिफिकेट त्याने बरोबर ठेवले व स्वारी पुन्हा शिराळ पेट्यात आरळ्यात आली व जोशी काकांची गाठ घेतली व त्याना सांगितले, 'धन्वंतरींचा माझ्यासंबंधी निष्कारण गैरसमज झाला आहे. त्यामुळे मला अतिशय त्रास झाला आहे आणि त्यांचा तेवढा गैरसमज काढून टाका, ते साधे आहेत.' जोशी काकांनी सांगितले, 'बरे आहे. त्यात काय अवघड आहे? मी तेव्हाच ते करीन.' मग त्याला विश्वास आला, व त्याने फुशारकी म्हणून सी.आय.डी. खात्याच्या प्रमुखांच्या सर्टिफिकेटची हकिकत सांगितली. 'बघू' असे ते म्हणाले. तो म्हणाला, 'कराडला आहे. पुन्हा आणून दाखवीन.' त्याला धीर येऊन तो निघून गेला. पुन्हा माझी गाठ पडली. तेव्हा जोशी काकांनी सर्व हकिकत सांगितली तेव्हा त्यांची खात्री पटली. त्यांना तो बाबूजींकडील लेखी जबाब दाखवला. मग त्याना मी सांगितले, 'आता बुजवू नका. तो पुन्हा आला म्हणजे ते सर्टिफिकेट तेवढे पाहू म्हणून मागून घ्या व त्यालाही माझ्याकडे घेऊन या.' तो काही दिवसांनी आला. ते नुसते सर्टिफिकेट जोशीकाका यांच्या हाती देऊन निघून गेला. ते सर्टिफिकेट आम्ही सर्वांनी वाचले. ते मी मजजवळ ठेवून घेतले होते व केव्हा जाळ्यात सापडतो याची वाट पाहात होतो. बाबूजी वगैरे सर्व भीत होते. तो आपल्यापैकीच एक आहे. मग शिक्षा कशाला? पण जेव्हा ते सर्टिफिकेट पाहिले तेव्हा ते खवळले, त्यामुळे अनंता मुतालिक खाली आला आहे म्हटल्यावर आम्ही सर्व सावध झालो. नंतर त्यास सकाळी आमच्याकडे आणण्यात आले. नंतर मी विचारले, 'काय साहेब, इतके दिवस स्वारी कुठे होती?' 'काही नाही. इकडेच होतो.' 'बरं, पुन्हा ५-६ दिवसात येतो म्हणून गेलात. त्याचा पत्ता नाही. अशी अवकृपा का?' 'तसे काही नाही.' हे प्राथमिक झाल्यावर जरा जोरात विचारले, 'सर्व हकिकत सरळपणे सांगणार का?' 'मी काही केलेच नाही. तर मी सांगू काय?' 'बरं, पोलिस ऑफिसरकडे जाऊन काही सर्टिफिकेट आणलंत वगैरे?' 'छे: कधी? अशी उडवाउडवी त्याने सुरु केली. आमच्यात अहमहमिका सुरु झाली. बाबूजी म्हणाला, 'मी पहातो त्यांच्याकडे'. मी म्हटले, 'नको मीच सर्व बाहेर काढतो.' मग आम्ही दोघा तिघानी जरा त्याला आड बाजूस नेले व त्याचे दोन्ही पाय बांधले व मध्ये काठी घातली. त्याबरोबर सर्व देवांच्या शपथा घेऊ लागला. सर्व नद्यांच्या शपथा घेतल्या. मग ज्यावेळी पायावर काठीचा तडाखा बसला त्या वेळी भूत बोलू लागल्याप्रमाणे सर्व सांगू लागला. मग त्याला सर्टिफिकेट दाखवले, तो जबाब दाखवला. त्याचा सर्व जबाब घेतला व मग ठोकून सोडून दिले. पुढे लवकरच सर्व चळवळ संपत आल्याने त्या सर्व गोष्टींवर पडदाच पडला.

## पैशाचे व्यवहार

बेचाळीसच्या चळवळीस सुरुवात झाली. त्या वेळी कार्यकर्त्यांशी पैशाशी संबंध येत

नसे. यशवंतराव चव्हाण होते तेव्हा वरुन दोन हजार येत असत म्हणे! ते नाना पाटील यांच्याकडे पाचशे व इतर सर्व भागात खर्च होत असे म्हणतात. पण सामान्य कार्यकर्त्यांचा व पैशाचा काही संबंध नसे. घरचे खावयाचे व काम करावयाचे किंवा जेथे मुक्काम असेल तेथील खावयाचे व काम करावयाचे. पोटाकरिता किंवा कपडयांकरिता कधी खर्च करावा लागत नसे. पुढे फरारी वाढत गेले. नियमित प्रमाणात नाही, पण अच्युतरावांच्या कडून कधी पैसे येत. मग प्रत्येकाच्या वाटणीस २-३ रुपये येत! ते त्यांना ग्रुपच्या मुख्यामार्फत वाटत असू. प्रामुख्याने पैशाची कामे पूर्वभाग करीत असे. पे ट्रेन १८०००/-, किर्लोस्करवाडी बँक २३०००/-, धुळे खजिना ५,५०,०००/- येडचाचे ३००/— आणि कोणाकोणाचे दंडाचे पैसे इ. जमा होते. बाकीच्यांच्याकडे पोस्टाच्या थैलीत काही निघाले तर किंवा दंडाचे पैसे एवढेच जमत. १९४३ पर्यन्त दंडाचे पैसे सुद्धा फार जमत नसत. शिराळ्या पेटयात काही जमले होते, पण बाकीच्या भागात जमले नाहीत. पण १९४३ नंतर जेव्हा दरोडेखोरांचा बंदोबस्त केला व नंतर न्यायदान सुरु झाले, तेव्हा काँग्रेसचे सर्व जिल्हाभर नैतिक सामर्थ्य वाढले. लोकात आदर वाढला व मग ज्या लोकांनी पूर्वी देशभक्तांना पकडून दिले, अगर काही अन्याय केला होता त्याबद्दल शिक्षा म्हणून दंड घेण्यात येऊ लागले व त्याची फार रक्कम जमू लागली. उदाहरणार्थ बुवा म्हावशीकर यांच्याकडे चाफळ १८००/— मानेवाडी २०००/—, रंगनाथ यास पकडून दिल्याबद्दल २०००/— जमा झाले. असे प्रत्येक ग्रुपकडे पैसे जमू लागले. व त्याचा हिशेब लागेना. काय झाले? तर खर्च झाले! कशासाठी? कपडयासाठी, पोटासाठी. मग लहान लहान ग्रुपही निर्माण होऊ लागले व तेही पैसे उकळू लागले. मध्यवर्ती सत्ता दुबळी पडत चालली. ही सत्ता प्रेमाची होती म्हणून फारशी कडक शिक्षा करता येत नसे. सर्वांनी मिळून बोलावयाचे, त्याची निर्भत्सना करावयाची. मोठी शिक्षा करुन कदाचित् मतभेद वाढून सरकारची ब्रोटे शिरकली तर हया संघटनेच्या ती ठिकऱ्या ठिकऱ्या उडवून देईल व एकमेकास सशासारखे ताणून मारील ही एक गोष्ट. शिवाय मरणाकरता सज्ज तयार झालेले लोक. कोण केव्हा गोळी खाऊन मरेल याचा पत्ता नव्हता. शिवाय हे सर्व लोक गरीब कुटुंबातले. त्यांची बायकामुले घरात उपाशी मरावयाची. ते पाहून दया येऊन काही घरी खर्च झाले तरी त्यात मोठा दोष वाटत नव्हता. अशा चारही बाजूंनी विचार करुन आर्थिक बाबींकडे दुर्लक्ष करीत असू. पण त्याने गुंड प्रवृत्ती वाढता उपयोगी नाही, म्हणून मिटिंगमध्ये मी व डी.जी. देशपांडे यांची चौकशी व हिशोब तपासणी कमेटी नेमली. बाकीच्या ग्रुपकडे टिपणे होती, परंतु पूर्व भागाचे नाथाजी लाड यांनी शिल्लक मेळाचा जमाखर्च ठेवला होता. प्रथम आम्ही बुवा म्हावशीकर यांचा जमाखर्च तपासला. त्याच्याजवळ शिल्लक मेळाचा जमाखर्च नव्हता, फक्त टिपणे होती. मग अमक्यास दिले, तमक्यास दिले, तमक्यासाठी खर्च झाले, काही भावास दिले, बाकीचे खर्च झाले अशाच स्वरुपाचा तो होता. अर्थात् त्यांना पुढे चांगला ठेवण्याबद्दल सूचना दिली.

तांबव्याला डी.जी. पाटील, आण्णा, चंदर यांना जमाखर्च विचारला. त्यात कुणाचा कुणास मेळ नव्हता. त्यांनी कोळे वगैरे ठिकाणाहून पैसे जमा केले होते; परंतु त्याच्यात दोन गट झाले. प्रत्येक गट दुसऱ्याचा हिशेब मागे. दोघांनाही हिशेब मागितला तर याला खर्च झाले, त्याला खर्च झाले ही उत्तरे. टिपणेही नव्हती. अशा सर्वांच्या अवस्था. मग व्यवस्थित वागा म्हणून ताकीद दिली. पुढे बाबूजी पाटणकर यांच्या ग्रुपकडे आलो. त्यांचे जमाखर्च शिल्लक मेळाचे व खर्चही व्यवस्थित व लिहिलेले असे होते, व त्यात काही अफरातफरही नव्हती. कोणाच्या घरी दिले असतील तर त्या व्यक्तीचे नाव लिहिले होते. ते सर्व पाहून समाधान वाटले. निवृत्तिकाकाडे काही पैसे जमाच नव्हते, त्यामुळे त्यांचा हिशोब तपासण्याचा भागच नव्हता. मग पूर्व भागाकडे कुंडलला आलो. त्यांचे लिहिणे उत्कृष्ट, कीर्द, खतावणी व प्रत्येकाच्या पावत्या घेतलेल्या व ऑडिट केलेले. लाखो रुपयांचे जमाखर्च, पण तपशील नाही. नुसते अमक्यास दिले, तमक्यास दिले इतकेच. त्यामुळे इतके व्यवस्थित असले तरी समाधान झाले नाही व संशयास जागा राहिलीच. नंतर उत्तर भागात बोराटे यांचा व आबा (किसन वीर) यांचा जमाखर्च व्यवस्थित होता. माधवराव जाधव कराड मध्यभाग यांच्याकडे पैशाचा संबंध फारसा नव्हताच. जो होता त्याचा जमाखर्चही ते महिन्याच्या महिन्यास रिपोर्टासोबत पाठवीत, त्यामुळे तपासणीचा फारसा संबंध राहिला नाही. या हिशेब तपासण्यामुळे एवढे मात्र खास झाले की, आपले हिशेब तपासले जातात, मिटिंगमध्ये आपले तोंड उजळ पाहिजे. शिवाय आम्हास एक वाटे ही भूमिगत अवस्था आटोपल्यानंतर सामान्य जनता—लोक—विचारणारे आहेत. आज परिस्थितीमुळे जरी आपण काही कडकपणे करू शकत नसलो तरी पुढे याचा जाब द्यावा लागेल आणि खरोखर तशीच परिस्थिती झाली. वॉरंटे निघाल्यावर जे ह्या मनोवृत्तीचे (क्रिमीनल) होते त्यांनी आपसांत भांडून खून केले. लोकांनी त्यांचे मुडदे पाडले. आज ते सर्व खलास झाले व होत आहेत.

## जनतेचा आश्रय

वर सांगितल्याप्रमाणे विभाग पाडून घेतल्यानंतर मी माधवराव याच्याबरोबरच काम करू लागलो. कराड शहरापासून ते सातारा शहरापर्यन्तचा भाग आमच्याकडे होता. माधवरावांनी त्या भागातील तरुण मुले हाताशी धरून खरी राष्ट्रीय भावना त्यांच्यात जागृत केली व राष्ट्रीय भावनेने काम सुरू केले होते. प्रथम सदू जने यास पकडून आणले. तो शहरात गुंडगिरी करणे, पोलिसांकडे खोटे पुरावे देणे वगैरे करीत होता. त्यास शिक्षा दिली. त्याचप्रमाणे शंकर मास्तरसारख्या अतिशय प्रतिष्ठित व सरकारदरबारी वजन असलेल्याला भर शहरातून उचलून आणून योग्य तो निर्णय घेऊन सौम्य शिक्षा देऊन सोडून दिला. त्यामुळे कराड शहरास फार मोठा हादरा बसला व शहरातील लोकांना आम्ही शहरात राहून पोलिसांच्या शक्तीच्या जोरावर काही करू असे वाटत होते तो भ्रम साफ नाहीसा झाला व दरारा बसला. त्याचप्रमाणे त्यांनी हत्यारे जमा केली,

शिरवड्यांची बंदूक काढली, गरगटे यांची बंदूक काढली व गावोगावचे तरुण जमा करून नडशीस हुतूतूचे सामने घेतले. त्याकरिता ढाली बक्षीस ठेवल्या. नडशी गाव कराडपासून अवघे ४-५ मैल लांब. कराडला पोलिस खात्याचे सेंटर व शिवाय मिलिटरी; पण सर्व लोकांची सहानुभूति असल्यामुळे यत्किंचित् बातमी बाहेर जाऊ शकत नसे. नडशीस सर्व भागातून कराडमधून मुले जमू लागली. ग्राऊंड आखले व सामना सुरू होणार, इतक्यात पोलिसांना संशय आल्यामुळे त्यांनी फार मोठा छापा टाकला व दोन मैल आवार धरून तो भाग वेढून टाकला. आम्ही वर वाडीत होतो. बाहेर येऊन पाहतो तो सर्वत्र पोलिस व भोवतालचा सर्व भाग वेढला आहे. मग सर्व उठलो. सुदैवाने काही पिके ऊंच होती. त्याच्या आडून नदी काठास आलो व शेतकऱ्यांनी काहिलीतून पलीकडच्या काठास पोचविले व काहिल वर काढून आडोश्यास ठेवली. आम्ही एका झोपडीत जाऊन बसलो. आम्ही नडशीच्या ज्या घरात होतो तेथे पोलिसांनी छापा घातला. त्या लोकांना मारले, पण त्यांनी आम्ही कुठे गेलो हे सांगितले नाही. नदीकडे येऊन पाहिले, पण काही दिसेना. मग त्यांनी वेढा तसाच ठेवून तपास सुरू केला. आम्हास तेथे रहाणे धोक्याचे होते. मार असह्य होऊन एखाद्याने सांगितले तर पंचाईत शिवाय वेढा भोवतीने टाकल्यामुळे ते रान न रान आणि छप्पर न छप्पर तपासणार. तेव्हा रात्र पडल्याबरोबर वेढा फोडून बाहेर पडावयाचे असे निश्चित केले. संशयित गावी जाणेही धोक्याचे म्हणून ज्या गावाचा संशय येणार नाही असे गाव कोणते? तर तळबीड. ते मिलिटरीचे गाव म्हणून रात्री १२ ते १ च्या सुमारास छपरातून बाहेर पडलो व अगदी चाहूल न लागता काळोखात आड रस्त्याने पूना-बंगलोर रोड पश्चिमेकडे जाऊन ओलांडला. रस्त्यावर पोलिसांच्या मोटारी उभ्या होत्या. त्यांची हालचाल आम्हास समजत होती; पण आमची हालचाल त्यांना न कळू देता पार पडलो व तळबीड गावच्या रस्त्यास लागलो. तो गाव काँग्रेसवाल्यांच्या व फराऱ्याच्या अगदी विरुद्ध. सरकारने जिल्ह्यातील सर्व गावच्या लायसेन्स बंदुका काढून घेतल्या, पण तेथील घेतल्या नव्हत्या. त्यांनी डी.एस्.पी. स सांगितले. काँग्रेसवाले तर येऊ द्यात! त्यांना गोळ्या घालून मारतो. त्यामुळे तो या गावावर अत्यंत खुष होता. आम्ही दत्तोबा गोवारकर यांच्या घरी जाऊन हाका मारून त्यांना उठवून त्यांच्या माडीवर जाऊन झोपलो ते सकाळी दहा वाजता उठलो. त्यांना सर्व हकिकत सांगितली व संध्याकाळ-पर्यन्त आराम केला. संध्याकाळी एक युक्ति सुचली. गावातील सर्वांचा गैरसमज काढून टाकण्याच्या उद्देशाने बाबासाहेब यांच्या घरी सर्व प्रमुख जमवले, बंदुकवाले जमवले व अचानक आम्ही जाऊन तेथे उभे राहिलो. सर्व 'बसा' म्हटल्यावर आम्ही बसलो व मग एकमेकांची ओळख करून दिली. त्यांना आश्चर्य वाटले व आमच्या धाडसाचे त्यांनी कौतुक केले. मग त्यांना आमची भूमिका समजावून सांगितली. "तुमच्या बंदुका आम्हास नकोत. तुमच्या बंदुका काढून घेतल्यावर जर स्वराज्य मिळणार असते तर सर्व जिल्ह्याची शक्ती एकवटून तुमच्या बंदुका काढून नेल्या असत्या. मग तुम्ही कितीही

लोकांना गोळ्या घातल्या असत्या तरी हरकत नव्हती. तुम्ही आम्हास गोळ्या घालणार आहात असे समजल्यावरून आम्ही आलो आहोत. तुमचे समाधान होणार असले तर घाला आम्हास गोळ्या. या आमच्या बंदुकी घ्या. तुम्ही शूर व छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेत मदत केलेल्या शूर घराण्यातील आहात. आज सर्व गावातील लोक मिलिटरीत आहेत. म्हणजे पर्यायाने ते देशाची सेवाच करीत आहेत. कृपा करून गैरसमज करून घेऊ नका की, तुमच्या बंदुका काढणार आहोत. नागपंचमीस डोंगरात शिकारीस गेलात तर तुम्हास कोणीतरी खोटेच सांगितले की तुमची हत्यारे काढण्याकरीता आम्ही येणार आहोत. तुम्ही लढाई करण्याच्या पवित्र्यात उभे राहिलात. तेव्हा सर्व गैरसमज सोडून द्या, व आमच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नात सामील व्हा.'' या बोलण्याचा फार चांगला उपयोग झाला. सर्व लोकांच्या भावना हेलावल्या गेल्या, व त्यांनी सांगितले, ''तुम्ही तळबीड हे गाव परके समजू नका. आपलेच समजा. गावात १६ बंदुका आहेत. आता पाहिजे तर सर्व आणून देतो. इतकेच नव्हे तर केव्हाही तुम्ही आम्हासही कामास बोलवा. आम्ही एका पायावर तयार आहोत. हत्यारे घेऊन येण्यास तयार आहोत.'' यावर मी म्हटले, ''तुमची हत्यारे आम्हाला नकोत. तो बोजा कुठं सांभाळावयाचा? व ती माणसे कोठून पोसावयाची? फक्त तुमची अंतःकरणे, तुमचे आशीर्वाद आम्हास पाहिजेत. ती अंतःकरणे आम्हास मिळाली. त्याबद्दल आम्ही परमेश्वराचे ऋणी आहोत.'' मग चहा, कॉफी, दूध पानसुपारी सर्व झाले. ते सर्व आम्हास पोचविण्यास आले व त्यानी प्रेमाने निरोप घेतला. गाव तेव्हापासून ते आमचे झाले. आत्तापर्यन्त जरी आम्ही काम करीत होतो तरी या पद्धतीने नव्हते. किवळ व किवळ–भोवतालचे थोडे क्षेत्र, इंदोली व इंदोली भागातील आसपासचे क्षेत्र असे त्याचे स्वरूप असे. पण आता साताऱ्यापासून कराडपर्यन्त गावन गाव, वाडी, खेडेसुद्धा सर्व राष्ट्रीय संस्काराने भारून टाकावयाचे असे धोरण ठेवले.

## कामाची पद्धत

पूणे-बंगलोर रोडच्या आसपासची गावे तशीच होती. त्यांना संस्कार नव्हता. शहराच्या सान्निध्याने गुण येण्यापेक्षा दुर्गुणच या खेड्यातून अधिक शिरले. वकिलांच्या सान्निध्याने कायदेशीर टगेगिरी व व्यापाऱ्यांच्या संसर्गाने बेमालूम लबाडी या दुर्गुणांचाच विशेष प्रभाव या नजीकच्या गावांवर पडला होता. तेंव्हा काम करताना दहशतीचा किंवा मारहाणीचा उपयोग फारसा करावयाचा नाही, अगदीच नाइलाज झाला तर सौम्य स्वरुपात ते वापरावयाचे. प्रथम गोड बोलून त्याना त्याचे दोष दाखवून द्यावयाचे, त्यामुळे उपयोग झाला नाही तर गाव जमवून सर्वांमार्फत सांगावयाचे. त्याने उपयोग होईना तर सौम्य शिक्षा नाही तर शेवटी जबर शिक्षा अगर देहदंड; दरोडेखोरांच्या बाबतीत उलट करीत असू. त्याचे कारण त्याची त्या गावावर अगर भागावर दहशत असे. त्यामुळे त्यांना प्रथम ठोकले की त्या भागातील त्यांची दहशत

नष्ट होत असे व आमच्याबद्दल आदर व गोरगरिबांची सहानुभूति निर्माण होत असे. म्हणून त्यांच्या बाबतीत असा उलट क्रम लावीत असू. एका भागात असे काम केले की दुसऱ्या भागातील लोक तक्रारी घेऊन येत असत. या दरोडेखोरांनी इतकी दहशत बसविलेली असे की, नुसते येऊन सांगण्याससुद्धा भीत असत. मग त्यांची मने तयार करावी लागत. त्यांची भीती काढून टाकावयाची व आमच्याकडे तक्रारी घेऊन येणारांची संघटना निर्माण करावयाची, त्यांचे मतभेद मिटवून टाकावयाचे. तोपर्यन्त त्यांच्यात थोडेसे धैर्य निर्माण होत असे व आम्हास आश्रयाचे स्थान तयार होई. आमच्यापासून पोलिसांचा त्रास झाला तरी सहन करण्याची मनाची तयारी होई व त्यांचाही या अन्यायांचा लौकर बंदोबस्त करा असा सारखा तगादा सुरू होई. मग त्या ठिकाणी जाऊन ॲक्शन केली म्हणजे ती सोप्यात जाई, व गुंडांचा बंदोबस्त झाल्याबरोबर तिथे चांगली शुद्ध राष्ट्रीय वृत्तीची शक्ती उत्पन्न होई व ती टिकणारी अशी असे.

दिवसा कुठे तरी लपून बसावयाचे व नंतर सर्वजण बसून कामाचा विचार करीत असू. आमची २५ - ३० जणांची टोळीच तयार झाली होती. अचानक रात्री गावात जावयाचे त्या गावातील लोकांना बाहेर बोलावून घेऊन परिस्थितीची चौकशी करावयाची. त्यांनी सर्व ठीक म्हटले की गावाच्या सर्व वाटा रोखून गावातील सर्व लोक देवळात एकत्र करावयाचे. त्यांची सर्व मंडळी जमल्यावर, पोलिस पाटील, मुलकी पाटील, तलाठी यांनाही बोलावून घ्यावयाचे व त्यांच्यापुढे आमची सर्व भूमिका समजावून सांगावयाची. आमचे ध्येय काय आहे, आमचा मार्ग काय व जनतेचे या वेळचे कार्य कोणते याबद्दल त्यांना शंका विचारू द्यावयाच्या व त्यांचे निरसन करावयाचे. आमच्यासंबंधी खोट्या वार्ता उठवून लोकात जे भीतीचे वातावरण उत्पन्न झाले आहे ते नष्ट करून आम्ही त्यांचे खरे मित्र आहोत, हितचिंतक आहोत याची खात्री पटवून द्यावयाची. खेळीमेळीचे वातावरण निर्माण करावयाचे व नंतर त्यांच्या अडीअडचणी, त्यांचा त्रास, गुंडांचा त्रास सर्वांसमक्ष विचारावयाचा. त्याने सर्व गावासमक्ष तो उठून सांगायचा. मग खरे खोटे यांची शहानिशा सर्वांसमक्ष करावयाची व तो त्रास खरा असेल तर ताबडतोब दूर करायचा. सर्वांना पुन्हा वाईट न वागण्याबद्दल ताकीद देऊन तेथून निघून जावयाचे. कुठे जायचे हे मात्र कोणास सांगायचे नाही. ही कामाची पद्धत घालून घेतली असल्याने माधवरावांच्या ग्रुपचीही तशीच तयारी झाली होती. सर्व शाळा-कॉलेजचे विद्यार्थी असल्याने निर्व्यसनी व राष्ट्रीय वृत्ती मुळात असल्यामुळे त्या वृत्तीने भारलेली व सर्वांनी नैतिक वर्तन शुद्ध राखले होते. त्यामुळे सर्वच चारित्र्यवान होते. जिल्ह्यातील बाकीच्या सर्व ग्रुपमधून काही ना काही कमी-अधिक प्रमाणात दोष होता. शिराळा पेट्याच्या ग्रुपमध्ये प्रत्येक भूमिगताचे पूर्वचारित्र्य म्हणून काही होते. काही व्यसनी, तर काहींची नैतिक पातळी कमी, तर काही क्रिमिनल प्रवृत्तीतून यात मिसळलेले अशी स्थिती होती. राष्ट्रीय वृत्तीची त्याला जोड पण त्यात किंचित स्वार्थ मिसळलेला. अशा निरनिराळ्या प्रवृत्तीची, भावनांची सरमिसळ होती. पूर्वभागाच्या कार्यकर्त्यांत क्रिमिनल प्रवृत्तीचे

लोक जास्त; स्वार्थ अतिशय प्रमाणात, पूर्वचारित्र्य खराब, अभ्यास कमी, अडाणी व्यसनी, मूर्ख, काही ध्येयनिष्ठ, चारित्र्यवान, निर्व्यसनी, चांगली माणसे होती; पण स्वार्थी लोकांचा भरणा अधिक. नवीन भरती झालेले. त्यात दोन प्रकार : एक सुशिक्षित कॉलेजमधील तर एक अगदी खालच्या पातळीतील. अखेरपर्यन्त अनुयायी राहिले व आपण मोठे ज्ञानी पुढारी असे समजून भलत्याच मार्गाने गेले. कॉलेजमधील मुले आपल्या चाललेल्या कार्यक्रमातून जेवढा वेळ उरेल तेव्हा वेळ देत. म्हणजे प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीने त्याचा फारसा उपयोग होत नसे. त्यानंतर कोरेगांव भाग. त्याचीही अवस्था तशीच होती. राजकीय संस्कारामधूनच त्याचा उठाव, निर्भेळपणा कमी. राष्ट्रीयत्वाचे संस्कार कमी. नंतर किसन वीर यांचा उत्तर भागाचा ग्रुप, त्यांत बाहेरगावाहून त्यांच्या ग्रुपमध्ये जी मुले भरती झाली, आण्णासाहेब पंत, डी.जी. देशपांडे, बाळ दिवाण डॉक्टर राष्ट्रीयत्वाने भारले होते. साताऱ्यात येऊन ते काम करू लागले. त्यांचे चारित्र्य उज्ज्वल होते. प्रखर राष्ट्रीयता होती. त्याग होता. श्रीमंतीत वाढलेली मुले, पण अगदी काबाडकष्ट करणाऱ्या शेतकऱ्याला निभणार नाहीत असे त्यांनी कष्ट केले. काम करून दमून आले म्हणजे उघडेच नांगरटीच्या ढेकळांत निजत. एका संस्थानिकाचा मुलगा, पण देशप्रेमाने भारून जाऊन त्याची ती काम करण्याची धडाडी, त्याग, कष्ट सोसण्याची तयारी, उच्च विचार पाहिले की अंतःकरण भरून जाई. पण डी.जी. देशपांडेखेरीज करून ही सर्व माणसे अल्पकाळ टिकली. पुढे ती मतप्रवाहांत भिन्नता आल्यामुळे आपल्या पूर्वआयुष्यात विलीन झाली. त्या ग्रुपमध्ये जी स्थानिक माणसे होती ती सामान्य होती. त्यांना राष्ट्रीयत्वाचे संस्कार विशेष नव्हते व त्यांचा त्याग सामान्यच. चारित्र्यही सामान्यच. माधवरावांच्या ग्रुपमधील मुले अखेरपर्यन्त राहिली. इतकेच नव्हे तर वाढतच गेली. स्वतः माधवरावांची तयारीही वाढत चालली. रोज डायरी लिहिणे, हिशोब लिहिणे, वाचनाची आवड यामुळे स्वतःची योग्य निर्णय घेण्याची शक्ती वाढत चालली व त्यांची छाया अनुयायांवर पडत चालली. सार्वजनिक पैशांवर यत्किंचित् अपहाराची दृष्टी किंवा वापर करण्याची वृत्तीही नव्हती. त्यामुळे त्यांनी जी जी कामे हाती घेतली त्यात ते यशस्वी झाले व होत आहेत. त्यामुळेच त्यांच्या ग्रुपमध्ये मतभेद, भांडणे किंवा अविश्वास यांचा वाससुद्धा राहिला नाही; उलट ग्रुपमधील गरीब दिसला, अत्यंत अडचणीत दिसला, अत्यंत हुषार दिसला तर स्वतः कष्टात राहून त्याला शक्यतो मदत करण्याची वृत्ती नेहमी त्यांनी ठेवली. त्यामुळे त्यांना आत्मिक समाधान मिळत व वाढत गेले. स्वतःच्या दारिद्र्याबद्दल त्यांना कधीच दुःख झाले नाही, उलट आनंदाने व धैर्याने ते सहन करीत. माझ्या पाठीमागे जिल्ह्याच्या व बाहेरच्या कामांचा व्याप असल्यामुळे सतत या ग्रुपमध्ये राहता येत नव्हते. बाहेरचे सर्व काम पहात पहात मी या मंडळीत शक्य तितका जास्त राहण्याचा प्रयत्न करीत असे. मी नाही म्हणून यांनी कामात कधीच खंड पडू दिला नाही.

# कुंडल गटाची चाल

सुरुवातीला जिल्हयाच्या कसल्याच कामांशी या ग्रुपशिवाय (माधवराव जाधव) माझा कसलाच संबंध येत नसे. पण यशवंतराव पकडले गेल्यापासून ते मी पकडला जाईपर्यन्त सर्व जिल्हयाचे काम मला अखंड पहावे लागत असे. त्यावेळी बाकीचे जरी डिक्टेटर म्हणून होते तरी आम्ही सर्वजण बसून धोरण ठरवीत असू. पण प्रत्यक्ष कामाची अंमलबजावणी व रिपोर्टस करणे, वर खाली (अच्युतराव व इतर ग्रुप्स) संबंध ठेवणे ही सर्व कामे मलाच पहावी लागत. त्यामुळे माझे कधी एका ठिकाणी राहणे झालेच नाही. पण शेवटी शेवटी मनाशी निश्चय करून अधिक दिवस या ग्रुपमध्ये राहण्याचा प्रयत्न करू लागलो.

कराडपासून कामास सुरुवात झाली. कराड चांगले शुद्ध झाल्यावर आम्ही तेथे जाऊ येऊ व राहू लागलो. किसन वीर डिक्टेटर असताना शाहुवाडी (कोल्हापूर) येथे एक मिटिंग घेतली. त्यास किसन वीर, मी, निवृत्तिकाका, पांडू मास्तर, बाबूजी पाटणकर, नाथाजी लाड, जी.डी. लाड, नागनाथ, वस्ताद, श्रीपतीबुवा अशी आम्ही ५० माणसे हजर होतो. मागील कामांचा आढावा घेतला व पुढील कामांचे धोरणही ठरले. त्या वेळी सर्व जिल्हा पैशाच्या अडचणीत होता; कारण या वेळी जरी जेवण फुकट असले तरी प्रत्येकाचा वैयक्तिक खर्च फार वाढला. कपडयालत्त्यांचा खर्च अतिशय होई व प्रवासखर्चही होई. तेव्हा पैसे जमवावेत असा चर्चेचा विषय होता. नाथाजी लाड म्हणाले, 'धुळयाच्या खजिन्यांपैकी पाच हजार रुपये देतो. ते काम जिल्हयाने केले असे समजा.' आजपर्यन्त जिल्हयाचे पूर्व भागातील लोक आमच्यात सामील होत—आम्ही त्यांना सामील करून घेत होतो म्हणून! पण ते मनाने कधीच आमच्याशी समरस झाले नव्हते. ते नेहमी तुटकच राहिले व जिल्हयाचा विचार करून त्यांनी कधीही कामे केली नाहीत. केली ती बहुतेक मोठी मोठी पैशाचीच व त्या पैशाशी जिल्हयाचा संबंधही कधीच आला नाही व त्या पैशाकरिता आजपर्यन्त जिल्हयाने कधीच लाचारी पत्करली नाही अगर त्यांच्याकडे दीनवाणे तोंड वेंगाडले नाही; उलट अतिशय धैर्याने व कष्टांत दिवस काढले व राष्ट्रीय वृत्तीने परकीय सत्तेवर जोरकस आघात करून तिची पोलादी चौकट खिळखिळी करून टाकली. सामान्य जनतेशी मिसळून त्यांच्यात उघड राहणे व कामे करणे असे काम चाले व एकमेकांशी अगदी अंत:करण उघड करून बोलणे, वागणे, चालणे असे. त्यामुळे सर्व जिल्हयात भूमिगतांत गुप्तता अशी नव्हती; गुप्तता होती फक्त ब्रिटिश परकीय सत्तेला!

पूर्व भागातील स्थिती अगदी उलट होती. आपापसातसुद्धा गुप्तता. कोणाशी कोणी मोकळेपणाने बोलणार नाही अगर वागणार नाही. त्यांच्यात सुद्धा पुन्हा श्रेण्या! वर्ग! मग जिल्हयाशी तर अत्यंत गुप्तताच. कुठले काम करणार आहोत याची किंवा कोणते काम केले याचासुद्धा जिल्हयात पत्ता लागू द्यावयाचा नाही. जेव्हा सरकारात उघडकीस

येईल तेव्हा कळावयाचे. नाना पाटील यांच्या बाबतीत तर शुद्ध बुवाबाजीच सुरू केली होती त्यांचे नाव महाराज ठेवून. महाराज भेटावयाचे म्हणजे रात्री. एका माणसाने येऊन एका ठिकाणी न्यावयाचे व मग १२ च्या सुमारास महाराज यावयाचे व त्यांनी सांगावयाचे आताच महाराज १२-१४ मैलांवरून आले. त्या महाराजांचा थाट काय विचारावा? अगदी हळू बोलावयाचे व ५-१० मिनिटे झाली की मग भेटायची दुसऱ्याची पाळी. मी पहिल्या खेपेसच हे आवरण फाडून टाकले. मी समक्ष भेटीत त्यांना सांगितले. असा हा व्याप असेल तर मला तुम्हास भेटावयाचेच नाही. तुमच्यापासून मला काही मिळवायचे नाही. तुम्हाला जिल्हयातील सर्व हकिकती कळाव्यात व तुमच्या जिल्हयाशी संबंध राहावा इतकेच. त्यामुळे अखेरपर्यन्त मला त्यांच्या भेटीचा कधीच त्रास झाला नाही. त्यामुळे पूर्व भागास नेहमी आपल्यास जिल्हयातील संघटना आपणास मान देत नाही म्हणून असमाधान असे. तेव्हा जरी पाच हजार रुपये देतो म्हणाले तरी कोणास काही समाधान झाले नाही. सर्वांनी एकच सांगितले हिशोब दाखवा त्यात १ पै शिल्लक राहिली तरी त्याचे आम्हास काही वाटणार नाही; पण ५ हजार काय २५ हजार दिलेत, तर ती जिल्हयास दिलेली लाच ठरेल. तेव्हा पैशाकरिता असे आम्ही नीतिभ्रष्ट होण्यास तयार नाही. हिशोब दाखवून शिल्लक जिल्हयाच्या स्वाधीन करणे, अगर हिशोब दाखविण्यास त्यांची तयारी नव्हती. त्यामुळे ती चर्चा फिसकटू लागली. शेवटी नागनाथ २५ हजारांवर आले तरी आबांनी किसन वीर आमच्या सर्वांच्या सांगण्यावरून (त्यांच्या मनात आलेले पैसे घ्यावे असे आले तरी) निश्चय कायम ठेवला व नकार दिला.

## गुंडांचा बंदोबस्त

लगेच जनतेकडून पैसा गोळा करावा असे ठरले. ताबडतोब पावती पुस्तके छापून आणून गावोगाव वर्गणी जमा करण्यास सुरुवात केली. लोकांनी पैशाचा पाऊस पाडला. पण आमच्या मूर्खपणामुळे त्यांचा सर्वस्वी व्यय यथायोग्य झाला असे म्हणता यावयाचे नाही. तेथून पैसे जमा करण्याची कमेटी ठरली. त्यात किसन वीर, पांडू मास्तर,निवृत्ति काका व मी असे होतो. ज्या वेळी वरून काही पैसे येत किंवा आम्ही वाटत असू, त्या वेळी पूर्व भाग पैसे मागण्यास सदैव तयार असे, पण यापुढे सर्वांनी असे ठरवून टाकले की या पैशातील पैसे पूर्व भागास काही द्यावयाचे नाहीत. नंतर सर्व स्वस्थानी निघून गेलो. परत नडशीला आल्यानंतर काम सुरू होते त्यात भाग घेण्यास सुरुवात केली. कराडनंतर सैदापूर, गोटे, कोपर्डे, वाघाव, वनवासवाडी, भोवतालच्या वाडघा, तासवडे, बेलवडे, वराडे, चरेगांव, कोळिवले, हिंगतुळे, घोणशी, वडोली, काळगांव, काशिळ, पाल, सासवडे, शिरगांव असे करीत परळखोराही घेऊन थेट जांभेया बेटपर्यन्त गेलो. सबंध तारळखोरा, तारळे, दुसाळे, घोट, चेटोशी इ. सर्व भाग विधायक कार्याने भारून टाकला. खोडशी येथे रामोशी लोकांचे मोठे बंद होते. ते सामान्य माणसांना,

गोरगरिबांना अतिशय त्रास देत. एकदा जाऊन त्यांना ताकीद दिली. देवळात आम्ही व्याख्यान देतो आहे, सर्वांना सांगतो आहे तर इकडे एक शेरडी चोरून नेऊन कापलीसुद्धा! दुसऱ्या एका गाभऱ्या म्हशीचा पाय तोडला सुद्धा. मी वाटेगांव भागात गेलो होतो, तेव्हा माधवरावांनी सर्वांना ठोकून काढले व भागातील गुंडगिरी नाहीशी केली. त्याचप्रमाणे घोणशीचे भागाची सुद्धा अवस्था व त्या भागातील तरुण वर्गास नवीन वळण लावून त्यावर राष्ट्रीय संस्कार केले व गुंडगिरीस कायमची मुठमाती देऊन विधायक कार्याचा सपाटा सुरू केला. पालीचे गुंड सभ्य, शिष्ट होते. त्यांनी हे सर्व वातावरण ओळखून आपला व्यवसाय ताबडतोब बंद ठेवून चांगले वागू लागले व आमच्यात येऊन मिसळून विधायक कार्यात लक्ष घालू लागले, सेवादल काढले, शिबिर घेतले, सामने घेतले, वाचनालय सुरु केले व सर्व गावास विधायक कार्याचे वळण दिले.

एकदा भूमिगतांचा शोध करीत उंब्रजचे जोग फौजदार व पोलिस आले व चौकशी करून पाली गावात फिरून श्री खंडोबाच्या दर्शनास देवळात शिरले. बरोबर पोलिस होतेच. इतर सनदी नोकरही होते व गावातील काही माणसे व कुतूहलाने मुलेही बरोबर होती. फौजदार देवाच्या दर्शनास आत शिरताच एका ७-८ वर्षांच्या मुलाने त्यांचा बूट-जोड सर्वांची नजर चुकवून लंपास केला. जोग दर्शनाहून परत येतात, तो बूट दिसेना. बूट गेला. मग पोलिस, सनदी नोकर यांच्यावर ते फार गरम झाले व शरमेने मान खाली घालून परत निघून गेले. सुदैवाने दुसऱ्या दिवशी मी तेथे आलो. त्या मुलाने बूट आणून माझ्या पुढे ठेवला व सर्व हकिकत सांगितली. मी त्याची कामाच्या कौशल्याची, धैर्याची तारीफ केली, पाठ थोपटली. मी त्याला सांगितले, 'हे बरोबर नाही. आपण एका फौजदाराचा बूट चोरून काय करणार? तेव्हा धाडस करून तूच नेऊन तो उंब्रजला त्यांच्या घरी नेऊन ठेव व मी पाठविले म्हणून सांग. त्याचा परिणाम फार चांगला होणार आहे. त्यामुळे आपली दानत, अंतःकरणाची उंची त्यांना कळणार आहे, संस्कार समजणार आहेत.' त्याला ते पटले व दुसऱ्या दिवशी त्याने उंब्रजला तो बूट पोचवला. त्याचा परिणाम फार चांगला झाला व जोगांना आमच्याबद्दल आदर व सहानुभूति निर्माण झाली व मोठा छापा यायचा झाला तर १-२ वेळा त्यांचा आगाऊ निरोप आला होता.

काळगावला निराळ्या स्वरुपात गुंडगिरी होती. सोन्या पाटील या नावाचे पोलिस व मुलकी पाटील होते. पहिल्यापासून तो फौजदारबरोबर पोलिस पार्टीतून हिंडून काँग्रेस फराऱ्याच्या मागे शोधार्थ लागे. असा नेहमी कार्यक्रम सुरु असे. प्रथम १९४३ मध्ये व्यंकटराव चरेगांवकर, भिकू पाटील, बापूसाहेब कोचेगांवकर, दत्तोबा काटकर, कदम मास्तर यांनी त्याला सांगून पाहिले. पण त्याचा उपयोग न होता, उलट तो जास्ती शेफारला. मग कदम मास्तर यांना पोलिसांचा वेश देऊन संध्याकाळच्या सुमारास त्याच्याकडे पाठवले व तुम्हास फौजदारांनी आता ताबडतोब मसूरला बोलविले आहे

म्हणून सांगितले. लागलीच त्यांना अंड्याच्या पोळ्या वगैरे मेजवानी त्यांच्याबरोबर देऊन साडेसातच्या सुमारास ते निघाले. १-२ मैल अंतर चालून गेल्यावर वाटेत बसलेल्या भूमिगतांनी त्याला ठोकले व पुन्हा असे कधी करणार नाही म्हणून कबूल करून घेतले. त्याचे नाकच कापणार होते पण तो प्रयत्न रहित केला. नंतर तो काही दिवस दबून राहिला; पण त्याच्या त्या वृत्तीने पुन्हा उचल खाल्ली व सरकारी मिलिटरी पोलीस आपल्या पाठीशी आहेत या घमेंडीने पुन्हा४५ साली त्याने नेट धरले व आमचे पत्ते शोधणे, आम्हास सहाय्य करणाऱ्या माणसांना त्रास देऊ लागला. ह्याने एक बेलकडची बाई ठेवली व गुलाब म्हणून एक मुसलमानाचा मुलगा व गुरवाचा एक मुलगा अशी तिघा-चौघांची टोळी करून ह्या भागातील गोरगरिबांच्या तरुण सुंदर मुलीना पैशाचे आमिष दाखवून घरातून काढून न्यावयाच्या व त्या दिसावयास देखण्या असल्यामुळे वेश्याबाजारात अगर अन्यत्र मुंबईत नेऊन विकावयाच्या असा व्यवसाय चालू केला. गोरगरिबांचे संसार उठू लागले. बरे, प्रतिकार करावा तर गुंड जवळ पाळलेले. त्यांच्याकडून त्रास द्यावयाचा, लांबून लांबून मुली आणावयाच्या. चौगुले म्हणून एका शेतकऱ्याची सून त्यांनी काढली व त्याचे घर उठवले म्हणून आम्हा सर्वांना अतिशय वाईट वाटले. त्याचा दारू काढायचाही धंदा अतिशय मोठ्या प्रमाणात होता. मग आम्ही मनाशी या गोष्टीचा बंदोबस्त करण्याचे ठरवले. आमची शक्ती या वेळी खूपच वाढलेली होती. आसपासची पेटल, खरोड वगैरे सर्व गावे आमची होती. त्यामुळे रात्री ८ च्या सुमारास गावात व शाळेत घुसलो व तो मुसलमानाचा पोरगा व गुरवाचा मुलगा यांना पकडले व सर्व गुन्ह्याची कबुली घेऊन व पुन्हा करणार नाही याची खात्री दिल्यानंतर सोन्या पाटलाचा शोध केला तर बाईच्या घरी तो बेलवाडीस असल्याचे समजले. मग रात्री १२ च्या सुमारास बेलवाडीस जाऊन त्या बाईच्या घरी दोघांना पकडून गावाबाहेर काढले व सोन्या पाटलास पत्री लावली व त्या बाईसही शासन केले. पुन्हा करणार नाही याची खात्री करून घेऊन त्यांना सोडून दिले. त्यावेळेपासून सोन्या पाटलांनी सर्व धंदा सोडून व्यवस्थित वागण्यास सुरुवात केली त्या भागात सर्वसामान्य लोकांना समाधान वाटले. याप्रमाणे सर्व भागात व्यवस्थित काम सुरू झाले.

## कार्यकर्त्यांतील मतभेद

सातारा जिल्ह्यात अच्युतरावांनी स्वतः यावे असा आमचा आग्रह फार दिवसापासून होता व तेही 'येतो येतो' म्हणत; परंतु सर्व भारतातील कामाचा व्याप त्यांच्यावर असल्यामुळे त्यांचे येणे काही घडत नसे. पण शेवटी त्यांनी येण्याचे निश्चित केले व कुंडलला मिटिंग घेतली. त्याप्रमाणे जिल्ह्यातील बहुतेक भूमिगत तेथे एकत्र झाले व त्यांची मिटिंग झाली. मी त्या वेळी खराड्यास होतो. तेथे निरोप आला. नदीस महापूर आलेला. मी, बुवा म्हावशीकर असे होतो. मग बुवांना सांगडीचा आधार देऊन व मी पोहत अलीकडच्या काठास आलो. त्यात घायाळाचा फार मोठा काटा पायात

घुसला व निघेना. तसाच लंगडत लंगडत सुपन्यास आलो. तेथून नावेतून फिरण्यास गेलो. पण पुढे चालणे अशक्य झाले. मग तेथून घोडे घेऊन निघालो. पण वेरळेस पाणी फार. मग बुवा आणि मी पोहत निघालो. अलीकडे पलिकडे गाळ फार होता. मांड्याइतके त्यात रुतलो. पण तसेच निघून पलीकडे जाऊ लागलो. मी पोचलो, पण बुवा घाबरले व खाली वाहू लागले व 'मेलो' म्हणून ओरडले. पण त्यांना धीर देत देत हळू हळू बाहेर काढले व पुढे चालू लागलो. घोडे चालेना म्हणून मधूनच त्याला परत पाठवून दिले व मी एकटाच पुढे चालू लागलो. पाय बराच सुजला. पोलिसांना बातमी गेली. लागलीच पोलिस पार्टी घेऊन आले. सुपन्यातून किरण्यास गेल्याचे व मी पायाने आजारी असल्याचे समजले. घोड्याच्या मालकास आणून मारले. त्याने सांगितले मी चरण्यास घोडे सोडले होते. कोणी नेले मला माहीत नाही. पण दुसऱ्या दिवशी घरी आले. पुढे तपास केला. पण त्यांना काही दाद लागेना. मी सरळ हळूहळू विंग, मालखेड, घोडेवाडी, तांबवे, पलूस ताकारीकडे निघालो. जवळ डोक्यावर १००० काडतूसे होती. कृष्णा नदीस पाणी आल्याने नदीकडून जाण्याचा मार्ग बंद झाला होता. मग रेठरे हरणाक्षच्या हद्दीत आल्यानंतर तेथून गावातील सेवादलातील कॅप्टन बोलवला. गावोगाव सेवादले असल्यामुळे जर कुठे अडचण पडली तर चटदिशी सेवादलाच्या मुलांस बोलावले की ती अडचण दूर होत असे. मला नावाने सर्व ओळखत असत. त्यामुळे रात्री ९ च्या सुमारास मुलगा आला. त्याने जेवण बरोबरच आणले होते. भूक फार लागल्याने तेथे जेवून पुढे त्याला अडचण सांगितली. त्यानेही सांगितले, नदीस महापूर आला आहे. त्यामुळे तिच्या काठचे सर्व रस्ते बंद झालेत. ताकारीस पोलीस पार्टी आहे. तेव्हा आपल्यास अतिशय सावधगिरीने दुसऱ्या मार्गाने गेले पाहिजे. त्याप्रमाणे त्याने अतिशय सावधगिरीने व जबाबदारीने रात्री दहा साडेदहाच्या सुमारास मला कुंडलला पोचवले. त्याला तेथील काही माहिती नसल्याने कुंडलच्या जरा अलीकडेच त्याला परत पाठवून दिले.

कुंडलमध्ये पोचलो, तर जनरल मिटिंगचा कार्यक्रम संपवून खास मिटिंग सुरूवात होणार होती. यावेळी देशात निराळेच वातावरण सुरू झाले होते. पंडितजीशी चर्चा सुरू होती. महात्माजींशी सरकारची बोलणी सुरू होती. त्यामुळे आम्हाला जरी समजले, नाही तरी अच्युतरावांनी आता हे देशाचे ग्रहण संपणार हे ओळखले होते. अगदी गुप्त जागी आम्ही सातच माणसे होतो. १ नाथाजी, २ जी.डी. लाड, ३ नागनाथ, ४ नाना पाटील, ५ मी, ६ किसन वीर, ७ जी.डी. देशपांडे. अच्युतराव मध्ये बसले होते. साताऱ्च्या मंडळींचे यापुढे (काँग्रेस सोशॅलिस्टांबद्दल) काय धोरण राहील यावर चर्चा सुरू झाली. नाना पाटलांनी देवांचे अनुयायित्व स्वीकारणार असल्याचे सांगितले. किसन वीरांनी अच्युतरावांचे अनुयायित्व पत्करू सांगितले. जी.डी. देशपांडे यांना विचारले, त्यांनीही अच्युतरावांचे अनुयायित्व पत्करल्याचे सांगितले. शेवटी मला विचारले, मी सांगितले, 'आधी समतावाद ही गोष्ट मला समजलीच नाही. शिवाय मला

इंग्रजी भाषा येत नाही. त्यामुळे त्यातील मूलभूत वाङ्मय मला वाचता येत नाही. तेव्हा मराठीतील वाङ्मय मला वाचावयास द्या. मी अभ्यास करतो व सहा महिन्यांनी किंवा वर्षांनी आपल्यास निश्चित काय ते सांगतो.' तेव्हा साहेब म्हणाले, 'आम्हास सहानुभूति दाखवता ना?' 'हां जरुर'. 'तेव्हा आम्ही तुम्हास सहानुभूति दाखविणारात (सिंपथायझर) दाखल केले तर तुमची काही हरकत नाही ना?' 'तुमच्याबद्दल सहानुभूति बाळगणारा समजा' म्हणून सांगितले. शेवटी मिटिंग संपली. जिल्हयातील कामासंबंधी चर्चा झाली, व आम्ही उठलो व पहाटे तेथून निघालो ते परत किसन वीर व मी कराडास आलो. डी.जी. देशपांडे यांच्या घरी होतो. तेथून तमा विंगकर यांच्या वाड्यात राहिलो. श्री. यशवंतराव चव्हाण सुटून आले होते. त्यांच्याशी चर्चा केली व एक कल्पना त्यांच्यापुढे मांडली. कराड शहराचा कॉंग्रेस कमिटीचा एक लाख रुपयांचा निधी जमा करून ठेवावा व त्याच्या व्याजातून शहर कॉंग्रेस कमिटीचा व्यवहार नीट चालेल. रोज श्रीमंतांच्याकडे पैशासाठी तोंड वेंगाडावे लागणार नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे एका दिवसात पासष्ट हजारांची आश्वासने घेतली. ते पैसेही ताबडतोब देण्यास तयार होते, परंतु एक लाख रुपये जमवून ते यशवंतरावांच्याकडे देऊन त्याचा कायम निधी करावा अशी माझी कल्पना होती. 'आम्ही मागू तेव्हा देऊ' असे त्यांनी सांगितले. शिवाय पैशाचा व्यवहार हा नेहमी अत्यंत दक्षतेने करावा लागतो अशी माझी कल्पना होती. एखाद्यावेळी पैसे घेतले सरकारला सापडले, किंवा त्याचा अयोग्य व्यय आला, किंवा त्यामुळे मतभेद आले, त्यापेक्षा ते ज्या त्या मालकाजवळ असणे अधिक योग्य म्हणून मीच त्यांच्या कडून पैसे घेण्याची टाळाटाळ केली. नंतर आम्ही तेथून आमच्या मंडळीत निघून गेलो. (किसन वीर) उत्तरभागात निघून गेले व धडाक्याने कामे सुरू झाली.

## गावातील विधायक कामे व गुंडगिरीचा नाश

आमची ही कामे चालली असता जिल्हयात स्त्रियांच्या बाबतीतही कार्य करणाऱ्या मुली धाडसी निघाल्या व त्यांनी कॉंग्रेसचे काम फार झपाट्याने व वेगाने सुरू केले. आमच्या भागात दिनकररावांची (कॉं. दिनकरराव निकम, इंदोली यांची) मुलगी इंदूताई, यशोदा तांबवेकर या दोघींनी घरे सोडून कॉंग्रेसचे स्त्री-मेंबर करणे व स्त्रियांची शिबिरे घेण्याचे काम सुरू केले. यांच्या जोडीला प्रमिला गरवारे वगैरे इतर मुली असत. यांनी कॉंग्रेसचे पाच हजार स्त्री-मेंबर केले, कासेगाव येथे स्त्रियांचे शिबिर घेतले व स्त्रीवर्गात जागृती करून स्त्रियांची सेवादले सुरू केली व तो वर्ग जागृत केला. चांगल्या चांगल्यांच्या स्त्रिया कधी घराच्या बाहेर पडणार नाहीत, खेड्यात तर गोष्टी फार. त्या सभांना फार मोठ्या संख्येने हजर राहू लागल्या व निरनिराळ्या कामात पुरुषांच्या बरोबरीने काम करू लागल्या. पूर्व भागाच्या ग्रुपमध्ये ऐतवाड्याच्या ताई म्हणून काम करीत. त्या आमच्या ग्रुप्समधून रात्रीचाही प्रवास करीत. सुशीलाताई कुबेर ही काम

करीत असत. खानदेशातील भूमिगत कार्यकर्ते उत्तमराव पाटील यांची बायको लीलाताई हिला सरकारने पकडले होते. त्या आजारी म्हणून ससून हॉस्पिटलमध्ये होत्या. तेथे पोलिसांचा खडा पहारा होता. सुशिलाताईंनी लीलाताईंना बेमालूमपणे बाहेर काढून पुन्हा भूमिगत केले, त्याही पूर्वभाग ग्रुपमध्ये काम करीत होत्या. खानदेशाच्या खजिन्याच्या ॲक्शननंतर उत्तमराव पाटील हे या जिल्हयात बरेच दिवस रहात असत. पूर्व भागाशी त्यांचा संबंध असे. तथापि जिल्हयात आमचेकडेही येत असत. त्यांना आम्ही मामा म्हणत असू. मामा-मामीचे जोडपे इकडे आनंदात राही. काही काही ठिकाणी सरकारचे अधिकारी व पोलिस गुंडांच्या गुंडगिरीस प्रोत्साहन देत असत, कारण त्यांच्या प्रतिकारार्थ आम्ही जावे व त्यांनी त्या ठिकाणी आमच्यावर हल्ला करावा अशी त्यांची योजना असे. त्याप्रमाणे त्यांनी कासेगावी गुंडगिरीस प्रोत्साहन दिले. आम्हीही रात्री ४-५ जण हत्यारबंद येत असू. शिवाय दिवसाही राहू लागलो. एक दिवस बाभळीच्या शिवारात माझा मुक्काम होता. तेथे राजाराम बापू भेटण्यास आले. ते नुकतेच वकिली पास झालेले होते. तेव्हा गप्पा झाल्यानंतर त्यांना गावची सर्व परिस्थिती सांगितली. 'हल्लीची वकील वर्गाची शोचनीय अवस्था झाली आहे, त्यापेक्षा मला वाटते, तुम्ही कासेगावात इंग्रजी शाळा सुरू करावी; कारण शिक्षणाशिवाय कायम स्वरूपात गाव सुधारणार नाही.' ही गोष्ट त्यांनाही पटली व त्यांनी लगेच हायस्कूल सुरू करण्याचा निश्चय केला. त्याच्या जुळवाजुळवीस सुरुवात केली. गावात हरीभाऊ देशपांडे व शंकरराव कुलकर्णी काही मुलांना शिकवीत होते. त्या सर्वांना एकत्र करून शाळा काढली. तेव्हा पैशाचा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा मी सुचवले, 'गावात गुजरांची घरे आहेत. ती फार चांगली माणसे आहेत. दानशूर आहेत. त्यांचेकडे मागू या.' प्रथम कोणास शक्य वाटेना. पण विष्णु केशव यांच्यामार्फत त्यांचे मन वळवून दहा हजार रुपये त्यांच्याकडून घेण्याचे ठरवले व जगालाल यांच्याकडून पाच हजार व मगनलाल यांच्याकडून पाच हजार असे घ्यावेत. नंतर काही कमी जास्त होईल ते त्यांच्या इच्छेवर ठेवावे व त्यांच्या संतोषाने घ्यावेत. समक्ष मी मागणे बरे दिसणार नाही म्हणून पांडू मास्तर, बाबूजी यांना पुढे केले व मी त्या वेळी गैरहजर राहिलो. पण त्या वेळी त्यांचे वागणे बरोबर झाले नाही असे मला समजले. गंगाराम शेठजी यांना बोलावून घेतले व दहा हजार द्या म्हणाले. पण त्यांनी इतके कुठे आहेत असे म्हटले, 'काही कमी करू का?' की लगेच पांडू मास्तर म्हणाले, 'बारा हजार द्या'. त्यांनी ती वागणूक ओळखली व नाराज होऊन सर्व पैसे पाठवून दिले. जगालाल व मगनचंद यांच्या इमारती शाळेस वापरण्याकरिता घेतल्या. त्यांच्याकडून पैसे घेतले नाहीत असे समजले. गावातही पैसे जमा केले. त्यामुळे पैशाचा प्रश्न संपूर्णपणे सुटला व नेटाने काम सुरु झाले. गावात संपूर्ण शांतता होऊन गुंडगिरीवर संपूर्ण आळा बसला. आम्ही राजरोस येऊ लागलो. सेवादल स्थापन झाले. वाचनालय सुरू झाले. नारायणराव जोशी यांना बोलावून चरखा संघाची शाखा काढली. सूत काढणे सुरू झाले. त्यांना भांडवल म्हणून दोन हजार रुपये

रोख जमवून त्यांच्या स्वाधीन केले. पुढे पुढे वाटेगाव हे आमचे ठाणे बनले. यावेळी शिराळे पेट्यांतील ग्रुप हजर झाल्याने त्या भागातील सर्व कामे इकडील माणसे जाऊनच करीत असत, पण स्थानिक काम जवळ जवळ बंद पडल्यासारखेच झाले होते व हा ग्रुप फार मोठा वाढला होता. वाटेगावाहून एकदा मी कामेरीस निघालो होतो. वाटेत कामेरीच्या महादू रामोशीची गाठ पडली. तो म्हणाला, 'चला माझ्या मळ्यात'. मग मळ्यात गेलो. तेथे जेवण वगैरे केले. इतक्यात एक माणूस तेथे आला व त्याने सांगितले, कासेगावची माणसे आलीत. तेव्हा त्याने सर्व हकिकत सांगितली व म्हणाला, 'तेथे दोन ग्रुपमध्ये भांडणे आहेत. त्यापैकी मारुती, यशवंत व दत्तू पाटील हे लोक १४०० रुपये घेऊन आले आहेत. त्यांना त्यांची फार भीती वाटते. तेव्हा कामेरीकरांना नेऊन त्या दोघांचा समेट करावयाचा विचार आहे. विठू पाटलांच्या मळ्यात सर्व व्यवस्था केली आहे. तेव्हा तुम्हीही बरोबर चला म्हणजे ते सर्व मिटवून टाकू.' मी म्हटले, 'माफ करा. मला तुमच्याबरोबर येता येणार नाही. कारण आम्ही सतीचे वाण हातात घेतले आहे. आम्हास अतिशय शुद्ध तऱ्हेने राहावयास पाहिजे. जर मी तुमच्याबरोबर आलो तर अतिशय गैरसमज निर्माण होतील. सर्वांना वाटेल, दरोडेखोरांच्यात याचीही पाती-वाटा आहे. तेव्हा खुशाल तुम्ही जा व त्यांची एकी करा, जा. आमच्या दृष्टीने ते दोघेही दोन्ही पार्ट्यांचे लोक त्याज्य आहेत. त्यांची कृत्ये आम्हास पसंत नाहीत.' बरे, म्हणून मग आम्ही दोघांनी निरोप घेतला व मी दुधोंडीस पुढे निघून गेलो. पुढे पांडू मास्तर, बाबूजी वरचेवर कासेगावात येऊन काम करू लागले. या लोकांची गुंडगिरी थांबत नाही म्हटल्यावर ज्ञानू मांग वगैरे लोकाना पकडून डोंगरात नेऊन ताकीद देऊन सोडून दिल्याचे व मारुती, यशवंत यास १००० रुपये दंड केल्याचे त्याने सांगितले. तो पैसे देईना म्हणून त्याचा मळा पाडला. मग त्याने पैसे दिले अशी हकिकत सांगितली. मारुती रामोशी यांची गुंडगिरी, खून, दरोडे, खंडण्या मागणे वगैरे चालूच होते. त्याच्या जोडीस आणखी ज्ञानू वडार वशीकर मिळाला व नरसिंगपूर येथे खून करून ते इकडे शिरले. मग अहमदभाई, बाबू वगैरे ५-६ लोकांनी त्यांच्यावर छापा टाकला व त्यांना पकडले व पाचुंब्रीस घेऊन गेले. नंतर त्यांना शिराळा पेट्यात घेऊन गेले. मी दुधोंडीस होतो. ताबडतोब तेथून निघून मी पाचुंब्रीस आलो. बातमी घेतली. तोपर्यंत ते बिळाशीकडे गेल्याचे समजले व त्यांतील मारुती रामोशी यास अष्ट्याच्या बागवे फौजदारमार्फत हजर केले! ज्ञानू वडार बरोबर होताच. मग मी त्यांना सांगल्यास गाठले व तेथून पुढे त्यांच्या बरोबर राहिलो. ज्ञानू वडार हा त्यांच्या जवळच होता व तो ग्रुपमध्येही राही. पुढे त्यास बरोबर घेऊन कुरळपला जावयाचे ठरले व त्याप्रमाणे गेलो. कुरळपला पोहोचल्यावर त्यास—ज्ञानू वडार—यास फौजदार यांच्याकडे हजर करण्याचे ठरले. पांडू मास्तर कुरळपला आपले गाव किंवा त्याविषयी आत्मीयता जास्त बाळगतात. तेव्हा त्यानी काही निर्णय तेथे दिला होता. तो तेथील लोकांनी मानला नाही. त्यामुळे ते संतापले, व 'जर तुम्ही माझा निर्णय मानत नाही तर दुसऱ्या गावच्या लोकांनी

काय मानावा?' असे म्हणून ते संतापले. ते डोके फिरल्याप्रमाणे काही तरी शरीराच्या चमत्कारिक हालचाली करू लागले, ओरडू लागले, बेशुद्ध पडले. मी त्यावेळी मळ्यात निवृत्तिकाकांच्या बरोबर होतो. 'चला चला, पांडू मास्तर कसे करतात ते पहा,' म्हणू लागले व २-३ माणसे पळत घाबरून आली. मला त्यांच्या स्वभावाची कल्पना होती. मी परत आलो. संतापाचे सर्व होते. भोवती खूप लोक गोळा झाले होते. मग ते सर्व घालवून दिले. खोबरेल तेल आणले, व ते सर्व अंगास खूप चोळले व अंधार करून त्यांना झोपवले. काही वेळानंतर त्यांना झोप लागली व सुमारे चार तासाने मग हा गडी माणसात आला. त्यांच्या स्वभावाचा दोष म्हणजे एकदम रागवणे, चंचल, भावनाप्रधान बनल्यामुळे विचाराचा भाग कमी; त्यामुळे त्यांच्या हातून अतिशय चुका होत व मागाहून ते पश्चाताप पावत व खूप मोठ्याने रडत सुद्धा! पाचुंब्रीस एकदा अशीच स्थिती झाली. नाना पाटलांना अपली जन्मभूमी येडे मच्छिन्द्रला जावे अशी इच्छा झाली. पण त्यांना येड्याची भीती अतिशय वाटे. परिस्थिती तशी काही नव्हती. गाव फार चांगले, माणसेही फार चांगली. पण जर चुकून कोणी नीचपणा केला तर जवळ इस्लामपूर पोलीस ठाणे. मिलिटरी. तेव्हा सर्वांनी बंदोबस्ताप्रमाणे जावयाचे ठरवून पश्चिम भागाचा ग्रुप बाबूजी पाटणकर, अहमदभाई, शेखकाका, श्रीपती बुवा, मी असे सर्व व त्यांचे पूर्व भागाचेही सर्व पोटग्रुपसह हजर झालो, व नाना पाटील यांना आणले. त्यांच्या घरी अगदी उघड ठेवले. त्यांना अतिशय आनंद झाला. त्या गावाच्या सर्व शिवेवर आमची माणसे सुसज्ज रक्षक म्हणून बसली होती. आम्ही एका घरात दुपारी जेवण करून बसलो होतो. माझ्या हातात शेखकाकांची चौदा बारी रायफल होती. बाकीचे सर्व पडले होते. आमची हत्यारे नेहमी लोड, काडतुसे भरलेली असत. तेव्हा कल्पना आली की जर ट्रेगर बेताने काडतुसावर ठेवला तर उडत नाही. एक दोनदा केले. पण जरा कुठे धक्का लागला त्याबरोबर ते उडले. नळी सरळ उभी होती. त्यामुळे पत्र्यास भोक पाडून गोळी निघून गेली व सर्वत्र गडबड झाली. पण ही चूक सर्वांना कळताच सर्व शांत झाले. मग संध्याकाळी जाहीर सभा घेतली. त्यात नाना पाटलांचे व्याख्यान झाले. नंतर आम्ही निघणार इतक्यात प्रश्न निघाला. बाबूराव खोतांची बहीण गोंदीत दिली होती. तिला मुलगा होता व ते पाहुणे तिला जमीन वाटून देत नव्हते. तेव्हा श्रीपती बुवा वगैरे इकडील लोकांनी जी.डी. लाड व नागनाथ वगैरे ग्रुपवर आरोप केला. 'तुम्ही या प्रकरणात पक्षपात करता आहात.' तेव्हा त्यांनी सांगितले, 'तुम्ही निकाल द्या.' त्यावर त्या सर्वांचा विचार ठरला की, "धन्वंतरी" जो निकाल देतील तो आम्हाला मान्य आहे. मग दोन्ही ग्रुप्स व मी गोंदीस गेलो. तेथे मेजवान्या चालू होत्या. नंतर अहंमदभाई, जी.डी. लाड, नागनाथ असे सर्वांना बसवले व मग त्या पाहुण्यांस बोलावून सर्वांसमोर चर्चा करून अखेरचा निर्णय देऊन बाबूराव खोताच्या भाचास जमीन वाटून दिली. सर्वांना आनंद झाला व आम्ही सर्व पाचुंब्रीस परत आलो. पुढे १५-२० दिवसांनी तो पाहुणा त्याच्या पाहुण्याचा वशीला घेऊन पांडू मास्तर

यांच्याकडे आला व अगदी रडून सांगू लागला. बाबूराव खोतांच्या बहिणीस जास्त दिले व मला कमी दिले असे विनवून सांगू लागला. लगेच पांडू मास्तरांना दया आली. मी रानात होतो. मला बोलावून घेतले व म्हणू लागले, 'तुम्ही अन्याय केला. निर्णय बरोबर दिला नाही.' त्यांच्या स्वभावाप्रमाणे दुसऱ्याची बाजू संपूर्ण ऐकून न घेता बडबडत सुटावयाचे त्याप्रमाणे बडबडू लागले व मला म्हणू लागले, 'निर्णय तुम्हीच फिरवा.' असा आग्रह करू लागले. मी सांगितले, सर्व लोकांच्या देखत सर्वांच्या विचारांनी निर्णय दिला आहे. मी फिरवणार नाही. तुम्हास वाटल्यास तुम्ही काहीही करू शकता. माझी काही तक्रार नाही.' त्या पाहुण्यास आपले जणू काही काम झाले असे वाटले. त्याला अतिशय आनंद झाला. पण ज्या वेळी मी सांगितले, या गृहस्थानी १५ वर्षांत खोतांच्या बहिणीस व तिच्या मुलास काही दिले नाही. ती बिचारी भावाच्या घरी येऊन राहिली. त्यांचे पोषण बाबूराव खोतानी केले, घरात भांडणे नकोत व प्रेमभाव वाढावा म्हणून मागील सर्व येणे सूट देऊन ताबडतोब जमिनी निम्मेनिम्मे वाटून कब्जात दिल्या. मला काही अन्याय वाटत नाही, उलट काही आगाऊ गेले असेल तर त्यांच्याकडेच. आता त्यानी त्या विधवा स्त्रीस व अज्ञान मुलास त्रास देऊ नये.' हे ऐकताच पांडू मास्तर या पाव्हण्यावर- गोंदीकरावर-रागावले व म्हणाले, 'मला त्या बाईस मुलगा आहे म्हणून का सांगितले नाहीस? मला वाटले, ती एकटीच बाई आहे. तेव्हा त्यांनी निर्णय दिला तो मला कमीच वाटतो. तू आणखी त्या पोरास द्यावयास पाहिजे.' असे म्हणून व 'मला माझ्या भावाची व पोराची आठवण झाली' म्हणून (त्यांच्या भावाचा खून झाला होता व त्यांच्या अज्ञान पुतण्यास त्यांनी चांगल्या प्रकारे सांभाळले होते) रडू लागले.५०-६० माणसे बसली होती. सर्वांत गडबड सुरू झाली. या गडबडीचा फायदा घेऊन गोंदीकर व त्यांचा पाव्हणा पळून गेले. त्यांनी मागेसुद्धा पाहिले नाही; कारण त्यांची समजूत, न जाणो, परत बोलावून आणखी जमीन व त्यांच्या खाल्लेल्या उत्पन्नाची भरपाई म्हणून काही सांगितले तर पंचाईत! नंतर पांडू मास्तरांनी पुन्हा मला बोलावून घेतले व भावनेच्या भरात मी तुम्हास काही तरी बोललो, राग मानू नका वगैरे म्हणून सर्व स्थिरस्थावर झाले. त्यामुळे ते कितीही रागावले अगर संतापले तरी मी तेथे आलो व काही सांगितले तर ते मानीत असत व आदराने पाहात. त्यांच्या स्वभावातील दोष काढून टाकला तर ते गृहस्थ अतिशय वरच्या दर्जाचे यात शंका नाही. देशाविषयी खरी तळमळ, त्याग, ध्येयनिष्ठा, मोकळ्या मनाचे, धाडसी, सत्याविषयीची प्रीती, स्पष्ट वक्तेपणा इत्यादी गुणात त्यांचा नंबर फार वरचा होता यात शंका नाही. नंतर आम्ही कुरळपहून निघून पाचुंब्रीस आलो व ज्ञानू वडार यास हजर करण्याकरता कुरळपच्या तात्या पाटील वगैरे लोकांच्या स्वाधीन केला; पण तेथून तो १-२ दिवसात पळून गेल्याचे समजले.

निवृत्ती काका कुरळपकर ही व्यक्ती आम्हा भूमिगतात जी वरच्या दर्जाची माणसे होती त्यांपैकी एक अत्यंत विचारी, हुषार, ध्येयनिष्ठ, औषधांचा व्यासंग, लेखनाची

हौस, ते खूप लिहीत. कोणत्याही गोष्टी घडवून आणण्यासाठी कुवत मोठी, प्रसिद्धिविन्मुख, विनयशील, प्रेमळ, गोड स्वभाव व अंगात वक्तृत्वाची कला मोठी, वाचनाची आवड व व्यासंग, पल्लेदार विचार यामुळे सर्वांचा त्यांच्याबद्दल आदर मोठा. प्रथम ते वसंतरावांच्या ग्रुपमध्ये काम करीत होते. वसंतराव पकडले गेल्यानंतर त्यांचा आमचा संबंध आला व आमच्यात ते पुढे कामे करू लागले. ज्या वेळी जिल्ह्याचे विभाग केले, त्यावेळी त्यांना सुपने-तांबवे या भागात जबाबदार म्हणून टाकले. तांबव्याचा ग्रुप त्यांच्या हाताखाली दिला होता. त्याने त्या भागात अतिशय उत्तम काम केले. कारण तेथील लोकांना कामाची दिशा नव्हती व आपापसात मतभेद जास्त, म्हणून त्यांची तेथे नेमणूक होती. त्यानी ग्रुपमध्ये प्रेम निर्माण करून अखेरपर्यन्त फार चांगले काम केले. वसंतरावांची माणसे—जी.डी. पाटील, नांद्रेकर, आदगौंडा पाटील, धोंडीराम माळी, खोत, श्याम वगैरे. या लोकांचा परिचय व त्यानी आमच्यात सामील होणे हे सर्व निवृत्तीकाकांच्या मुळे झाले. जी.डी. ना विध्वंसनाची किंवा न्यायदान मनापासून कधीच आवडत नसे. आमच्यातून काम करीत; पण त्यांना लोकांची नीती सुधारावी व भारतीय तरुणांच्या अंगात सद्‌गुण कसे येतील? व ते संस्कारयुक्त कसे होतील यावर त्यांचा भर असे. आमच्या भूमिगतात सुशिक्षित पदवीधर माणसे फार थोडी. त्यात हे ग्रॅज्युएट म्हणून नेहमीच आम्ही त्यांच्याकडे आदराने पाहत असू. धोंडीराम माळी, खोत वगैरे राष्ट्रीय वृत्तीचे, धाडसी व सद्‌गुणी तरुण. पण यांचे आमचे घनिष्ठ संबंध फार कमी आले.

कासेगावात आता खूपच फरक झाला होता. पूर्वीचे सर्व वातावरण बदलून निवळले होते व सर्व लोक अतिशय सहानुभूतीने वागू लागले. पांडू मास्तर, बाबूजी वरचेवर येऊ जाऊ लागले व नवीन नवीन मुले ज्ञानू, नाथा पाटील, तुका पाटील, महादू नांगरे, राजाराम औंधकर, काका वाणी, बापू माने, नारायण माने वगैरे येऊन आमच्याशी संबंध ठेवू लागले व संबंध वाढत चालला. तोपर्यंत हरी बावडयाची मारामारी होऊन त्यातून मारुती गावडे व रघुनाथ गावडे फरारी होऊन तेही बाबूजीच्या ग्रुपमध्ये येऊन मिसळले. नारायण माने मिलिटरीतून पळून आला, म्हणून तोही मिसळला. बंडा सोनटक्केही येऊन मिसळला. तेव्हा बाबूजीने मला विचारले, 'ही मुले आलीत, काय करावयाचे.' मी त्यांना एवढेच सांगितले की पारखून घ्या, नाहीतर त्रासदायक होईल. पण ती सर्व अखेरपर्यन्त चांगली राहिली. पांडू मास्तर बाबूजींच्या ग्रुपमध्ये पुढे नेहमी राहू लागले. ते त्याला शिष्य मानीत, तो त्यांना गुरुजी माने. कधी कधी चेष्टेने माझी मुलगी त्याला (बाबूजींना) देऊन मी जावई करून घेणार आहे म्हणत. त्यामुळे जावईही म्हणत! कासेगांवी जसा संबंध जास्त येऊ लागला तसे मी त्यांना सांगून ठेवले होते. 'जर काही काम करावयाचे झाले तर माझ्या संमतीशिवाय करीत जाऊ नका, कारण मला तेथे राहावयाचे आहे. माझी जन्मभूमि आहे. मी तेथील लोकांच्या अंगाखांद्यावरून खेळलो आहे. तेव्हा तेथील धोरण हे नेहमी विचाराने संयमपूर्वक आंखले गेले पाहिजे.'

अर्थात् ही गोष्ट त्यांनी मानली होती व अखेरपर्यंत त्यांनी ती पाळली होती. कासेगावच्या काही लोकांच्याबद्दल प्रवाद उठले. भिका रामजी, विष्णु पाटील यांनी लेव्हीचे सरकारकडून पैसे आणले पण लोकांना दिले नाहीत. आकाराम गुरव ह्याने दारू पिऊन पैशाच्या जोरावर ज्ञानू शिद्यांची बायको रखेली म्हणून ठेवून गुंडगिरी सुरू केली आहे. विश्वनाथ मोहिते याचा लोहिगडघांच्या खुनाशी संबंध होता. रामचंद्र विष्णू कुलकर्णी हा पोलिसांत सारखा फिरून काँग्रेसवाल्या भूमिगतांच्या बातम्या देतो व बाबूजी पाटणकर यांचा पाठलाग केला इ. बाळकृष्ण आप्पाजी पाटील हे मला पकडून देण्याच्या खटपटीत आहेत. आम्ही सर्व बसलो व वरच्या गोष्टीबद्दल काही शासन केले पाहिजे व गुंडगिरी थांबवली पाहिजे म्हणून विचार झाला. बाळकृष्ण पाटलांची भैरेवाडीस गाठ घेऊन त्यांना सर्व समजावून सांगितले. 'तुमच्यासारख्या घरंदाज माणसांचा हा उद्योग नव्हे. हे सोडून द्या. तुमच्या आमच्या घरांचा खूप दिवसांपासून संबंध आहे. जरी आपली घरे निरनिराळी असली तरी आपण सर्व एका घरासारखे वागत आलो आहोत. तुम्हास मला पकडून द्यावयाचे आहे का? चला, मी बरोबर येतो व पंच्याहत्तर हजार रुपये मिळवा.' त्यांनी सांगितले, 'हे सर्व साफ खोटे आहे. मी तुम्हास माझा थोरला भाऊ म्हणून मानतो.' तेव्हा त्यांना सांगितले, 'आमच्याकडे तशी बातमी आली आहे. तेव्हा माझ्या जबाबदारीवर तुमचा विश्वास देतो.' मग मी बाबूजी वगैरेंना त्यांच्याबद्दल काळजीचे कारण नाही म्हणून सांगितले व पुढे आमच्याशी ते आमच्यापैकीच एक म्हणून वागले. नंतर रामचंद्र विष्णूला मी स्वतः शिक्षा करतो म्हणून सांगून २-४ माणसे घेऊन पाचुंब्रीस आलो. रात्री तो पाणी नेत होता. त्यास पकडून शिक्षा केली. त्यानेही सर्व सोडून देऊन तो बाबूजींचा दोस्त बनला. एक दिवस रात्री पांडू मास्तर, बाबूजी, मी व इतर ग्रुपमधील १५-२० लोक मिळून कासेगांवी आलो व बाकीच्यांना शिक्षा करावयाचे असे ठरविले. मी त्या दोघांना म्हटले, 'शारीरिक शिक्षेपेक्षा आर्थिक दंडाचेच धोरण अधिक ठेवा.' अलीकडे १०-२० वर्षात माझा कासेगांवचा संबंध तुटल्यामुळे ही माणसे अशी वागत असतील याची कल्पना मला नव्हती. त्यामुळे चौकशीत काही निर्माण झाले तर शिक्षा म्हणून मी निर्धास्त होतो. प्रथम आकारामाच्या घरावर गेलो. तो गवळघाच्या वाडघात झोपला होता. खूप हाका मारल्यावर त्याने दार उघडले. त्याच्या तोंडाला दारूचा वास येत होता. बाई कुठे आहेत? म्हणून विचारले. त्याने नाही म्हणून सांगितले. पण खोलीचे दार उघडले तर बाई. मग माझे काही अंदाज खरे ठरले नाहीत. त्यांचे बरोबर ठरले. मग त्यांनी त्यास चारपाच चापटघा मारल्या. मी म्हटले, 'मारु नका, त्याला पैशाचा दंड करा.' मग पांडू मास्तर यानी पाचशे रुपये दंड केला व तो वसूल केला. बाळा, लखू माळघावरही काही आरोप होते. त्याच्याकडून दोनशे दंड घेतला. पुढे विष्णु रामाजीकडे निघालो. पांडू मास्तरांच्या स्वभावात दोष असा होता की ते कोणी विरोध केला की खवळून उठून दुप्पट शिक्षा द्यावयाची. कोणी म्हटले, गुरुजी हे पैसे जास्त होतात की मग दुप्पट सांगावयाचे. विष्णुशास्त्री सुद्धा निश्चयी व धाडसी.

तेव्हा तेथे काही होऊ नये म्हणून त्यांचा वरचा आरोप खरा हे समजून घेऊन मी हळूच मधल्या वाटेने त्यांच्या अंथरुणाजवळ जाऊन त्यांना उठवून आम्ही येत आहोत; तेव्हा जो दंड तुम्हास करतील, तो मान्य करा, पुन्हा आपण पाहू, असे म्हणून सांगून पुन्हा यांच्या ग्रुपमध्ये येऊन सामील झालो. विष्णु रामजी यांच्या येथे काहीतरी होणार अशी सर्वांच्या मनातील कल्पना, पण आम्ही तेथे गेल्यावर पांडू मास्तर यांनी त्यांना सांगितले असा तुमच्यावर आरोप आहे. त्यांनी सांगितले बरे, मग मी तुम्हास एक हजार दंड करतो. ते म्हणाले, 'बरं', 'आताच्या आता पैसे घ्या.' मी म्हटले, 'आता कोठून देणार? पुन्हा ते देतील. मग तेथून पुढे निघालो. रामू परटाच्या इथे नुसती ताकीद दिली व भाऊकडे गेलो. गुंडगिरी करतो असा त्याच्यावर आरोप होता. म्हटले, न्हावी माणूस. लोकांची उष्टीखरकटे खाणारा, गरीब माणूस, तेव्हा तो कशाची गुंडगिरी करणार? त्याला ताकीद द्या व पुढे चला. मग त्याला ताकीद देऊन विश्वनाथ मोहित्यांच्या घराकडे निघालो. विश्वनाथ यास बाहेर काढला व त्याने संबंध असल्याचे कबूल केले. मग काहींच्या मनात आर्थिक दंडाची कल्पना आली. पण तो गरीब कर्जबाजारी माणूस, त्याला दंड केला तर बायकापोरं उपाशी मरतील म्हणून मारल्यावर बंद करा, म्हणून सांगितले व त्याला घरी पोचवले. तेथून सर्व पाचुंब्रीस परत निघून आलो व मी उत्तर भागाच्या ग्रुपकडे निघून गेलो. अधूनमधून ज्या वेळी मी येत असे त्या वेळी सर्व झालेले काम मला सांगत असत व पुढे करावयाच्या कामासंबंधी सुद्धा चर्चा करीत असू. त्यामुळे जरी कामाशी प्रत्यक्ष संबंध नसला तरी सर्व गोष्टींशी अप्रत्यक्ष का होईना संबंध असे. रामोश्यांनी जवळजवळ सर्व कामे बंद केल्यासारखे होते. आता वरच्या अधिकाऱ्यांचे दडपण आले की ते कासेगावच्या फराऱ्यांना पकडून देतो, असे सांगत असत; पण त्या बाबतीत त्यांची फारशी कधी हालचाल नसे. वाटेगावच्या रानात मी, पारिस काका बसलो होतो. एवढ्यात तुकाराम गोविंद व काका वाणी हे दोघे भेटावयास आले व म्हणाले, 'यशवंत रामोशी व तुकाराम रामोशी तुम्हास पकडून देण्याच्या खटपटीत आहेत. ते दोघे फरारी आहेत. त्यांना आम्ही पकडून देतो.' मी त्याला विरोध केला. कारण पकडून दिल्याने काय होणार आहे? दोन ते तीन महिन्यात फिरू लागतील व कितीही गुप्तपणाने तुम्ही काम केले तरी ते उघड होणार व मग ते तुमची नुकसानी करण्यास प्रवृत्त होतील व तुम्हास त्रास होईल. त्यापेक्षा तुम्ही त्यांची उपेक्षा करा. आम्हास पकडून देण्याची त्यांची कुवत नाही. ते मला 'बरं' म्हणाले पण हा सल्ला त्यांना मानवला नाही. पारिस काकांचा हेतू निराळा. वाईकर फौजदारमार्फत हे फरारी पकडले म्हणजे त्यांना प्रमोशन मिळेल व त्यांना अगदी निर्धास्तपणे घरात राहून उघड भूमिगत म्हणून राहावयास हरकत नाही! म्हणून त्यांनी मला अलग बाजूला ठेवून परस्पर संगनमत होऊन तो बेत पार पाडला. त्या दोघांना वाईकरमार्फत पकडून दिले. वाईकरांचे बस्तान बसले. यांना चांगल्या तऱ्हेने राहता येऊ लागले. पुढे चार महिन्यांनी ते दोघे सुटून आले. उघड फिरू लागले व तुकाराम

गोविंद यांची बाभळ चोरीस गेली व वाडा पेटवून दिला. झाले, सर्व गोंधळ उडाला व ते घाबरुन माझ्याकडे आले. आता काय करावे, काय करावे म्हणून घायाळ होऊ लागले. मी म्हटले, 'जा आता पारिस काकांकडे. आता बाबा विव्हळून काय होणार? कोणत्याही गोष्टीचा संपूर्ण विचार केल्याशिवाय असे केले की त्याचा परिणाम हा असा होणारच. पुढे बाबूजींनी काही तरी पैसे दिले व घर बांधले. बाबूजी हा तरुण, उमदा, धाडसी, राष्ट्रीय वृत्तीचा, पण काही दोषही त्यांच्यात होते. भावनाप्रधान जास्त. माणूस पारखण्याची खोल बुद्धी कमी. त्यामुळे त्यांच्याकडे कोणी रडत आला की तेच त्याला खरे वाटू लागे व लागलीच निर्णय घेई. बोलता बोलता एकदम संतापत असे व मग त्याचे त्याला सुद्धा भान रहात नसे. त्याने कासेगावची बहुमोल सेवा केली. त्याने चांगल्या बुद्धीने ज्या गोष्टी केल्या त्याचे परिणाम उलटे झाले व त्याला भोगावे लागले. शिराळा पेटयातील ग्रुप हजर झाल्यानंतर पेटयातील कामे बाबूजींचा ग्रुपच तेथील स्थानिक कार्यकर्त्यांच्या सहाय्याने काम करत असे. जी.डी. लाड व मी सर्व कोकण भागातून दौरा करुन गोटेवाडी, येळगांववरुन परत आलो. गोटेवाडीस आल्यानंतर जंगल घेण्याची कल्पना सुचली. मग जंगलतोड घेतली. त्या व्यवहारात जी.डी. चे पैसे मुद्दल परत जाऊन नफा म्हणून पाच हजार रुपये उरला. तो त्यांनी मागितला. पण हा नफा आमच्या श्रमामुळे झाला आहे, तेव्हा तो आमच्याकडेच राहू द्या, असा बाबूजींचा आग्रह पडला. त्यावरुन ते सार्वजनिक पैसे म्हणून बाबूजींच्याकडे राहिले. पुढे बाबूजींच्या मनात आले. ह्या पैशाचा उपयोग करुन जर स्वतःचे उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करता आले तर फार उत्तम होईल. म्हणून या भांडवलावर मुंबई येथे सोडा वॉटरचे दुकान काढावे अशी त्यांनी कल्पना काढली. म्हणजे एक वर्षात भांडवल परत सार्वजनिक कॉंग्रेस कमेटीच्या स्वाधीन करता येईल व स्वतःस स्वतःचा व्यवस्थित उद्योग सुरु होईल. जिल्हयातील सर्व कार्यकर्त्यांना ही कल्पना पटली व त्यास पैसे गुंतवण्यास परवानगी दिली. त्यांचे अत्यंत जिवलग स्नेही खासेराव माने म्हणून येळगावचा एक गृहस्थ होता. त्याच्यावर त्यांचा फार मोठा विश्वास. खटपट करुन गिरगावरोडला एका सुंदर वळणावर अशी जागा त्या मालकास सर्व परिस्थिती सांगून मिळवली. त्याने आनंदाने दिली. नंतर तेथे अतिशय सुंदर दुकान थाटले. मी व डी.जी. देशपांडे दोघेही सारखा बाबूजीस आग्रह करुन काही तरी करारपत्र करुन ठेवू या असे म्हणू लागलो. पण काही केल्या त्यांना ते पटेना. ते म्हणू लागले, काहीतरीच तुमचे असते. अशी कल्पना तरी तुमच्या मनात कशी येते? त्याने जरी काही मनात आणले तरी त्याचे काही चालणार नाही. येळगावला त्याचे घर, जमीन वगैरे आहे. स्वतःच्या शक्तीची भलतीच कल्पना करुन घेऊन ते घमेंडीत गेले. तरी माझा नेहमी तगादा असेच. आपण जरी भूमिगत असलो तरी अॅग्रिमेंट करण्यास काहीच हरकत नाही. बाबूजी सरळ बुद्धीने वागत होते व खाशाबा अत्यंत मायावीपणे वागत होता. तो व्यसनी असल्यामुळे मला त्याच्याबद्दल कधीच आदर वाटला नाही. तो बाबूजींची नेहमी स्तुती

करी. त्यांच्या धैर्याची, शक्तीची तारीफ करी. त्यामुळे हे सर्व निश्चित होते. खाशाबाने सर्व भूमिगत म्हणून आपल्याच नावाचा भाडेपट्टा करुन घेतला व दुकानासही आपले नाव दिले. तरीही बाबूजींचा त्यांच्यावर विश्वास होता. पण एक दिवस त्यांना संशय आला तेव्हा त्यांनी विचारले तर तो म्हणाला, 'तुमचे पैसे तुम्ही घेऊन जा. दुकान माझे आहे.' एवढ्यात सर्व बाहेर आलेले होते. मग २-३ जण मुंबईस गेले व त्याला दुकानाबाहेर हाकलून देऊन बाबूजी गल्ल्याच्या पेटीवर बसले. पण त्याने ताबडतोब फौजदारी केली. दुकान एका बाजूस राहिले, पण त्यातून सावरता सावता त्यांची पुरेवाट झाली. नंतर डी.जी. नी खूप प्रयत्न करुन त्यातून सर्व मुक्त झाले. खाशाबावर फिर्याद करुन ते सर्व पैसे वसूल केले. ते पैसे राजाराम बापू यांनी हायस्कूलकडे खर्च केले म्हणून सांगितले व त्यावर पडदा पडला.

## आघाडीचे वीर पकडले गेले!

शेवटी शेवटी बाहेरचे काम सर्व करीत माधवरावांच्या ग्रुपमध्ये काम करीत होतो. कामाचा जोर अतिशय वाढला. त्या बरोबर जिल्हयातसुद्धा पोलिस, मिलिटरी यांचे प्रेशर वाढले. तेव्हा जिल्हयातील सर्व मंडळींनी बाहेर पडावे असे आदेश डिक्टेटर किसन वीर यांच्याकडून आला. परंतु आमच्या ग्रुपमध्ये जिल्हयाबाहेर जावयाचे नाही असे ठरवले, कारण जिल्हयात फारसा खर्च येत नसे व बाहेर जावयाचे याचा अर्थ मुंबईस जावयाचे. मुंबईस फार खर्च येत असे. माझ्यासारख्याला अडचण येत नसे, पण सामान्य अनुयायांची फार पंचाईत होत असे. कोणाचा कोणास फारसा पत्ता लागत नसे. मग कोणाच्या तरी दारी जाऊन कसे करी राहावे लागत असे. ज्याच्याकडे राहू ते मग ज्याच्याजवळून पैसे मिळतील, त्यांच्याकडून घेत असत व ती दीनवाणी परिस्थिति मला आवडत नसे. या वेळी आमच्या ग्रुपमध्ये तीस लोक होते. तेव्हा इतक्यांची व्यवस्था लावणे मला शक्य नव्हते व वरच्या लोकांवर विश्वास ठेवून आपले स्थान सोडावे असे वाटेना. म्हणून आम्ही जावली तालुक्यात शिरण्याचे ठरवून तारळे खोऱ्यातून जांभेभांबे इकडे वर निघालो आणि वरती तसे कळवून टाकले. नडशीपासून वर निघालो त्या वेळी बाबूराव काळे कामानिमित्त कराडास गेले व ते पकडले गेले असे समजले. तेव्हा त्यांना ठोकल्यावर आमचे सर्वांचे पत्ते कळतील म्हणून ताबडतोब तारळ खोऱ्यांतून वर निघालो. तिकडील पत्ते त्यांना माहीत नव्हते. लुगडेवाडीच्या वर मुक्काम होता. बुवा म्हावशीकर आमच्यात येऊन मिसळले. पुन्हा बातमी आली की बाबूराव काळे पकडले गेले नाहीत. तेव्हा त्यांना या भागात आणणे जरुरीचे होते व त्यांना आम्ही कोठे आहोत हे समजणार नाही व ते पुन्हा पोलिसांच्या जाळ्यात अडकतील म्हणून त्यांना ताबडतोब वर आणण्याचे ठरले. डॉ. काळे प्रथम निघाले, पण माधवराव म्हणाले, मी खाली जातो. माधवराव नेहमी निधड्या छातीने, उघडेपणाने सर्व भागात वावरत म्हणून त्यांनी जाऊ नये असा माझा आग्रह होता. पण डॉ. काळे म्हणाले मी त्यांना सांभाळून आणतो.

या वेळी आमच्या कार्यक्षेत्रात पोलिसांचे जाळे विणले गेले होते. त्यामुळे आम्हास त्यांनी जाणे धोक्याचे वाटत होते व जाऊ नये असेच वाटत होते. म्हणून आम्ही त्यांना जाऊ नका असेच म्हटले होते. तथापि त्यांनी जाण्याचा आग्रहच धरला. त्यामुळे सर्वांनी त्यांना निरोप दिला. तेथून दोन दिवसात वर डोंगरावर येतो म्हणून त्यांनी सांगितले होते, पण तीन दिवस झाले त्यांचा पत्ता नाही; उलट तीन हजार पोलिसांचा छापा पडला. आमची नेहमीची पद्धत अशी होती की कधी एका ठिकाणी राहावयाचे नाही. त्यामुळे माधवराव खाली गेले की आम्ही लगेच डोंगरावर दुसऱ्या मुक्कामास गेलो व फार मोठा छापा आला आहे म्हणून बातमी आली व जसे आम्ही या भागात ज्या ज्या गावावरुन व ज्यांच्या ज्यांच्या घरी उतरलो त्यांच्या घरावरही छापे पडले, त्यांना पोलिसांनी ठोकले, मारले, पण त्याना आमचा पत्ता लागला नाही. तेव्हा शेवटी निराश होऊन ते परत निघून गेले. पण माझे मन चरकले व मनास सारखी हुरहुर लागली. मन बेचैन झाले. बुवांना म्हटले, जरा चौकशी करा. माधवराव का परत आले नाहीत? तेव्हा बुवांनी बातमी आणली वाघावच्या पुढे घोणशीच्या हद्दीत माधवराव पकडले गेले. आम्ही सर्व दु:खसागरात बुडून गेलो. पुन्हा चित्त शांत झाल्यावर मी असे ठरवले की खाली जावे काडतुसे व इतर सामान ठिकठिकाणी हलवावे; कारण माधवराव यांना खूप मारणार व नंतर ते सामान ज्यांच्याकडे ठेवले ते पकडले जाणार. सामानही जाणार। म्हणून बाकीची माणसे बुवांच्या स्वाधीन करून सर्वांना व्यवस्थित सांभाळण्यास सांगून मी ताबडतोब जळूवरुन दुसाळघास आलो व तिकडील माहिति घेतली तेव्हा सर्वत्र हलकल्लोळ उठला आहे, असे कळले. तेव्हा तुम्ही खाली जाऊ नका. कॉ. दिनकरराव निकम, इंदोलीकर, डेखणकर, राऊ पाटील, खाशाबा सोमण, डॉ. काळे, बी.बी. काळे वगैरे सर्व लोक पकडले गेले आहेत। मग जास्तच काळजी, दु:ख वाटले व या सर्व मंडळींना तुरुंगातून सोडवता आले तर पाहावे. असाही विचार आला. शिवाय निरनिराळ्या वस्तू कोठे ठेवल्या आहेत, आमची आश्रयाची स्थाने, सर्व जिल्हाभर प्रवास करण्याचे मार्ग या सर्व गोष्टी पोलिसांना माहीत असल्यामुळे सावधपणे राहावयास पाहिजे; कारण आपणहून कोणी काही सांगेल असे नाही, पण मारापुढे काय करणार? म्हणून नेहमी आम्ही कोणी पकडला गेला की लागलीच त्याला काय काय माहीत आहे याची कल्पना आम्हाला असे. तेव्हा त्या सर्व गोष्टीपासून सावध असावयाचे हा आमचा क्रम असे.

## कराडच्या गुंडाला पत्री!

पोलिस मारताना सुंद्री भरमाप्पा यांचा उपयोग करीत असत. जसे आमच्या मारास 'पत्री' हे टोपण नाव असे तसे एक कातडयाचा चांगला कमावलेला व ज्याचा मार चांगला बसेल असा पट्टा घेऊन त्या पट्ट्याने मारीत. कुल्ल्यावर चुन्याचे पाणी मारावयाचे व त्यावर त्या सुंद्रीने मारावयाचे. मार अतिशय लागतो. त्यानंतर पाय लांब करुन

बसवावयाचे व त्यावर काठी आडवी ठेऊन इकडे तिकडे २-२ माणसांनी उभे रहावयाचे. बुटाच्या लाथा, बुक्क्या यांच्याबरोबर वेताच्या छडीने मारावयाचे! कित्येक वेळा रक्ताच्या चिळकांड्या उडत असत! कराडइतका मार जिल्ह्यात कुठे नसे. मारण्याचे प्रमाण इतरत्र कमी असे. शिवाय कराडला किशा न्हावी म्हणून एक तगडा पैलवान गृहस्थ होता. तो नेहमी पोलिसातून हिंडे. देशभक्तांच्या खटल्याकरता पंच, साक्षीदार कोणी मिळत नसत. प्रत्येक कामात साक्ष पंच म्हणून सदू जंत्रे वगैरे असावयाचाच! दारु, बाया, गुंडगिरी यात तो प्रमुख होता. आजच्या वॉरंटवाल्यांपैकी कोणास पकडले की पोलिसांनी तर खूप मारावयाचेच, पण शिवाय रात्री साडेबारा वाजता मिशाचे कल्ले राखलेले, लहरी रंगाचा फेटा, हातात वीतभर कुऱ्हाड घेऊन दारु पिऊन बेभान होऊन काँग्रेसच्या फराऱ्यांना शिव्या देत स्वारी किशा न्हाव्याच्या तेथे यावयाची व त्याने पकडलेल्यांना पुन्हा शिव्या व मार द्यावयाचा व बाकीचे फरारी कुठे आहेत? राहतात कुठे? म्हणून विचारावयाचे व पुन्हा मारावयाचे. त्या फराऱ्यांच्या किंचाळण्याने सर्व कचेरीचे वातावरण भरुन जाई व हा आक्रोश इतरांना मुद्दाम ऐकविला जाई. का तर इतरांनी भिऊन माहिती सांगावी. माराची दहशत बसावी. या किशा न्हाव्याच्या लीला आमच्या कानी आल्यानंतर आम्ही त्यास निरोप पाठवले. 'बाबा, असे तू करू नको. याचा परिणाम बरा होणार नाही. आमची चळवळ स्वातंत्र्याची. तुला पसंत नसेल तर गप्प बैस. पण अशा तऱ्हेने अपशब्द वापरणे, मानभंग करणे, मारहाण करणे, पैशाच्या लोभाने अगर खोट्या मानाच्या लोभाने असे करणे बरोबर नाही. हे सर्व तू सोडून दे. असे आमचे तुला हात जोडून सांगणे आहे.' त्याचा परिणाम बरा न होता उलट विपरीतच झाला व तो शेफारुन पोलिसांच्या बळावर अतिशयच अत्याचार करु लागला. कराड सोडून बाहेर कुठेही पडेना. शेवटी आम्ही ठरवले की वाटेल ते झाले तरी त्यास शिक्षा करावयाची. त्याच्या दुर्दैवाने व आमच्या सुदैवाने त्याला इंदोलीस येण्याची बुद्धी झाली व तो इंदोलीस आला. त्याचा पाहुणा रानात राहात होता. तो त्याच्या वस्तीवर आला. ते दिवस उन्हाळ्याचे होते. सकाळी न्याहारी करुन एका जवळच्या आंब्याच्या गर्द सावलीच्या झाडाखाली तो झोपला होता. आम्ही तेथून अर्ध्या मैलावर पान मळ्यात मी, माधवराव, बाळ भुरके, बाबू नलवडे, राजकुमार, किशा असे होतो. एकाने इतक्यात बातमी आणली किशा न्हावी येथे आला आहे. सर्वांचा विचार झाला की, ही संधी सोडावयाची नाही. मग सर्व उठलो. सर्व दिशांनी कोंडाळे करुन त्या व्यक्तीच्या रोखाने निघालो. किशा न्हावी अत्यंत हुषार, चपळ, तगडा जवान व धाडसी होता. त्यामुळे जर तो पळू लागला अगर अंगावर चालून आला अगर अन्य काही युक्ती योजू लागला तरी त्याला गोळी घालून ठार करावयाचे असे आम्ही ठरवले. त्यामुळे अत्यंत सावधगिरीने चाललो होतो. त्या वस्तीजवळ येऊन पाहिले तर तो नजीकच्या आंब्याखाली पडलेला, झोपलेला होता. आम्ही सर्व हत्यारबंद होतो व दुपारी बाराची वेळ. सर्व शिवारातील लोक, काय विशेष होणार म्हणून टवकारुन पहात होते. नंतर त्याच्याजवळ आम्ही

सर्वजण जाऊन कडे केले व मग मी त्यास हाक मारली, 'किसन ऊठ.' त्याने डोळे उघडले. मला ताबडतोब ओळखले व हात जोडले व माझे म्हणणे ऐका म्हणून सांगितले. मी ठीक आहे म्हटले. पण येथे नाही. चल येथून दूर जाऊ, कारण जवळच पोलिस ठाणे आहे. शेकडो लोक पहात आहेत. पण त्याच्या पापामुळे त्याला खात्री झाली की हे लोक आता आपणास शिक्षा केल्याशिवाय सोडणार नाहीत. म्हणून तो येण्यास आढेवेढे घेऊ लागला. एका क्षणाचाही विलंब न करता त्यास उचललाच. मग मात्र तो कसातरी चालू लागला. आडोशास गेल्यानंतर म्हटले, 'सांग तुझे काय म्हणणे ते.' त्याने सांगितले, 'मी सर्व केले आहे. मी तुमच्या लोकांना पकडून देण्याचा प्रयत्न केला आहे. हे सर्व जरी मी केले असले तरी "मला क्षमा करा." पण तो क्षमा करण्यासारखा माणूस नव्हता. क्रिमिनल गुंड होता व त्याचा आजपर्यन्तचा हा धंदा होता. त्यामुळे याला क्षमा करणे म्हणजे आपल्यावर पुन्हा फार मोठी आपत्ती ओढवून घेणे व त्याच्या सर्व पहिल्या धंद्यांना ऊत यावयाचा. म्हणून ताबडतोब पाय बांधले व तडाखे देण्यास सुरुवात केली. त्याला किशाने एका बाजूस धरले व एका बाजूस बाबू नलवडे याने धरले होते. किशा म्हणाला, 'मालक, पुरे आता. पण त्याने लागलीच खांद्यावर काठी होती तीही खाली केली. ते मला आवडले नाही. त्यास एक तडाखा दिला. नंतर पुन्हा थोडे तडाखे देऊन किशा न्हाव्यास मोकळे केले व असे करु नको म्हणून ताकीद देऊन आमच्याबरोबर चालवीत आणून त्याच्या वस्तीवर सोडले व त्याच्या पाहुण्यास मिठाच्या पाण्याने त्याला शेकण्यास सांगून आम्ही निघून गेलो. ही बातमी कराडसह सर्व भागात झाली. त्यामुळे सरकार कडच्या असणाऱ्या सर्व डाकूंना व चोरट्याना मोठा हादरा बसला व शहराच्या आश्रयाने राहून गुंडगिरी करणारे पांढरपेशे सुद्धा घाबरले. नंतर किशा न्हाव्याचा भाऊ येऊन त्याने त्याला घेऊन कराडच्या दवाखान्यात नेले. जाताना त्याचा भाऊ कचेरीसमोर अक्षरक्षः बोंबलला। पोलिस व फौजदार यांना तो म्हणाला, 'तुमच्या संगतीने माझा भाऊ मारला गेला.' नंतर पाचसहा दिवस त्याच्यावर कराड दवाखान्यात उपचार केले; पण दहशतीमुळेच तो त्यात खलास झाला. ही बातमी आमच्या कानावर आली. आम्हासही बरे वाटले नाही, कारण तो मरावा अशी काही आमची इच्छा नव्हती. कारण आम्ही त्याच्या पायाने त्याच्या वस्तीवर त्याला पोचवला होता. उलट मार कमी झाला असेल म्हणून पुन्हा जावे काय असा त्या वेळी आम्ही विचार करीत होतो. अशा अवस्थेत त्याला मरण कसे आले? असो. परमेश्वराची इच्छा. म्हणून आम्ही ते सोडून दिले. पण याचा परिणाम इतरांवर झाला. हिंगनोळ्यास पांडुरंग नलवडे म्हणून एक कोड भरलेला मनुष्य होता. तो गावात अतिशय अत्याचार करीत असे. लोकांची पिके कापणे, गरीबांच्या बायकांवर अत्याचार, घरे पेटविणे, कडबे जाळणे, जनावरे मारणे असा त्याचा धंदाच होता. पूर्वी कितीदा तरी आमच्या माणसांनी सांगितले तरी तो ऐकत नसे व एकदा ताकीद देऊनही त्यांनी त्याला सांगितले होते. पण त्याचा उपयोग झाला नव्हता. तेव्हा आमच्या पद्धतीप्रमाणे सर्व गाव जमवून तिथे त्याला धरुन आणला व सर्व

गावाने त्याच्यावरील आरोप सांगितले. त्याने ते कबूल केले. कुणा कुणाची पिके कापली, कुणाचे कडबे पेटविले, ज्या बाईशी बळजबरीने संबंध करीत होता तिच्या नवऱ्याने उठून सांगितले, तेव्हा त्याच्या दोषीपणाची खात्री झाली व त्याला शिक्षा करावयाचे ठरले. त्याला उचलून बाहेर काढण्यास लोक गेले. तो हातापाया पडू लागला व मी पुन्हा असे करणार नाही, माझ्या अंगात ताप आहे, मी आजारी आहे असे म्हणू लागला. त्यामुळे मला जरा विचार आला व नुकताच किशा न्हावी मेल्यामुळे मनास बरे वाटत नव्हते. कितीही अन्याय केला तरी माणूस मरावा अशी क्रूर भावना आमच्या कोणातच नव्हती. तो सुधारावा, त्यास सुधारण्यास संधी द्यावी इकडे लक्ष जास्त. त्यामुळे मी स्वतः उठून त्याच्या अंगास हात लावून पाहिले. तेव्हा ताप होता. मग सर्वांची समजूत काढून त्याने आपले वागणे सुधारावे व सहा महिने संधी द्यावी असे ठरुन त्यास सोडून देण्यात आले. मात्र त्याचे वागणे सुधारले नाही म्हणून रंगा कुंभाराने पुन्हा दोन तडाखे दिले व ही गोष्ट नंतर मला सांगितली नाही. मी थोड्या शिक्षेच्या नेहमी विरुद्ध होतो. केली तर एक भरपूर शिक्षा करावयाची, नाही तर त्यास क्षमा करावयाची. भरपूर शिक्षा केली म्हणजे तिची आठवण राहते व पुन्हा ती वाईट सवय डोके वर काढत नाही. क्षमा केली तर मनात सात्विकतेचा काही अंश असेल तर त्याचा परिणाम चांगला होऊन गुन्ह्याची प्रवृत्ती कमी होते, नाहीतर निदान वैर तरी निर्माण होत नाही. अर्धवट शिक्षेमुळे दहशत तर बसत नाहीच उलट डाव धरुन सूड उगवण्याची वृत्ती बळावते व तो त्या दिशेने मार्गास लागतो आणि या गोष्टीचाच पुढे अनुभव आला.

मी पकडलेल्यांची चौकशी करण्याकरिता खाली कोरिवळ्यात आलो. तेथे मुक्काम करुन सामान्य माहिती घेतली. छाप्यामुळे सर्व हैराण झाले. सर्वांना पकडून कराडला नेले. रंगा कुंभार, खाशाबा, टूरिंग, बाबू कुठे बेपत्ता. त्यांची चौकशी करण्यास सांगितले व हिंगनोळ्याची परिस्थिती काय आहे म्हणून चौकशी केली तर तेथील परिस्थिती अतिशय चांगली आहे असा रिपोर्ट मिळाला. गावातील परिस्थितीत आता काहीही काळजीचा भाग नाही. पण गावचा आलेला रिपोर्ट चुकीचा होता. तो नलवडे वकिल चिडून काँग्रेस फराऱ्यांवरच नजर ठेवीत होता. ही गोष्ट तेथील आमच्या काम करणाऱ्या मुलांच्या लक्षात आली नाही. ती मुले नवखीच होती व त्यांचा माझा प्रत्यक्ष परिचयही नव्हता. त्यामुळे त्यांच्या बोलण्यावर विश्वास कितपत ठेवावा याचा अंदाज आला नाही. शिवाय चित्त स्थिर नव्हते. त्यामुळे काय करतो इकडे लक्ष कमीच. मी रात्री ९ च्या सुमारास पोलिस मुलकी पाटलांच्या घरी आलो व त्यांना शिराळकर वकील यांना बोलावून आणण्यास सांगितले. कारण कराडची परिस्थिती काय आहे हे जाणून घ्यायचे होते.

# शिराळकर वकिलांची साथ

शिवाय १९४२ मध्ये अतिशय मोठी कामगिरी कोणी केली असेल तर वकील शिराळकर यांनी. बहुधा सर्व खटले कराडला चालत असत. मग केस म्हटल्यावर वकील कोण? एरवी देशभक्तीच्या गप्पा मारणारे या वेळी टिकत नसत. कारण फौजदार लागलीच त्यांच्या मागे लागत, त्यामुळे राजकीय खटले चालविणे, आरोपींना भेटणे, त्यांच्या घरी कळवणे ही कामे ते करीत. घरच्या माणसांना सुद्धा त्रास होई. त्यामुळे कित्येक वेळ तेही चौकशी करीत नसत. अशा वेळी आस्थापूर्वक स्वत: तोशीस सोसून काम करणारे वकील कोण असतील तर ते शिराळकर. सर्व आरोपी हे जिल्हयातून आलेले, ते ओळखीचे असतच असे नाही. मग चौकशी करुन घरी कळवणे, नंतर पदरच्या पैशाने कित्येक वेळ तिकिटे लावून अर्ज देणे, घरी पत्र-व्यवहार करणे, किरकोळ खर्चास कित्येक वेळ गरीबांस पैसे देणे इथपर्यन्तसुद्धा एखादेवेळी त्यांना करावे लागे. हे फौजदारांना आवडत नसे, म्हणून त्यांनी त्यांना त्रास द्यावयास सुरुवात केली. शेवटी एक दिवस वालावलकर फौजदार यांनी त्यांना सांगितले, 'तुम्हास अटक करीन.' त्या वेळी त्यांनी स्वच्छ सांगितले, 'होल्डॉल बांधून ठेवला आहे आणि आपण सांगाल तेव्हा, सांगाल त्या वेळी हजर आहे.' त्यांच्या या बाणेदार व निधड्या उत्तराने फिरुन फौजदाराने त्यांचे नाव काढले नाही. जिल्हयातील वकीलात दे.भ. भाऊसाहेब सोमण जेलमध्येच होते. तात्यासाहेब साठे स्वत:स कॉंग्रेसमध्ये म्हणवीत; परंतु पैशाची तोशीस लागता उपयोगी नाही व काही त्रास पडता उपयोगी नाही ही दृष्टी असे. क्वचित् त्यांचा उपयोग होई. बाकीचे कॉंग्रेसवाले वकील राजकीय खटले चालविण्यासाठी फारसे पुढे आले नाहीत. अधिकाऱ्यावर देशभक्तीचे वजन पडून पक्षकारांकडून खूप पैसा पिळून काढून त्यांची कामे करुन स्वत:च्या इस्टेटी करण्याकडे सर्व लक्ष। तात्यासाहेब साठे यांनी तर खुद्द वालावलकर फौजदार यांचे वकीलपत्र घेऊन काम केले। त्या वेळी जिल्हयातील सर्व कार्यकर्त्यांना वाईट वाटले. अशा नीच माणसाचे वकीलपत्र एका देशभक्त म्हणवून घेणाऱ्या मोठ्या कॉंग्रेस भक्ताने घ्यावयाचे। त्यांना विचारता त्यांनी सांगितले, 'तो १०-१५ हजार रुपये देतोय, तर का टाकावयाचे? शिवाय मी नव्वद टक्के संसाराचा मनुष्य आहे व दहा टक्के देशभक्त आहे.' सरकारने तर खटले भरण्याचा सपाटा चालवलेला. अशावेळी शिराळकर हाच खरा वकील। पण खटपटी व धाडसी, दयाळू व स्वत:स तोशीस लावून घेणारा, उद्योगी असा माणूस आम्हा सर्व देशभक्तांना त्या वेळी तो आधार खास ठरला. शिवाय जोडीला डी.जी. देशपांडे. डी.जीं. नी शिराळकर सांगतील ती सर्व पूर्तता करुन द्यावयाची. डी.जीं.नी प्रचंड काम करुनही सरकारला कधी संशय आला नाही. ''दिसे ठेंगणी मूर्ती ही बावळीशी.'' त्यामुळे जिल्हयातील सर्व कार्यकर्त्यांच्या घरचे ते एक बनले. प्रांतिककडून जे काही अल्पस्वल्प पैसे येतील ते घरोघर पोचविणे, कपडे वगैरेंची मदत नेऊन पोचविणे, कोर्टासंबंधी केसची तयारी करणे आणि जिल्हयातील सर्व भूमिगतांशी संबंध

ठेवून त्यांना मदत करणे एवढी प्रचंड कामगिरी ते पार पाडीत. जिल्ह्यात तालुक्याच्या ठिकाणचे वकील काही मदत करीत. वाईचे कापरे, साताऱचे मनोहर भागवत, इस्लामपूरचे नानासाहेब रानडे, सागांवकर, बापूराव सोमण व त्यांचे बंधू पण अगदी तुरळकच. त्यामुळे शिराळकर यांना आम्ही आमच्याप्रमाणेच कार्यकर्ते समजत असू.

## नलवडे याचा विश्वासघात

तेव्हा शिराळकरांची गाठ घ्यावी व परिस्थिती काय आहे, पकडलेल्या लोकांची मन:स्थिती काय आहे, त्यांची बाहेर येण्याची इच्छा आहे काय, त्यांना मारले आहे कितपत? त्यांनी काय काय सांगितले? मदतीची अपेक्षा काही आहे काय? वगैरे हे सर्व समजून घ्यावे व मग पुढची पावले टाकावीत असा विचार मनात आला. म्हणून कराडपेक्षा शिराळकर उंब्रजला येत आहेत, तेथून हिंगनोळे एक मैल. म्हणजे ताबडतोब येणे व निवांतपणी गाठ घेणे दोघांनाही सोईचे म्हणून तेथे थांबलो. महादू पाटील यांचा माझा पहिला परिचय नव्हता. ते दिनकरराव निकम इंदोलीकर यांचे अतिशय दोस्त व दिनकरराव माझे दोस्त. त्यामुळे त्यांना माझ्याविषयी जिव्हाळा वाटत होता. म्हणून त्यांचेच घर पसंत केले. पण प्रत्यक्ष ते अतिशय सुस्त व फाजील आत्मविश्वासी, आणि खरे म्हणजे त्याचमुळे मला धोका झाला. त्यांच्या घरी अतिशय ढेकूण. अक्षरश: रात्र बसून काढली. शेकडो ढेकूण चावले. 'ऊठ, इथं तुला फार मोठा धोका आहे.' चवताळून सारखे अंगावर ढेकूण येत होते. मला ते समजले नाही. मी मूर्खासारखा त्यांना मारत होतो. शेकडोंनी मी मारले, जाळले पण त्यांनी चिकाटी सोडली नाही. शेवटी पाटलानी दुसरे रिकामे घर बघून त्यात मला पहाटे जाण्यास सांगितले व शिराळकर आता येतात, मग येतात करीत ठेवून घेतले. उंब्रजला अर्ध्या मैलावर मिलिटरी, हंदोलीस एक मैलावर पोलिस पार्टी, कराडला माझ्यासाठी रात्रंदिवस प्रयत्न अशा धोक्याच्या ठिकाणी किती वेळ थांबावयाचे याचा मीही विचार करावयास पाहिजे होता. माझ्या मनास सारखी रुखरुख लागली होती. जाऊ या, आता इथे थांबणे नको, पण एक मन सांगे, ही जागा सुखरुप आहे. काळजी करावयाचे कारण नाही. आणि दुसरे मन सांगे काळजी घेण्याच्या आपल्या आजपर्यन्तच्या रिवाजाप्रमाणे ही गोष्टी अतिशय चूक आहे. एक-दीड दिवस एका जागी आपली माणसे जवळ संरक्षणास नसता कधीच राहात नव्हतो. परंतु आपले सर्व लोक पकडले गेल्यामुळे गोंधळलेली परिस्थिती निर्माण झाली होती. काही सुचत नव्हते. एकच ध्यास. पैसे गेले तरी हरकत नाही. एखादे मोठे धाडस करुन, आपला नाश झाला तरी हरकत नाही. परंतु आपली माणसे बाहेर कशी आणता येतील हा विचार. त्यामुळे मी एका सावजाची शिकार बनतो आहे, याची कल्पनासुद्धा आली नाही. कारण परमेश्वरी संकेत निराळा होता. आमची नेहमी पद्धत असे, ज्या गावी मुक्काम करावयाचा ते गाव कितीही सुरक्षित असले तरी आपली माणसे व त्यात स्थानिक कार्यकर्ते माणसे मिसळून खडा पहारा ठेवावयाचा. त्या गावच्या हद्दीत

जरी कोणी परकी माणूस शिरले तरी त्याची बातमी अवघ्या पंधरा मिनिटात येऊन पोचली पाहिजे. त्यामुळे कसल्याही धोक्यात निर्धास्त राहता अगर काम करता येत असे आणि यामुळेच एवढ्या प्रचंड सामर्थ्याशी व या चंचल जगाशी चार वर्षे तोंड देता आले. नेहमीच्या कार्यकर्त्यांची वाताहात होऊन गेलेली. ते सर्वत्र पांगले गेले. जवळ कोणी नाहीत. हिंगनोळे गाव नवीन. तेथील कार्यकर्ते नवीन. त्यांना फराऱ्याची जपणूक कशी करतात याची कल्पना नाही. जबाबदारीची जाणीव नाही. मी गावात आल्याची बातमी त्या नलवड्यास लागली. रंगा कुंभाराने मारल्यापासून तो भीत होता व स्वत: अतिशय जपून वागत होता. तो रात्रभर रानात राहिला व सकाळी गावात आला व म्हणू लागला काय करावयाचे या भीतीने रात्र रानात काढली. पण मी ज्या घरात होतो, त्या घरात दूध पोचवताना त्याने पाहिले. त्यास शंका आली की कुणी फरारी अद्याप गावात आहे. म्हणून इंदोलीच्या गेटावर निघून गेला. गावातील माणसे पहारा करीत होती, पण काम करीत. इंदोलीस फौजदार महाबळेश्वरकर म्हणून होते. १०-१५ पोलीस व हवालदार बरोबर घेऊन ते निघाले. आली वर्दी जाणे भाग आहे, म्हणून ते निघाले. फरारी असा राहील कसा? त्यामुळे त्यांना कोणी सापडेल अशी आशा नव्हती. मो कोरिवळ्याहून कोण कुठं आहे याची चौकशी करण्यासाठी माणसे पाठवली. त्यात रंगा कुंभाराचा तपास लागला व त्याला मी खाली आलो आहे हे कळताच ताबडतोब हिंगनोळ्यास भेटावयास आला. मी ज्या घरात बसलो होतो, तेथे अंधार होता. तेथे आला व त्याने मधली सर्व हकिकत सांगितली व पोलिसांनी सर्वांचा पाठलाग केल्याचे, तसेच टूरिंग अतिशय घाबरला आहे म्हणून सांगितले. मी त्याला भेटले पाहिजे व त्याला धीर दिला पाहिजे म्हणून सांगितले. नाहीतर त्याच्या डोक्यावर परिणाम होईल. मी कराडकडे जात असल्याचे सांगितले. तेव्हा तो म्हणाला, 'भाग सर्व पेटलाय, तेव्हा जपून जावा. सर्वत्र धोका निर्माण झाला आहे.' 'मी त्या घाणेरीहून जाऊन येतो, तोपर्यन्त आपली सर्व माणसे एकत्र करुन ठेव. कदाचित मोठी काही तरी ॲक्शन घ्यावी लागेल' असे मोघम बोललो व प्रेमाने निरोप दिला. तो पाया पडून निघून गेला. मलाही आता येथे बसू नये बाहेर पडावे असे मनातून एकसारखे वाटू लागले. का, कोणास ठाऊक, पण हुरहुर लागली.

## हा हन्त हन्त!

एकाएकी कुत्रे भुंकू लागले. रात्रभर जागरण व रंगा येऊन भेटून गेला तेव्हा अंधारात शिराळकर यांची वाट पहात झोपलो. अंधार असला तरी मला साधारण दिसत होते. पण बाहेरुन येणाऱ्या माणसाला मात्र काहीच दिसत नव्हते. मी पडता क्षणीच माझा डोळा लागला आणि जेव्हा 'कोण आहे, कोण आहे?' या आवाजानं जागा होऊन डोळे उघडले तर स्वप्नासारखे समोर संगीनी रोखलेले पोलीस! क्षणभर दिङ्मूढ झालो! पोलिसांवर हल्ला करण्याच्या, पळून जाण्याच्या, दंगामस्ती करण्याच्या सर्व कल्पना डोळ्यासमोरुन

निघून गेल्या. या वेळी काहीही गडबड करुन उपयोग होणार नाही याची स्पष्ट कल्पना आली. मी जोरात विचारले, 'कोण आहे?,' त्याबरोबर ते सर्व म्हणाले, 'बाहेर चला.' आणि बाहेर आल्यावर अक्षरशः त्यांच्या समोर हसत उभा राहिलो. त्यांना आश्चर्य वाटले. ओळख पटेना. पण हवालदाराने सांगितले, 'हे कासेगावकर वैद्य आहेत, परेडला येत होते.' मग ताबडतोब बेड्या ठोकण्यात आल्या व दोरखंडांनी आवळण्यात आले व विचारले, 'तुम्ही असे आलात कसे? सापडलात कसे? बरोबर हत्यार नाही. फक्त वर्तमानपत्रं व कुऱ्हाड आणि शांतपणे हसत उभे आहात?' त्यांनी म्हटले, 'सर्व प्रश्नांचे उत्तर एकच आहे. तुम्ही सुदैवी आहात मी दुर्दैवी आहे.' केवढ्या मोठमोठ्या संकटातून, पोलिसांच्या घोळक्यातून त्याने मला वाचवले व आज अनपेक्षित २०-२५ पोलिस मला पकडीत आहेत! तेव्हा परमेश्वराची इच्छाच अशी दिसते की आजपर्यन्त बाहेर फरारी राहून काम केले ते पुरे, आता जेलमध्ये जा! त्यामुळे आता वाईट वाटून काय उपयोग? ते म्हणाले, 'कृपा करुन आता गडबड करु नका.' मी सांगितले, 'मी मनाशी ठरवले आहे काही गडबड करावयाची नाही. तेव्हा तुम्ही निर्धास्त असा' आणि त्यानंतर चावडीत आणून बसवले. माझ्यावर लक्ष ठेवणारे पहारेवाले कार्यकर्ते पोलिस पार्टी जवळ आल्यावर सावध झाले व मला कळविण्यास पळू लागले. ताबडतोब त्यांनाही पकडण्यात आले, व माझ्याजवळ त्यांनाही आणून बसविले. मला त्यांचा खूप राग आला. पण रागापेक्षा त्यांना सहानुभूतीच दाखविणे आवश्यक होते म्हणून सहानुभूतीने त्यांच्याकडे फक्त पाहिले, बोलणे शक्यच नव्हते. स्वस्थ बसलो. डोक्यात विचारचक्र सुरु झाले. आता पुढे काय? जेल म्हणजे काय? कधी माहीत नाही, फौजदार इन्स्पेक्टर, डी.एस्.पी. या अधिकाऱ्यांचा कधी संबंध नाही. आणि ती सर्व सहकाऱ्यां-कडून ऐकलेली व वाचलेली भयंकर वर्णने! मारहाण, ती सुंद्री, तो भरमाप्पा, बर्फावर निजवणे, रात्री जागवणे, चुन्याचे पाणी टाकून मारणे हे सर्व डोळ्यापुढे प्रत्यक्ष चालले आहे असे उभे राहिले. आता हत्यारे कुठे आहेत? काडतुसे कुठे आहेत? आश्रयदाते कोण कोण? पैसा कुठून येतो? बाकीचे सर्व कुठे आहेत? असे अनेक प्रश्न विचारुन ते मला चिक्कार ठोकणार ही गोष्ट सारखी दिसू लागली! तेव्हा मनाचा पहिला एक ठाम निश्चय केला की, कितीही मारले तरी एक शब्दसुद्धा सांगावयाचा नाही. मनाची निश्चयात्मक शक्ती वाढवू लागलो व अंतःकरणाची चलबिचल होऊ द्यावयाची नाही, शांत रहावयाचे हे ठरवून टाकले. कित्येक संकटात मनाची शांतता टिकविण्यास नामस्मरणाचा चांगला उपयोग होतो याचा मला अनुभव असल्यामुळे अखंड नामस्मरण सुरू केले व स्वस्थ पडून राहावयाचे व नेहमी हसतमुख राहावयाचे, कोणीही आपल्याकडे पाहिले की किंचित् हसावयाचे. बस्स. मी सापडलो ही गोष्ट विजेसारखी सर्व प्रांतात पसरली.

## कराडच्या लॉकअपमध्ये

गावात आणि एक दोन ठिकाणे करुन मला संध्याकाळी सातच्या सुमारास उंब्रज येथे

आणले व माणसांच्या वहातुकीची मोटार थांबवून त्यात सर्व पोलिससह बसलो. त्यात ग.स. आळतेकर वकील बसलेले होते. त्यामुळे कराडातही सर्वांना कळले. पण खरे कोणासच वाटेना. सर्व म्हणू लागले, त्यांच्यासंबंधी अशा वरचेवर बातम्या उठवतात. पण गोष्ट खरी असल्यामुळे कचेरीकडे माणसांची सारखी रांग लागू लागली. प्रत्येकजण बाहेरुन पाही व खात्री करुन घेई. कोणी हळहळत! कोणी भीतीयुक्त चेहरा करुन या प्राण्याचं आता पुढे काय होणार अशा आविर्भावाने पाहात व पुढे चालू लागत. साडेसात आठच्या सुमारास मला कराड कचेरीवर आणल्यावर तेथे वरमाड इन्स्पेक्टरांच्या पुढे नेले. त्यांनी विचारले, 'काय महाराज कुठं होतात?' मी म्हटले, 'इथे होतो.' 'मग आम्हीच खुळे म्हणून शोधत होतो. बघतोय कसा मांगासारखा. या भडव्यांना चौकात नेऊन गोळ्या घालून ठार केले पाहिजे. सापडलात कसे? दोनतीन दिवसांपूर्वी तीन हजार पोलीस नेऊन तुमच्यासाठी मोठा छापा घालून आलो तरी सापडला नाहीत. हे पहा तुमचे गोळीवॉरंट!' म्हणून त्याने टेबलातून टाईप केलेला एक कागद काढून दाखवला व 'आपल्यास दिसेल तेथे कशाही अवस्थेत गोळी घालण्याचा हुकूम आहे.' असे म्हणाला. मी कागदावर साधारण पाहिले, पण माझं खरं लक्ष होतं त्याच्या चेहऱ्यावर. मी चोरुन सारखा बघत होतो. तो संतापून लाल झाला. मी त्याच्या कोणत्याच प्रश्नास उत्तर देत नव्हतो. 'या घरात कसे आला?' 'मोकळं होतं म्हणून,' या उत्तरावर 'शाब्बास' म्हणाला व नंतर त्यांनी सब इन्स्पेक्टर शेलार यांना बोलावून घेतले व ह्याला मारल्याशिवाय हा काही सांगणार नाही म्हणून त्याने काठ्या, सुंद्री, चुन्याच्या पाण्याची बादली मागवली व खोलीभोवती घोंगडी लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे माझ्या खोलीत सर्व आणले गेले. घोंगडी लावली गेली. खोलीच्या मागेपुढे पोलिसांचे सशस्त्र पहारे बसवले. व जेऊन परत येतो म्हणून वरमाड इन्स्पेक्टर तेथून गेले व मी आता त्या क्षणांची वाट पहात राहिलो. मन शांत राहणे शक्यच नव्हते. हे निरनिराळ्या विचारांच्या कल्पनांच्या साठ्यास बरोबर घेऊन सारखे चकरा मारुन येत होते व कितीही मन घट्ट करावयाचे म्हटले तरी छाती सारखी धडधडत होती! पण विचार हा अखेरपर्यन्त सुटला नाही व भीती वाटली नाही. दर तासाचे ठोके पडत होते व ठोक्यास ठिकठिकाणी बसवलेले पहारे प्रथम आपला नंबर म्हणत नंतर "ऑलवेल" असे लांब हेल काढून म्हणत. प्रथम "नंबर वन. ऑलवेल ओरडे, ते माझ्या खोलीपुढचा सेव्हन व मागचा एट" म्हणून हा विधी जवळजवळ दहा मिनिटांच्या पुढे चाले. मला झोप कुठली? माझे लक्ष केव्हा मारणार आहेत? व पोलिस खात्याला रात्र झाली की उजाडते! त्यामुळे रात्री किती येतील याचा पत्ता नव्हता. तेव्हा दहा झाले, अकरा, बारा, एक, मग वाटू लागले, पहाटे मारतील; जेव्हा पाच वाजून गेले तेव्हा वाटले, सकाळी मारतील म्हणून तेवढाच मनास विरंगुळा मिळाला व मन निरनिराळ्या दिशेने विचार करु लागले. नामस्मरणामुळे भीती कमी होत चालली व एक प्रकारचा नीडरपणा येऊ लागला. कारण मनाने कितीही निश्चय करुन ठरवले की, कितीही मारले तरी एक

अक्षरसुद्धा सांगावयाचे नाही; तथापि प्रत्यक्ष मार सुरू झाल्यावर शरीर कितपत तग धरील, मन कुठपर्यन्त आपला निश्चय टिकवील असा अदमास नव्हता. ते सातआठ तास तो सर्व देखावा पाहून व अंदाज घेऊन मन तयार होऊ लागले. निश्चय टिकण्याची खात्री वाटू लागली. सकाळी बरोबर आठ वाजता स्पेशल डी.वाय्.एस्.पी. खेडकर आले व त्यांनी खूप प्रश्न विचारले. 'तुम्हास खूप शोधले, मोठे छापे घातले, हिंगनोळ्यास कसे आलात? अगदी मोकळे कसे? की हजर झालात?' 'तुम्ही सुदैवी म्हणून तुम्हास सापडलो. मी दुर्दैवी त्यामुळे फसगत झाली. हजर वगैरे काही झालो नाही.' 'जर तुम्ही सरळपणाने सर्व सांगणार असाल तर आम्ही मारणार नाही. नाहीतर तुम्हास आम्ही मारणार आहोत.' 'मी असे समजणारा मनुष्य आहे, आजपर्यन्त बाहेर सुरक्षित राहिलो व काम केले. ते सर्व परमेश्वराने माझ्या हातून करवून घेतले आहे. आता आत आलो आहे. तेव्हा खोटे सांगून शिक्षा चुकवावी वगैरे मताचा मी नाही. तेव्हा उत्तरेस नीरा व दक्षिणेस वारणा या दोन नद्यांच्या मध्ये म्हणजे या जिल्ह्यात जी राजकीय कामे झाली, त्या सर्वांस मी काही कामात प्रत्यक्ष व बाकीच्या सर्व कामास नैतिक जबाबदार आहे. त्यामुळे मी काही नाकबूल करणार नाही.' मला ठाऊक होते, कोणकोणत्या गोष्टी पोलिस खात्याकडे गेल्या आहेत व त्यांना कोणकोणत्या गोष्टींची माहिती आहे. माधवराव पकडले गेले. त्यांना डायरी लिहिण्याची सवय होती. त्यामुळे त्या डायरीत जेवढे आहे तेवढे कळणार, शिवाय मासिक रिपोर्टवर डिक्टेटरकडे पाठवीत असू. त्यापैकी एक महिन्याचा रिपोर्ट त्यांना मिळाला आहे. शिवाय शिरवडे स्टेशन जळिताच्या केसमध्ये कोर्टातून नावे निष्पन्न झाली आहेत. तेव्हा हे नाकबूल करुन मार खाण्यात काय हशील? आपल्याबद्दल वाईट समज तरी का करुन द्यावयाचा? त्यापेक्षा एवीतेवी हे गुन्हे आपण केलेले आहेत व ते सर्वांना माहीतही आहेतच. हे कबूल करुन आपल्यासंबंधी सर्वांचा चांगला ग्रह करुन घेणे चांगले व ते अंतिम दृष्टीने उपयोगीही होते. श्री. खेडकर म्हणाले, 'तोंडी नको, लेखी पाहिजे.' 'लेखी जरुर देईन. तसा काही बदलणारा मी माणूस नाही.' खेडकरांच्या मनावर फार मोठा परिणाम झाला व त्यांनी ताबडतोब कोरा कागद, दौत, टाक आणून दिले. मी अगदी पहिल्यापासून तारीखवार तारा तोडणे, शिरवडा स्टेशन ॲक्शन वगैरे लिहू लागलो. 'त्यांनी सांगितले, तसे नको, इतक्या जुन्या हकिकती नकोत.' 'ठीक आहे.' असं मी म्हटलं. नवीन काय काय त्यांच्याकडे आहे, हे मला माहीत होते. त्याप्रमाणे त्या महिन्यांतील ॲक्शन्स लिहिण्यास सुरुवात केली. बऱ्याच गोष्टी लिहिल्या. त्यांनी (खेडकरांनी) पाहून 'ठीक आहे' म्हणून सांगितले. त्यानंतर दोन तासांनी सुमारे दहाच्यावेळी स्पेशल डी.एस्.पी. विश्वासराव मोरे हे हसतच माझ्यापुढे आले व त्यांनी सर्वांना बाहेर जाण्यास सांगून सहानुभूतिपूर्वक ते माझ्याशी बोलू लागले. त्याचा परिणाम माझ्या मनावर मोठा झाला व आता मारणार नाहीत याची खात्री झाली. गोरापान उंचापुरा गृहस्थ, गंभीर चेहरा, तेजस्वी, त्यामुळे दुसऱ्याच्या मनावर त्याची छाप तेव्हाच पडे. त्यांच्या जिव्हाळ्यामुळे

त्यांनी विचारले, 'सापडलात कसे?' तर 'माधवरावांना तुम्ही पकडलेत. तेव्हा त्यांची भेट होते का पहावी म्हणून आलो' मी खरे सांगितले. ताबडतोब माधवरावांना लॉकअपमधून काढून आणले व माझ्यासमोर उभे केले. आपण दूर गेले. आम्ही एकमेकाना कडकडून भेटलो व फार मारले वगैरे काय म्हणून विचारले. त्यांनी मारले म्हणून सांगितले व अपमानकारक रीतीने वागवले म्हणूनही सांगितले. मला त्यांनी विचारले, 'तुम्ही कसे?' हळूच त्यांना म्हटले, 'काडतुसे वगैरे व्यवस्थित ठेवलीत' ते म्हणाले, 'दिनकरराव याचा अर्थ त्यांनी दिनकरराव इंदोलीकर असा केला. त्यामुळे घाणेशीवर सुरक्षित आहेत व बाकीची व्यवस्था बहुतेक झाली आहे. काळजी करण्याचे कारण नाही. तुम्हाला मारले का म्हणून विचारले,' 'अद्याप नाही. पाहू काय घडते ते', म्हणून सांगितले. इतक्यात मोरे आले. 'झाले का बोलून?' मी 'हो' म्हटले, 'काय बोलावयाचे?' माधवरावांना घेऊन गेले. त्यांना हातात बेड्या, पायात बेड्या, दोरखंडाने आवळलेले होतेच. नंतर विश्वासराव दोन तास चर्चा करीत राहिले.

## चळवळ कशी वाढली?

चळवळीचे स्वरुप काय? सर्व जिल्हयात चळवळ कशी वाढत गेली, सरकार कसकसे वागत गेले त्यावर आम्ही कसे वागलो इ. शेवटी मी त्यांना स्वच्छ सांगितले, 'सरकारच्या वागण्यातील, धोरणातील जो गाढवपणा किंवा चुका तो आमचा शहाणपणा! सरकारचा जो वैरी तो आमचा मित्र हे आमचे धोरण. सरकारने पहिली घोडचूक केली. फरार्‍यांचे नातेवाईक उचलण्याची. त्यामुळे जिल्हयातील दहा हजार लोक उचलले व लोकांना जी तुरुंगाची भीती होती, ती नष्ट झाली व आतून ते निरोप देऊ लागले, आम्ही आनंदात आहोत. तुम्ही हजर होऊ नका. नेटाने काम करा. काळा बाजारवाल्यांना आम्ही पत्र्या लावल्या! त्यामुळे सर्व जनता आमच्याकडे आकर्षित झाली. काँग्रेस भूमिगतांना पकडून देण्यासाठी दरोडेखोरांना सरकारने हाताशी धरले. त्यांनी सर्व जिल्हाभर धुडगूस घातला. दिवसाढवळ्या दरोडे घालू लागले. पैशाच्या नोटांची पोती भरुन मागू लागले. सरकारचे पोलिस दरोडेखोरांच्या टोळ्यांतून हत्यारे काडतुसे घेऊन मदतीस जाऊ लागले. दरोडेखोरांना गोळ्या घालून ठार केले व पोलिसांच्यावर हल्ले केले. त्यात त्यांची पायताणे पडत यावरुन जनतेची अशी खात्री झाली की, आमच्या जीविताचे व वित्ताचे रक्षण काँग्रेसवाले करू शकतील. त्यामुळेच प्रतिसरकारची चळवळ जिल्हाभर फोफावली. सरकारने ३०-३०-४०-४० हजार रुपये सामुदायिक दंड बसवले व एक तास, दोन तास एवढ्या वेळात वसूल केले. म्हणजे अत्याचार करुन वसूल केले. त्याचा परिणाम सरकार किती अन्यायी आहे याची त्यांना कल्पना पुरेपूर आली. आम्ही पाठोपाठ तेथे जात असू, त्यांची समजूत काढीत असू व आमच्यामुळे तुम्हास त्रास होतो असे म्हणताच ते म्हणत असत—सरकारने विचारल्यावरही म्हणत—जोपर्यन्त ताकद आहे, तोपर्यन्त दंड भरु. नाही त्या दिवशी

आम्ही ही घरेदारे सोडून चालू लागू, पण काँग्रेस फराऱ्यांना पकडून कदापि देणार नाही. आम्ही ज्या भागात फिरत असू त्या भागात गुन्हा नाही. सर्व खटले आपसात तुटत; त्यामुळे सरकार कचेरीस हेलपाटे, पैशाचा अपव्यय सर्व टळे. त्यामुळे कोर्टात केसीस नाहीत. कचेरीत भांडणे नाहीत. कोर्ट-कचेऱ्या यांना पोलिस ठाण्यांचे स्वरुप आले। सरकारी माणसांशी संबंध ठेवणे कमीपणाचे अशी सामान्य माणसांची समजूत होऊ लागली. त्यामुळे सर्वत्र शुकशुकाट. तुम्ही सर्व जिल्हाभर मिलिटरी आणून ठेवल्यामुळे सगळा जिल्हा ही राजकारणाची शाळाच बनली. काही ठराविक व्यक्तींचा हा लढा नसून सामान्य गोरगरीब जनता विरुद्ध परके सरकार अशीच भूमिका आली आहे. कचेरीवर आम्ही उघड मोर्चे आणत होतो. त्या वेळी निष्कारण गोळीबार करुन लोक मारलेत. त्यामुळे चळवळीस भूमिगत स्वरुप आले.' 'तारा तोडता, टपाल लुटता यांचा उद्देश काय? राष्ट्राची हानी होत नाही काय? लोकांना त्रास होत नाही काय?' 'सर्व भारतभर एकसूत्रीपणाने ब्रिटिशांची सत्ता कायम राहाण्यास पोस्ट, रेल्वे, तार ही महत्त्वाची साधने होत. ती जर खिळखिळी केली तर त्यांना सत्ता चालवणे कठीण होऊन बसेल. जनतेला थोडा त्रास होईल ही गोष्ट खरी आहे. पण जनता तो आनंदाने सहन करील.' 'भूमिगत अवस्थेत तुम्हास दरोडेखोरांची मदत झाली ही गोष्ट खरी आहे काय?' मी त्यांना सांगितले, सर्वस्वी खरी नाही, काही अंशी खरी आहे. कारण काँग्रेसला फरारी रहावयाचे माहीतच नव्हते. तेव्हा प्रथम फरारी झाल्याबरोबर समदुःखी म्हणून ते क्रिमिनल्स आमच्याकडे कृपा दृष्टीने पहात असत. आम्हाला लढाईच्या दोन आघाड्या उघडावयाच्या नव्हत्या। तेव्हा त्यांच्याशी सहानुभूतीने वागत असू. मी त्यांना नेहमी म्हणत असे, तुम्ही उन्हात होत्तात त्या वेळी आम्ही काही चौकशी करीत नव्हतो. पण गोरगरिबांचा तळतळाट घेणं बरं नाही. तेव्हा मर्यादा ठेवा. सर्व क्रिमिनल्स आमच्याशी फार चांगल्या तऱ्हेने वागत, पण त्यांना सरकारचे अंग मिळताच ते आमच्यावर बिथरले. आम्हीही त्यांची नंतर दयामाया ठेवली नाही. कित्येक सरकारी अधिकारी आमच्याशी सहानुभूतीने वागत असत. कित्येक फौजदारांशी आमचा संबंध असे.' विश्वासराव म्हणाले, 'कोणा कोणाशी? मी म्हटले, 'माफ करा. मी नावे सांगू शकत नाही.' शेवटी हसून ते म्हणाले, 'मला वाटते, फक्त तुम्ही डी.एस्.पी. शिल्लक ठेवला नाहीतर सर्व अधिकाऱ्यांना तुम्ही सामील करुन घेतले असे मला वाटते'. 'अधिकारी तुम्हास सापडले नाहीत काय?' 'अधिकारी खूप वेळ सापडत, पण तो सरकारी काम करतो किंवा पोलिस छापे घालतात म्हणून आम्ही कोणास शासन केले नाही. कारण ते आपले कर्तव्य पार पाडीत आहेत. त्यांत त्यांचा दोष नाही. पण काही अधिकारी किंवा डाके-बातमीदार सामुदायिक दंड वसूल करताना कायदा सोडून वाहयातपणा, आगाऊपणा करीत त्यांना जरुर शासन करीत असू. दुधारीचा पाटील एका काँग्रेसवाल्या भूमिगताच्या बायकोपाशी गेला व हातातील छडीने लुगडे वर करुन म्हणाला, 'नवरा घरी येत नाही म्हणतेस आणि हे तुझे पोट कसे वाढले?' आम्हाला याची

चीड आली आणि तो कितीही पोलिस बंदोबस्तात असला तरी बरोबर पाळत ठेवून त्याला उचलून नेऊन देहांताची शिक्षा दिली. हे पोलिस छापा घालण्यासाठी जात तेव्हा ते निरनिराळ्या जिल्ह्यातून आणलेले असत व अतिशय भुकेजलेले असत. छापा घालतेवेळी त्या माणसांच्या घरात शिरुन सर्व खाद्यपदार्थ खाऊन फस्त करीत. तेव्हा व्यंकटराव चरेगावकरांनी मला विचारले, 'अन्नात विष घालून ठेवले तर शेकडो पोलिस एकदम सहज मारता येतील,' मी साफ नकार देऊन सांगितले, 'ते आपले भाऊ आहेत. त्या बिचाऱ्यांचा काय दोष? पोटाकरता करतात. उलट त्यांना अन्न देणे आपले कर्तव्य आहे व खरोखर अन्नाची जरुर असेल त्यांना अन्न द्या' असेही सांगितले. गिलबर्ट साहेब (स्पेशल डी.एस्.पी.) एक कुत्रे व बंदूक बरोबर घेऊन वाटेगावच्या शेजारच्या डोंगरातून एकटाच फिरे. त्या वेळी आमचे लोक म्हणत, 'याला खतम करू या.' मी सांगितले, 'असे करणे बरोबर नाही.' तो म्हणत असे, 'एक तरी अधिकारी या कॉंग्रेसवाल्या भूमिगतांनी मारावा, या साताऱ्याचा अष्टी-चिमूरकरून टाकील. सर्व जिल्हा जाळून अत्याचार करुन भस्म करीन.' चार वर्षात कुठेही अत्याचार न केल्यामुळे परकीय सत्तेच्या मनात असूनही त्यांना अत्याचार करता आला नाही. सारखे दात खात गप्प बसावे लागत होते.' 'तुम्ही हा लढा किती दिवस चालवणार होता?' 'आमच्यापुढे तीन मार्ग होते: १)स्वतःचा परकीय सत्तेशी लढा देत देत मृत्यू, २)संपूर्ण स्वातंत्र्य, ३)ज्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या वर्किंग कमेटीने हा लढा सुरु केला होता, त्यांनीच बाहेर येऊन सांगणे ''थांबवा म्हणून.'' आणि आत्तापर्यन्तचा असा अनुभव आहे. दर दोन वर्षानी आमचा एक माणूस तुम्हास सापडतो आहे. तेव्हा सुमारे दीडशे लोक आम्ही आहोत तर तीनशे वर्षे हा सातारा तुम्हास तोंड देऊ शकेल.'

शेवटी बऱ्याचशा गप्पा झाल्यावर सदू जंत्रे यास पत्र कोणी लिहिले म्हणून विचारले. सदू जंत्रे यांचे हॉटेल कचेरी शेजारी होते. तो पोलिस पंचनाम्यात सारखा साक्षीदार असे व खोट्या साक्षी भरत असे. त्याला खूप वेळ सूचना देऊनही त्याचे वर्तन सुधारले नाही म्हणून कचेरी जवळून त्याला उचलून माधवरावांनी नेले होते व थोडी शिक्षा करुन दंड पाचशे रुपये केला होता. तेव्हा तो कुरकुरु लागला. दंड फार झाला कमी करा. त्या वेळी त्याला त्यांनी सांगितले, धन्वंतरींच्याकडे अपील कर. त्या प्रमाणे त्याने अर्ज मजकडे केला होता. माधवराव यांच्याकडे चौकशी करता दंड थोडा जास्त झाला आहे, पण अतिशय नाही. त्यावर त्याला मी कळवले होते. दंड का केला? दंड करण्याचा हेतू? व त्याचे परिणाम सविस्तर लिहून माझ्या सहीने मी पाठवले. ते विश्वासराव यांचे हातात पडले होते व त्यांनी ते वाचून फारच खूष झाले होते. 'मी लिहिलेले पत्र होते' म्हणून सांगताच त्यांना बरे वाटले व म्हणाले, 'मला ते फार आवडले.' बरे असो, 'आता ही चळवळ आटोक्यात कशी आणावी?' 'सुमारे तीन वार झाले. जिल्ह्यात एकही गुन्हा नाही. याचे कारण तुमची मिलिटरी नाही, तर आच्या डिक्टेटरने हुकूम काढला आहे. जिल्ह्यातील कामे बंद करा. सरकारचे प्रेशर फार वाढले आहे. तेव्हा तूर्त कामे बंद

ठेवावीत. या वेळी आम्ही शांतता ठेवून सरकारकडून दडपशाही कमी न होता ती वाढतच जाणार असेल तर पुन्हा निकराने आमचे लोक तोंड देणार आहेत. पुढची गोष्ट तुमच्या धोरणावर अवलंबून आहे. तेव्हा मला वाटते, प्रथम तुम्ही जिल्हयातील मिलिटरी उठवावी. पण ते तुमच्या हातात कितपत आहे? मला माहीत नाही.' 'जिल्हयात काँग्रेसचा वजनदार माणूस कोण आहे?' मी सांगितले, 'सर्वांवर वजन ठेवून विश्वासपात्र मनुष्य म्हणजे यशवंतराव चव्हाण!' याप्रमाणे बराच वेळ बोलणे झाल्यावर ते निघून गेले व रोज एक तास तरी येऊन गप्पा मारुन जिल्हयासंबंधी बोलून जात. त्यांनी लेखी जबानी सविस्तर लिहिण्यास सांगितली. 'कारण हे कागद ऐतिहासिक असतात. मी खूप लोकांशी बोललो पण असे सुसंगतवार असे आजच मला समजले.' मीही नावे वगैरे न लिहिता शक्यतो सविस्तर लिहून जबानी दिली. पुन्हा चौथ्या दिवशी मुद्दाम येऊन सांगितले, 'मिलिटरीची ठाणी उठवण्यास सुरुवात केली.' आणि पुन्हा जिल्हयात काही अशांतता निर्माण झाली नाही. माझे म्हणणेही खरे ठरले. नवव्या दिवशी खेडेकर साहेब म्हणाले, 'आज नाटक खलास झाले. पंडितजी सुटले व पुण्यास मिटिंग घेतली. त्यात 'जय सातारा', म्हणून साताऱ्याचे कौतुकच केले व यापुढे विध्वंसनाने काहीही करता उपयोगी नाही म्हणून बजावले व मागे जे झाले ते देशभक्तीने प्रेरित होऊन त्यांनी सर्व केले आहे असा शिक्कामोर्तब करुन टाकले. शिवाय व्हाईसरॉयनेही ''फरगेट अँड फरगिव्ह'' 'विसरा आणि क्षमा करा' असे भाषणात काँग्रेसला, गांधीजींना सांगितले. 'तेव्हा तुमचे धोरण पुढे काय?' असे हसत विश्वासराव म्हणाले. मी म्हटले, 'व्हाईसरॉयचे म्हणणे तुम्ही म्हणता तसे असेल तर आमचे पुढारी ठरवतील ते धोरण आमचे राहणार, आमचे असे स्वतंत्र धोरण काय असणार? पण व्हाईसरॉयप्रमाणे, आपले धोरण नसेल तर आमचे खास निराळे राहील, मग आम्ही सर्वच हसू लागलो. त्यांनी शेकहॅन्ड केला व एकमेकांना नमस्कार करुन आपापल्या जागेकडे निघून गेलो.

## मी आरोप नाकारले!

पहिल्या दिवशीच माराची भीती कमी झाल्यावर व आता फक्त बुद्धीच्या कौशल्याने यांच्याशी वागावयाचे हे कळल्यावर मग काय मी नीडर बनलो. शिवाय विश्वासराव माझ्याशी अगदी प्रेमळपणे वागतात म्हटल्यावर सर्व अधिकारी नरम पडले व कोणी फारसे डोळे लाल करुन पहात नसत. मात्र सर्कशीतील सिंहादी प्राण्यांना पाहण्यास लोक जातात, त्याप्रमाणे जवळजवळ इलाख्यातील सर्व अधिकारी येऊन पाहून गेले असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. मलाही ती आता सवय होऊन गेल्यामुळे विशेष काही वाटत नव्हते. मला पकडलेल्या फौजदारांनी मोठा सत्यनारायण घातला. जिल्हयातील सर्व अधिकारी जमले होते. मोठा जुलूस झाला. बक्षिसांची रक्कम पाच हजार दिली गेली.

पहिल्या दिवशी जेवण दिले नाही. जेवतानाही बेड्या तशाच असत. खाली फरशीवर तसेच उघडे झोपावयाचे. शौचाच्या वेळी ढुंगण तसेच धुवावयाचे. त्या वेळी फार हाल होत. मुंबईहून स्पेशल गाडेकर साहेब म्हणून ऑफिसर आले होते व सुमारे सात दिवस सारखी माझी जबानी घेत होते. मला वाटते, ८० ताव ती झाली असावी, आणि त्यांच्यानंतर आठव्या दिवशी स्नानास परवानगी दिली व दहाव्या दिवशी दाढीचे सामान दिले. सोळा दिवसानंतर मॅजिस्ट्रेटपुढे नेऊन उभे केले. नंतर मॅजिस्ट्रेटनी माझ्यावरचा चार्ज वाचून दाखविला. एकूण सुमारे शंभर खटले भरले होते. प्रमुख सासपडच्या मांगवड्याचे दहन, शंकर पाटलाची हत्यारे काढून आणणे व कित्येकाला शिक्षाकेल्या होत्या त्याचे खटले होते. सर्व वाचून दाखवून तुम्ही हे सर्व गुन्हे कबूल केल्याचे व तुम्ही तसे लेखी मान्य केल्याचे पोलीस सांगतात. तरी तुमचे म्हणणे काय आहे? ते एक तासाने विचार करुन सांगा म्हणून सांगितले व पुन्हा लॉकअपमध्ये रवाना केले. मला सर्व गुन्हे कबूल करावे असे वाटत होते, पण वकिलांचे म्हणणे ते बरोबर होणार नाही. मी म्हटले, 'बरे.' नंतर पुन्हा मॅजिस्ट्रेटपुढे नेले व मॅजिस्ट्रेटनी वाचून दाखवून तुमचे काय म्हणणे म्हणून मला विचारले? मी सांगितले, 'मी गुन्हाच केला नाही. मी माझे पवित्र कर्तव्य केले.' मॅजिस्ट्रेट म्हणाले, 'ते काही नाही. गुन्हा केला का नाही ते सांगा.' मी म्हटले, 'याला मी गुन्हेच समजत नाही. मी गुन्हा केला नाही.' मॅजिस्ट्रेट साहेब यांनी 'ठीक आहे' म्हणून सांगितले व पुन्हा सर्व फौजदार इन्स्पेक्टर वगैरे जमले व 'हे काय खरे बोलतात का?' म्हणून विचारले. मी म्हटले, 'खोटे काय सांगितले? तुम्ही ज्याला गुन्हे समजता त्याला मी गुन्हे समजत नाही, तर गुन्हे केले असे म्हणू कसे?' 'आमचे गुरु आहात झालं' म्हणू लागले।

## कराड लॉकअपमधील लढा

नंतर मग घरच्या माणसांना व वकिलांना भेट मिळाली. शिराळकर वकील भेटून गेले. भोवतालची घोंगडी काढून टाकल्यामुळे बाहेर पहाता येऊ लागले व जिवाची करमणूक होऊ लागली. नंतर चार दिवसानी इतर कैदी ठेवतात त्या लॉकअपमध्ये घेऊन गेले. माझ्या खोलीत पुण्याची दोन पोरे होती. मिळून आम्ही तिघे झालो. स्पेशल पहारे होतेच. इतर कैद्यांबरोबर रोज स्नान मिळू लागले व दाढीचे सामान ठेवण्यास मिळाले. पण बेड्या काढल्या नव्हत्या. झोपण्याच्या वेळीही ठेवत. माझी पहिली खोली होती. त्यामुळे स्नानास, शौचास जाता येता सर्वांच्या गाठी पडत. आपसात बोलू लागलो. ज्या लॉकअपमध्ये ठेवले होते त्या कोठड्यांची अगदी अक्षरश: नरकासारखी स्थिती होती. रात्री कैद्यांना बाहेर काढत नसल्यामुळे लघवी तेथेच कोपऱ्यात करावी लागे. रात्री शौचास बाहेर काढीत नसल्यामुळे अतिशय जोरात शौचास लागल्यावर एखादा त्याच कोपऱ्यात बसत असे. जेवण तिथेच, झोपणे तिथेच, ढेकूण तर इतके मनस्वी झालेले, जेवावयास बसले की वरुन पानात बदाबदा पडत. रोज जेवण तर इतके

बाईट मिळे की तोंडात घालणेही अशक्य! आमचे जवळ जवळ २५ लोक होते. मी, माधवराव जाधव, दिनकरराव निकम इंदोलीकर, खाशाबा सोमण, डेखण, भिकू पाटील, डेखण, पांडुरंग डेखण, डॉ. काळे, बी.बी. काळे, दिनकरराव घोणशीकर, बी.आर. नेर्लेकर, विलास फंदी, गुरव, फंदी, हणमंता फंदी, गोसावी, फंदी असे आणखी बरेच लोक होते. सर्वांचे डबे घरुन अगर खानावळीतून येत असत. माझाही डबा घरुन येऊ लागला. मी सर्वांना म्हटले की हे बरोबर नाही. आपण तुरुंग सुधारला पाहिजे. घरच्या लोकांना गरीबीत इतका जास्त खर्च कशाला? तेव्हा डबा बंद करा. मी आमचा डबा बंद केला. माधवरावांनी डबा बंद केला व तुरुंगावर रावसाहेब बेचलेकर म्हणून अधिकारी होते त्यांच्याकडे तक्रार केली. त्यांना हे नवीन होते. कैदी तक्रार करतात म्हणजे काय? मग त्यांनी दुर्लक्ष केले. आम्ही सर्वांनी एक वेळ अन्न घेतले नाही. मग रावसाहेब आले. तेव्हा सर्वांनी त्यांना स्वतःस अन्न खावयास लावले. मग अन्नात सुधारणा झाली. आमच्यात भिकू पाटील डेखणकर हुषार मनुष्य. शौचास गेले त्या वेळी त्यांनी एक उंदराचे पिल्लू मारुन आणले व मला दाखवले. मी त्याचा उपयोग करुन घ्यावयाचे ठरवले. त्यांना म्हटले, 'माझ्या खोलीपुढे ठेवा.' मुकाट्याने त्यांनी ठेवले व ते निघून गेले. चौकशीकरता थोडगे क्लार्क आले तेव्हा त्यांना मी सांगितले, 'हा प्लेगचा उंदीर आहे. माझ्या खोलीपुढे आला व गरगर फिरुन त्याने प्राण सोडला. त्यावर पिसवा आहेत.' ताबडतोब उंदीर डॉक्टरकडे पाठविण्यात आला. डॉक्टरकडून आलेला रिपोर्ट म्युनिसिपालिटीकडे. दुपारी २ वाजता सर्व जेलच्या कोठड्या धुण्यास म्युनिसिपालिटीच्या २५ लोकांची पार्टी हजर! कडक डी.डी.टी. च्या लोशनने खोल्या चौहोकडून धुऊन काढल्यावर ताबडतोब डिस्टेंपर व्हाईट वॉश देण्यात आला. सर्व फरशा घासून धुऊन काढल्या. कोपऱ्यात लघवीसाठी बंदिस्त कुंड्या देण्यात आल्या. सर्व खिडक्यांना तेलपाणी, सर्व खोल्या हवेशीर बंगल्यासारख्या झाल्या. ढेकूण, डास, पिसवा, नावसुद्धा राहिले नाही व पुढे आम्ही त्या अगदी स्वच्छ राखत असू. उदबत्त्या लावीत असू. त्यामुळे अगदी पवित्र वातावरण निर्माण झाले. सकाळी सर्वजण जेलमध्ये प्रार्थना म्हणत असू. रात्री राष्ट्रीय गाणी म्हणत असू. जेल पोलिसांवर आमचा दरारा असे. माधवरावांना पोलिस अतिशय भीत असत. ते अवखळपणा करीत. त्यांना फार त्रास होऊ लागला की ते माझ्याकडे तक्रार करीत. मग मी माधवरावांना समजावून सांगितले की ऐकत. त्यामुळे त्यांच्याबद्दल वशीला लावावयाचा असला की माझ्याकडे धाव घ्यावयाची असा एक अलिखित संकेत ठरल्यासारखाच असे. सर्व गुन्ह्यांची जबाबदारी मी घेतल्यामुळे बहुधा सर्व केसमध्ये त्यांना व मला नेण्यात येईच. वरच्या सर्व गोष्टी करत असता एक आपत्ती ओढवली ती म्हणजे प्लेगचे इनॉक्युलेशन सर्वांना मुकाट्याने करुन घ्यावे लागले. सर्वांनी करुन घेतले. माधवराव करुन घेईनात. मग मला तेथे नेऊन कशी तरी त्यांची समजूत काढून त्यातून पार पडलो. केसीसबद्दल आम्हाला कधीच काळजी वाटत नसे. त्या प्रॉसिक्यूटरना म्हणत असू, जर आम्हास

फाशी झाली नाही तर तुमचे हे सर्व करणे व्यर्थ! एकदा सातारला घेऊन आले. तेथील तुरुंगात बऱ्याच सुखसोई होत्या. न्याहारी मिळत होती. सणावारास मिष्टान्न अगर मटण आणि सूत काढण्यास चरखे! परत कराडला आणल्यावर आम्ही ही चळवळ सुरु केली. पुन्हा दिवसभर अन्न कोणी घेतले नाही. त्यामुळे पुन्हा न्याहारी व सणावारास मिष्टान्न मिळू लागले. हे आम्ही हट्टाने मिळवतो ते वरच्या अधिकाऱ्यांना खपेना. त्यांना कमीपणा वाटू लागला. वरचे जेलचे अधिकारी म्हणजे मामलेदार वल्लीभाई प्रांत. तेही वरचेवर येऊ लागले व मिठ्ठास बोलू लागले. आम्हीही गोड बोलत असू; पण कधी तत्त्व सोडत नसू.

एकदा रात्री डी.आय.जी. युरोपियन अधिकारी आला. क्रिमिनल असत ते हात जोडून साहेब आम्हांला विनाकारण पकडून आणले आहे असे म्हणून काही विनंत्या करीत. तो सर्वांच्या खोल्या पहायला आला. नंतर माझ्या खोलीपाशी आला. मी स्वस्थ पडून होतो. हातात बेड्या होत्याच. शेलार सब इन्स्पेक्टर व वरताड इन्स्पेक्टर त्यांच्याबरोबर होते. रात्री आठची वेळ होती. त्यांनी माझ्यासंबंधीची हकिकत सांगितली. त्याने कंदिलाचा व बॅटरीचा उजेड माझ्या तोंडावर पाडला. मी हालचाल काही केली नाही. पुन्हा तो मोठ्याने ओरडला, 'ऊठ, ऊठ' मी उभा राहिलो. तो सारखा नाचू लागला व म्हणाला, 'याला गोळी का घातली नाही? मी पाहून घेतले असते पुढे काय झाले असते ते.' सारखा रागाने पाच मिनिटे माझ्याकडे पाहात होता. नंतर निघून गेला.

## चरख्यासाठी उपोषण

माधवराव, दिनकरराव व मी असा विचार केला की आपण सूत कातण्यास लॉकअपमध्ये चरखे मिळवू या. वेळ कसा तो जात नाही. वाचणार किती? लिहिणार किती? गप्पा मारणार किती? सकाळी सहाला उठत असू, साडे सहाला शौचमुखमार्जन स्नान, नंतर मेहनत, वाचन, लेखन, नाश्ता पुन्हा जेवण, दुपारी वेळ खूप राही. तेव्हा चरख्याची मागणी आम्ही सुरु केली. वरच्या अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले. नंतर आम्ही संध्याकाळचे जेवण घेतले नाही. रात्री वाटाघाटीसाठी अधिकारी जमले. त्यांनी सांगितले, 'लॉकअपमध्ये चरखा देता येत नाही. कायदा नाही. नियम नाही.' आम्ही सांगितले, 'हा अन्याय आहे. येरवड्यास मिळतो. साताऱ्यास मिळतो. येथे का मिळू नये?' त्याना काही उत्तर देता येईना. फक्त कायद्यावर ते बोट ठेवू लागले. आम्ही सांगितले, 'असला अन्यायी कायदा आम्ही मानीत नाही.' एक दिवस गेला. डॉक्टर सर्वांना सकाळी-संध्याकाळी येऊन तपासत असत. सर्व लोक अशक्त होऊ लागले. नाड्या क्षीण होऊ लागल्या. दुसऱ्या दिवशी वल्लीभाई आले. गोड बोलून आम्ही ऐकत नाही म्हटल्यावर त्यांनी दम भरला, 'पाहून घेतो कसे तुम्ही ऐकत नाही ते. खटले भरतो.' पण याला कोण भिणार? माधवरावांचे व त्यांचे फारच झाले व प्रकरण नेटास लागले. उपोषणाचा तिसरा दिवस सुरु झाला. कित्येकांना वांत्या सुरू झाल्या. प्रकृति क्षीण

झाल्या. मी स्नानास निघालो त्या वेळी दिनकरराव म्हणाले, 'मालक, सर्वांना उपास निभतील असे नाही.' मी म्हटले, 'ठीक आहे. आपण असे करु, डॉक्टर आज घाईस येणार तेव्हा ते मला तुम्हां सर्वांकडे घेऊन येतील. मी तुम्हा सर्वांना आग्रह करीन व तुम्हा सर्वांचा प्रतिनिधी म्हणून मी उपवास करीन. तुम्ही उपास सोडा.' बेत व्यवस्थित ठरला. ठरल्याप्रमाणे ९ वाजता डॉक्टर आले. सर्वांच्या तब्येती पाहिल्या व घाबरले. मला म्हणाले, 'हे काय चालवलेत? तुम्ही सांगितलेत तर सर्व उपवास सोडतील.' मी म्हटले, 'मी सर्वांना सांगतो पण मी मात्र चरखा मिळेपर्यंत प्राणांतिक उपोषण करणार आहे.' डॉक्टरांना त्यातल्या त्यात बरे वाटले. चाळीस माणसांच्या प्रकृतीची काळजी करण्यापेक्षा एका माणसाच्या प्रकृतीवर लक्ष ठेवणे सोपे. असे ठरल्यावर मी व डॉक्टर प्रत्येकाच्या कोठडीपाशी जात असू व सर्वांना समजून सांगत असू. तेव्हा शेवटी नाईलाजाने सर्वांनी कबूल केले व उपोषण सोडले. माझे मात्र राहिले. नंतर चौथा दिवस गेला, पाचवा दिवस गेला. माझी प्रकृतीही अतिशय क्षीण होऊ लागली. मुंबईशी सारखी तारातारी सुरु झाली. सहा दिवस उपोषण झाले. अंथरुणावरून उठणे अशक्य झाले. वांत्या होऊ लागल्या. माझी खोली सर्वांना भेटण्यासाठी मोकळी ठेवली. नंतर चारच्या सुमारास नानासाहेब देशपांडे भेटण्यास आले व पंधरा मिनिटे बसले. माझा निश्चय ढळण्यासारखा नव्हताच. त्यामुळे कोणी समजावण्याच्या भरीस पडत नसे. शेवटी ते उठून जाऊ लागले. मी सर्वांना नमस्कार केला. इतक्यात धावत पोस्टातून तार घेऊन शिपाई आला व चरखे देण्यास मुंबई सरकारने हुकूम दिल्याची तारच आणली. ताबडतोब सर्व जेलमध्ये आनंदी आनंद झाला. डॉक्टर आले व नानासाहेब यांच्या हस्तेच मोसंब्याचा रस देण्यात आला. याप्रमाणे संपूर्ण सात दिवस उपोषण होऊन आठव्या दिवशी यशस्वी रीतीने त्याची परिसमाप्ती झाली व सर्वांना सूत काढण्यास चरखे देण्यात आले. जेलमध्ये चरखे फिरु लागले. सरकारी अधिकाऱ्यांनी पाहिले की यांना कराडला ठेवणे योग्य नाही म्हणून साताऱ्यास हलविण्यासंबंधी वाटाघाटी होऊन साताऱ्यास नेण्याचे ठरले.

## साताराच्या जेलमध्ये

एक दिवस प्रमिलाबाई बेळगावाहून दुपारी २ च्या सुमारास भेटण्यास आल्या. त्या बेड्या व दोरांनी करकचून आवळलेले पाहिल्याबरोबर त्यांना घेरीच आली. त्यांना ते दृश्य पाहवलेच नाही. पुन्हा मी सावध केले. सुमारे अर्धा तास गप्पा मारल्या. नंतर त्यांच्या स्वतःसंबंधी कुशल विचारल्यावर व हल्ली सर्व ठीक आहे, सर्वांचा राग कमी झाला आहे म्हटल्यावर मलाही बरे वाटले व कामत सुटल्यावर आम्ही लवकरच विवाहित होणार म्हणून त्यानी सांगितले. मी ठीक आहे म्हणून सांगितले. त्या गेल्यानंतर आम्हास साताऱ्यास घेऊन गेले. साताराचा जेल फार मोठा व तेथून नागनाथ पळून गेलेला. तेव्हा पुष्कळसे विचार डोक्यात घोळू लागले. आम्हा चौघास साताऱ्यास

आणले. मी, माधवराव, बी.बी. काळे व डॉ. काळे. सातारच्या जेलचे दोन विभाग आहेत. रस्त्यावरुन मोठा दरवाजा दिसतो. तिथून आत गेले की समोर किचनरुम (भिशी) आहे व डाव्या हातास जेलरचे ऑफिस आहे व त्यास लागून स्टोअररुम आहे. तेथून मोठ्या बराकी आहेत. पाण्याचा हौद आहे, बाग आहे व जेलरच्या ऑफिसच्या डाव्या हातास तीन स्वतंत्र खोल्या आहेत. बाहेर मोकळी जागा आहे. स्वतंत्र नळ, संडास आहे. त्या संडासच्या पाठीमागे भिंत आहे. तेथून खालच्या बराकीच्या लोकांशी बोलता येते. आम्ही गेलो ते आम्हाला बराकीत स्वतंत्र खोल्या होत्या त्यात घालण्यात आले. एका खोलीत फर्स्ट क्लास डेटेन्यू (स्थानबद्ध) लक्ष्मणराव कोकरुडकर इनामदार व खडके पोलीस होता. दुसऱ्या खोलीत आम्ही चौघे व तिसऱ्या खोलीत ठाकूर फौजदार व दोन कॉन्स्टेबल होते. त्यांच्यावर काही प्रकरण आल्यामुळे त्यांना अटक करुन आणले होते. कराडहून स्पेशल पोलीस लॉरीतून आम्हा चौघास साताऱ्यास आणले. दरवाजातून आत जेलरच्या ऑफिसमध्ये नेले. आत नेल्याबरोबर जेलरने माझ्याकडे रोखून पाहिले व 'उपोषण करणारे तुम्हीच नाही का?' म्हणून विचारले. मी सांगितले, 'होय मीच तो.' नंतर कपडे दिले. मग थाळी, पॉट, पांघरण्यास रग, अंथरण्यास रग असे सामान मिळाले. या जेलमध्ये सोयी बऱ्याच आहेत. जेलभोवती उंच तट आहे. सर्वत्र पहारे आहेत. सकाळी सात वाजता कुलूप काढतात. ते पुन्हा बाराला घालतात. पुन्हा चारला कुलूप काढतात ते सातला लावतात. म्हणजे आठ-नऊ तास कैदी मोकळा असतो. त्यामुळे स्नान, शौचमुखमार्जन, दाढी, कपडे धुणे, बागकाम करणे, आवारात हिंडणे व्यवस्थित होई. आम्ही हुतूतूचा डाव खेळत असू. सकाळी नेहमी मेहनत करीत असू. तेथे गेल्यावर आम्ही एक नवीन गोष्ट शिकलो. डॉक्टरचे सर्टिफिकेट मिळविल्यावर एक शेर दूध मिळते. मग काय विचारता? सर्वांनी दुधाची परवानगी मिळवली. त्यामुळे आमच्या खोलीत तीन शेर दूध येत असे. मी काही दूध मागितले नाही. आम्ही सर्वजण एकमेकांचे घेत असू. सकाळी न्याहारीच्या वेळी गूळ, शेंगा. शिवाय कुणाच्या ना कुणाच्या भेटी सारख्या यावयाच्याच त्यामुळे खाण्यास कधी कमतरता नसे. बाकीच्याना आठवड्यातून एकदोन वेळा मटण, आम्हास चपाती वगैरे मिळे. जेलमध्ये उन्हाचा संबंध नसल्याने प्रत्येकजण गोरापान, मेहनत करण्यामुळे तगडा व खाण्यामुळे व विश्रांतीमुळे जाडज्याजाड झाला. केसीसच्या निमित्ताने वरचेवर कराडला आणत असत. एकदा आम्हास भेटण्यासाठी अच्युतराव पटवर्धन कराडला आले होते. मग त्याना कोठडीत आणून बसवले. नंतर कोठडीतील सर्व लोक एकत्र करुन बराच वेळ गप्पा झाल्या. ते मला म्हणाले, 'तुम्ही पॅरोलवर बाहेर चला. बाहेर तुमची मला फार जरुर आहे.' मी सांगितले, 'मी एकटा बाहेर येण्यास तयार नाही. आमच्या सर्व लोकांसह पॅरोलवर बाहेर घेत असाल तर आम्ही बाहेर येतो.' ते शक्य नव्हते. त्यामुळे सर्वांनी खूप वेळ गप्पा मारल्या. आम्ही सर्व कडकडून भेटलो. ते निघून गेले नंतर दुसऱ्या दिवशी आम्ही साताऱ्यास निघालो. हातात बेड्या, दोरखंडाने

आवळलेले. इतक्यात श्रीरंग कामत व प्रमिलाबाई दोघे भेटावयास आले. मला या अवस्थेत पाहून त्यांना आश्चर्य वाटले ते म्हणाले, 'कर्नाटकात अशा तऱ्हेने आम्हास वागवत नव्हते.' मी हसून म्हटले, 'हा सातारा आहे.' ते म्हणाले, 'हो खरंच की, मी विसरलो होतो.' म्हणून आम्ही सर्वच हसू लागलो. क्षेम समाचार विचारल्यावर त्यांनी विवाहित होणार म्हणून सांगितले. मी म्हटले, 'आमचे शुभाशीर्वाद आपल्या पाठीशी आहेत.' नंतर आम्हास मोटारीत घालून लगेच सातारला आणण्यात आले. ते बेळगावला परत निघून गेले.

## ठाकूर फौजदाराला ठोकले

सातारला आम्ही आल्यापासून आमच्या पाठीमागे बापूराव कचरे, बाबूराव घोरपडे मास्तर वगैरे लोकांचा तगादा लागला, 'ठाकूर फौजदाराला ठोका.' मी म्हटले, 'भल्या गृहस्था हे काय? उगीचच्या उगीच ठोका. याला काही अर्थ आहे की नाही?' ज्या ज्या राजकीय कैद्यांना त्याने ठोकले होते, त्यांना आणून त्यांच्यापुढे उभे केले व लोकांच्या ढुंगणाची कातडी निघेपर्यन्त, रक्तबंबाळ होईपर्यन्त मारले होते ते सर्व दाखवले. आम्ही त्याला मारु म्हणून तिकडच्या कोठड्यात त्याला ठेवले होते म्हणूनही त्यांनी सांगितले, नाहीतर आम्ही येऊन त्याला ठोकणार तेव्हा म्हटले, 'तुम्ही तसे करु नका. आम्हीच काहीतरी निमित्त काढून ठोकतो. फक्त चार दिवसांची संधी द्या.' त्याप्रमाणे निश्चित ठरले. आमच्यात माधवराव, डॉ. काळे हुषार. त्यांना म्हटले, 'अशी कामगिरी आली आहे.' ते म्हणाले, 'मग विचार कसला? पार पाडावयाची.' 'ठीक आहे.' मी म्हटलं. मग आम्ही योजना आखू लागलो. शेवटी असे ठरले : ठाकूर फौजदाराला सिगारेटचे व्यसन होते. फर्स्ट क्लास डेटेन्यू म्हणून कोकरुडकर इनामदार यांना सिगरेट ओढण्याची परवानगी होती. तेव्हा सिगरेट ओढण्यास खडके पोलिसाने आमच्या कोठडीत त्यास आणावे व सिगरेट ओढण्यास द्यावी. माझ्या अंथरुणावर त्यास गप्पा मारीत बसवावे आणि मी बागेत काम करावे व गप्पा रंगात आल्यावर तेथे येऊन माझ्या अंथरुणावर का बसलात म्हणून ठोकावे. मग सोडवण्याच्या निमित्ताने सर्वांनी सामील व्हावे. याप्रमाणे योजना ठरल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी मी शौचमुखमार्जन केले व बागेत काम करीत बसलो. खडके यांनी ठाकूर फौजदाराला बोलावून आणले. इनामदार यांनी त्याला सिगरेट दिली. आमच्या खोलीत माझ्या बैठकीवर तो गप्पा मारण्यात दंग झाला. इनामदारांना धैर्य झाले नाही. मला खूण केली व आपण शौचास पळाले. मी सरळ कोठडीत गेलो तर हा गृहस्थ गप्पा मारीत होता. मी गेल्याबरोबर विचारले, 'हे गृहस्थ कोण?' डॉ. काळे म्हणाले, 'ठाकूर भाऊसाहेब.' 'माझ्या अंथरुणावर का?' म्हणून मी चप्पल काढली व ठोकावयास आरंभ केला. तो गृहस्थ बोंबलला. सर्वांनीच मारण्यास सुरुवात केली. त्यांच्याबरोबरचे शिपाई त्याला सोडवण्यास येईनात. त्यांना वाटले, हे आपल्याला देखील ठोकतील. जेलचा शिपाई आला, परंतु त्याची पुढे

येण्याची हिंमत झाली नाही! 'अहो मारू नका.' एवढे ओरडू लागला. बराच मारल्यावर डेंजर बेल झाली. सर्व जेलमध्ये आरडाओरड, गोंधळ सुरू झाला. इतक्यात जेलर आल्यावर सर्व शांत झाले. जे ते आपापल्या खोलीत गेले. नंतर त्यांनी ठाकूर फौजदाराला बोलावून घेतले व सर्व हकिकत विचारली. त्याने सर्व ती खरी हकिकत सांगितली. त्यात त्याच्या दोन गोष्टी बेकायदेशीर होत्या. एक सिगरेट ओढणे व दुसरी आपली खोली सोडून दुसऱ्याच्या खोलीत जाणे. त्यामुळे त्याला कायदेशीर काही करणे कठीण होते. तथापि जेलरने त्याला आपल्या पाठीशी घातले व 'डॉक्टरचे सर्टीफिकेट देतो,' असे त्याला सांगितले. तो उघडाच असल्यामुळे त्याच्या मांडीवर, दंडावर, पाठीवर, तोंडावर चपलांचे वण उठून आले होते व काळे, निळे झाले होते. फौजदार फार भ्याला होता. जर मारणारावर केस करावी तर हे जिवंत तरी मारतील किंवा हातपाय मोडून कायमचे जायबंदी तरी करुन ठेवतील म्हणून तो केस करण्यास धजेना. त्याला पुन्हा परत पाठवले व मला बोलावून घेतले व म्हणाला, 'मिस्टर, मी तुम्हांला सज्जन समजत होतो. हे तुम्ही का केले?' मी सरळ सर्व हकिकत सांगितली. 'या गृहस्थाने मारलेले लोक येथे आहेत. याने खूप अत्याचार केला आहे. याने जनावरासारखे मारलेले आमच्या लोकांनी दाखवताच मला राग आला. तो मी सारखा आवरुन धरत होतो; पण हा गृहस्थ माझ्या खोलीत येऊन माझ्या अंथरुणावर बसलेला मी पाहिला, शिवाय सिगरेट ओढीत होता, माझा राग अनावर झाला व मी त्याला ठोकले. मी एकट्याने मारले आहे. बाकीच्यांचा संबंध नाही. हे मुद्दाम घडवून आणले आहे असे तुम्ही समजत असाल तर समजा.' पुन्हा माझ्यासमोर ठाकूर फौजदाराला बोलावून आणले. त्याच्यासमोर मला विचारले. मी खरी परिस्थिती सांगितली. त्यात लबाडी काही नव्हतीच. तेव्हा जेलर पुन्हा संतापला व म्हणाला, 'ठाकूर, केस द्या.' त्याने सांगितले, 'मी केस देणार नाही.' तेव्हा जेलर म्हणाला, 'मी देईन. मग तरी तुम्हांस सर्व सांगावे लागेल की नाही.' त्याबरोबर फौजदार म्हणाला, 'मी स्वच्छ सांगेन, मला या गृहस्थाने मारले नाही. मी पडलो व मला लागले.' मी जागेवरुन लागलीच उठलो व फौजदारांना कडकडून भेटून सांगितले, 'तुम्ही आम्ही आता दोस्त झालो व माझ्या मनातील तुमच्याबद्दलचा राग गेला आहे.' लागलीच त्यांच्या हातास धरुन बाहेर आणले. आम्ही सर्व एकत्र जमलो व झाले गेले विसरुन जाण्याचे ठरवले. दोन दिवसानी जेल कमिटी तपासण्यास आली. त्यांच्यापुढे जेलरने तक्रार केली. मला दाखवले, ठाकूर फौजदाराला दाखवले. जज्जसाहेब यांनी तक्रार करा म्हणून सांगितले; पण फौजदाराने तक्रार न केल्यामुळे सर्वांना स्वस्थ बसावे लागले. त्यांनी ही बातमी गुप्त ठेवली. पण आम्ही जेलमधून बातमीपत्र बाहेर पाठवल्यामुळे सर्व वर्तमानपत्रातून ही बातमी आली. मात्र जेलर खूपच संतापला आणि ही बातमी बाहेर कशी गेली म्हणून चौकशी करता आम्ही कानांवर हात ठेवून मोकळे झालो.

# माधवरावांची चलाखी!

आमच्यात अत्यंत हुषार, बेमालूम काम करणारे म्हणजे (मग ते कोणतेही असो) माधवराव! त्यांची पोलिसांनाही फार मोठी दहशत होती. पोलिस त्यांना त्रास देत म्हणून तेही त्यांना अतिशय त्रास देत. दारे जोरात ठोठावणे, पोलिसांच्या अंगावर धावून जाणे, जेवणाची थाळी फेकून मारणे, नेहमीच चाले. त्यामुळे शौचाला जाऊन परत स्नान करुन पुन्हा कोठडीत घालेपर्यन्त पोलिसांच्या जिवात जीव नसावयाचा. पहाऱ्यावरचा एक पोलिस त्यांना त्रास देई. तो एकदा रात्री पहाऱ्यावर आला असता त्याचा डोळा लागला. त्यानी नजर ठेवली व बेड्यांचा आवाज न होऊ देता त्याच्या नकळत माधवरावांनी त्याची संगीन बरोबर काढून घेतली. सकाळी त्याला हे कळले नाही. पुढे काही वेळाने त्याच्या लक्षात आले. पण माधवरावांना कोण विचारणार? नंतर तो म्हणाला, 'माधवराव, माझी संगीन आहे काय?' 'मला माहीत नाही.' ''झडती घेऊ?'' 'आत तरी या म्हणजे एकेकाचा मुडदाच पाडतो.' आत शिरण्याची कोणाची छाती होईना. सुमारे एक दोन तास झाल्यानंतर मग एका हवालदाराने एक युक्ती काढली व माझ्याकडे तो येऊन गयावया करुन रडू लागला व 'माझी नोकरी आता जाईल. तेव्हा कसेही करुन माधवरावांची समजूत काढा व संगीन परत देण्यास सांगा.' मला त्याची दया आली व मी म्हटले, 'मला तरी माधवरावाकडे न्या, नाहीतर त्यांना तरी माझ्याकडे घेऊन या.' त्यांना माझ्याकडे आणून धोका पत्करण्यापेक्षा मला बाहेर काढून खोलीपर्यंत नेले. मी त्यांची समजूत काढली व संगीन परत नेऊन देवविली. आमच्याजवळ संकेत आहे. आम्ही कोणी कोणाचे मोडत नाही, एकमेकांचा आदर करतो, प्रेम, विश्वास वाढवतो. तसेच त्यांना आणखी एक शिपाई त्रास देत असे. स्नानास कैदी बाहेर काढीत. त्यानी जाताना त्याच्या नकळत कोठडीच्या लाकडावर किल्ल्यांचा जुडगा राहिला. त्याने शोधलाही खूप, पण त्याला मिळाला नाही. माधवराव म्हणाले, 'किल्ल्यांचा जुडगा देतो. माझ्या पायातील बेड्या काढ. रात्री झोपताना मला त्रास होतो.' ही गोष्ट त्याच्या कक्षेतील नव्हती. पुढे त्यांची समजूत काढून तो जुडगा शिपायास परत देण्यास लावला. काही दिवसांनी पायातल्या बेड्या काढण्यात आल्या व हळूहळू चांगले वातावरण निर्माण होऊ लागले.

# पलायन रहित

सातारला आमच्या डोक्यात कल्पना आली. आपण जेल फोडून निघून जावे. माधवरावांनी या गोष्टीस मान्यता दिली. लगेच त्या दिशेने विचार सुरू झाले व योजना निश्चित केली. आमच्या बराकीच्या दक्षिणेचा तट आतील बाजूने उंच होता, पण पलीकडच्या बाजूने अगदी जमिनीस लागून होता. तेव्हा त्या तटावरून निघून जावयाचे असे ठरवले. पण दारास कुलुपे आणि पहारेकरी! तपास करुन कुलुपाच्या किल्ल्या आणावयाच्या; पहारेकरी ६ वाजता परत जातात, ७ वाजता शिपाई दार उघडण्यास

येतो, तर ६ ते ७ या वेळात सटकावयाचे। कुलुपाची किल्ली कशी तयार करावयाची ही चिंता। मग पहारेकरी शिपायांचा स्नेह संपादन करुन त्याच्याबरोबर पत्ते खेळण्याचा डाव चालू केला। थोडी दंगामस्तीही चालू केली. आम्हा तिघा-चौघांची दंगामस्ती सुरू झाल्यावर माधवरावानी त्याची नजरबंदी करुन किल्ल्याचा जुडगा असा उडवला की, शिपायाच्या ते लक्षात आले नाही। माधवरावानी तो खोलीबाहेर नेऊन ओल्या साबणावर त्या किल्लीचा शिक्का बरोबर उठवला व परत खोलीत किल्ल्या उडवीत आले। शिपायाच्या काही ते लक्षात आले नाही. तो साबणावरचा ठसा भाऊसाहेब पालकर यांच्याकडे कराडला पाठवला. त्यानी बेमालूमपणे जेलमध्ये भेटीच्या वेळी भाकरीबरोबर ती किल्ली पाठवली! जेलर जरी अन्न तपासत असले तरी ती भाकरीत बेमालूम बसवली होती। ती त्यांच्या लक्षात येणेच शक्य नव्हते.

मी रात्री किल्ली चालवून पाहिली. कुलूप ताबडतोब निघाले व नंतर बसवलेही. मी माधवरावांना दाखवले. त्यानीही ते काढून बसवून पाहिले, नंतर आता पळण्याचे निश्चित करावयाचे असा बेत करतो तो दुपारी गाडेकर इन्स्पेक्टर जेलमध्ये आले, त्यानी मला बोलावून घेतले व विचारले, 'तुमचे धोरण यापुढे काय राहणार?' मी म्हटले, 'पुढे केव्हा?' ते म्हणाले, 'बहुतेक ८ - १५ दिवसात तुम्हाला सोडतील. त्याप्रमाणे सर्व वाटाघाटी सुरू आहेत. तेव्हा मुद्दाम भेटावयास आलो आहे.' मी म्हणालो, 'जे आमच्या काँग्रेस पुढाऱ्यांचे तेच आमचे। आमचे असे स्वतंत्र काही नाही. मग बाहेरच्या इतर गप्पा झाल्या. साने गुरुजींचा दौरा झाल्याचे तसेच आमचा गौरवपूर्ण उल्लेख केल्याचेही त्यांनी सांगितले. मग मी पुनः परत येऊन माधवरावांना सर्व हकीकत सांगितली. तेव्हा दोघांच्या विचाराने असे ठरले : आता तुरुंगातून पळणे किंवा अन्य काही प्रकार करू नयेत. म्हणून मग तो बेत रहित करून डोक्यातील ते विचार सोडून दिले आणि आता सुटका किती दिवसात होते याचा विचार सुरू झाला.

## जनताद्रोह्यांचा बंदोबस्त

दर स्वातंत्र्यादिवशी (२६ जानेवारी) दरसाल एक बुलेटिन काढीत असू. आजपर्यंत काय काय कामे केली व ती करण्यास कारणे काय झाली? उद्देश काय? व पुढे आमचे धोरण काय राहील याचे ते अधिकृत पत्रक असे. आमच्या जवळ बुलेटिन काढण्याचे मशिन होते. त्यामुळे १५०० ते २००० प्रती काढून त्या सर्व जिल्हाभर वाटीत असू. त्याचप्रमाणे बौद्धिकाचा काही भाग मिळावा म्हणून निरनिराळ्या विषयांची चर्चा व विशेष बातम्या असतील त्या बातम्यांचाही त्यात समावेश असे.

२६ जानेवारीला पत्रक काढीत असताच बाबूजी पाटणकर मूळव्याधीने आजारी झाले. अतिशय रक्त पडू लागले. मग त्यांना वाटेगावी ठेवून मला स्वतःलाच तेथे रहावे लागले. जवळ जवळ १५ दिवस वाटेगावी होतो. शेवटी देशी उपचाराने मूळव्याध काढावी असे ठरले. म्हणून केशवराव चांदुगडे यांना कराडहून बोलावून आणले. त्यांनी

औषध मोडास लावले व ते ताबडतोब परत गेले. औषधामुळे अतिशय त्रास झाला. नंतर २-३ दिवस सारखे निरनिराळे उपचार केले. नंतर त्यांना थोडे बरे वाटू लागले. तो त्रास पुनः झाला नाही. कायमचा नाहीसा झाला.

१९४३-४४ च्या वेळी धान्याचा अतिशय तुटवडा पडला. सरकारने धान्यावर नियंत्रण बसवले. बंगालमध्ये दुष्काळाने हाहाःकार उडवून दिला. लाखो लोक मेले. कंट्रोलच्या दुकानातून वेळेवर व भरपूर धान्य मिळेना. लोक सारखे उपाशी राहू लागले. धान्याच्या दुकानावर सरकार जे धान्य, साखर देई त्यातील तो दुकानदार काळ्या बाजाराने विके व पुन्हा सर्वत्र ओरड होई. माणसे सोन्याच्या दागिन्यासारखे साखर कुलुपात ठेवू लागले. खेडोपाडी गुळाच्या चहाचा सपाटा सुरू झाला. शेतकऱ्यांवर लेव्ही बसली व त्यांच्याकडून सक्तीने धान्य वसुली सुरू झाली.

प्रत्येक माणशी धान्याचे जे प्रमाण सरकारने ठरवून दिले होते ते अपुरे होते. त्यामुळे लोकांना बाहेरुन काळ्या बाजाराने धान्य मिळविण्याशिवाय गत्यंतर नव्हते. त्यामुळे कोठून ना कोठून माणूस धान्य पैदा करी. असे धान्य आणताना कोणी सापडले तर त्याच्याकडून सरकारी लोक पैसे उकळीत व नंतर त्याला सोडत. कोकणातील लोक तर उपाशी मरु लागले. मग आम्ही गाड्यांचे तांडेच्या तांडे आमच्या बंदुकांच्या संरक्षणाखाली कोकणात नेऊन पोचवीत असू. त्यामुळे तो भाग आम्हास दुवा देई. वाटेत गाववार ठेवलेले जे जे राखणे, रामोशी, पाटील, तलाठी त्रास देतील त्यांना जाऊन ताकीद देत असू. कासेगावी टगे व रामोशी लोकांना त्रास देत. वरचेवर धान्याच्या गाड्या अगर गाठोडी अडवणे, त्यांच्याकडून पैसे उकळणे असा त्रास होई म्हणून एक दिवस पाचुंब्रीहून चार दोन हत्यारी माणसे बरोबर घेऊन आलो. तो स्टँडवर, सडकेवर हे लोक पत्त्याने जुगार खेळत बसले होते व कोणी माणूस अगर गाडी सापडते का याची वाट पहात होते. मग त्यांना पकडून शिक्षा केल्या व पुन्हा असे करणार नाही म्हणून हमी घेतली व आणखी कोण कोण हे धंदे करते, त्यांची चौकशी करुन त्या सर्वांना ताकीदी दिल्या. त्यामुळे त्यांचा कायमचा त्रास बंद झाला. राजरोस सर्व धान्य सर्वत्र जाऊ लागले व गोरगरीब पोटभर खाऊ लागले. वाझरचा पांडू रामोशी हा स्वतःस पांडू मास्तर म्हणवून घेऊन अनोळखी लोकांना फसवत असे. सर्व गावात सेवादले सुरु झाल्यामुळे तरुण मुलांची काम करण्यास कधीच वाण पडत नसे व मागे मी सांगितल्याप्रमाणे नुसते नाव सांगितले की कोणत्याही गोष्टीस सहाय्य मिळायचे. खराडे गावची बरीच मुले काम करण्यास तयार झाली होती. एके दिवशी रात्री १० वाजण्याच्या सुमारास खराड्यांच्या मुलांना निरोप आला. पांडू मास्तर आले आहेत व आर्वीस ॲक्शन करता जावयाचे आहे. ताबडतोब २५ -३० मुले भाले व कुऱ्हाडी घेऊन तयार झाली व माळावर आली. त्यांच्या ओळखीचे पांडू मास्तर नव्हते! त्यांनी नंतर त्या तोतया पांडू मास्तराचा बंदोबस्त केला.

शामुको.- वाय ५९-११०५ पु. अ५*९-२०२२

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई